# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# इतिहास लेखनातील नवे प्रवाह
## (Recent Trends in History Writing)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग २**

**इतिहास**

Compulsory : Paper 401

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (इतिहास लेखनातील नवे प्रवाह)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-37-3

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■


अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८–१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग–२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''इतिहास लेखनातील नवे प्रवाह'' या विषयाचे स्वयं:अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९–२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं:अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

इतिहास लेखनातील नवे प्रवाह या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये इतिहासाचे नवे आकलन, इतिहास आणि सहाय्यकारी शास्त्रे, इतिहासातील नवीन दृष्टीकोन, नवी साधने इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
हातकणंगले

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(इतिहास लेखनातील नवे प्रवाह)**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ४०१ (आवश्यक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. निरंजन कुलकर्णी**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले | १, २ |
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>इतिहास विभाग प्रमुख, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ३, ४ |
| **प्रा. मुफीद मुजावर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. निरंजन कुलकर्णी**
मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
हातकणंगले

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | इतिहासाचे नवे आकलन | १ |
| २. | इतिहास आणि सहाय्यकारी शास्त्रे | १९ |
| ३. | इतिहासातील नवीन दृष्टीकोन | ८० |
| ४. | नवी साधने | ११२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक-१

# इतिहासाचे नवे आकलन
# (The New Understanding of History)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ विभाग १ : इतिहासाच्या बदलत्या संकल्पना

  १.२.२ विभाग २ : सांस्कृतिक इतिहास

  १.२.३ विभाग ३ : उत्तर आधुनिकतावादाचा परिणाम

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

- इतिहासामधील बदलत्या संकल्पना स्पष्ट होतील.
- 'सांस्कृतिक इतिहास' ही संकल्पना, तिचा विकास आणि महत्व समजून येईल.
- उत्तर आधुनिकतावाद ही संकल्पना स्पष्ट होईल, आणि तिचे इतिहासाला असलेले योगदान स्पष्ट होईल.

## १.१ प्रास्ताविक

''इतिहास म्हणजे कला'' ते 'इतिहास म्हणजे शास्त्र; दुसरे तिसरे काही नाही' हा प्रवास तीन-चार

शतकांचा आहे. त्यानंतर, इतिहास म्हणजे राजकारणाचाच अभ्यास या संकल्पनेमध्येही बदल होत, आता संस्कृतीच्या सर्व अंगाचा अभ्यास व्हावा अशी अपेक्षा इतिहासाकडून होत आहे. तर दुसरीकडे, इतिहासाच्या निश्‍चित धारणेवरच प्रहार करण्याचे काम उत्तर आधुनिकतावादी विचारवंत करीत आहेत. या सर्वांची चर्चा या घटकांमध्ये आपल्याला करायची आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ विभाग १ : इतिहासाच्या बदलत्या संकल्पना (Changing Concepts of History)

फार पूर्वी, 'इतिहास' हा साहित्याचा-कलेचा भाग असे. पुढे, १८ व्या शतकातील प्रबोधनयुगानंतर, इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. विज्ञानातील प्रगतीमुळे, मानवी बुध्दीला महत्व प्राप्त झाले. वैज्ञानिक दृष्टिकोनाबरोबरच, मानवाच्या तार्किक बुध्दीवर विश्‍वास वाढू लागला. यातूनच, 'पुराव्याच्या आधारेच इतिहास लिहावा' हा दृष्टिकोन मजबूत होऊ लागला. पुढे, २० व्या शतकाच्या सुरुवातीलाच, 'इतिहास हे शास्त्रच आहे; दुसरे तिसरे काही नाही' असे म्हंटले जाऊ लागले. 'पुरावे' आणि 'शास्त्रीय पध्दती' यांना इतिहासात महत्व प्राप्त झाले. त्याचबरोबर, या दोन बाबी असल्या तर, गतकाळाचे संपूर्ण ज्ञान होऊ शकते असा आत्मविश्‍वास निर्माण झाला.

इतिहासामध्ये असे हे महत्वाचे बदल घडून येत होते. अर्थात, हा इतिहास मुख्यत्वे 'विशिष्ठ व्यक्ती आणि राजकीय घडामोडी' यांनाच केंद्रित धरुन लिहिला जात असे. याला छेद जेम्स रॉबीन्सन याने दिला. याने 'न्यू हिस्ट्री' ही संकल्पना मांडली (१९११).

रॉबीन्सनच्या मते, पारंपारिक इतिहासाचा मुख्य उद्देश हा 'विविध राजकीय घटना आणि त्या घडवलेल्या थोरांची कथा' सांगणे असा असे. नायक, खलनायक, कारस्थानं, युध्दं हे त्यातील प्रधान विषय असत. हे इतिहास नाटकांसारखे असत. या नाटकामध्ये काही मोजकी थोर माणसं मुख्य भूमिका वठवत असत. तर उरलेला सगळा समाज ही फक्त या नाटकातील साधनं असत. थोडक्यात, असा इतिहास करमणूकीसारखा असे. आपलं वक्तृत्व उठावदार व्हावं यासाठी इतिहासातील उदाहरणं देणे ही त्या काळी सवयच पडून गेलेली होती. असा इतिहास हा काहीच वर्षाचा होता; म्हणजे ज्यापासून मानव राजकारण करु लागला तेव्हापासून!

इतिहासाच्या या पारंपारिक उद्देशांचा तो एकंदर आढावा घेतो. प्राचीन काळातील पॉलिबियस हा विद्वान 'इतिहास म्हणजे पुढारी आणि लष्करी अधिकारी यांची मार्गदर्शिका असते' असे म्हणतो. तर, पुढे बॉलिंग ब्रुक म्हणतो की 'इतिहास म्हणजे उदाहरणांद्वारे शिकवलेले तत्वज्ञान' होय. अर्थात, रॉबीन्सन यावर

टिका करतो. तो म्हणतो की तसे असते तर नेपोलियनचा पराभवच झाला नसता! त्यामुळे, इतिहासातून काही 'शहाणपणाचे धडे' मिळतीलच असे नाही.

त्यामुळे, रॉबीन्सन म्हणतो की इतिहासामध्ये मानवी जीवनाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. आणि 'शहाणपणाचे धडे' घेण्यापेक्षा, ते जीवन कसे घडत होते याचा पुराव्याधारे अभ्यास करणे गरजेचे आहे. अर्थात, इतिहासकाराला, भूतकाळाची पुर्नबांधणी करताना, बऱ्याच मर्यादा येणार आहेत. कारण, साहित्य आणि कलेसारखे त्याला कल्पनेच्या भराऱ्या मारता येत नाहीत. अर्थात, हे नकोच आहे. त्याने, घटनांतील नाट्यमयता शोधण्यापेक्षा; गतकाळातील मानवी जीवनावर अधिकाधिक प्रकाश कसा टाकता येईल याचा विचार करायचा आहे. यासाठी, इतिहासकाराने, अधिकाधिक शास्त्रीयता आणण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे.

थोडक्यात 'न्यू हिस्ट्री' मध्ये, शास्त्रीय पध्दती असेल. त्याच्याजवळ जे पुरावे उपलब्ध होतील, त्यांच्या आधारेच तो बोलेल. फक्त सुसंस्कृत माणूसच नव्हे तर संस्कृतीच्या सर्व स्तरांतील माणूस हा इतिहासाचा अभ्यासविषय असेल. तसेच, फक्त घटनाच नव्हे तर मानवाने निर्माण केलेल्या विविध संस्थांचाही सुध्दा येथे अभ्यास होईल. माणूस राजकारण जेव्हापासून करु लागला, त्याअगोदर, लाखो वर्षांचा इतिहास मानवाला आहे. अशा मानवाच्या बऱ्याच दीर्घ कालखंडाचा इथे अभ्यास होईल. त्यासाठी, इतिहासकाराला मानवशास्त्र, मानसशास्त्र, तौलनिक शास्त्रे यांची मदत घ्यावी लागले.

थोडक्यात, मानवी जीवन, प्रागैतिहासिक काळापासून मानवाचा अभ्यास, घटनांबरोबरच मानवाने निर्माण केलेल्या विविध संस्थांचा अभ्यास, इतर शाखांची मदत, पुराव्यांवर भर, नाट्यमयतेपेक्षा सत्यावर शोध ही, 'न्यू हिस्ट्री' ची काही महत्वाची लक्षणे रॉबीन्सनने मांडली.

रॉबीन्सनच्या 'न्यू हिस्ट्री' संकल्पनेचा अधिक विकास हा १९६० नंतर झालेला दिसतो. दुसऱ्या महायुध्दानंतर, वैश्विक कथनांवरील विश्वास उडून गेलेलाच होता. यातून, 'उत्तर आधुनिकतावाद' या विचारसमूहांचा वेगाने उदय झालेला होता. साहित्यानंतर, आता 'इतिहास' हा विषय, यांच्या चर्चेचा बिंदू बनला. त्यांनी इतिहासाची चिकित्सा चालू केली; तिच्या मूलभूत संकल्पना आणि पध्दतीवर शंका उपस्थित केल्या. यातून, इतिहासकारांमध्येही सखोल चिंतन चालू झाले. पारंपारिक इतिहासापेक्षा, नव्या संकल्पना आणि पध्दतींचा असा 'नवा इतिहास' न्यू हिस्ट्री रुजू लागली.

अशा 'न्यू हिस्ट्री'मध्ये संकल्पना आणि पध्दती या दोन्ही स्तरावर बदल झाले.

राजकीय घडामोडी व व्यक्ती केंद्रस्थानी ठेवून पारंपारिक इतिहास लिहिला जात असे. त्यात घडलेल्या घटनांचे फक्त निवेदन करण्यावर त्यांचा भर असे आणि यासाठी ते फक्त शासकीय/अधिकृत कागदपत्रावरच भर देत असत.

मात्र, आता, 'मानवी जीवनातील सर्वच घटना महत्वाच्या आहेत' असे समजले जाऊ लागलेले आहे. त्यामुळे आता इतिहासामध्ये विविध अंगांवर लक्ष केंद्रित केले जाऊ लागले. यातून इतिहासामध्ये विविध प्रकार उदयास येऊ लागले जसे, सांस्कृतिक इतिहास, स्थानिक इतिहास, स्त्रीवादी इतिहास, पर्यावरणाचा इतिहास, समकालीन इतिहास, शहरांचा इतिहास, वंचितांचा इतिहास, वासाहतिक इतिहास इ. त्याचबरोबर, घटनांच्या निव्वळ निवेदनापेक्षा; त्यांच्या अन्वयार्थावर भर दिला जात आहे. तसेच घटनांसह त्यांच्यामागील संरचनांचा/मूल्यधारणांचा/बैठकीचा विचार केला जाऊ लागलेला आहे. अशावेळी, भाषाशास्त्र, मानवशास्त्र या शाखांमधील संकल्पना, पध्दतींची, मॉडेल्सची मदत इतिहासाला होऊ लागलेली आहे.

अर्थात, असा 'जीवनाच्या सर्व बाबींना स्पर्श करणारा इतिहास' लिहावयाचा तर साधनांच्या स्वरुपामध्येसुध्दा बदल करणे गरजेचे आहे. यामुळे, लिखित साधने जरी मिळाली तरी त्यांची नव्या पध्दतीने चिकित्सा होऊ लागलेली आहे. तसेच, मौखिक परंपरांसारख्या अलिखित साधनांवर भर येऊ लागलेला आहे. त्याचप्रमाणे इतर विद्याशाखांची मदत आवश्यक झालेली आहे. त्या शाखांमधील संकल्पना आणि पध्दतींची मदत होऊ लागलेली आहे. अशा प्रकारची आंतरविद्याशाखीय संशोधने इतिहासामध्ये होऊ लागलेली आहेत.

## १.२.२ विभाग २ : सांस्कृतिक इतिहास (Cultural History)

'सांस्कृतिक इतिहास' ही संकल्पना मानवशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विद्याशाखांच्या पध्दती एकत्र आणते. यामध्ये एका विशिष्ठ समूहाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा अभ्यास केला जातो, जशी भाषा, दैनंदिन जीवन, आहार-विहार-निवासाच्या सवयी, उपजीविकेची साधने इ. एखाद्या समूहाचे दृष्टिकोन, श्रध्दाविश्व यांचा अभ्यास होतो, जसे, वारी, समारंभ, उत्सव. याबरोबरच, त्या समूहामध्ये निर्माण झालेली कला यांचा विचार याठिकाणी केला जातो. इतकेच नव्हे, तर, त्या समूहाने निर्माण केलेल्या विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक संस्थांचाही विचार यामध्ये होऊ शकतो.

असे म्हंटले जाते की, जेकब बर्कहार्ड (१८१८-९७) या स्वित्झर्लंडच्या इतिहासकाराने 'सांस्कृतिक इतिहास' या विद्याशाखेची निर्मिती केली. त्याने इटलीतील 'पुनरुज्जीवन काळा'चा अभ्यास केलेला होता. एका विशिष्ठकाळाचा 'समग्र' अभ्यास करावा अशी त्याची इच्छा होती. त्यामुळे तो पुनरुज्जीवन काळातील इटलीच्या फक्त चित्र, शिल्प, स्थापत्य एवढ्याच बाबींचा विचार करत नाही. तर त्या काळातील इटलीतील अर्थकारण, सामाजिक संस्थाही विचारात घेतो.

साधारणतः 'सांस्कृतिक इतिहासा'मध्ये, जसे अभिजनांच्या कला-स्थापत्याचा अभ्यास केला जातो. त्याहून अधिक सामान्य लोकांच्या, सामूहिक अभिव्यक्तींचा विचार केला जातो, जसे, सणवार, वारी, जत्रा, आख्याने, भारुड-दशावतारासारखे खेळ इ. त्यांच्या आहार-विहार-निवासाच्या सवयी, वस्त्रालंकार,

संगीत इ. ही बाबी आल्या. त्याचबरोबर, कला-साहित्य-विज्ञानामध्ये झालेली प्रगतीही विचारात घेतली जाते. त्याचबरोबर, सत्ता, वैचारिक भूमिका, वर्गसंबंध, अस्मिता इ. दृष्टिकोन-आणि त्यांचा इतिहासही अभ्यासला जातो. अशा पारंपारिक सांस्कृतिक बाबींबरोबरच, अलिकडे 'माध्यमांचा' अभ्यासही 'सांस्कृतिक इतिहासा'मध्ये होऊ लागलेला आहे, जसे, टिव्ही, रेडिओ, वृत्तपत्रे, पोस्टर्स, चित्रपट, इंटरनेट इ. कारण, ही माध्यमं, एका समूहाची विशिष्ठ सांस्कृतिक धारणा बनवण्यासाठी फार महत्वाची ठरत असतात.

सांस्कृतिक इतिहास आणि इतिहासाच्या इतर प्रकारातील फरकही लक्षात घेणं गरजेचं आहे. 'लोकसंख्याक इतिहास'मध्ये कुटुंब, विवाहाचे वय यातील बदल लक्षात घेतले जातात. तर सांस्कृतिक इतिहासामध्ये या बाबी विचारात घेतल्या जातातच पण त्यापुढे जाऊन कुटुंबातील विविध घटकांच्या धारणा, एकमेकांतील संबंध, ताण-तणाव, वाद-विवाद, समस्यांना प्रतिसाद देण्याची वृत्ती, लैंगीकता इत्यादी असंख्य बाबी येऊ शकतात. तर 'धर्मिक इतिहास'मध्ये तत्वज्ञान, अध्यात्म इ. संकल्पनांचा विचार होतो. सांस्कृतिक इतिहासामध्ये याबरोबरच, कोणकोणत्या माध्यमातून धर्म हा लोकांपर्यंत पोचतो (कला, स्थापत्य, साहित्य, प्रवचनं-किर्तनं, यात्रा, उत्सव इ.), लोक कशा पध्दतीने धर्माकडे पाहतात, धर्माची संस्था कशी बनत जाते, त्यातील अर्थकारण वगैरेंचा अभ्यास होतो. तसेच 'कला इतिहास' हा निव्वळ कलेचा इतिहास अभ्यासतो तर सांस्कृतिक इतिहास हा कलेबरोबरच, त्या कलेचे संदर्भ, ती कला ज्या लोकांतून निर्माण झाली; सामजिक संकेत इत्यादी बाबींचा ही अभ्यास करतो.

अलिकडे 'सांस्कृतिक इतिहासाच्या' अभ्यास करताना इतिहासाचे पुनर्लेखन ही होऊ लागलेले आहे. जसे, फ्रेंच राज्यक्रांतीचा विचार करताना, मार्क्सवादी इतिहासकार हे निव्वळ वर्गसबंधांवर भर देत असत. मात्र, आता, तत्कालिन फ्रान्समधील लिंगभाव, श्रध्दास्थानं, धारणा, लोकांमधील चर्चा यातून जी काही विशिष्ठ राजकीय संस्कृती निर्माण झालेली होती त्या राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाकडे आता इतिहासकार लक्ष देऊ लागलेले आहेत. यांच्यावर जर्गन हबरमास यांच्या Public Sphere या संकल्पनेचा प्रभाव आहे.

तसेच 'सांस्कृतिक अभ्यास' (Cultural Studies) अशी विद्याशाखाच विविध ठिकाणी स्थापन होऊ लागलेली आहे. यामध्ये विविध समाजाची संस्कृती अभ्यासली जाते. इतिहासाबरोबरच, साहित्य, चित्रपट, तत्वज्ञान, मानवशास्त्र इ. विविध अंगाने हा अभ्यास केला जातो. यामध्ये, एखाद्या समूहाच्या कृतीमागे, त्या समूहाच्या संस्कृतीतील विविध संकल्पना (लिंगभाव, अस्मिता, धारणा) कसे प्रभाव टाकतात हे अभ्यासले जाते.

'सांस्कृतिक इतिहासा'च्या अभ्यासामध्ये, बर्कहार्डनंतर, हबरमास आणि गिझचे नाव महत्वाचे आहे. जर्गन हबरमास, त्याच्या The Structural Tranformation of the Public Sphere-1989 या ग्रंथामध्ये 'समाजविश्व' ही संकल्पना मांडतो. तर क्लिफॉर्ड गिझ यांचा Thick Description: Toward an Interpretive Theory of Culture या लेखात ही Thick Discription संकल्पना मांडतो.

## ❀ ‘सांस्कृतिक इतिहास’ या संकल्पनेचा विकास

‘सांस्कृतिक इतिहास’ या संकल्पनेचा विकास पाहण्यासाठी, ‘संस्कृती’ या शब्दाचा विकास कसकसा होत गेला हे ही महत्वाचे ठरेल.

सांस्कृतिक इतिहासाचे धागेदोरे आपणाला ‘पुनरुज्जीवन’ (Renaisssance) काळापर्यंत घेऊन जातात. या काळात, संस्कृती (Cultus/cultura) शब्द मुख्यत्वे पुढील धारणेतून आलेला होता. ‘नागरी समाजासाठी सद्‌गुणांची आवश्यकता असते. हे सद्‌गुण साहित्य, तत्वज्ञान, वर्क्तृत्व, कायदा, कला, शास्त्रे यांच्या जपणूकीतून **(cultivation)** निर्माण होत असतात.’ तर १७ व्या शतकांमध्ये, बेकन, हॉब्ज लिबनिज यांनी वरील धारणा बाजूला ठेवली. त्यांच्या मतानुसार ‘आत्मा, मन, बुध्दिमत्ता आणि तर्कांची जपणूक’ हे संस्कृतीचे कार्य असते. इथे, लिबनिज, संस्कृतीसाठी Cultur/Kultur असे शब्द वापरतो.

एखाद्या व्यक्तीबाबतची वरील अपेक्षा ही आता साऱ्या समाजाला लागू पाडली गेली. यानुसार, एखादा समाज सुसंस्कृत (cultivated) आहे का रानटी ते विचारात घेतले गेले. ब्यूडॉसच्या मते ‘एखाद्या समाजातील नैतिकता, सामाजिकता आणि आदिमतेच्या पुढे जाऊन विचार करण्याची पध्दत, हे तो समाज कितपत सुसंस्कृत आहे ते ठरवते.’ १७७४ मध्ये मेरियनच्या म्हणण्यानुसार सुध्दा आदिम/असंस्कृत समाज म्हणजे शिकारी लोक ज्यांच्याकडे कायदा नसतो, कला नसते.

थोडक्यात संस्कृती किंवा असंस्कृतीची व्याख्या ही खास युरोपियन लोकांनी बनवलेली व्याख्या होती. अर्थात, ते स्वतःला सुसंस्कृत समजत होते.

पुढे, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात, ‘आत्मा’ (Spirit) ची जागा साहित्याने घेतली. विद्वानांचे लेखन, शोध आणि कलेचा इतिहास हा ‘संस्कृती’शी जोडला गेला. आता ‘साहित्याचा इतिहास’ म्हणजे ‘सांस्कृतिक इतिहास’ असे समजले जाऊ लागले.

भाषा आणि संस्कृती यांचा अन्नोन्य संबंध याच काळात पुढे आला. जॉन ॲडलंगच्या मते ‘शेती आणि खाजगी मालमत्तेच्या विकासाबरोबरच, ज्यावेळी भाषांचा उदय झाला त्यावेळी संस्कृतीची सुरुवात झाली.’ थोडक्यात, भाषा आणि संस्कृतीच्या घनिष्ठ संबध असल्याने, भाषेचा विकास समजायचा असेल तर त्या संस्कृतीचा विकास समजणे आवश्यक असते. जॉन हर्डरच्या मतेही संस्कृतीमध्ये ‘तार्किक बुध्दी’ असणे अत्यावश्यक असते आणि ही बुध्दी भाषेतूनच व्यक्त होत असते.

ॲडलंगच्या मते ‘निव्वळ प्रेरणातून कृती करणाऱ्या आदिम परिस्थितीतून, अधिक गुंतागुंतीची सामाजिक संबंध तयार होणे या बदलास संस्कृती’ असे म्हणतात.

पुढे, व्हिक्टोरियन कालखंडामध्ये ‘सांस्कृतिक इतिहासा’मध्ये बरेच लेखन झाले. विल्हेम वॅशमथ

(Wilhelm Wachsmuth), गुस्ताव केम (Gustav Klemm) इ. यातील महत्वाची नावे. केम याने, ड्रेसडेन याठिकाणी एका एथ्नोग्राफीक वस्तुसंग्रहालयाची स्थापना केलेली होती. आदिमानव कशा प्रकारची हत्यारे वापरात होता? त्याचा आहार-विहार, वस्त्रं कशी होती? यामध्ये केमला रुची होती. बायबलच्या दृष्टिकोनातून मानवी संस्कृतीकडे बघण्यापेक्षा; प्रागैतिहास काळापासून, या मानवाची, त्याच्या भौतिक संस्कृतीमध्ये कशी प्रगती होत गेली याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. थोडक्यात, आता 'आदिमानव' आणि 'भौतिक संस्कृती' हा सांस्कृतिक इतिहासाचा केंद्रबिंदू ठरु पहात होता. हा एक मोठा बदल म्हणता येईल.

१९ व्या शतकामध्ये, मानवशास्त्राच्या विकासामुळे, सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाला चालना मिळाली. एडवर्ड टेलर ला आधुनिक मानवशास्त्राचा जनक म्हणजे जाते. १८८१ मध्ये त्याचा Primitve Culture हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्याच्या म्हणण्यानुसार 'संस्कृती म्हणजे अशी एक गुंतागुंतीची रचना असते की ज्यामध्ये, एका समाजाचा घटक या नात्याने, मानवाने ज्ञान, श्रध्दा, कला, नैतिक मूल्यं, कायदा, रीतीरिवाज यांच्या क्षमता आणि सवयी प्राप्त केल्या.'

तरीही व्हिक्टोरियन अभ्यासक संस्कृतीच्या दोन कल्पनांमध्ये अडकून पडलेले होते. काही जण 'संस्कृती म्हणजे आदिमानवाची भौतिक संस्कृती' असे पहात होते. तर काही जण 'संस्कृती म्हणजे कला, साहित्य, तत्वज्ञान, धर्म अशा अधिभौतिक संस्कृती' असे पहात होते. याठिकाणी जेकब बर्कहार्ड (Jacob Burckhardt) आपल्याला भेटतो. तो एक संग्राहक होता. त्याला युरोपियन पुनरुज्जीवन काळातील कला आणि साहित्यातील विकासामध्ये विशेष रुची होती. 'उस्फुर्तपणे झालेला कोणताही बौध्दिक विकास' अशा प्रकारे संस्कृतीची तो व्याख्या करतो. त्याला भौतिक जीवनातील प्रगती आणि त्याखाली जे काही चाललेले होते ते नापसंद होते.

१९ वे शतक संपता संपता, सांस्कृतिक इतिहासामध्ये बरेच संशोधन झाले, लेखन झाले. १८८८ मध्ये शाफर (Dietrich Schafer) याने, सांस्कृतिक इतिहासापेक्षा, राजकारणावर जास्त भर दिला. तर, त्याला प्रतिवाद करताना, पुढील वर्षी गोथे (Eberhard Gothein) याने सांस्कृतिक इतिहासाचे समर्थन केले. ऐतिहासिक बदल समजून घेण्यासाठी, राजकारण आणि भौतिकवादापेक्षा; धर्म, कला, कायदा, अर्थव्यवस्था इ. मधील बदल समजून घेणे हे अत्यावश्यक असते, असे त्याचे म्हणणे होते. १८८६ मध्ये, लँपरेटने (Lamprecht) लिपझिग विद्यापीठामध्ये जर्मनीच्या संपूर्ण सांस्कृतिक इतिहासाचे सर्वेक्षण सुरु केले, त्यासंबधी सेमिनार घेतला. त्याला 'सांस्कृतिक आणि वैश्विक इतिहासाचा' विभाग काढायचा होता. त्याची ही 'नव इतिहासाची'जी संकल्पना होती त्यावर भाषाशास्त्र, पुरातत्वशास्त्र, कला इतिहास यामध्ये होत असलेल्या प्रगतीचा प्रभाव होता. पुढे, पहिल्या महायुध्दानंतर, जर्मनीमध्येच, सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाचा वापर, जर्मन वंशाच्या श्रेष्ठत्वाची संकल्पना उदयास होण्यास झाला.

लँपरेटच्या या संकल्पनेचा प्रभाव तिकडे अमेरिका आणि फ्रान्सवर जाणवत होता. अमेरिका आणि फ्रान्समध्येही, इतिहासाच्या अभ्यासामधील 'संस्कृतीचे' महत्व समजून आलेले होते. अमेरिकेत, १९१२ मध्ये, जेम्स रॉबीन्सनने, पारंपारिक राजकीय इतिहासापेक्षा, सांस्कृतिक अभ्यासाला महत्व देणारी 'नव इतिहासाची' संकल्पना मांडली. इकडे संस्कृतीसाठी Culture आणि Civilization या शब्दांमध्ये द्वंद्व होतेच. 'रानटीपणा' आणि 'मानवाचा सर्वोच्च विकास' असे हे द्वंद्व दिसून येते. फ्रान्सवा गुझो च्या मते, फ्रान्समध्ये जी काही संस्कृती म्हणून होती ती फक्त प्राचीन अभिजात काळापासून ते राजघराणे या काळापर्यंतच होती. अर्थात, सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून हे परत मागे जाणेच होते!

पुढे, २० व्या शतकात सांस्कृतिक इतिहासाने विकासाचा पुढील टप्पा गाठला. या काळामध्ये, मानवशास्त्राचा प्रचंड प्रभाव सांस्कृतिक इतिहासावर निर्माण झाला. परिणामी सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासक्षेत्रामध्ये; वैयक्तिक असो किंवा सामाजिक, वास्तविक असो किंवा काल्पनिक, नैसर्गिक असो वा सामाजिक थोडक्यात 'पूर्ण जगाचा' समावेश झाला. बर (Berr) याला 'प्रत्येक बाबीचा इतिहास' (The History of Everything) असे म्हणतो. हॅरी बार्न सुध्दा 'नव इतिहास म्हणजे भूतकाळात घडलेल्या प्रत्येक बाबींची नोंद' अशी संकल्पना मांडतो. या उत्साहातून १९४० मध्ये, अमेरिकेत 'इतिहासाकडे पाहण्याचा सांस्कृतिक दृष्टिकोन' या शिर्षकाखाली एक खंड प्रकाशित केला. यामध्ये, संस्कृतीचे विश्लेषण करणाऱ्या विविध पध्दती, समूह-राष्ट्रीयत्व, संस्था, विचारप्रवाह यांचे विश्लेषण करणाऱ्या पध्दती इत्यादि विषयावरील लेख प्रकाशित झाले. १९८९ मध्ये, लिन हंट याने ही सांस्कृतिक चालीरिती आणि मानसिकता/दृष्टिकोण यांच्या अभ्यासाचा समावेश 'सांस्कृतिक इतिहासा'मध्ये केला. आता, गुन्हा, वेडसरपणा, बालपण, वृध्दत्व, देहबोली, विनोद, गंध, अवकाश, व्यसन, विद्रोह इ. अनेक विषय यामध्ये येत आहेत.

थोडक्यात, सांस्कृतिक इतिहास; भौतिकवादी अर्थशास्त्र, तसेच, राजकीय अर्थशास्त्राचे वैश्विक दावे स्पष्टपणे नाकारतो. वस्तुनिष्ठतेचा अट्टाहास नाकारुन; इतिहासाच्या पुनर्बांधणीमध्ये कल्पनेलाही महत्व देतो. स्पष्टीकरणापेक्षा; अन्वयार्थांना महत्व देतो. गीझ आणि टायलरच्या मते अन्वयार्थावर भर देणारी सामाजिक शास्त्रे आवश्यक आहेत. यामध्ये कार्यकारणभाव आणि स्पष्टीकरणापेक्षा, 'आकलनाला' महत्वाचे स्थान असेल. अर्थात, अशा दाव्यांमध्ये व्यक्तीनिष्ठेचा किंवा सापेक्षतेचा दोष दिसून येतो. पण, वैश्विक सिध्दांताच्या आधारे, छोट्या-छोट्या संस्कृतींचा अर्थ लावण्यापेक्षा; त्या संस्कृतींच्या परिप्रेक्ष्यात, त्यांचे चिकित्सक आकलन महत्वाचे ठरते आहे.

अशा प्रकारे, संस्कृतीच्या युरोपियन श्रेष्ठत्वाच्या व्याख्येपासून प्रारंभ होऊन, आता, संस्कृतीची व्यापक कल्पना पुढे आलेली आहे. तसेच फक्त कला-साहित्यच नव्हे तर यामध्ये, सर्व स्तरांतील समाजाची, सर्व स्तरातील वर्तन/अभिव्यक्ती महत्वाची बनलेली आहे. भव्यदिव्य सिध्दांतांपेक्षा, मर्यादित स्थळ/अवकाशातील समाजांचा 'समग्र अभ्यास' हा केंद्रस्थानी येऊ लागलेला आहे.

## ❀ सांस्कृतिक इतिहासाचे महत्वाचे अभ्यासक/विचारवंत

**जेकब बर्कहार्ड** (Jacob Burckhardt-1818 to 97) हा एक स्वित्झर्लंडमधील कला आणि संस्कृतीचा अभ्यासक होता. याला 'सांस्कृतिक इतिहास' या संकल्पनेचा संस्थापक म्हंटले जाते. याने प्रामुख्याने 'पुनरुज्जीवन काळा'चा अभ्यास केला. पुनरुज्जीवन काळ हा प्रामुख्याने त्या काळातील सुंदर कला, स्थापत्य, साहित्य याबाबत प्रसिध्द आहे. या विषयांवर असंख्य ग्रंथ उपलब्ध आहेत. मात्र, बर्कहार्डने, फक्त यांचाच अभ्यास केला नाही. तर त्याला त्या काळातील, दैनंदिन आयुष्यातील विविध सामाजिक संस्थांमध्ये रुची होती. त्याच्या म्हणण्यानुसार फक्त कागदपत्रे आणि पुस्तकं म्हणजे इतिहासाची साधने नव्हेत. तर अभिव्यक्तीचे प्रत्येक प्रकार (जसे कला, स्थापत्य, साहित्य इ.), लोकांच्या श्रध्दा ही सुध्दा इतिहासाची साधनेच आहेत. त्यामुळे फक्त राजकीय आणि लष्करी नव्हे तर एखाद्या स्थळ-काळातील लोकांचा समग्र अभ्यास त्याला करायचा होता. त्यामुळेच, त्याच्या, कॉन्स्टंटाईनवरील ग्रंथात, कॉन्स्टंटाईनच्या जीवनचरित्रापेक्षा; बर्कहार्डला, त्या काळातील लोकांच्या दृष्टिकोनामध्ये रुची होती.

हा धर्मोपेदशकाचा मुलगा. मात्र त्याला धर्मोपदेशक बनायचे नव्हते. तो, बर्लिन विद्यापीठामध्ये कलेचा इतिहास शिकायला गेला. याठिकाणी, त्याने इतिहासतज्ज्ञ रँकेची व्याख्यानेही ऐकली. पुढे तो कलेचा इतिहास शिकवणारा प्राध्यापक बनला.

त्यावेळी, राजकीय इतिहास हाच एक सर्वमान्य प्रकार होता. अशावेळी बर्कहार्डने, इतिहास अभ्यासामध्ये 'कलेचा अभ्यास' केंद्रस्थानी ठेवला. लुकास च्या मते, बर्कहार्डनेच खऱ्या अर्थाने 'सांस्कृतिक इतिहासाची' बैठक घातली. बर्कहाडच्या मते, इतिहासाच्या अभ्यासकाने, विशिष्ठ लोकांचा, विशिष्ठ स्थळाचा आणि विशिष्ठ काळाचा आत्मा आणि त्यांचे/तेथील अभिव्यक्तीचे प्रकार समजून घेतले पाहिजेत. यासाठी कलेच्या अभ्यासाला, इतिहास अभ्यासामध्ये केंद्रस्थान मिळायला हवे. म्हणूनच बर्कहार्डला 'कलेच्या इतिहासाचा' संस्थापक असेही समजले जाते.

बर्कहार्डने प्रचंड लेखन केले. मात्र, The Civilization of the Renaissance in Italy-1860 आणि The History of the Renaissance in Italy-1867 हे त्याचे महत्वाचे ग्रंथ होत. हे ग्रंथ पुनरुज्जीवन काळातील इटलीचा इतिहास मांडतात. त्याचा प्रयत्न हा त्या काळातील इटलीचा समग्र अभ्यास करण्याकडे होता.

**जर्गन हबरमास (Jürgen Habermas)** : हबरमास, समाजामध्ये दोन क्षेत्रांची कल्पना करतो. एक असतं 'प्रातिनिधिक/एकपक्षीय' (Representational) तर दुसरं असतं 'समाजविश्व' (Public Sphere). मध्ययुगामध्ये ज्या काही संस्कृती, सभ्यतेच्या कल्पना होत्या, त्या फक्त, राजा अथवा अभिजन वर्ग ठरवतील त्याचप्रमाणे होत्या. हे एकपक्षीय/प्रातिनिधिक असं चित्रण होतं. असे 'मोजके सक्रिय आणि निष्क्रिय बहुसंख्य' असा हा काळ असे. अशावेळी समाजविश्व जे असे, ते, परिघावरच असे. पुढे, आधुनिक

काळामध्ये, 'समाजविश्व' पुढे आलं. यामध्ये फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती महत्वाची ठरली. आता, वृत्तपत्रे, मासिकं, चर्चासत्रं, कॉफीहाऊसेसमधील गप्पा याद्वारे, समाजविश्वामध्ये विविध चर्चा मोकळेपणाने सुरु झाल्या; दृष्टिकोन विकसित होऊ लागले. आता, संस्कृती, काही विशिष्ठ वर्ग ठरवत नाहीत तर, या 'समाजविश्व' संस्कृतीची व्याख्या ठरवू लागले. 'चिकित्सक' असणे हे या समाजविश्वाचे प्रधान वैशिष्ठ्य होते. त्यामुळे, इथे विचारांचा साचेबंदपणा राहिला नाही. आता, बहुसंख्य समाज हा सक्रिय झाला. हबरमासच्या मते, अलिकडे मात्र हे समाजविश्व, विविध कारणांमुळे कोसळत चाललेले आहे. जसे, ज्यापासून माध्यमं ही निव्वळ नफ्याचा विचार करु लागलेली आहेत. त्यामुळे पूर्वीचा सक्रिय, चिकित्सक समाज आता निष्क्रिय ग्राहक बनलेला आहे.

**क्लिफोर्ड गिझ (Clifford Geertz)** : मानवाच्या निव्वळ वर्तनाचा अभ्यास न करता, त्या वर्तनाचा 'संदर्भ' अभ्यासणे याला Thick Discription असे क्लिफोर्ड गिझ म्हणतो. सर्वसारणतः एथ्नोग्राफर्स एका समूहाचा अभ्यास करताना, त्या समूहाच्या वर्तनाचे निरिक्षण करतात; त्यांची नोंद करतात. अशा निव्वळ वर्तनाचे निरिक्षण आणि त्याच्या नोंदीवरुन आपल्याला ती संस्कृती पूर्णपणे समजून येते असे एथ्नोग्राफर्स म्हणतात. गिझ याचा विरोध करतो. त्याच्या म्हणण्यानुसार कोणतीही संस्कृती, विशिष्ठ अशा चिन्हव्यवस्थांनी भरलेली असते. दुसऱ्या शब्दांत, त्या, त्या संस्कृतीची विशिष्ठ अशा काही धारणा असतात. उदाहरणार्थ, एका विशिष्ठ स्थळ-काळातील एक समूह आहे. त्या समूहाने, वर्षानुवर्षे आपली एक संरचना/चिन्हव्यवस्था/मूल्यव्यवस्था/धारणा तयार केलेली असते. या समूहातील प्रत्येक जण, दुसऱ्याशी वागताना, तसेच समूहाचा प्रतिनिधी म्हणून वागतानाही त्या संरचनेच्या आधारेच वागत असतो. ही धारणा आपल्याला माहिती नसते. अशावेळी, निव्वळ वर्तनाच्या अभ्यासावरुन, ती संस्कृती कशी समजून येऊ शकेल? त्यामुळे, एकाचे निव्वळ वर्तनाचे निरिक्षण करण्याबरोबरच; त्या-त्या, वर्तनाचे संदर्भ, त्यामागील धारणा, मूल्यव्यवस्था समजून घेणे आवश्यक असते.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. 'न्यू हिस्ट्री' ही संकल्पना सर्वप्रथम ................ याने मांडली.

*(अ) जेम्स रॉबीन्सन* *(ब) विल्हेम वॅशमथ*

*(क) जेकब बर्कहार्ड* *(ड) ॲडलॅग.*

२. जेकब बर्कहार्डचा ................. हा अभ्यासविषय होता.

*(अ) पुनरुज्जीवन काळ* *(ब) आदिम जमाती*

*(क) फ्रेंच राज्यक्रांती* *(ड) अमेरिकन राज्यक्रांती.*

३. ............ याने ड्रेसडेन याठिकाणी एथ्नोग्राफीक वस्तुसंगहालयाची स्थापना केली.

*(अ) गुस्ताव केम* *(ब) विल्हेम वॅशमथ* *(क) जॉन हर्डर* *(ड) अॅडलॅग.*

**प्रश्न २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रॉबीन्सनच्या 'न्यू हिस्ट्री' या संकल्पनेची ठळक लक्षणे कोणती?

२. कोणत्या संशोधकाला सांस्कृतिक इतिहासाचा जनक असे म्हणले जाते?

३. समाजविश्व किंवा 'पब्लिक स्फिअर' ही संकल्पना कोणी मांडली?

४. 'थिक डिस्क्रिप्शन' ही संकल्पना कोणी मांडली?

## १.२.३ विभाग ३ : उत्तर आधुनिकतावादाचे परिणाम (Impact of Post-Modernism)

आधुनिकतेनंतर येते ती उत्तर आधुनिकता. साधारणतः प्रबोधन काळापासून १९५० पर्यंतचा कालखंड हा 'आधुनिक कालखंड' असा समजला जातो. त्यामुळे, १९५० नंतरच्या काळाला 'उत्तर आधुनिक' काळ असे म्हणले जाते. या काळात आधुनिकतेवर टीका करण्यात आली; तिची सखोल चिकित्सा झाली. यातून, विविध विचार पुढे आले. अशा विविध विचारांना, सामुहिकपणे, 'उत्तर आधुनिकतावादी' विचार असे संबोधले जाते. थोडक्यात 'उत्तर आधुनिकता' हा काही एकच असा सिध्दांत वगैरे नाही.

जाँ ल्योटॉर्ड या विचारवंताने, त्याच्या The Post-Modern Condition-A Report on Knowledge या ग्रंथामध्ये 'उत्तर आधुनिकता' हा शब्द प्रथम वापरला.

उत्तरआधुनिकतेची लक्षणे समजून घेण्यासाठी, प्रथम आधुनिकतेची लक्षणे समजून घ्यावी लागतील. त्यानंतर, त्यावरील उत्तर आधुनिकतेचे आक्षेप समजून घ्यावे लागतील. मग, उत्तर आधुनिकतेचा- इतिहासाच्या संदर्भात विचार करावा लागेल.

### ❀ प्रबोधनापासून सुरु झालेली आधुनिकतेची लक्षणे

विवेकवाद, शास्त्रीयता, प्रगतीवर विश्वास या बाबी म्हणजे आधुनिकतेचा पाया होत्या. काही लक्षणे या काळाची दिसून येतात.

- बुध्दी/विवेकाच्या आणि विज्ञानाच्या मदतीने माणसाला जगाचे ज्ञान होते.
- थोडक्यात, आपण जर विवेक आणि शास्त्रीय पध्दतीचा अंगीकार केला तर ज्ञान मिळते. असे ज्ञान स्थिर आणि शाश्वत स्वरुपाचे असते. जसे, इतिहासाने, जर शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला, तर त्याला भूतकाळ १०० टक्के समजून येतो.

- तसेच, यातून, ज्ञानाला एक सुव्यवस्थितपणा प्राप्त होतो.
- अशा व्यवस्थित ज्ञानातून, निश्चित प्रकारची अशी चिरंतन मूल्यं आपल्याला मिळून जातात.
- या मूल्यांच्या मदतीने, मानव विविध क्षेत्रात प्रगती करतो.
- अशा प्रगतीतून माणूस सुखाच्या दिशेने जातो.

थोडक्यात, 'स्वतःच्या बुध्दीवर विश्वास ठेवून, शास्त्रीय दृष्टिकोनाचा अंगीकार जर केला तर मानवाची निश्चित प्रगती होते' असा ठाम विश्वास आधुनिकतेचा होता. अशा परिस्थितीत अराजक, अव्यवस्थेचा, गोंधळाचा नाश होऊन मानव सुखी होतो, स्वतंत्र होतो अशी श्रध्दा येथे दिसते.

## ❑ आधुनिक जग आणि त्यातील बदल

अशा प्रकारच्या ठाम विश्वासातून, मानव झपाट्याने वाटचाल करु लागला. यातून जे आधुनिक जग निर्माण झाले त्याचे काय स्वरुप होते?

एका बाजूला, मानवाच्या प्रचंड प्रगतीतून जग जवळ येऊ लागले. उत्पादन वाढले; त्यामुळे व्यापार वाढला. यांनी देशादेशांच्या सीमा पार केल्या. वाहतुकीची साधने, प्रसार माध्यमं, संगणक यांच्यातील प्रगती आणि विस्ताराने जग जवळ येऊ लागले. देशांच्या सीमा धूसर होऊन, विविध संस्कृतींचा परिचय झाला. जग हे एक मोठे खेडे बनले.

तर दुसरीकडे, झपाट्याने उत्पादन मिळवण्याच्या नादातून, पर्यावरणाचा ऱ्हास झाला. साधनसंपत्तीच्या हव्यासापोटी वसाहतवाद फोफावू लागला. उत्पादन खपवण्याच्या स्पर्धेतून, देशांदेशांत भीषण स्पर्धा सुरु झाली. यातून, दोन महायुध्दं भोगावी लागली. वैज्ञानिक प्रगतीमुळे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, जसे, 'अणुबाँब' मिळाला. यातून प्रचंड नरसंहार झाला. सर्वत्र एक संशयाचे वातावरण निर्माण झाले. एकीकडे 'सारे जग एक आहे' असे भासू लागले मात्र त्यातच, प्रत्येक व्यक्ती हा एक स्वतंत्र 'बेट'च बनत गेला. मूल्यव्यवस्थेच्या ऱ्हासामुळे ''त्याचा केंद्रबिंदू नाहीसा झालेला आहे.'' तो जाहिरातींचा, प्रतिमांचा गुलाम झालेला आहे.

थोडक्यात, विवेक/बुध्दी-शास्त्रीय ज्ञान-मानवी प्रगती या भ्रामक कल्पना आहेत असे वाटू लागले. सर्व प्रकारचे सिध्दांत म्हणजे ही पोकळ 'महाकथने'च (Metanarratives) आहेत असे वाटू लागले. 'हे असे असे झाल्यावर ते तसेच होते' असे जे काही ठाम साधारण सिध्दांत होते त्यांचा फोलपणा दिसू लागला.

## ❑ उत्तर आधुनिक वादाची काही ठळक लक्षणे

अशा प्रकारे, आधुनिकतेवरील-आणि त्यातील 'ठाम' दावे जे होते त्यावरील विश्वास उडाला..यासाठी,

पर्यायी विचार पुढे येऊ लागले. या सर्व विचारांचा समुच्चय म्हणजे 'उत्तर आधुनिकता'वादी विचार होत. अर्थात, 'आधुनिकते'वरील प्रखर टिका आणि चिरफाड हे सर्वात महत्वाचे लक्षण या नव्या विचारांचे आहे. तसेच, 'महाकथनां'वरील म्हणजेच 'वैश्विक तत्वांवर' अविश्वास हे आणखीन एक महत्वाचे लक्षण. 'वैज्ञानिक प्रगतीने मानव सुखी होतो', 'भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्ती स्वतंत्र असते', 'साम्यवादाने वर्गसंघर्ष संपुष्टात येऊन, मानवी जीवन सुखी होते' अशा प्रकारची जी विधाने असतात, त्यांना 'महाकथनं' असे म्हणले जाते. अशा महाकथनांचा विरोध उत्तर आधुनिकतावादी करतात. त्यांचे विचार आपण लक्षात घेतले तर आपल्याला उत्तर आधुनिकतेची **काही ठळक लक्षणे** कळून येतील :-

- जग हा एक स्थिर स्वरुपाचा ठोकळा नसून, त्यामध्ये विविध प्रकारची माणसं असतात. त्यांचे, प्रत्येकाचे अनुभव हे वैशिष्ठ्यपूर्ण आणि परस्परांपेक्षा वेगवेगळे असतात. त्यामुळे, मानवाबद्दल, सर्वांना लागू पडणारे असे 'साधारण सिध्दांत' आपण काढूच शकत नाही. थोडक्यात, 'जगाचे ज्ञान' वगैरे आपल्याला होऊच शकत नाही.

- पुन्हा, प्रत्येक मानवाचे अनुभव वेगळे असल्यानेः- 'शास्त्रीय पध्दतीचा अंगीकार केला तर मानवासंबंधीचे ज्ञान मिळते', 'अशाच प्रकारे आपण गतकाळातील मानवाचे ज्ञान मिळवू शकतो.' याआधारे आपण, 'मानवासबंधी भविष्यवाणी सुध्दा करु शकतो' इ. सर्व फोल ठरते.

- मानवाची एकच एक अशी काही संस्कृती नसते. त्यामुळे, एका किंवा मोजक्या संस्कृतींचा अभ्यास करुन, आपण अखिल मानवाच्या संस्कृतीबाबत सिध्दांत काढू शकत नाही. किंवा ते आपल्याला १०० टक्के समजले असे म्हणू शकत नाही. त्यामुळे, प्रत्येक संस्कृतीचा वैशिष्ट्यपूर्ण असा अभ्यास करावा लागतो.

- 'वैज्ञानिक प्रगतीमुळे, मानव हा सुखीच होतो' हे ही एकप्रकारचे पोकळ 'महाकथनच' आहे. आणि, त्यामुळे ते खोटे ठरलेले आहे. उलट, तो जाहिरात आणि प्रतिमांच्या जाळ्यात अडकून, भांबावलेला आहे.

- 'प्रगती ही एकरेषीय अशा स्वरुपाची असते' हे एक पोकळ महाकथन आहे. उलट, आधुनिक काळात; प्रगतीपेक्षा, मूल्यव्यवस्थेतील अधोगतीच दिसून येते.

- ज्ञान हे स्थिर, शाश्वत, सुव्यवस्थित, सुसंगत अशा स्वरुपाचे असत नाही. तर ते व्यक्तीसापेक्ष, तुटक किंवा स्वतंत्र, विशिष्ट स्वरुपाचे असते. त्यामुळे 'सापेक्षततेचा उदय' हे ही एक उत्तर आधुनिकतेचे ठळक लक्षण आहे. त्यामुळेच, विशिष्ट गोष्टींचा अभ्यास केल्यास आपल्याला त्यासंबधीच-म्हणजे विशिष्टच असे काही कळून जाईल. यातून, 'अखिल मानवी जातीला लागू पडणारी चिरंतन मूल्यं' मिळू शकत नाहीत; ती तशी नसतातही!

## ❑ इतिहासावरील उत्तर आधुनिकतावादाची चिकित्सा

'इतिहास' या शाखेच्या आधुनिक संकल्पना आणि पध्दतीशास्त्रावर उत्तर आधुनिकतावादाने प्रचंड टीका केलेली आहे; चिकित्सा केलेली आहे.

- ❋ प्रत्येक मानवाचे अनुभव वेगवेगळे असल्याने, आपण ते १०० टक्के समजू शकत नाही. 'गतकाळ' तर अगदी जुना काळ. मग, त्या गतकाळातील मानवाचे ज्ञान आपल्याला कसे मिळणार?
- ❋ सर्व संस्कृती एकमेकांपासून वेगवेगळ्या असल्याने, 'अखिल मानवजातीची संस्कृती' अशी काही चीज अस्तित्वात नाही. त्यामुळे, जर अशा स्वरुपाचा वैश्विक अभ्यास असेल; तसेच, त्या आधारे काही 'महाकथनं' केली जात असतील तर तो अभ्यास आणि तशी महाकथनं चुकीचे होऊन जातील. थोडक्यात, संस्कृतीबाबत टॉयंबीचा सिध्दांत, तसाच मार्क्सचा 'वर्गसंघर्ष आणि वर्गरहित समाजाचा' सिध्दांत ही 'महाकथनं' आहेत. ती सर्वांना लागू पडत नाहीत.
- ❋ गतकाळाचा अभ्यास करणारा इतिहासकार हा वर्तमानकाळातील असतो. त्याच्यावर, वर्तमानकाळातील परिस्थितीचा, त्याच्या वैचारिक मांडणीचा, त्याच्या प्रशिक्षणाचा-अशा सर्वांचा प्रभाव असतो. त्यामुळे, त्याच्या संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यावर-म्हणजे, विषय निवडीपासून, साधन चिकित्सा ते अन्वयार्थ अशा प्रत्येक टप्प्यावर या विविध प्रभावांचा परिणाम होत असतो. त्यामुळे, इतिहासकार आपल्यासमोर गतकाळातील घटना 'जशा आहेत तशा' मांडत नसून, तो अशा प्रकारे 'स्वतःचेच' म्हणणे मांडत असतो. थोडक्यात, फुको म्हणतो त्याप्रमाणे 'इतिहासामध्ये गतकालीन घटनांची वास्तविक अशी मांडणी नसून; तो इतिहास म्हणजे, त्या घटनांबद्दलची इतिहासकाराने मांडलेले परिभाषित असते.'

## ❑ इतिहासाला उत्तर आधुनिकवादाचे योगदान

उत्तर आधुनिकतेने इतिहासावर वरीलप्रमाणे जरी जोरकस टीका केली असली तरी, इतिहासाला दिलेले त्यांचे योगदानही खूप महत्वाचे आहे.

- ❋ सर्वात महत्वाचे म्हणजे ज्ञान हे अनुभवनिष्ठ असते. आणि प्रत्येकाचा अनुभव वेगळा असल्याने ज्ञान एकजिनसी असे नसते. तसेच, त्या ज्ञानावर आता कोणाची मक्तेदारी राहिलेली नाही. त्यामुळे एका बलिष्ठ देशांऐवजी, ***विविध छोट्या गटांचा अभ्यास*** आता महत्वाचा बनलेला आहे.
- ❋ तसेच उत्तर आधुनिकतावादाने एकेकाळच्या परिघावरील घटकांना, चर्चाविश्वाच्या/अभ्यासाच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे इतिहासामध्ये ही अशा ***दुर्लक्षित घटकांवर अभ्यास सुरु झाला,***

जसे, पर्यावरणाचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास, वंचितांचा इतिहास, अन्नाचा इतिहास, औषधांचा इतिहास. फुकोमुळे तर गुन्हेगार आणि तुरुंग, वेडे आणि त्यांची इस्पितळे हे अभ्यासाच्या केंद्रस्थानी आले.

- अशाच प्रकारे, एका विशिष्ठ संस्कृतीला 'व्यापक' असे समजून तिचा अभ्यास करण्यापेक्षा; ***छोट्या-छोट्या संस्कृतीचा/गटांचा/अस्मितांचा अभ्यास*** आता होऊ लागलेला आहे.
- फुकोने मांडलेला 'सत्तेबाबतचा' विचार हा एक महत्वाचा उत्तर आधुनिकतावादी विचार होय. त्याच्या म्हणण्यानुसार 'सत्ता' ही फक्त आपण समजतो तशी वर कुठेतरी, केंद्रस्थानी अशी नसते. तर, ती, सगळीकडे, सर्व ठिकाणी अगदी आपल्या घरांमध्येसुध्दा असते. यातूनच ***'सत्ता आणि सत्तासंबंध'*** हा इतिहास अभ्यासाचा एक महत्वाचा विषय बनलेला आहे. अशा 'सत्ते'च्या अनुषंगाने; आता, कुटुंब, लिंगभाव, विवाह/वारशासारख्या रुढी यांचा अभ्यास होऊ लागलेला आहे.
- उत्तर आधुनिकवादाने 'विकासाच्या एकरेषीयतेचा' विरोध केला. त्यामुळे, इतिहासामध्येही 'उत्क्रांतीवादाचा एकरेषीयपणा', विकासाची ठोकळबाज संकल्पना या टाळल्या जात आहेत. त्याऐवजी, ***बहुरेषीयतेकडे*** लक्ष वेधले गेले आहे.
- मोठ्या स्थळांच्या व्यापक अभ्यासापेक्षा, मर्यादित अवकाशतील स्थळांचा-त्यातील प्रक्रियांचा अभ्यास आता महत्वाचा होऊ लागलेला आहे. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/प्रादेशिक स्वरुपांच्या इतिहासापेक्षा ***'स्थानिक इतिहास'*** ही एक महत्वाची अभ्यासशाखा म्हणून पुढे येऊ लागलेली आहे.
- फुकोच्या म्हणण्यानुसार, 'इतिहासात सुसंगती आणि ऐक्य असे नसते. तर, इतिहास म्हणजे ऐक्य नसलेल्या, सुट्या, तुटक, असंगत अशा घटनांचा इतिहास असतो.' त्यामुळे विविध घटनांच्या व्यापक स्वरुपांवर भर देण्यापेक्षा, त्यांच्या सुट्या/खंडित स्वरुपाकडे लक्ष वेधणे महत्वाचे आहे. थोडक्यात ***'केंद्रिकरणापेक्षा विकेंद्रीकरणावर'*** आता इतिहासाचा भर राहिलेला आहे.
- तसेच, 'विविध विशिष्ठ घटनांचा अभ्यास करुन त्यातून एकसमान सूत्र शोधणे' याला विरोध केलेला आहे. त्याऐवजी, प्रत्येक विशिष्ठ घटनांचा, त्यांच्या संदर्भात अभ्यास करुन, त्या घटना समजून घेणे यावर आता भर आलेला आहे. त्यामुळे ***'सूक्ष्म इतिहास'*** आता एक महत्वाचा अभ्यासविषय होऊ घातलेला आहे.
- तसेच, 'बहुकालीक' विषय-म्हणजे 'विविध काळातील मानवाची प्रगती' मागे पडलेली आहे. तर, त्याऐवजी, एक मर्यादित विशिष्ठ काळ निश्चित करुन, त्याच काळातील मानवाची संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न आता होऊ लागलेला आहे.

- एकेकाळी, फक्त अभिजन वर्ग, त्या समाजाचे प्रतिनिधित्व करत असतो असे समजले जात असे. या अभिजनांचे विश्व म्हणजेच त्या समाजाची संस्कृती असा समज होता. पण आता तसे राहीले नाही. तर 'लोकांचे चर्चाविश्व' किंवा ***'समाजविश्व'*** हे केंद्रस्थानी आलेले आहे.

- अर्थात, अशा प्रकारे, तुटक, विशिष्ठ, खंडित विषयांच्या संशोधनामुळे आपण सर्वसाधारण- म्हणजे, विज्ञानाप्रमाणे, 'सगळ्यांना लागू पडणारे सिध्दांत' काढू शकत नाही. पण उत्तर आधुनिकतावादानुसार, अशा अट्टाहासाची आवश्यकताच नाही! कारण, सर्वसाधारण सिध्दांतापेक्षा, त्या त्या घटकांचे स्वतंत्र आकलन करणे इतकेच पुरेसे आहे.

- त्यांच्या म्हणण्यानुसार, इतिहासकाराने अनुवादकाची भूमिका घेऊ नये. म्हणजे, मागील घटना, आपल्या भाषेत मांडणे इतकेच काम त्याचे नाही. तर, त्याने त्या घटनेचे संदर्भ काय? त्यांचे आकलन आणि अन्वयार्थ यावर भर दिला पाहिजे.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-२

- **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

    १. 'उत्तर आधुनिकता' ही संकल्पना सर्वप्रथम कोणी मांडली?

    २. 'महाकथने' म्हणजे काय?

    ३. उत्तर आधुनिकतावादामध्ये 'सत्तेचा' विचार कुणी प्रामुख्याने मांडला?

    ४. कोणत्या विचारवंताने, तुरुंग, वेड्यांची इस्पितळे हे अभ्यासाचे विषय बनवले?

## १.३ सारांश

एकेकाळी इतिहास हा काव्याचा, कलेचा प्रकार असा समजला जात असे. पुढे, रँकेनंतर, इतिहासाच्या संशोधन पध्दतीमध्ये शास्त्रीयता आली. रॉबीन्सनने 'न्यू हिस्ट्री' ही संकल्पना मांडली. पुढे, ब्युरीने 'इतिहास हे शास्त्र आहे' अशी संकल्पना मांडली. पुढे, फक्त राजकारण म्हणजे इतिहास नव्हे; तर मानवी संस्कृतीचा समग्रपणे अभ्यास करणे आवश्यक आहे असा विचार पुढे आला. यातूनच 'सांस्कृतिक इतिहास' ही शाखा निर्माण झाली. या शाखेतून पुढे 'समग्र इतिहास' अशा संकल्पना पुढे येऊ लागल्या. या एकंदर काळात, आपली तार्किक बुध्दी आणि वैज्ञानिक प्रगती याआधारे आपण अखिल मानवजातीबाबत वैश्विक सिध्दांत मांडू शकतो असे दावे ठोकले जाऊ लागले. तसेच, याद्वारे, मानव सुखाकडे वाटचाल करीत आहे अशी भाबडी आशाही निर्माण झाली. मात्र, दोन संहारक महायुध्दांनी एकप्रकारची साशंकता निर्माण झाली. यातून, विविध विषयांमध्ये सखोल चिंतन होऊ लागले. नव-नवे विचारप्रवाह पुढे येऊ लागले. पूर्वीच्या ठाशीव

मुद्द्यांचा आता पुनर्विचार करणे आवश्यक आहे असे वाटू लागले. यालाच 'उत्तर आधुनिकता' असे म्हणले जाते. या काळात खुद्द इतिहास या विषयाच्या उपयुक्ततेवरही शंका उपस्थित होऊ लागल्या. अर्थात, यामुळे पूर्वीच्या कित्येक दुर्लक्षित अशा घटकांकडे इतिहासकाराचे लक्ष वेधले गेले. व्यापकतेपेक्षा; छोट्या अभ्यासावर इतिहासकार लक्ष केंद्रित करु लागलेले आहेत.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **एकरेषीय प्रगती** : 'मागासपासून विकासाकडे' अशी एका रेषेत होणारी प्रगती.
- **उत्तर आधुनिकतावाद :** आधुनिकतेवर टीका करणारा आणि नवे अभ्यासविषय, संकल्पना आणि पध्दती सूचवणारा विचारांचा समूह याला 'उत्तर आधुनिकतावाद' असे म्हणतात. साधारणतः १९५० नंतर याची सुरुवात झाली.
- **जाहिरात आणि प्रतिमा** : एखाद्या वस्तूचा खप वाढविण्यासाठी, प्रसंगी खोट्या प्रतिमांचा वापर केला जातो. मानव, या प्रतिमांना खरे समजू लगतो. अशाने, त्याचे वास्तवाचे भान नष्ट होत जाते.
- **प्रबोधनकाळ** : मानव, त्याची बुध्दीचे महत्व आणि विज्ञान यांच्या उत्कर्षाचा काळ म्हणजे प्रबोधनकाळ होय. हा साधारणतः १८ व्या शतकामध्ये होऊन गेला.
- **महाकथने** : अखिल मानवजातीला लागू पडतील असे वैश्विक सिध्दांत.
- **थिक डिस्क्रीप्शन** : वर्तनांचा, त्यांच्या संदर्भासह विचार करणे.
- **लिंगभाव** : संबध, तुलना आणि भेद हे लिंगाधारीत आहेत याची जाणीव होणे म्हणजे लिंगभाव.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१) १. *(अ) जेम्स रॉबीन्सन.*

२. *(अ) पुनरुज्जीवन काळ.*

३. *(अ) गुस्ताव केम.*

२) १. *मानवी जीवन, प्रागैतिहासिक काळापासून मानवाचा अभ्यास, घटनांबरोबरच मानवाने निर्माण केलेल्या विविध संस्थांचा अभ्यास, इतर शाखांची मदत, पुराव्यांवर भर, नाट्यमयतेपेक्षा सत्यावर शोध.*

२. *जेकब बर्कहार्ड.*

३. *जर्गन हबरमास.*

४. *क्लिफॉर्ड गिझ.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. जाँ ल्योटार्ड

२. मानवी समुहाच्या मोठ्या गटाला लागू पडणारे वैश्विक स्वरुपाचे सिध्दांत.

३. मिशेल फुको.

४. मिशेल फुको.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

- **टिपा द्या.**

अ) इतिहासातील नवे प्रवाह.

ब) जेकब बर्कहार्ड.

क) जर्गन हबरमास.

ड) क्लिफॉर्ड गिझ.

इ) उत्तर आधुनिकतावाद आणि इतिहास.

- **दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सांस्कृतिक इतिहास म्हणजे काय ते सांगून, तिचा विकास स्पष्ट करा.

२) उत्तर आधुनिकतावादाची चिकित्सा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


- **कोठेकर, शांता** : *'इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान'*.
- **Robinson, James Harvey** : *'The New History'*, Proceedings of the American Philosophical Society, Vol. 50, No. 199 (May-Aug. 1911) Pp. 179-190.


❑ ❑ ❑

घटक-२

# इतिहास आणि सहाय्यकारी शास्त्रे
# (History and Allied Disciplines)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ विभाग १ : (अ) मानवशास्त्र आणि (ब) एथ्नोग्राफी

२.२.२ विभाग २ : पुरातत्वशास्त्र

२.२.३ विभाग ३ : (अ) मूर्तीशास्त्र, (ब) नाणकशास्त्र आणि (क) पुराभिलेखशास्त्र

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर,

- आपल्याला मानवशास्त्र आणि एथ्नोग्राफी या दोन शास्त्रांचा परिचय होईल.
- आपल्याला पुरातत्वशास्त्र म्हणजे काय? हे लक्षात येईल.
- आपल्याला मूर्तीशास्त्र, नाणकशास्त्र आणि पुराभिलेखशास्त्र या शास्त्रांचा परिचय होईल.
- तसेच, आपल्याला, या शास्त्रांची, इतिहासाच्या अभ्यासासाठी कशी मदत होते हे ही कळून येईल.

## २.१ प्रस्तावना

आज इतिहास ही कला वगैरे राहिलेली नसून, ते एक शास्त्र बनलेले आहे. पुराव्यांचा आधार आणि शास्त्रीय पध्दतीचा वापर हा इतिहासाचा मूलमंत्र आहे. अर्थात, अशा पुराव्यांचे स्वरुप भिन्न प्रकारांचे असते. त्यामुळे गतकाळाचा अभ्यास करताना, निव्वळ लिखित साधनांवर अवलंबून न राहता, अशा वैविध्यपूर्ण साधंनाचा वापर करणे गरजेचे बनलेले आहे. त्यामुळे, आपल्याला विविध शास्त्रांची मदत घ्यावी लागते. अशाच विविध सहाय्यकारी शास्त्रांचा परिचय आपल्याला करुन घ्यावयाचा आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ विभाग १ : (अ) मानवशास्त्र (Anthroplogy) आणि (ब) एथ्नोग्राफी (Ethnography)

#### (अ) मानवशात्र (Anthroplogy)

सामाजिक शास्त्रांच्या विश्वकोशानुसार ''मानवाच्या भूतकाळाचा आणि वर्तमानकाळाचा अभ्यास करुन, त्याचे विश्लेषण करणारे आणि वर्णन करणारे शास्त्र म्हणजे 'मानवशास्त्र' होय.'' "Anthropology is the study, analysis, and description of humanity's past and present."

'मानवाचा अभ्यास' या व्यापक दृष्टिकोनामूळे; स्थळ, काळ आणि विषय या तिन्ही स्तरावर अगणित अभ्यासाचे विषय यामध्ये येत असतात. अर्थात, 'विशिष्ठ मानवी संस्कृती' हा अभ्यासाचा केंद्रबिंदू असतो. सध्या, आधुनिक मानव या शाखेच्या अभ्यास क्षेत्रामध्ये आलेला आहे. असे असले तरी, मानवशास्त्रामध्ये, मुख्यत्वे, आदिम अवस्थेत असलेल्या समाजांचाच अभ्यास केला जातो.

या आदिम समाजातील कुटुंब, भावकी, विवाहासारख्या विविध संस्था, अपत्यसंगोपन, रोगप्रतिकारक स्थानिक प्रथा तसेच औषधांचे ज्ञान, समाजातील श्रेणीपध्दती, सत्तेची रचना, उपजिविकेची साधने, अर्थव्यवस्था, धर्म, अंत्यसंस्कार, कला इ. यांचा अभ्यास केला जातोच. शिवाय, या सर्व बाबींमागील, त्यांची मूल्यव्यवस्था/वैचारिक बैठक/धारणा यांचा ही अभ्यास केला जातो.

मानवाच्या संस्कृतीबरोबरच, यामध्ये मानवाच्या शारिरीक वैशिष्ट्यांचाही अभ्यास येथे केला जातो. यासाठी दोन स्वतंत्र शाखाही विकसित झालेल्या आहेत.

तसेच मानवशास्त्राची अभ्यासपध्दती ही शास्त्रीय (Scientific) ही असते तशीच मानवविद्येलाही (Humanistic) लक्षात घेणारीही असते. शास्त्रीय पध्दतीमध्ये 'निगमन' (Deductive) पध्दती वापरली जाते. म्हणजे, प्रथम, एक अभ्युपगम (Hypothesis) किंवा समस्या (Problem) समोर ठेवली जाते.

आणि, त्या अनुषंगाने अभ्यास केला जातो, निरिक्षणे केले जातात. थोडक्यात, त्या अभ्युपगमाची चाचणी घेतली जाते. यातून मिळणारी माहिती ही वर्णनात्मक/गुणात्मक (Qualitative) असते तशीच संख्यात्मकही (Quantitative) असू शकते. तर मानवविद्येच्या दृष्टिकोनातून अभ्यास करताना 'विगमन' (Inductive) पध्दती वापरली जाते. म्हणजे, प्रथम अभ्यास केला जातो, निरिक्षणे केली जातात. यातून फक्त वर्णनात्मक/गुणात्मक माहिती मिळते. इथे प्रथम अभ्युपगम तयार केला जात नाही.

अर्थात, अशा दोन पध्दती जरी असल्या आणि उद्देश कोणताही असो; मानवशास्त्राची मुख्य अभ्यास पध्दत म्हणजे 'क्षेत्रअभ्यास' (Field Work) ही होय. मुख्यत्वे, मॅलिनोवस्कीच्या आग्रहातून, मानवशास्त्रामध्ये; मानवी समाजामध्ये प्रत्यक्ष दीर्घ काळ राहून; त्यांचे निरिक्षण केले जाते, अभ्यास केला जातो. थोडक्यात, गुणात्मक पध्दतीवर येथे भर असतो. अशा वेळी प्रत्यक्ष निरिक्षण, संवाद, मुलाखत, त्यांच्या कृतीमध्ये सहभागी होणे, मौखिक परंपरा अशी साधने या अभ्यासासाठी वापरली जातात.

अमेरिकेमध्ये, शारिरीक मानवशास्त्र आणि इतर मानवशास्त्राच्या शाखा (इतर शाखा) असे दोन ठळक विभाग आहेत. तर, युरोपमध्ये मानवशास्त्र (अमेरिकेनुसार शारिरीक मानवशास्त्र) आणि एथ्नोलॉजी (इतर शाखा) असे दोन विभाग पाडले जातात. तर भारतात, मानवशास्त्र आणि पुरातत्वशास्त्र असे दोन स्वतंत्र विभाग आहेत.

मानवशास्त्रातून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग विविध क्षेत्रामध्ये होत असतो. सरकारी धोरण ठरविण्यासाठी, उद्योगपतींना, तंत्रज्ञानामध्ये काम करणाऱ्या, आरोग्यसेवा पुरवणाऱ्यांना, शिक्षकांना इ.

अमेरिकेमध्ये, मानवशास्त्र हे 'चार' स्वतंत्र मात्र परस्परसंबधीत शास्त्रांचे बनलेले आहे. पुरातत्वशास्त्र (Archaeology), शारिरिक मानवशास्त्र (Physical/Biological Anthropology), भाषाशास्त्रीय मानवशास्त्र (Linguistic Anthropology) आणि सांस्कृतिक/सामाजिक मानवशास्त्र (Cultural/Social Anthropology). काहीं जण, यामध्ये, 'कार्यान्वीत मानवशास्त्र' (Applied Anthropology) या पाचव्या शास्त्राचीही भर घालतात.

**१. पुरातत्वशास्त्र** : 'गतकाळातील मानवाच्या भौतिक संस्कृतीचा अभ्यास करुन, त्याचा इतिहास समजून घेणे याला पुरातत्वशास्त्र म्हणतात.' या शास्त्राचे प्रमुख दोन भाग समजले जातातः प्रागैतिहासिक पुरातत्व (Prehistoric Archaeology) आणि ऐतिहासिक पुरातत्व (Historical Archaeology). हा फरक फक्त-लिखित का अलिखित अशा साधनांच्या स्वरुपावरून पडलेला आहे. तसेच, ज्या संदर्भात साधने सापडतात, त्या संदर्भावरुनही पुरातत्वाच्या शाखा तयार होतात, जसे, Underwater Archaeology, Industrial Archaeology.

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात या शास्त्राचा उदय झाला असे समजले जाते. या काळात इंग्लडमधील

मोठमोठे जमिनदार हे दगड, कास्य, लोह यामधील विविध अवशेषांचा संग्रह करीत. तो, संग्रह, आपल्या मित्रांसाठी खुला करीत. मग, बागकामाची अवजारे वापरुन, लोक ही उत्साहाने जमिन उकरु लागले. अवशेष जमिनीबाहेर येऊ लागले. मग लूटारु आले. ते ही गुप्तधनाच्या आशेने खुदाई करु लागले. अर्थात, यामुळे, पुरातत्वीय स्थळांचा नाश होत असे. पुढे, १८ व्या शतकाच्या शेवटी 'पाँपी'चा शोध लागला. येथून, उत्खननाकडे गांर्भियाने पाहिले जाऊ लागले.

१८३० च्या दशकातील, दोन शोधांमुळे पुरातत्वीय संशोधनामध्ये विकास झाला. एकतर, बूशर द पार्थे (१७८८-१८६८) याने, फ्रान्समधील ॲबव्हिल याठिकाणी अश्मयुगीन हत्यारे शोधली. ही जवळजवळ लाखो वर्षापूर्वीची होती. दुसरं म्हणजे, डॅनिश विद्वान ख्रिश्चन थॉमसन (१७८८-१८६५) याने मांडलेली 'त्रियुगाची' (Three Age System) संकल्पना. मानवाचा विकास अश्म, कास्य आणि लोह अशा तीन युगांच्या टप्प्यातून झाला असे त्याचे म्हणणे होते. या दोन्ही शोधांमुळे, मानवाचे प्राचीनत्व आणि त्याचा विकास या दोन वैचारिक बैठका पुरातत्वीय संशोधनाला मिळाल्या. साधारण याच दरम्यान, १८४४ मध्ये, टरगॉ याने तीन टप्प्यातील मानवाचा आर्थिक विकास ही संकल्पना मांडली; शिकार करणारा, पशुपालन करणारा आणि शेती करणारा.

पुढे, सर जॉन लुबॉक यांनी, त्यांच्या 'प्रिहिस्टॉरिक टाईम्स' (१८६५) या ग्रंथातून थॉमसनच्या कालखंडाना व्यवस्थित रुप दिले. त्याने, पुराश्मयुग (Palaeolithic) आणि नवाश्मयुग (Neolithic) असे दोन कालखंड पाडले. पुढे, मध्याश्मयुगाची (Mesolithic) भर, या दोन कालखंडांच्या मध्ये पडली. २० व्या शतकाच्या पूर्वार्धापासून, पुरातत्वशास्त्राचा बराच विकास होत गेला. पुढे, जगातील विविध देशांमध्ये आता उत्खननं होऊ लागली. जसे, दक्षिण अमेरिकामधील देश, आफ्रिकेमधील देश, आशियातील देश इ. अर्थात, ''सांस्कृतिक कालक्रम'' शोधून, इतिहासाची बांधणी करणे एवढाच उद्देश या उत्खननांचा होता.

पुढे, २० व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये Processual आणि Post-Processual हे दोन विचार पुढे आले. Processual मध्ये, निव्वळ सांस्कृतिक कालक्रमापेक्षा, आता प्रक्रिया-बदल समजून घेणे महत्वाचे बनले. त्यांच्या मते, मानव आणि त्याचे पर्यावरण यांची, स्वतःची एक व्यवस्था (System) असते. या दोनही व्यवस्थांमध्ये परस्परसंबध असतो. त्यामुळे, ज्यावेळी पर्यावरणाच्या व्यवस्थेमध्ये जेव्हा बदल होतो त्यावेळी मानवाच्या व्यवस्थेमध्येसुध्दा बदल होत असतो. तर Post-Processual मध्ये, प्रागैतिहासिक मानवाच्या दैनंदिन जीवनावर लक्ष केंद्रित केले जाते. त्यांचे समाजसंगठन कसे असते, या संगठनामध्ये श्रेणी कशा असतात, त्यांच्या श्रध्दा कशा असतात इ. विषयांचा यामध्ये अंतर्भाव होतो. थोडक्यात, ज्याप्रमाणे, सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञ वर्तमानातील जातींचा अभ्यास करतात तोच अभ्यास, हे विद्वान, प्रागैतिहासिक समाजाबाबत करण्याचा प्रयत्न करीत असतात. पुढे, यातूनच, शहरी पुरातत्व, औद्योगिक पुरातत्व अशा शाखा विकसित झाल्या.

पुरातत्वशास्त्रज्ञांना 'सांस्कृतिक संसाधन व्यवस्थापन' (Cultural Resource Management) या क्षेत्रामध्ये मोठी मागणी असते. याठिकाणी, कोणतेही प्रकल्प हाती घेताना, त्याठिकाणी भौतिक संस्कृती कोणती आहे, तिला कसे वाचवावे याचा विचार केला जातो.

**२. शारिरीक मानवशास्त्र** : मानवाचा, तो एक प्राणी आहे असे समजून त्याच्या शरीराचा यामध्ये अभ्यास केला जातो. यामध्ये, त्याची उत्क्रांती आणि त्याच्या शरीरातील होत गेलेले बदल लक्षात घेतले जातात.

१८ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि १९ व्या शतकाची सुरुवात हा तो काळ होता. या काळामध्ये जेम्स हटन आणि सर चार्लस् लायेल यांसारख्या विद्वानांनी भूगर्भशास्त्र आणि अश्मास्थी यामध्ये संशोधन केले. या संशोधनातूनच, पुढे, मानवाच्या उत्क्रांतीच्या अभ्यासाला गती मिळाली. त्यात, १८५० च्या दशकात दोन महत्वाचे शोध लागले. एकतर, जर्मनीमधील डसेलडॉर्फ याठिकाणी निअँडरथल मानवाच्या पूर्वीच्या मानवाचे अवशेष सापडले (१८५६). आणि दुसरं म्हणजे, चार्लस डार्विन यांच्या 'माकडापासून मानवाच्या उत्क्रांतीचा' आणि 'स्पर्धेत टिकून राहण्याची क्षमता' अशा दोन संकल्पनांचा उदय (१८५९). या दोन शोधांमुळे, एका प्रजातीची उत्क्रांती कशी होत जाते याबाबत एक वैचारिक बैठक मिळालेली होती. इथून, या शाखेचा अधिक विकास झाला. या शास्त्राच्या तीन उपशाखा आहेत, Primatology, Paleoanthropology, Contemporary Human Biology.

Primatology मध्ये, 'मर्कट' कुटुंबाचा अभ्यास केला जातो. यामध्ये मानव तर आहेच शिवाय मर्कटाच्या इतर प्रजातींचाही विचार केला जातो. इथे, हे प्राणी कसा वेळ घालवतात, अन्न संकलन कसे करतात, वाटप कसे करतात, सामाजिक संगठन कसे बांधतात, बालकांना कसे वाढवतात, समस्येचा सामना कसे करतात, बंदिस्त असताना त्यांचे वर्तन कसे असते या सर्वांचा अभ्यास (नोंदी, विश्लेषण) येथे केला जातो.

Paleoanthropology मध्ये, अश्मास्थींच्या (Fossils) आधारे मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला जातो.

Contemporary Human Biology मध्ये, आधुनिक मानवाच्या शारिरिक रचना आणि वर्तनामधील साम्य आणि बदल याचा अभ्यास केला जातो. यामध्ये, आहारपध्दती, प्रजननक्षमता, शारिरिक वाढ, आरोग्य, शहरी तणाव, प्रदुषण इ. बाबींचा अभ्यास केला जातो. जेनेटिक आणि मॉलेक्युलर अभ्यास ही यामध्ये येईल. याद्वारे, विशिष्ठ रोगराई कशा प्रकारच्या/कशा परिस्थितीत राहणाऱ्या माणसांमध्ये वेगाने पसरते हे ही लक्षात येते.

**३. भाषाशास्त्रीय मानवशास्त्र** : भाषा ही संस्कृतीमधील महत्वाचा घटक असतो. कारण, भाषेद्वारेच संस्कृतीमध्ये संवाद होत असतो, ती पुढे वाहत राहत असते. या शाखेमध्ये, मर्कट कुटुंबातील प्राण्यांच्या संवाद साधण्याच्या पध्दतीचा अभ्यास केला जातो.

साधारण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये, युरोपियन विद्वानांचा युरोपाबाहेरील अनेक समाजांशी संपर्क झाला. या समाजांच्या भाषा या अलिखित आहेत आणि युरोपियनांच्या संपर्कानंतर, त्या भाषा संपत चाललेल्या आहेत हे लक्षात आले. त्यामुळे अशा वेगाने मृत होणाऱ्या आणि अलिखित असणाऱ्या भाषांचा अभ्यास करणे; नोंदी करणे हे या शाखेचे प्रमुख कार्य बनले. सर विल्यम जोन्स (१७४६-९४) यांना या शाखेचा जनक असे मानले जाते. त्यांनी, भाषेचे एक 'कुटुंब' आहे असे मानले. याचा अर्थ प्रथम एकच मूळ भाषा, पुढे, त्या भाषेची विविध कुटुंबं/शाखा तयार होतात. जसे, 'इंडो' (संस्कृत) या मूळ भाषेतून, इंडो युरोपियन, इंडो इराणीयन, इंडो आर्यन अशा प्रकारे. त्यामुळे, या काळात, भाषेचे मूळ, विविध प्रदेशातील भाषांचा एकमेकांशी असणारा ऐतिहासिक संबंध, आदिम लोकांची भाषा इ. विषय अभ्यासले जाऊ लागले. तर फ्रान्झ बॉप, रास्मज रास्क, जेकब ग्रिम अशा विद्वांनानी 'तौलनिक भाषाशास्त्र' या शाखेची बैठक घातली. यामध्ये, रास्कने विविध भाषांतील समान ध्वनी निघणाऱ्या शब्दांकडे लक्ष वेधले. यातून, विविध प्रदेशातील भाषांचा तुलनात्मक अभ्यास होऊ लागला.

तर, स्विस भाषाशास्त्रज्ञ फ्रर्डिनंड सोसूर याने 'सरंचनात्मक पध्दती' ची बैठक घातली. भाषेच्या विकासापेक्षा, त्याने भाषेच्या संरचनेवर भर दिला. याच्या मते, भाषेमध्ये दोन भाग असतात. एक असतो व्याकरणाचे नियम (la langue), आणि दुसरा असतो प्रत्यक्ष बोलली जाणारी भाषा (la parole). त्यामुळे, विद्वानांनी अशा बोलली जाणारी भाषेचा अभ्यास करुन, त्याचे नियम शोधून काढले पाहिजेत. याच आधारे पुढे फोनेम (Phoneme) आणि मॉर्फेम (Morpheme) या संकल्पनांचा उदय झाला. फोनेम मध्ये प्रत्येक अक्षर आणि त्यांचे उच्चार हे स्वतंत्र असतात. याल 'अक्षर' म्हणू. तर मॉर्फेम मध्ये या फोनेम्सची, म्हणजे, त्या विशिष्ठ हेतून, अक्षरांची मांडणी केली जाते. याला शब्द असे म्हणू! थोडक्यात, विविध शब्दांसाठी म्हणजे मॉर्फेमसाठी, फोनेम्सची/स्वतंत्र अक्षरांची मांडणी केली जाते. जसे 'मरा' या शब्दांसाठी, म आणि रा या दोन अक्षरांची एकापाठोपाठ एक अशी मांडणी केली. तर, तीच अक्षरे उलटी करुन 'राम' हा शब्द तयार केला. तर, अशाप्रकारे या मॉर्फेमची वाक्यांमध्ये ज्यावेळी मांडणी केली जाते त्यावेळी त्याला 'सिंटॅक्स' असे म्हंटले जाते. थोडक्यात, सिंटॅक्स-मॉर्फेम-फोनेम्स अशी रचना होईल.

म्हणजेच संरचनावादामध्ये, एका संस्कृतीचा अभ्यास करताना, त्यातील मानवाचे आपल्याला दिसणारे जे वर्तन असते त्याला महत्व देण्यापेक्षा; ते वर्तन ज्या धारणतेून/मूल्यव्यवस्थेतून/वैचारिक बैठकीतून घडत असते त्या बैठकीचा-संरचनेचा अभ्यास करणे आवश्यक असते.

या शाखेचे तीन उपविभाग आहेत; ऐतिहासिक भाषाशास्त्र (Historical Linguistic), वर्णनात्मक/संरचनात्मक भाषाशास्त्र (Descriptive/Structural), सामाजिक भाषाशास्त्र (Sociolinguistic).

- ***ऐतिहासिक भाषाशास्त्रामध्ये,*** काळाच्या विविध टप्प्यामधून भाषेचा जो विकास होतो त्याचा अभ्यास केला जातो. ही भाषा बदलत कशी जाते, विविध भाषांचा एकमेकांशी कसा संबंध

असतो, सांस्कृतिक बदल आणि भाषेतील बदल याचा काय संबंध आहे इ. गोष्टींचा अभ्यास केला जातो.

- ***वर्णनात्मक/संरचनात्मक भाषाशास्त्रामध्ये,*** भाषिक संरचनेमुळे (व्याकरण, ध्वनी व्यवस्था) समकालीन भाषा या एकमेकांपासून कशा वेगळ्या होतात हे अभ्यासले जाते. थोडक्यात, भाषेपेक्षा; त्या भाषेच्या संरचनेवर भर दिला जातो.

- ***सामाजिक भाषाशास्त्रामध्ये,*** समाजातील बदल, सामाजिक संदर्भ आणि भाषांतील बदल यांचा सहसंबंध अभ्यासला जातो. यामध्ये, 'भाषाविरहित संवादांचा' (Nonverbal Communication) ही विचार केला जातो. १९८० नंतर, या शाखेमध्ये चार नवे प्रवाह दिसून येतात. एक म्हणजे, आंतरराष्ट्रीय/प्रादेशिक/स्थानिक स्तरांवर दैनंदिन वापर आणि चर्चामध्ये वापरली जाणारी भाषा आणि तिचा सत्तेशी असणारा संबंध विचारात घेतला जाऊ लागला. दुसरं म्हणजे, जागतिक भाषांचा अभ्यास होऊ लागला, जसे, इंग्रजी, स्पॅनिश, चीनी. तिसरं म्हणजे, 'माध्यमांची भूमिका' विचारात घेतली जाऊ लागली. यामध्ये, भाषा आणि राष्ट्रीयत्व यांचा संबंध, एखादी संस्कृती घडवण्यामध्ये माध्यमांचे योगदान इ. चा विचार होऊ लागला. आणि चवथं म्हणजे, 'भाषेचा अधिकार हा एक मानव अधिकार आहे' असा विचार होऊ लागला.

४. **सांस्कृतिक मानवशास्त्र** : यामध्ये वर्तमानकाळातील मानवी समाजातील संस्कृतींचा अभ्यास केला जातो. म्हणजे, एका समाजाचा भाग म्हणून मानव जो काही शिकतो, वर्तन करतो, त्याच्या ज्या श्रध्दा आहेत त्यांचा येथे अभ्यास केला जातो. यामध्ये बरेच उपविभाग आहेत, जसे, राजकीय मानवशास्त्र, अर्थशास्त्रीय मानवशास्त्र, कायदा मानवशास्त्र, वैद्यकीय मानवशास्त्र, मानसशास्त्रीय मानवशास्त्र तसेच, कुटुंब/भावकीचा अभ्यास, सामाजिक संगठन, सामाजिक भेद, धर्म, संवाद इ. ही अभ्यासविषय यात येतात.

**'सांस्कृतिक मानवशास्त्र' या विद्याशाखेचा विकास म्हणजे एकंदर मानवशास्त्राच्या संकल्पना आणि पध्दतीमधीलच विकास आहे** हे लक्षात येते. त्यामुळे ही शाखा कशी विकसित झाली त्याचा येथे विचार करु.

अगदी सुरुवातीला हिरोडोटस, मार्को पोलो, इब्न खाल्दून असे लोक प्रवास करत. त्यावेळी त्यांचा, नव्या आणि अनोळखी संस्कृतींचा परिचय झाला. त्यांनी-त्यां संस्कृतीच्या नोंदी केल्या. यावेळी या शाखेचा उदय झाला असे म्हणले जाते. पुढे, १८ व्या शतकामध्ये, माँटेस्कूसारख्या फ्रेंच विद्वानानेही अशा नोंदी केल्या. 'विविध वातावरणामध्ये राहणाऱ्या लोकांची संस्कृती विविध असते. म्हणजे, त्यांचा स्वाभाव, देहबोली, शासनव्यवस्था वेगवेगळ्या असतात' असे त्याने, Spirit of Laws मध्ये नोंदवून ठेवलेले आहे. म्हणजे 'संस्कृतीं तपासून, त्यावरुन एक साधारण निष्कर्ष काढणे' ही पध्दती येथे दिसते. अर्थात, या पध्दतीमध्ये शास्त्रीयता नव्हती.

१९ व्या शतकातील डार्विनच्या 'उत्क्रांतीवादा'नंतर, या शाखेला गती आली. लुईस मॉर्गन (अमेरिका), एडवर्ड टायलर, जेम्स फेझर (इंग्लड) हे या काळातील महत्वाचे अभ्यासक होत. यांच्या म्हणण्यानुसार, जगामध्ये जो काही संस्कृतीमध्ये फरक आहे त्याचे कारण सांस्कृतिक उत्क्रांतीमध्ये (Cultural Evolution) दडलेले आहे. ही उत्क्रांती, 'प्रथम मागास नंतर विकास' अशा क्रमाने होत जाते. प्रत्येक संस्कृती एकाच वेगाने किंवा प्रत्येक टप्पा घेत जाते असे होत नाही. त्यामुळे या वेगात आणि टप्प्यात फरक पडतो म्हणून संस्कृतींमध्ये फरक पडतो. असे हे सांस्कृतिक उत्क्रांतीवादी जे होते त्यांनी विविध संस्कृतीतील, विकासाच्या टप्प्यांचे 'मॉडेल्स' तयार केले. जसे, मॉर्गनच्या 'भावकीच्या (Kinship) मॉडेल'नुसार, सुरुवातीला वारसाहक्क हा मातृसत्ताक होता पुढे तो पितृसत्ताक झाला. फेझरच्या 'धर्माच्या मॉडेल'नुसार, आदिम अवस्थेमध्ये 'जादू'ला श्रध्देमध्ये महत्व होते. पुढे संस्कृतीचा विकास झाल्याने, जादूची जागा 'धर्माने' घेतली. तर पुढे विकसित संस्कृतीमध्ये धर्माची जागा 'विज्ञान' घेते.

अर्थात, हा जो काही डार्विनच्या प्रभावाखालील सांस्कृतिक उत्क्रांतीचा अभ्यास होता त्याच्यामध्ये महत्वाचे दोष होते. एकतर, संस्कृतीचा विकास एका सरळ रेषेतेच होत असतो अशी यांची चुकीची धारणा होती. तसेच, संस्कृतीचे मूळ हे एकाच गोष्टीत असावं का अनेक गोष्टीमध्ये? हा ही प्रश्न होताच. दुसरं म्हणजे, ही जी काही उत्क्रांतीची स्पष्टीकरणं होती ती फारच ढोबळ होती. याचे कारण म्हणजे फारच कमी पुरावे यांच्याकडे होते. महत्वाचं म्हणजे हा सर्व अभ्यास हा, 'युरोपियन संस्कृती ही जगातील सर्वात उच्च संस्कृती आहे' अशा चुकीच्या धारणेवर आधारलेला होता. थोडक्यात, ही एक वसाहतवादी वृत्ती होती.

अर्थात, वरील महत्वाचे दोष जरी यात असले तरी, शास्त्रामध्ये होणाऱ्या प्रगतीचा-तसेच, शास्त्रीय पध्दतीचा वापर करुन 'संस्कृती' समजून घेणे हा दृष्टिकोन या काळात विकसित झाला हे महत्वाचे.

या काळातील, इतर बहुतेक अभ्यासक हे 'आरामखुर्चीतील मानवशास्त्रज्ञ' होते. म्हणजे, ते प्रवासी, अन्वेषक, धर्मप्रचारक आणि एथ्नोग्राफर्सच्या वृत्तांतावर अवलंबून रहात असत. या वृत्तांतांच्या आधारे ते आपले मॉडेल्स तयार करत असत. मात्र, मॅलिनोवस्कीने, यामध्ये बदल घडवून आणला.

मॅलिनोवस्कीला 'आधुनिक सांस्कृतिक मानवशास्त्रातील पध्दतीशास्त्राचा जनक' मानले जाते. 'एखाद्या संस्कृतीचा जर अभ्यास करायचा असेल तर त्यांच्यासोबत राहूनच करावा' असे त्यांचे ठाम मत होते. त्याने 'प्रकार्यवादा'चा (Functionalism) सिध्दांत मांडला. त्याच्या म्हणण्यानुसार संस्कृती ही आपल्या शरीरासारखी असते. शरीर व्यवस्थित चालण्यासाठी जसे प्रत्येक भागाचे व्यवस्थित कार्य करणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे, संस्कृतीतील विविध घटक जर कार्य करीत असेल तर ती संस्कृती अस्तित्वात राहते. त्यामुळे, एखाद्या संस्कृतीचा अभ्यास करताना, तिचा प्रत्येक भाग समजून घेणे आवश्यक असते. याला Holism असे ही म्हणतात.

तर, फांज बॉस याने मानवशास्त्र हे, परस्परसंबधित चार विद्याशाखांनी बनलेले असते असे मत मांडले. त्याने सांस्कृतिक उत्क्रांतीवादाला विरोध केला. त्याच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक संस्कृती महत्वाची असते. यामध्ये, श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे काही नसते. त्याने 'सांस्कृतिक सापेक्षवादा'ची संकल्पना मांडली. एखाद्या संस्कृतीचा अभ्यास, हा त्याच संस्कृतीतील मूल्यव्यवस्था आणि वैचारिक बैठक विचारात घेऊन करायला हवा. इतर संस्कृतीच्या दृष्टिकोनातून नव्हे! तसेच, एखादी संस्कृती ज्या संदर्भात घडते आहे, त्याच संदर्भाच्या आधारे, त्या संस्कृतीचा अभ्यास होणे अपेक्षित आहे. याला 'ऐतिहासिक विशिष्ठवाद' (Historical Particularism) असे म्हणले जाते. थोडक्यात, विविध संस्कृतींबाबत जे ढोबळ आणि साधारण निष्कर्ष काढले जातात, जे वैश्विक सिध्दांत, महाकथने असतात ती अत्यंत चुकीची असतात. त्या, त्या संस्कृतीचा त्यांच्या त्यांच्या व्यवस्थेनुसार, आणि त्यांच्याच संदर्भानुसार अभ्यास करावा-निष्कर्ष काढावेत.

मॅलिनोवस्की आणि बॉस च्या अभ्यासामुळे सांस्कृतिक मानवशास्त्र या शाखेची मोठी प्रगती झाली. 'युरोपियन वर्चस्ववाद' आणि 'एका रेषेतील उत्क्रांती' अशा ढोबळ संकल्पना मागे पडल्या. खूर्चीत बसून नव्हे तर प्रत्यक्ष संस्कृतीमध्ये राहून अभ्यास करण्याची नवी पध्दती मिळाली. तो मानवशास्त्राचा महत्वाचा भाग बनला.

१९६०-७० नंतर या शाखेचा अधिक विकास झाला. 'सांस्कृतिक पर्यावरण' (Cultural Ecology) हा विचार पुढे आला. 'पर्यावरण आणि संस्कृतीतील साम्य/बदल' यांच्यातील सहसंबंध अभ्यासला जाऊ लागला. समान पर्यावरणातून, समान संस्कृती उदयास येतात असे हे म्हणू लागले.

याचबरोबर, फ्रेंच मानवशास्त्रज्ञ आणि भाषाशास्त्रज्ञ लेव्ही स्ट्रॉस ने 'संरचनावाद' (Structuralim) मांडला. त्याच्या म्हणण्यानुसार, एखादी संस्कृती समजून घ्यायची असेल तर त्या संस्कृतीतील दंतकथा, कथा ऐकल्या पाहिजेत. त्यांचे विश्लेषण करुन, त्याच्यामागील अर्थ समजून घ्यायला पाहिजे. त्याने, दक्षिण अमेरिकेतील, स्थानिकांकडून विविध पुराणकथा गोळा केल्या. त्यांच्या आधारे, या संस्कृतीची मूल्यव्यवस्था/धारणा/वैचारिक बैठक समजून घेतली.

संरचनावाद आणि प्रकार्यवाद यामध्ये फरक आहे. 'प्रकार्यवाद' हा मानवी वर्तन/त्याची कृती लक्षात घेतो त्यावरुन संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न करतो. यासाठी, त्या कृतीचे व्यवस्थित निरिक्षण करुन, त्यांची नोंद करणे ही महत्वाची पध्दती असते. तर 'संरचनावाद' हा मानवाच्या कृतीमागील मूल्यव्यवस्था लक्षात घेतो. त्यातून, संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न करतो. यासाठी, त्यांच्या कथा, दंतकथा, पुराणकथा यांच्या नोंदी करणे, विश्लेषण करणे ही पध्दती होते.

पुढे, सांस्कृतिक पर्यावरण या संकल्पनेचा अधिक विकास होऊन, त्यातून 'सांस्कृतिक भौतिकवाद' (Cultural Materialsm) ही संकल्पना उदयास आली. ही संकल्पना मार्विन हॅरिसने मांडली. याच्यावर

मार्क्सवादाचा अर्थातच प्रभाव होता. त्याच्या म्हणण्यानुसार एखाद्या संस्कृतीचा अभ्यास करताना; मानवाची भौतिक अवस्था, तेथील नैसर्गिक पर्यावरण आणि अशा प्रकारे, विशिष्ठ पर्यावरणातील एखादी संस्कृती कशी जगते याचा विचार करणे महत्वाचे असते. त्याची हा 'विशिष्ठ पर्यावरणातील विशिष्ठ भौतिक संस्कृती' हा त्या संस्कृतीचा पाया (Infrastructure) असतो. संस्कृतीचा हा 'पाया' एकदा लक्षात आला की मग, त्यावर उभारलेले संस्कृतीचे विविध घटक लक्षात येतात, जसे सामाजिक संगठन, वैचारिक बैठक इ. ही झाली इमारत (Superstructure). यासाठी, तो भारतातील 'गाईचे' उदाहरण देतो. तो म्हणतो की भारतामध्ये गाय पवित्र मानली जाते. त्याचे कारण, तीचे बरेच भौतिक उपयोग आहेत, जसे, बैलाचा नांगरणीसाठी उपयोग, शेणाचा खत म्हणून उपयोग, दूध इ. इथे, 'गाईला पवित्र मानणे' ही श्रध्दा झाली Superstructure आणि तिचे भौतिक उपयोग झाले Infrastructure.

त्याचबरोबर, संरचनावादाचा विकास होऊन 'अन्वयार्थात्मक मानवशास्त्र' (Interpretative Anthropology) या संकल्पनेचा उदय झाला. क्लिफर्ड गिझने ही संकल्पना मांडली. त्याच्या म्हणण्यानुसार, संस्कृती समजून घेणे म्हणजे त्यातील लोक कसे विचार करतात, तिथे प्रतिकं कोणती आहेत-त्यांचा अर्थ ते कसे लावतात, इ. समजून घेणे होय. थोडक्यात, हॅरिस जिथे भौतिक संस्कृतीला महत्व देतो तिथे गिझ वैचारिक संस्कृतीला महत्व देतो. त्यामुळे, गिझ एखाद्या संस्कृतीतील मानवाच्या विशिष्ठ वर्तनाचे स्पष्टीकरण देताना, ते वर्तन कोणत्या संदर्भात घडते, त्या वर्तनामागे त्याचा काय विचार होतो याला महत्व देतो. याला Thick Description असे म्हणले जाते.

ज्युलियन स्टिवर्ड सारखे विद्वान 'सांस्कृतिक पर्यावरण' ही संकल्पना मांडू लागले आहेत. ज्या पध्दतीने पर्यावरणाशी मानव जोडून घेत जातो त्याप्रमाणे त्याच्या संस्कृतीमध्ये संगठन घडत असते असा हा विचार आहे. तर, लेस्ली व्हाईट पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी मानवाने ज्या काही तांत्रिक सुधारणा केल्या त्याचा विचार करतो. तसे 'स्त्रीवादी मानवशास्त्र'सारखे नवे विचार पुढे येत आहेत. तसेच, एखाद्या संस्कृतीचा अभ्यास करताना, व्यक्तीविशेषांचाही आता विचार केला जाऊ लागला आहे. पूर्वीसारखे फक्त आदिम समाजच नव्हे तर, आजचे ग्रामीण आणि शहरी समाजही आता मानवशास्त्राच्या अभ्यासाचे विषय बनलेले आहेत.

थोडक्यात, शारिरीक मानवशास्त्र हे मानवाच्या संस्कृती निर्माण करण्याच्या शारिरीक क्षमतांचा विचार करतात; पुरातत्वशास्त्रज्ञ, भौतिक अवशेषांच्या आधारे या संस्कृतीचा विकास शोधतात; भाषाशास्त्रज्ञ ही संस्कृती, भाषेच्या आधारे कशी टिकून राहते त्या भाषेच्या विकासांचा अभ्यास करतात; तर सामाजिक/ सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञ हे या संस्कृतीच्या स्वरुपाचा जो विकास झाला त्याचा अभ्यास करतात.

अलिकडे मानवशास्त्राचा समाजाला कसा उपयोग करुन घेता येईल याचा ही विचार पुढे येऊ लागलेला आहे. यातूनच **'कार्यान्वित मानवशास्त्र'** ही शाखा उदयास येऊ लागलेली आहे. यामध्ये, आता

शहरी, औद्योगिक समाजाचा अभ्यास होऊ लागलेला आहे. तेथील प्रदुषण, आरोग्य इ. समस्यांवर विचार होऊ लागलेला आहे.

सांस्कृतिक मानवशास्त्राच्या पध्दतीशास्त्रात 'एथ्नोग्राफी' आणि 'एथ्नोलॉजी'ला महत्व आहे. एथ्नोग्राफीमध्ये, अभ्यासक एखाद्या संस्कृतीमध्ये दीर्घकाळ वास्तव्य करतात. त्यांचे निरिक्षण करतात. नोंदी करतात. थोडक्यात, ते, ती संस्कृती 'लिहून' काढतात. म्हणून येथे 'ग्राफी' हा शब्द आहे. पूर्वी फक्त, विचित्र आणि अद्‌भूत संस्कृतीसंदर्भात हा अभ्यास मर्यादित होते. मात्र पुढे, सर्वच संस्कृतीचा अभ्यास होऊ लागला. पुढे, ५० च्या दशकानंतर, ग्रामीण समाजाचा अभ्यास होऊ लागला. ८० नंतर तर आता शहरी संस्कृतींचाही अभ्यास होत आहे.

तर 'एथ्नोलॉजी'मध्ये एक विशिष्ठ विषय घेऊन, विविध संस्कृतींचा अभ्यास केला जातो. जसे, 'विवाह' हा विषय घेऊन, विविध संस्कृतीमध्ये ही पध्दत कशी आहे, साम्य कसे आहे, फरक कसा आहे, ते का आहेत याचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. हा अभ्यास, एथ्नोग्राफीने पुरवलेल्या माहितीच्या आधारे केला जातो.

## (ब) एथ्नोग्राफी (Ethnography)

ही सांस्कृतिक मानवशास्त्राची (Cultural Antropology) एक शाखा आहे. 'एथ्नोग्राफी' हा शब्द 'एथ्नो' (राष्ट्र/लोक) आणि 'ग्राफी' (लेखन) अशा दोन शब्दांनी मिळून बनलेला आहे.

Ethnography is the **scientific description** of the customs of individual pepoles and cultures अशी ऑक्सफर्ड डिक्शनरीने व्याख्या केलेली आहे.

तर, समाजशास्त्राच्या डिक्शनरीने Ethnography : A term usually applied to the acts both of **observing** directly the behaviour of a social group and producing a **written description** therof अशी व्याख्या केलेली आहे.

न्यू डिक्शनरी ऑफ हिस्ट्री ऑफ आयडिया ने Ethnography is a mode of deriving knowledge about **particular**, local worlds through **direct engagement** with their peoples and ways of life अशी व्याख्या केलेली आहे.

थोडक्यात, 'एखाद्या विशिष्ठ मानवसमूहाचे, त्यांच्यामध्ये राहून, शास्त्रीय पध्दतीने निरिक्षण करणे आणि त्यांचे वर्णन करणे म्हणजे एथ्नोग्राफी होय.' थोडक्यात, १) मानवाचा विशिष्ठ समूह, २) त्यांचे (त्यांच्या वर्तनाचे) दीर्घकाळ निरिक्षण करणे, ३) हे निरिक्षण, त्यांच्याबरोबर राहून करणे, ४) या निरिक्षणाचे वर्णन करणे/वृत्तांत लिहिणे अशी सर्व मूलभूत लक्षणे एथ्नोग्राफीमध्ये दिसून येतात. आत्तापर्यंत, देशोविदेशीच्या

अनेक संशोधकांनी, विविध जमातीमध्ये दीर्घकाळ राहून, अशा स्वरुपाचा अभ्यास केलेला आहे. जसे वेरियर एल्विन या ब्रिटिश संशोधकाने, भारतातील 'बैगा', 'अगारिया' अशा जमातींचा अभ्यास केलेला आहे. गुंथर सोंथायमर या जर्मन संशोधकाने, महाराष्ट्रातील 'धनगर' जमातीचा अभ्यास केलेला आहे. तो, तर, जवळपास, ३० वर्षं धनगर जमातीमध्ये राहिलेला होता.

अर्थात, योग्य अभ्यासासाठी, त्या-त्या समूहात प्रदिर्घकाळ वास्तव्य करणे आवश्यक असते. अशा वेळी, तो, त्या समूहाचाच जणू काही एक भाग बनून जातो. ग्रंथालयातील विविध संदर्भसाधने चाळण्यापेक्षा, ज्या समूहांचा अभ्यास करायचा आहे, त्यांच्यामध्ये राहून, त्यांच्याशी बोलून, निरिक्षण करुन माहिती मिळवणे हे आवश्यक असते. अर्थात, यासाठी, त्या समूहाची भाषाही अवगत असणे गरजेचे असते. तसेच, त्या समूहातील एका माहीतगार व्यक्तीची (Informant) मदत ही आवश्यक असते. त्याचबरोबर, समूहाच्या एका कृतीमध्ये त्याने भाग घेणे हे ही उत्तम असते. सर्वात महत्वाचे म्हणजे, जे, निरिक्षण करायचे असते ते अत्यंत शास्त्रीय पध्दतीने, वस्तुनिष्ठपणे करणे आवश्यक असते. तसेच, हे निरिक्षण, फक्त समोर दिसणाऱ्या बाबींचे असू नये. तर, या बाबींमागील/वर्तनामागील; त्या समूहाची चिन्हव्यवस्था, मूल्यव्यवस्था/धारणा (Structures) यांचे आकलनही एथ्नोग्राफरला होणे हे आवश्यक असते. तसेच, या निरिक्षणामधून, त्याने, वारंवारीताही (Patterns) शोधणे आवश्यक असते.

असे हे निरिक्षण त्या समूहाच्या विविध स्तरांबाबात असू शकते, जसे- (१) शारिरिक (शरीरयष्टी, त्वचेचा रंग), (२) सामाजिक (चालीरिती विविध संस्था), (३) वैचारिक (कला, साहित्य, शास्त्र, तत्वज्ञान, धर्म).

हा समूह कोणत्या प्रकारच्या भौगोलिक/नैसर्गिक पर्यावरणामध्ये राहतो? त्याची शारिरिक लक्षणे कोणती? कोणती भाषा बोलतो? कोणती लिपी वापरतो? त्याच्या आहार-विहार-निवासाच्या पध्दती काय? त्याची उपजिविकेची साधने कोणती? तो कोणकोणती अवजारे वापरतो? त्यांच्या रुढी, रिती काय आहेत? त्यांची श्रध्दा; श्रध्देला जोडलेले सण-उत्सव वगैरे? त्याचे कला-क्रिडा प्रकार? अशा अनेक मूलभूत गोष्टीचे **निरिक्षण** केले जाते; त्याचे **लेखन** केले जाते.

मात्र, अलिकडे निव्वळ दिसणाऱ्या बाबींचे निरिक्षण करणे आणि नोंद करणे इतकेच ध्येय एथ्नोग्राफर्स ठेवत नाहीत. तर, अधिक खोलवर बाबींचा आता विचार होऊ लागलेला आहे, जसे, या समूहाचा, त्याच्या नैसर्गिक पर्यावरणाशी कसा संबंध असतो? व्यक्तींशी, व्यक्ती म्हणून तसेच समूहाचा घटक म्हणून कसे संबंध असतो? लिंगभाव कसा आहे? सत्ता कशी आहे? सत्तेचा, समाजातील कोणत्या घटकांशी संबंध येत असतो, सत्ता आणि समाजसंबंध कसा आहे? काही सामाजिक स्तर आहेत? लैंगीकतेच्या काय कल्पना आहेत? चिन्हव्यवस्था/मूल्यव्यवस्था/धारण कशा आहेत? अर्थकारण, सत्ता, समूह हे संबंध कशा स्वरुपाचे आहेत? इतर समूहांशी संपर्क आणि संबंध कसा आहे? त्यांच्या श्रध्दा आणि अभिव्यक्तीशी, सामाजिक/कौटुंबिक संबंध निगडित असतात का? इ.

## ❑ एथ्नोग्राफीचा विकास

एथ्नोग्राफीची वर मांडलेली शास्त्रीय लक्षणे ही आजची आहेत. अर्थात, इथपर्यंत पोचायला बराच काळ जावा लागला.

काही ठळक लक्षणे जर विचारात घेतली–म्हणजे 'समूहाचे निरिक्षण'; तर एथ्नोग्राफीचे धागेदोरे फार प्राचीन काळातही सापडू शकतात. विशेषतः ज्यापासून मानवाने, आपली जागा सोडून, विविध कारणांसाठी, प्रवासाला जेव्हा सुरुवात केली त्यापासून हा प्रारंभ दिसू शकतो. पुढे, व्यापारी, विविध देशी जाऊ लागले. संशोधक, नवे मार्ग शोधण्यासाठी बाहेर पडले. मग, धर्मप्रचारक बाहेर पडले. पुढे युरोपियन लोकांच्या विविध ठिकाणी वसाहती स्थापन होऊ लागल्या. अशा प्रकारे, प्रवासी, व्यापारी, संशोधक, धर्मप्रचारक, वसाहतकार हे पहिले एथ्नोग्राफर्स होते असे ढोबळपणे म्हणता येईल.

या सर्वांना आपण ढोबळपणे 'प्रवासी' म्हणू. या प्रवाशांना, नवनवे प्रदेश जसे सापडत गेले तसे नविन मानवसमूह ही दिसू लागले. हे समूह, या प्रवाशांपेक्षा वेगळे होते. अगदी दिसण्यापासून ही! त्यामुळे, त्यांच्याबद्दल नोंदी करणं आलं, त्याचे वृत्तांत लिहिणं आलं. अर्थात, हे सर्व, 'त्या समूहांचा शास्त्रीय अभ्यास करावा' अशा उद्देशाने बाहेर पडले नव्हते. तर, प्रत्येकाच्या स्वतःच्या अशा वेगवेगळ्या भूमिका होत्या.

उद्देशांमध्ये वैविध्य असले तरी ही, या सर्वांच्या मध्ये एक समान धागा होता. तो म्हणजे, हे सर्व स्वतःला, त्या नव्या समूहापेक्षा श्रेष्ठ समजत होते. हे नवे समूह अनोळखी होते. म्हणून, ते एकाचवेळी अद्भूत आणि विचित्रही वाटत होते. तर, काहींना, हे समूह म्हणजे प्रचंड मागासलेले, कनिष्ठ दर्जाचे आणि रानटी असे वाटत होते. तर, 'या समूहांना ज्ञान देऊन त्यांना सुसंस्कृत करण्याची ईश्वरीय जबाबदारी आहे' अशी ठाम समजून धर्मप्रचारकांनी करुन घेतली होती. आपण वेगळे आहोत आणि 'ते' वेगळे आहेत याची ठाम समजूत या प्रवाशांची होती. त्यामुळेच, या पूर्वीच्या वृत्तांतात मोठ्या प्रमाणावर पूर्वग्रह, गैरसमजूत, प्रचंड व्यक्तिनिष्ठता इ. दोष दिसून येतात. पुढे, 'एथ्नोग्राफी' हे एक शास्त्र म्हणून उदयास आलं. अर्थात, याला, १९ वे शतक उजेडावे लागले.

साधारणतः असे दिसून येते की, दोन पध्दतीने, या नव्या समूहांचं निरिक्षण होत असे. काहींच्या मतानुसार, या सर्व प्राचीन जमाती एका सुवर्णयुगातच नांदत आहेत आणि आपण मात्र भ्रष्ट झालेलो आहोत. जसे प्राचीन ग्रीक भूगोलतज्ज्ञ स्ट्रॅबो याला सिथियन माणसं अतिशय आदर्श, मुक्त आणि सद्‌गुणी वाटत. तर काहींच्या मतानुसार, या सर्व जमाती अतिशय मागासलेले आहेत आणि आपण अत्यंत विकसित आहोत. या दुसऱ्या दृष्टिकोनाचाच प्रभाव, या पूर्वीच्या निरिक्षणांमध्ये अधिक होता असे दिसून येते.

पुढे, नैसर्गिक इतिहास या विद्याशाखेची वाढ होत गेली. त्यापासून, एथ्नोग्राफर्स, मानवसमूहाच्या

अभ्यासाबरोबरच, आता, हवामान, भौगोलिक स्थिती, खनिजे, वने आणि वन्यजीव यांचाही मोठ्या प्रमाणावर विचार करु लागले. हा विचार काहींच्या मते इतका प्रभावी ठरत गेला की मानवाला, या पर्यावरणाचा फक्त एक घटक म्हणून पहायला सुरुवात झाली.

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत, अशा अनेक समूहांवर एथ्नोग्राफर्स यांनी वृत्तांत प्रकाशित केलेले होते. विविध समूहांमध्ये तुलना ही आता केली जाऊ लागलेली होती. अशी तुलना करुन, काही ढोबळ सिध्दांत ही प्रकाशित होऊ लागलेले होते. अर्थात, अशा तुलनांना काही अर्थ नव्हता, जसे, प्राचीन रोमनांची तुलना, १८ व्या शतकातील अमेरिकनांशी करण्याचा प्रयत्न! तसे, हे ढोबळ सिध्दांत हे ढोबळच रहात असत. त्यामुळे, पुढे, अशा तुलना करण्यापेक्षा, एका विशिष्ठ समूहाचा, त्या समूहाच्या संदर्भातच विचार करावा, सूक्ष्म निरिक्षणं करावीत असे मत पुढे येऊ लागले. तसा अभ्यास सुरु झाला.

१९ व्या शतकात युरोपियन आणि अमेरिकन वसाहती आणि साम्राज्यं वाढू लागली. त्यामुळे अधिकाअधिक समूह एथ्नोग्राफर्सच्या नोंदींचा विषय बनू लागले. यामध्ये, नैसर्गिक शास्त्रज्ञ, वस्तुसंग्रहालये यांनीही उडी घेतली. याबरोबर, प्रश्नावल्या, मार्गदर्शिका तयार होऊ लागल्या. मानवशास्त्राला वाहिलेल्या 'सोसायटी' तयार निर्माण होऊ लागल्या. या सोसायटींना प्रवासी, शासन, वस्तुसंग्रहालये मदत करु लागली. यातून, प्रत्येक समूहाचे 'मोनोग्राफ्स' (विशिष्ठ विषयाला वाहिलेले छोटे वृत्तांत/ग्रंथ) तयार होऊ लागले. जसे, ब्यूरो ऑफ अमेरिकन एथ्नोलॉजी, दि अमेरिकन एथ्नोलॉजिकल सोसायटी, नैसर्गिक इतिहासाला वाहिलेली वस्तूंसग्रहालये यांची प्रकाशने. यामध्ये 'सेनेका संस्कृती' हा लुईस मॉर्गनचा ग्रंथ (१८५१), 'तोडा संस्कृती' हा विल्यम रिव्हर्सचा ग्रंथ (१९०६) 'इफ्युगाओ संस्कृतीचे कायदे' हा रॉय बार्टनचा ग्रंथ (१९१९). अशा प्रकारे जवळजवळ, पहिल्या महायुध्दापर्यंत अशी असंख्य एथ्नोग्राफीक प्रकाशने आपल्याला दिसू लागतात. अर्थात यातील बरेचसे संशोधक हे मानवशास्त्राशी सबंधीत नव्हते.

१९२५ पर्यंत, एथ्नोग्राफीक संशोधनाला प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. जवळपास, यावेळी मॅलिनोवस्कीचे 'ट्रोब्रियांड बेटातील समूहा'बाबत संशोधन प्रकाशित झाले. त्याचे इतरही महत्वाचे लेख याचदरम्यान प्रकाशित झाले. (१९२२, १९३५). त्याने, त्या बेटावर दीर्घकाळ वास्तव्य केलेले होते. त्या समूहाची भाषा त्याने अवगत केलेली होती. त्याने, या समूहाचे निरिक्षण करताना, विविध वर्तनातील वारंवारिता (Patterns) शोधली. ते वर्तन, ज्या संदर्भात (Context) घडत असे त्या संदर्भांचा विचार केला. थोडक्यात, एथ्नोग्राफीच्या ज्या काही आधुनिक संकल्पना आहेत त्या सर्व मॅलिनोवस्कीच्या संशोधनात सापडतात.

३०-४० च्या दशकात, एक शास्त्र म्हणून एथ्नोग्राफीच्या खूप जबाबदाऱ्या वाढल्या. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र अशी इतर शास्त्रे विकसित झालेली होती. या शास्त्रांचा प्रभाव वाढला-पध्दतीमध्ये देवाणघेवाण सुरु झाली. पध्दतीशास्त्रामध्ये विविधता येऊ लागली, जसे, व्यक्तींच्या जीवनइतिहासाची

(Life histories) नोंद करणे, काही चाचण्या घेणे, चित्रफिती तयार करणे इ. महत्वाचे म्हणजे, आता, एखाद्या समूहाचे निव्वळ निरिक्षण करुन चालणार नव्हते. तर, पध्दतीपासून (Methodology), अन्वयार्थ (Intepretation) काढण्यापर्यंत, संशोधकाने अधिक चिकित्सक असले पाहीजे अशी अपेक्षा होऊ लागली. फक्त माहितीचे संकलन (Data Collection) करण्याऐवजी; आता, त्या समूहातील विविध सांस्कृतिक वारंवारीता शोधणे आणि त्यांची सखोल चिकित्सा करणे महत्वाचे बनू लागले. जसजसे विविध सामाजिक शास्त्रांचा साधने/पुरावे यांच्या वस्तुनिष्ठतेकडे कल वाढू लागला तसतसे एथ्नोग्राफर्सची जबाबदारी वाढू लागली. पूर्वीसारख्या फक्त अद्‌भूत, विचित्र बाबींची नोंद करणे हे आता कमी महत्वाचे ठरले. त्या समूहाच्या प्रत्येक महत्वाच्या वर्तनाचे निरिक्षण केले जाऊ लागले.

थोडक्यात, संकल्पना आणि पध्दती या दोन्ही बाबतीत एथ्नोग्राफर्सचे संशोधन अधिक शास्त्रीय बनू लागले. यातून, जी माहिती मिळू लागली त्याचा वापर इतर शास्त्रं करु लागली. विविध समूहांच्या अभ्यासातून, एकंदर मानवी समूहाबाबत काही सर्वसाधारण सिध्दांत (Generalization) लागू पडतील का याची चपापणी ते करु लागले. यासाठी संख्यात्मक (Quantitative) आणि तुलनात्मक (Comparative) पध्दतींचा वापर ते करु लागले.

१९५० नंतर, संकल्पना आणि पध्दती या दोन्ही स्तरावर सर्वच विद्याशाखांमध्ये प्रगती होत होती. विशेषतः लेव्हि-स्ट्रॉसच्या 'सरंचनावादा' (Structuralism) (१९५८)चा विशेष प्रभाव दिसू लागला. ढोबळपणे, प्रकार्यवाद (Functionalism), हा समोर दिसणाऱ्या वर्तनाला/बाबींना (Function) महत्व देतो. तर संरचनावाद, त्या वर्तनामागील, व्यवस्था/रचना (Structures) शोधतो. म्हणजे, आषाढी एकादशीची वारी हे प्रकार्य तर या वारीमागील श्रध्दा/विचार आणि त्याचे विकसित होणे ही संरचना असे साधारण म्हणता येईल. एथ्नोग्राफीमध्ये सुध्दा, समूहाच्या वर्तनाचे निरिक्षण करुन, या वर्तनामागे काही संरचना/चिन्ह व्यवस्था/धारण आहे काय? याचा अभ्यास आता होऊ लागला. या समूहांची काही व्यापक सांस्कृतिक व्यवस्था (Cultural System) आणि उपव्यवस्था (Sub-system) असते का? याचा ही विचार होऊ लागला. पध्दतीमध्येही, एरियल मॅपिंग, संगणकांचा वापर इ. विकास होऊ लागले.

०......०......०

एथ्नोग्राफीतून मिळालेली माहिती, ही, प्रत्यक्ष सहभागी निरिक्षणामधून आलेली असल्याने रॅडक्लिफ-ब्राऊन एथ्नोग्राफी म्हणजे 'समाजाचे नैसर्गिक शास्त्र' (Natural Science of Society) असे म्हणतात. मात्र, यातील संशोधक-माहिती देणारा यातील संवादावर जो भर असतो त्यामुळे, इव्हान्स-प्रिचर्ड, एथ्नोग्राफीला 'मानवी कला' (Humanistic Art) म्हणतात. एथ्नोग्राफीमध्ये कठोर वस्तुनिष्ठता, सांख्यिकी दृष्टिकोन, तयार कॅटॅगरीज नसतात; तसेच, 'सर्व व्यक्ती आणि त्यांच्यातील संभाषण' हा माहितीचा स्त्रोत असल्याने त्यामध्ये व्यक्तिनिष्ठतेचा धोका असतो अशा विविध स्वरुपाच्या टीका केल्या जातात. पण

काहींच्या मते, हे जे दोष सांगीतले जातात तिच खरे तर एथ्नोग्राफीची वैशिष्ट्ये आहेत. इथे, कोणतेही तयार कॅटॅगरिज आणि पूर्वअनुमान सोबत घेऊन न जाता, त्या लोकांशी संवाद साधून, त्यांच्यामध्ये राहून, त्यांच्या कृतीमध्ये सहभागी होऊन निरिक्षणं केली जातात आणि आहे तशी ती मांडली जातात. त्यामुळे, ते अधिक सत्याच्या जवळ जाणारे असते.

तसेच, एथ्नोग्राफर्स हे मूळातच 'तुमच्या वर्तनाचे अर्थ लावण्याचे आम्हाला कौशल्य आहे' अशा भूमिकेतूनच त्या समूहामध्ये प्रवेश करतो अशीही टीका केली जाते. तसेच, समूहाचा अभ्यास करताना, 'शहरी वैतागापासून अलिप्त असलेला शांत समाज-त्यामुळे तसाच राहू देण्याची आवश्यकता', 'प्रचंड मागासलेला समाज-त्यामुळे विकासाची आवश्यकता' अशा पूर्वग्रहापासून काही संशोधक मुक्त नसतात. त्यामुळे आर्ची मफेजे हा आफ्रिकन संशोधक म्हणतो की ''एथ्नोग्राफीला, मानवशास्त्रापासून मुक्त करणे आवश्यक आहे. तरच, विविध समूह, आपापली एथ्नोग्राफी लिहू शकतील ("Ethnography ... needs to be liberated from anthropology so that it can become a source of "social texts authored (solely) by the people themselves)."

अर्थात, एथ्नोग्राफर्स जी माहिती गोळा करतात, त्या माहितीचा प्रचंड उपयोग मानवशास्त्राला होतोच. शिवाय, इतर सामाजिक शास्त्रांना तसेच धोरण ठरविणाऱ्यांनाही होत असतो. एथ्नोग्राफर्सनी पुरवलेल्या माहितीवरुनच, ही इतर शास्त्रे, काही नियमितता/पॅटर्नस, संकल्पना, सिध्दांत विकसित करत असतात. विविध समूहाच्या संस्कृतींचा तुलनात्मक अभ्यासासाठीही, अशा माहितीचा उपयोग होऊ शकतो.

.................

सध्याच्या आंतरविद्याशाखीय जगामध्ये, विविध ज्ञानशाखांमधील संकल्पना आणि पध्दतीमध्ये देवाणघेवाण होते आहे. **इतिहासाला ही, एथ्नोग्राफीचा उत्तम उपयोग होऊ शकतो.** पूर्वीची, 'गतकालीन राजकारण म्हणजेच इतिहास' ही संकल्पना केव्हांच मागे पडलेली आहे. सध्या, 'समूहाचा अभ्यास' हा इतिहासाच्याही केंद्रस्थानी आलेला आहे. त्यामुळे, एखाद्या समूहाचा अभ्यास करण्यासाठी, एखाद्या समूहातील लिंगभाव, सत्तेचे स्वरुप, संस्कृती-त्यातील बदल, समाज संबंध इ. चे आकलन करण्यासाठी एथ्नोग्राफीची तसेच एथ्नोग्राफीक प्रकाशनांची मदत मिळू शकते. जसे, फेल्डहाऊस यांच्या ग्रंथातून आपल्याला, भूगोलाच्या संदर्भात, लिंगभावाची माहिती मिळते. तर, ढेरे यांच्या विविध ग्रंथातून, श्रध्देच्या विकासाबरोबरच, समाजातील बदल-विविध समाजांतील संबंध यांचा विकास कळून येतो. सोंथायमर यांच्या ग्रंथातून धनगर समाजातील स्थलांतराचे, उपजीविकेच्या साधनातील बदला संदर्भातील उपयुक्त माहिती मिळू शकते. अशा अभ्यासातून, विविध समूहांचा ऐतिहासिक अभ्यास करता येतो. वंचितांचा इतिहास, शहरांचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास, तौलनिक इतिहास अशा समकालीन इतिहास प्रकारांमध्येही याचा उपयोग होऊ शकतो.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. .............. याच्या उत्क्रांतीवादाच्या संकल्पनेमुळे, १९ व्या शतकातील वैचारिक जग ढवळून गेले.

*(अ) डार्विन* *(ब) हॅरिस* *(क) गिझ* *(ड) फेझर.*

२. मानवशास्त्रामध्ये, 'थिक डिस्क्रिप्शन' ही संकल्पना ................ यांनी मांडली.

*(अ) एल्विन* *(ब) गिझ* *(क) स्टिवर्ड* *(ड) मार्शल.*

३. सांस्कृतिक पर्यावरणाची संकल्पना ................. यांनी मांडली.

*(अ) हबरमास* *(ब) स्टिवर्ड* *(क) फ्रेझर* *(ड) बार्टन.*

४. ............. या एथ्नोग्राफरने भारतातील बैगा आणि अगारिया समाजाचा अभ्यास केला.

*(अ) एल्विन* *(ब) सोंथायमर* *(क) कुल्के* *(ड) फेल्डहाउस.*

५. ................. याने संरचनावादाची संकल्पना मांडली.

*(अ) लेव्हि-स्ट्रॉस* *(ब) मॅलिनोवस्की* *(क) रिव्हर्स* *(ड) फ्रेझर.*

**प्रश्न २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मानवशास्त्र म्हणजे काय?

२. नवाश्मयुगाची संकल्पना कोणी मांडली?

३. एथ्नोग्राफी म्हणजे काय?

४. आधुनिक सांस्कृतिक मानवशास्त्रातील पध्दतीशास्त्राचा जनक कोणास म्हंटले जाते?

५. कोणत्या एथ्नोग्राफरने, भारतातील धनगर समाजाचा अभ्यास केला?

## २.२.२ विभाग दुसरा : पुरातत्वशास्त्र (Archaeology)

'गतकाळातील मानवाच्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करुन, त्याचा इतिहास अभ्यासणे' म्हणजे पुरातत्वशास्त्र होय. या अवशेषांमध्ये, जसे सुटे अवशेष (Artefacts) येतात तसे स्थिर स्मारकेही (Monuments) येतात.

सर्वसाधारणतः लिखित साधनांच्या आधारे इतिहास लिहावा अशी अपेक्षा असते. मात्र, याला काही मर्यादाही आहेत. एकतर, लिखाणाचा शोध हा अलिकडचा शोध आहे. त्यामुळे जवळजवळ ९० टक्के

मानवाचा इतिहास हा-लिखाणाच्या शोधापूर्वीचा म्हणजे प्रागैतिहासिक काळाचा आहे. हा काळ म्हणजे भटक्या शिकारी आदिमानवापासून तो स्थिर शेतकरी झाला-त्याने पहिली शहरं निर्माण केली तोपर्यंत येतो! या काळात मानवी संस्कृतीच्या कित्येक बाबींचा उदय झाला; जसे, त्याने हत्यारे शोधली-त्यात प्रगती केली, त्याने धातू शोधला, त्याने पशुपालन-शेती-कारागीरी-विनिमय यांचा शोध लावला, त्याची पाहिली खेडी आणि शहरं याच काळात तयार झाली, श्रध्दा-धर्माचा उगम या काळातच झाला. मात्र, या काळाची कोणतीही लिखित साधने सापडत नाही. मग, इतक्या मोठ्या काळाचा जर अभ्यास करायचा असेल तर, निव्वळ लिखित साधनांवर आधारीत असलेल्या इतिहासाच्या पध्दतीचा उपयोग होत नाही.

दुसरं म्हणजे, जी काही लिखित साधने उपलब्ध आहेत ती फक्त मोजक्याच विषयाबाबत मर्यादित असतात, जसे, प्रशासन, धर्म अशा. सर्वसामान्यांच्या जीवनाबाबत माहिती आपल्याला मिळू शकत नाहीत. अशा वेळी, अलिखित साधनांवरच भर द्यावा लागतो.

त्यात, प्रत्येक लिखाण ही एक 'नोंद' असल्याने, त्यामध्ये हेतू असतोच; व्यक्तीनिष्ठता असते. याऊलट पुरातत्वीय साधने 'अबोल' असल्याने, तो अभ्यास अधिक वस्तुनिष्ठपणे होऊ शकतो.

अर्थात, फक्त 'लिखाणाचा शोध लागण्यापूर्वीचा' कालखंड पुरातत्वशास्त्रात अभ्यासला जात नाही. अलिकडे 'ऐतिहासिक पुरातत्व' ही शाखा उदयास आलेली आहे. या शाखेमध्ये प्राचीन तसेच मध्ययुगीन काळ ही अभ्यासला जातो. येथे, लिखित आणि अलिखित अशा दोन्ही साधनांचा अभ्यास करुन, गतकाळ जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. मेहता यांचे 'चंपानेर'चे किंवा माटे यांचे 'दौलताबादचे' उत्खनन अशाच पध्दतीचेच आहे.

अशा पध्दतीने, मानवाने, हेतूपूर्वक/निर्हेतूकपूर्वक आपल्या मागे सोडलेल्या वस्तू/वास्तूंचा अभ्यास करुन, त्याचा इतिहास अभ्यासणे हा उद्देश पुरातत्वशास्त्राचा होतो. अर्थात या 'अभ्यासा'मागे, त्या वस्तू/ वास्तू शोधून, त्या पुष्ठभागावर आणणे यापासून, अहवाल लेखन करणे यापर्यंत सर्व गोष्टी अपेक्षित आहेत.

## ❑ पुरातत्वशास्त्राचा इतिहास

पूर्वीपासून प्राचीन वस्तूंबद्दल एक गूढ आकर्षण मानवामध्ये राहिलेले आहे. अशा प्राचीन वस्तूंचा आणि स्थळांचा अभ्यास करुन इतिहास लिहिला पाहिजे असे काही विद्वान म्हणत असत. ही वृत्ती पुढे कायम जरी राहिली तरी, पुढे, १७-१८ व्या शतकातील प्रबोधन युगापासून, एक शास्त्र या दिशेने पुरातत्वाचा विकास होऊ लागला.

### १. प्राचीन नगरे आणि जुन्या वस्तूंमध्ये रुची (Antiquarians) असणारा काळ (१९ व्या शतकापर्यंत)

प्राचीन काळात; ग्रीस, इटली असे युरोपमधील देश आणि इजिप्त, इराक, इराण, भारत असे

आशियातील देश प्रसिध्द होते. तेथील नगरांची वर्णने साहित्यामध्ये, प्रवासवृत्तांतात भरुन पडलेली होती. त्यामुळे, तेथील आकर्षक अवशेषांचा मोह सर्वांना पडणे हे स्वाभाविकच होते.

इ.स.पू. ६ व्या शतकामध्ये बॅबिलोनमध्ये एक राजा होऊन गेला. नबोनिदास हे त्याचे नाव. त्याने, एका देवतेच्या मंदिराचा जीर्णोध्दार केला. हे करत असताना, त्याला, या मंदिराच्या पायाखाली, आणखीन एक पाया सापडला. तसेच, त्याने, आपल्या राजवाड्यात एक प्राचीन वस्तूसंग्रहालयही उभे केलेले होते. अर्थात अशी रुची आणि कृती केवळ अपावादात्मक होती. ढवळीकर, नबोनिदास ला 'प्राचीन अवशेषांचा आद्य संशोधक' असे म्हणतात.

पुढे, पुनरुज्जीवन (Renaissance) काळामध्ये, म्हणजे १५ व्या शतकामध्ये, ग्रीक-रोमन कला आणि स्थापत्याबाबत प्रचंड आकर्षण निर्माण झालेले होते. त्यावेळी, विविध प्रवासी ग्रीस आणि इटलीचे दौरे करु लागलेले होते. तेथील जुने अवशेष पाहून ते दीपून जात असत. त्यामुळे, ग्रीकोरोमन तत्वज्ञानच नव्हे; तर या स्थळांमध्येही त्यांना विशेष रुची निर्माण झाली. या काळातील फ्लॅविओ बियोनो या इतिहासकाराने तर प्राचीन रोमच्या ऐतिहासिक स्थळांची एक मार्गदर्शिका बनवलेली होती. त्यामुळे, असे ग्रीकोरोमन अवशेष शोधून काढणे, त्यांचे प्रदर्शन करणे ही एक प्रतिष्ठेची बाब बनलेली होती. पोप सारखे धर्मगुरुसुध्दा या मोहात पडलेले होते. त्यांनीही आपले चर्चेस, अशा प्राचीन वस्तूंनी सजवून ठेवली. अर्थात, राजे-रजवाडे, धर्मगुरु, धनाढ्य व्यापारी यांच्यापूरताच हा 'छंद' मर्यादित होता.

पुढे १६ व्या शतकात, इंग्लडमधील आठव्या हेन्रीने, जॉन लेलँड याची शासकीय पुरातत्वज्ञ म्हणून नेमणूक केली. लेलँड आणि विल्यम कॅमडेन यांना प्राचीन वस्तूंमध्ये रुची होती. ते इंग्लडमधील खेड्यांना भेटी देत असत. तेथील अवशेषांचे निरिक्षण करीत, त्यांची रेखाटने करीत, वर्णन करीत आणि अगदी अर्थही लावत असत.

पुढे १७ व्या शतकातील, इंग्लडमधील स्टोन हेंज आणि इतर महाशिलायुगीन स्थळांचे उत्खनन ही पहिली उत्खननं मानली जातात. जॉन ऑब्रे (१६२६-९७) याने कित्येक महाशिलायुगीन स्थळं शोधून काढली. तसेच, त्याने वस्त्रं, ढालींचे आकार, मध्ययुगीन स्थापत्य इत्यादीचा कालक्रमानुसार एक तक्ता बनवला. या तक्त्यात, वरील बाबींच्या शैलीमध्ये कसा फरक पडत गेला ते दाखवून दिलं.

तर १८ व्या शतकात, रॉक अल्कुबेरे या स्पॅनीश लष्करी अभियंत्याने पाँपे चे उत्खनन केले (१७४८). पाँपे हे रोमन साम्राज्यातील शहर, ज्वालामुखीच्या राखेने गाडले गेले होते. अल्कुबेरेने येथे उत्खनन करुन, हे रोमन शहर उजेडात आणले. तेथील माणसं, भांडी, चित्रे उजेडात आणली. या उत्खननांचा मोठा प्रभाव युरोपवर पडला.

पुढे १९ व्या शतकाच्या सुरुवातीला, अद्‌भूतरम्यवादाच्या (Romanticism) प्रभावाखाली, मध्ययुगीन

कलास्थापत्याबाबत रुची निर्माण झाली. त्यामुळे, युरोपमधील कित्येक दफनं वाटेल तशी खोदली जाऊ लागली.

अर्थात, याच शतकात, नेपोलियनपासून; युरोपचे लक्ष ग्रीस, इटली सोडून इजिप्तकडे वळले. नेपोलियनला इजिप्तच्या प्राचीन वैभवाची कल्पना होती. त्यामुळे, त्याने, आपल्या इजिप्त मोहिमेमध्ये, शास्त्रज्ञ, चित्रकारही सोबत नेलेले होते. यातूनच 'फ्रेंच-इजिप्शियन संस्थे'ची स्थापना झाली. या संस्थेने प्राचीन अवशेषांचा अभ्यास सुरु केला. उत्खननं सुरु झाली. यातूनच, १७९९ मध्ये, बुशार्द ला, अलेक्झांड्रिया येथे 'रोझेटा स्टोन' हा शिलालेख मिळाला. इजिप्तमध्ये असे मौल्यवान शोध लागल्यामुळे, लूटारुंच्या तोंडाला पाणी सुटले. या लूटारुंमध्ये, त्या काळचे, मोठे मोठे राजे, सरदार, पुढारी असे सर्व होते. त्यात, १८५० मध्ये जेम्य मॅरियट हा इजिप्तच्या पुरातत्वखात्याचा प्रमुख बनला. त्याने, इजिप्तमधील अवशेषांच्या लूटीला बंदी घातली. तसेच, स्वतःशिवाय, त्याने इतरांना उत्खनन करण्यास मज्जाव केला.

तिकडे, युरोपियन राजनैतिक अधिकाऱ्यांच्या वाऱ्या मध्यपूर्वेत वाढू लागलेल्या होत्या. त्यांना, तुर्कस्थान, इराक, इराण येथील समृध्द अवशेषांची कल्पना आली. त्यांना 'मेसोपोटेमिया'च्या समृध्द संस्कृतीचा परिचय झाला. त्यामुळे, इथे ही उत्खनने सुरु झाली. यातून, रॉलिन्सन या ब्रिटिश संशोधकाने सुमेरियन 'क्युनिफॉर्म' लिपींचे वाचन केले.

अर्थात, ग्रीसचे आकर्षण हे कायम राहिलेलेच होते. यातूनच, १८७० मध्ये, हेन्रिच शिलमान याने 'ट्रॉय'चे उत्खनन केले. स्तरांचा व्यवस्थित विचार करुन हे उत्खनन केले गेले होते. त्याने, तेथील संस्कृतीचा सात स्तरांतील विकासही शोधून काढला. शिलमनबरोबरच, कॅव्हर्ट आणि डॉर्पफेड यांनीही येथे उत्खनन केले. या विद्वानांनी, प्रागैतिहासिक काळापासून, हेलेनिस्टिक कालखंडापर्यंत, या वसाहतींचा कालक्रम उलगडवून दाखवला.

या कालखंडाला 'जुन्या वस्तूंमध्ये रुची असणारा' कालखंड असे म्हणले जाते. पुरातत्वीय स्थळांचा वेगाने नाश होणे हा धोका या काळात होता.

### २. पुरातत्वीय स्थळं आणि शास्त्रीय उत्खनन पध्दतीचा विकास (१९ वे शतक आणि २० व्या शतकाचा पूर्वार्ध)

फक्त प्राचीन वैभवशाली संस्कृती किंवा तेथील नगरेच नव्हे तर मानवाच्या इतर संस्कृतींचाही अभ्यास होणे आवश्यक असते हा विचार आता सावकाशीने बळावू लागला. तिकडे भूगोल, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र इ. शास्त्रांचा विकास होत होता. तिथे शोध लागत होते. यातून, पुरातत्वशास्त्रातही आता शास्त्रीयता येऊ लागली. त्यांच्या शोधातून, पुरातत्वामध्येही आता नवे वळण मिळू लागले. यातूनच, शास्त्रीय पुरातत्वाचा तसेच उत्खननांचा विकास होत गेला. तसेच, उत्खननाचे तंत्रही अधिकाधिक शास्त्रीय होऊ लागले.

विल्यम कनिंगहॅम यांना पुरातत्वीय उत्खननाचा जनक समजले जाते. त्यांनी, १७९८ मध्ये, विल्टशायर याठिकाणी उत्खनन केले. त्यांनी, नवाश्मयुगीन आणि कास्ययुगीन वसाहतींचा अभ्यास केला, अवशेषांच्या नोंदी केल्या. पुढे, १९ व्या शतकामध्ये 'स्तरशास्त्र' (Stratigraphy) या संकल्पनेचा उदय झाला. ही संकल्पना भूगर्भशास्त्र (Geology) आणि पॅलिआँटोलॉजी (Paleontology) मधून आलेली होती. या संकल्पनेचा वापर, प्रागैतिहासिक आणि कास्ययुगातील वसाहतींच्या उत्खननांमध्ये होऊ लागला.

इकडे, युरोपमध्ये अवशेषांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. अशा अवशेषांना एक व्यवस्थित कालक्रम देणे आवश्यक होते. अशावेळी, १८३६ मध्ये, डॅनिश संशोधक थॉमसन यांनी, 'त्रियुग संकल्पना' (Three Age System) मांडली. यानुसार, मानवी संस्कृतीचा विकास, क्रमशः अश्म (Stone), कास्य (Bronze) आणि लोह (Iron) युगांमध्ये झाला असे त्याने दाखवून दिले. वास्तविक ही व्यवस्था, कोपेनहेगन वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे वर्गीकरण करण्यासाठी केलेली होती. पण त्याची मदत, पुरातत्वशास्त्राला झाली.

एक काळ होता की अश्मयुगीन हत्यारे आणि मानव यांचा काही संबंध आहे का नाही हेच मूळात माहिती नव्हतं. निव्वळ उत्सुकतेपोटी आणि वैचित्र्याचे आकर्षण असल्याने, या हत्यारांचा संग्रह केला जात असे. पुढे, १८४७ मध्ये बूशर द पार्थे याला सेंट ॲबव्हिल येथे सापडलेली अश्महत्यारे सापडली. ही हत्यारे मानवाची आहेत हे त्याने सिध्द केले. येथून, प्रागैतिहासिक पुरातत्वाचा प्रारंभ झाला.

१८५१ मध्ये, डॅनियल विल्सन या ब्रिटिश संशोधकाने 'अश्मयुग म्हणजे प्रागइतिहास होय' अशी संकल्पना मांडली. त्याने प्रथमच प्रागइतिहास (Prehistory) ही संज्ञा वापरली.

पुढे, १८६५ मध्ये, लुबॉक यांनी, पुराश्मयुग (Paleolithic) आणि नवाश्मयुग (Neolithic) अशा दोन संकल्पना मांडल्या. पुढे, दोघांच्या मध्ये मध्याश्मयुग (Mesolithic), आणि नंतरचे ताम्रपाषाणयुग (Chalcolithic) अशा संकल्पनांची भर पडत गेली. अर्थात, अलिकडे, मानवी संस्कृतीला अशा ढोबळ वर्गात घालण्यापेक्षा; त्यांचा आहार आणि निवास पध्दती विचारात घेतली जाते. म्हणूनच 'शिकारीचा कालखंड', 'अन्नसंकलक आणि भटके यांचा काळ', 'स्थिर वसाहतींचा काळ' अशा संज्ञा वापरल्या जातात.

पुरातत्वाचा असा विकास होताना, अजूनही, याकडे 'संस्कृतीचा अभ्यास करणारे' गंभीर शास्त्र असे मानण्यापेक्षा हौस/छंद असेच उद्देश असत. मात्र, १८८० मध्ये विल्यम पीटरिव्हर्स यांनी शास्त्रीय पुरातत्वाची बैठक घातली. त्यांनी, उत्खननाची आणि अवशेषांच्या नोंदीची शास्त्रीय पध्दती शोधून काढली. त्यांनी अवशेषांचे, प्रथम प्रकारानुसार वर्गीकरण केले आणि त्यानंतर काळानुसार! यामुळे, या अवशेषांचा एक विकास दिसून येऊ लागला. अवशेष, मग तो फार सुंदर किंवा विचित्र नसेल, तर साधा असेल; तरीही त्याची व्यवस्थित नोंद केली पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. त्याचबरोबर, प्रत्येक थरांमध्ये सापडणाऱ्या वस्तूंची, त्यांच्या थरासह, नोंद केली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. तसेच, दफनाऐवजी, वसाहतीचे उत्खनन

करण्यावर त्यांनी भर दिला. इतकंच नव्हे तर, उत्खननानंतर, त्याचा वृत्तांतही तातडीने प्रकाशित केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. थोडक्यात, वसाहतीचे उत्खनन, प्रत्येक अवशेषाला महत्वाचा मानणे, थरांच्या संदर्भात त्यांची नोंद करणे, वृत्तांताचा आग्रह इ. गोष्टी पुरातत्वशास्त्राच्या विकासासाठी फार महत्वाच्या होत्या. म्हणूनच, त्यांना 'आधुनिक/शास्त्रीय पुरातत्वशास्त्राचा जनक' असे म्हणले जाते.

जवळजवळ, याच वेळी, सर सर फ्लिंडर्स पेट्री हे पुरातत्वज्ञ आपल्याला भेटतात. आपले पूर्ण आयुष्य, पेट्री यांनी, इजिप्तमध्ये उत्खनन करण्यात व्यतीत केले. एक काळ होता की ज्यावेळी फक्त पूर्ण भांडेच जतन करुन ठेवले जायचे. पेट्रींनी तुटक्या खापरांच्याही नोंदी केल्या. आणि, त्यांनी, खापरांवरुन कालक्रम कसा शोधावा हे शोधून काढले. त्याचप्रमाणे, काळ माहित असणाऱ्या एका अवशेषाबरोबर, जर अज्ञात अवशेष सापडला तर,त्या अज्ञाताचा काळ सापडतो असे त्यांनी मांडले. याला तौलनिक कालक्रम (Comparative Dating) असे म्हंटले जाते. त्यांनी, १८८० मध्ये ग्रेट पिरॅमिडचा काळ निश्चित केला. तर, इजिप्त आणि पॅलेस्टिनमध्ये संशोधन करणाऱ्या जॉर्ज रायजनर यांनी स्तरांच्या अभ्यासावर (विश्लेषण आणि अन्वयार्थ) भर दिला.

पुढे, १९२०-३० च्या दरम्यान, सर मॉर्टिमर व्हिलर यांनी पुरातत्वीय उत्खननपध्दतीमध्ये अधिक शास्त्रीयता आणली. 'पुरातत्वीय स्थळांमध्ये व्यवस्थित चौकोन आखून, एकेक चौकोन खोदत जाणे' ही जी ग्रीड पध्दती (Grid System) आहे ती व्हिलर यांनी आणली. तसेच, १९३७ साली त्यांनी, लंडन येथे 'पुरातत्वशास्त्राचे' शास्त्रीय शिक्षण देणारी एक संस्था स्थापन केली. आता, तो विषय विद्यापीठात शिकवला जाऊ लागला.

## ३. भारतामधील पुरातत्वाचा विकास :-

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात, सर विल्यम जोन्स यांची कलकत्ता हायकोर्टचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. भारतीय लोकांचे न्यायदान करण्यासाठी, स्थानिक परंपरा ज्ञात असणे हे आवश्यक होते. यातून, जोन्स यांचा भारतातील कायदे-परंपरांचा अभ्यास सुरु झाला. यातून, त्यांना भारतीय साहित्याच्या वैभवाची कल्पना आली. याचा अभ्यास करणे हे आवश्यक आहे हे त्यांच्या लक्षात आले. तसेच, हे अधिक गंभीरपणे आणि नियमितपणे व्हावे यासाठी, १७८४ मध्ये, 'रॉयल एशियाटिक सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. पुढे, या सोसायटीने, फक्त हस्तलिखितेच नव्हे, तर प्राचीन भारताची माहिती देणारे जे काही अवशेष सापडतील ते गोळा करण्याचे अहोरात्र कार्य केले. या अवशेषांना सुरक्षित ठेवण्यासाठी एका छोटेखानी वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. हे भारताचे पहिले वस्तुसंग्रहालय! पुढे, याचे रुपांतर, कलकत्ता येथील 'इंडियन म्युझियम'मध्ये झाले. तसेच, या अवशेषांचा अभ्यास करुन, ते संशोधन ताबडतोब प्रकाशित व्हावे याचाही आग्रह धरला. यातूनच, १७८६ मध्ये, 'जर्नल ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटीचा' उदय झाला. जोन्स यांच्या या कार्यामुळेच, त्यांना, 'भारतविद्येचा (Indology) जनक' असे म्हणले जाते.

अवशेषांचा शोध, त्यांचा अभ्यास, त्यांचे प्रकाशन यामुळे, इथूनच, पुरातत्वशास्त्राचा प्रारंभ भारतात झाला असे ही म्हणता येऊ शकेल.

जोन्स यांच्या मूलभूत प्रयत्नानंतर, सोसायटीमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्य चालू राहिले. एकीकडे विविध प्राचीन हस्तलिखिते शोधली जात होती; भाषांतरीत होत होती. तर दुसरीकडे, जेम्स प्रिन्सेपने अशोकाकालीन ब्राह्मीचे वाचन केले. सारनाथ, मणिकल्या येथे उत्खननं करुन, स्तूप शोधले गेले. मंदिरे, चैत्य, विहार यांची रेखाटनं होऊ लागली. कलेचा अभ्यास होऊ लागला.

भारतीय पुरातत्वशास्त्राच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली ती अलेक्झांडर कनिंगहॅममुळे! सरकारी स्तरावर एक पुरातत्वखाते असण्याची आवश्यकता आहे हे त्यांनी, तत्कालिन सरकारला पटवून दिले. यातून, १८६२ साली, भारतीय पुरातत्व खात्याची (Archaeological Survey of India-ASI) स्थापना झाली. अर्थातच, कनिंगहॅम, खात्याचे पहिले संचालक बनले. हडप्पा येथील अवशेष हे वेगळ्या प्रकारचे अवशेष आहेत हे त्याच्या लक्षात आले होते. मात्र, त्यांची मुख्य रुची गंगेच्या खोऱ्यामध्ये होती. 'बौध्द वाङ्मयाचा अभ्यास करुन, त्यात नमूद केलेली स्थळे शोधून काढणे आणि त्यांचा अभ्यास करणे' हे त्यांचे ध्येय होते. याला 'ऐतिहासिक भूगोल' (Historical Geography) असे म्हणतात. अशी असंख्य बौध्द स्थळे त्यांनी शोधून काढली. त्यांचे वृत्तांत तातडीने प्रकाशित केले.

पुढे, बर्जेस खात्याचे संचालक बनले. मात्र त्यांना विशेष रुची स्मारकांमध्ये होती. त्यामुळे, त्यांनी भारतभर सर्वेक्षण केले. मंदिरे, चैत्य, विहार यांचा अभ्यास केला; रेखाटने/नकाशे तयार केले; वृत्तांत प्रकाशित केला. कलेचा इतिहास अभ्यासताना, बर्जेस यांच्या या कामाचा अभ्यासकांना मोठा उपयोग होतो.

१९०२ मध्ये, सर जॉन मार्शल यांची संचालकपदी नियुक्ती झाली. त्यांनी तक्षशिला आणि मोहेनजोदडो येथे उत्खनन केले. मोहेनजोदडो उत्खननामुळे तर भारताचा वैभवशाली इतिहास जगासमोर आला. तर, तक्षशिलेच्या उत्खननामधून, त्यांनी विविध थरांचा आणि अवशेषांचा अभ्यास करुन या शहराचा विकास जगासमोर मांडला. या उत्खननासाठी त्यांनी लिखित साधनांचाही आधार घेतलेला होता. या दोन्ही उत्खननामुळे, भारतातील पुरातत्वशास्त्राच्या विकासाला प्रचंड चालना मिळाली.

दरम्यान, याच काळात लॉर्ड कर्झन हा भारताचा गव्हर्नर जनरल होता. भारतातील प्राचीन अवशेषांच्या लूटीमुळे तो अस्वस्थ असे. 'ज्याठिकाणी अवशेष सापडतात त्याचठिकाणीच ते ठेवले पाहिजेत' असा त्याचा आग्रह होता. यासाठी, त्याने, एकीकडे 'प्राचीन अवशेष आणि स्मारके यांच्या संरक्षणाचा कायदा' अंमलात आणला. तर दुसरीकडे 'स्थळ वस्तुसंग्रहालय'ची (Site Museum) संकल्पना मांडली. आज, लोथल आणि धोलावीरा येथील उत्खनन केलेल्या वस्तू, त्याचठिकाणी स्थापन केलेल्या 'स्थळ वस्तुसंग्रहालया'मध्ये जतन करुन ठेवलेल्या आहेत.

पुढे, १९४४ मध्ये सर मॉर्टिमर व्हिलर यांची संचालकपदी नेमणूक झाली. यांनी, युरोपामध्ये शास्त्रीय उत्खननाची पध्दती विकसित केलेली होती. त्यांनी भारतामध्ये, तक्षशिला, हडप्पा, ब्रह्मगिरी, अरिकामेडू येथे उत्खननं केली. तसेच, त्यांनी, आपल्या तरुण सहकाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना आधुनिक पुरातत्वशास्त्राचे प्रशिक्षण दिले. स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील पुरातत्वशास्त्राचा विकास, पुढे, व्हिलरच्या विद्यार्थ्यांनीच घडवून आणला.

०......०......०

सरकारी पातळीवर, भारतीय पुरातत्व खाते वेगाने प्रगती करीत होते. निधी आणि मनुष्यबळ यांची विपुलता असल्याने, त्यांना मोठ-मोठी उत्खननं हाती घेता येत होती.

अशावेळी, महाराष्ट्रात, ह.धी. सांकलिया यांनी, पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये 'शास्त्रीय पुरातत्वाची' बैठक घातली. एक विभाग तयार केला. विविध शास्त्रांच्या प्रयोगशाळा उभ्या केल्या. विद्यार्थी घडवले. आणि, दर्जेदार स्वरुपाची उत्खननं हाती घेतली. यामध्ये, चांदोली, आपेगाव अशी ताम्रपाषाणयुगीन स्थळं तसेच कोल्हापूर, नाशिक, नेवासा अशा सातवाहनकालीन स्थळांचे त्यांनी उत्खनन केले. यातील नेवासा याठिकाणी तर, प्रागैतिहासिक काळापासून मध्ययुगापर्यंतचे अवशेष त्यांनी क्रमाने उजेडात आणले. आपले संशोधन ते तातडीने प्रसिध्द करीत असतच. शिवाय, ते सर्वसामान्य लोकांपर्यंतही पोचले पाहिजे असा त्याचा आग्रह असे. यातून, त्यांनी वृत्तपत्रातून लेखन केले, सोप्या भाषेतील पुस्तिका काढल्या. पुढे, त्यांच्या विद्यार्थ्यांनी हे कार्य तितक्याच जोमाने चालू ठेवले. ढवळीकर हे त्यांचेच विद्यार्थी. त्यांनी, ईनामगाव येथे जवळजवळ १२ वर्षे उत्खनन केले. ईनामगावचे उत्खनन हे भारतीय पुरातत्वशास्त्राच्या विकासासाठीचे अत्यंत महत्वाचे असे उत्खनन ठरले. कारण, अवशेषांचा अन्वयार्थ लावताना, याठिकाणी सर्व शास्त्रांची मदत घेतली गेली. तसेच वसाहत रचना, वसाहत आणि लाभक्षेत्र यांचा संबंध असे अनेक अभिनव अभ्यास याठिकाणी केले गेले.

## ❑ पुरातत्वीय संशोधन पध्दती

पुरातत्वीय संशोधन पध्दतीमध्ये पुढील टप्प्यांचा अंतर्भाव होतो. उत्खननापूर्वी, उत्खनन आणि उत्खननानंतर. मात्र, त्यापूर्वी, 'पुरातत्वीय स्थळ' म्हणजे काय ते समजून घेऊ.

### पुरातत्वीय स्थळ (Archaeological Site) आणि त्याचे स्वरुप :-

अश्मयुगातील मानव हा अन्नाच्या शोधात भटकत असे. त्यामुळे, सर्वसाधारणतः पाणवठ्याच्या ठिकाणी, डोंगरउतारावर, डोंगरातील कपारीत/गुहेत हा काही काळ टेकत असे. अशा ठिकाणी 'पुरातत्वीय स्थळ' तयार होते. इथे, फक्त, 'मातीखाली दडली गेलेली दगडी हत्यारे' इतकेच या स्थळाचे स्वरुप असते.

माणूस ज्यावेळी स्थिर झाला आणि मातीची/विटांची घरे बांधू लागला त्यावेळी 'पुरातत्वीय स्थळाचे' स्वरुप वेगळे होते. होतं काय की, प्रथम काही कुटुंब एके ठिकाणी रहायचे निश्चित करतात. तिथे घरं वगैरे बांधतात. मग कालांतराने, विविध कारणाने ती वस्ती सोडून, ते दुसरीकडे निघून जातात. मग ती वस्ती ओसाड होते. मातीखाली गाडली जाते. पुढे काही वर्षांनी, दुसरी काही कुटुंब त्याचठिकाणी येतात. पूर्वीची थोडीफार माती साफ करुन, ते त्याच ठिकाणी राहू लागतात. मग पुन्हा तेच! अशा पध्दतीने, या वस्तीच्या ठिकाणाचे रुपांतर 'पांढऱ्या मातीच्या टेकाडात' होते. यालाच 'पुरातत्वीय टेकाड' (Archaeological Mound) असे म्हणतात.

तर, महाशिलायुगीन काळामध्ये, मानवी वसाहती फारशा मिळतच नाहित. मिळतात ती दफने!

थोडक्यात, विविध काळामध्ये, पुरातत्वीय स्थळांचे स्वरुप बदलत जाते. त्यामुळे, अर्थातच, त्यांच्या उत्खननाच्या पध्दतीमध्येही बदल होत जातो.

### ❁ उत्खननापूर्वी :–

**१. समन्वेषण** (Exploration) : म्हणजे 'पुरातत्वीय स्थळ शोधणे.' पांढऱ्या मातीच्या टेकड्यांना वेगवेगळी स्थानिक नावं असतात, जसे, पांढरी, गावपांढरी, गवळ्यांचे टेक, हाळ इ. हे स्थळ शोधण्यासाठी विविध पध्दतींचा वापर केला जातो, जसे, सर्वेक्षण नकाशांचा अभ्यास करणे, प्रत्येक गावांमध्ये जाऊन शोधणे, उपग्रहाच्या फोटोंजचा वापर करणे, दंतकथांचा विचार करणे, अपघाताने अवशेष जेथे सापडणे तेथे शोधणे इ. या पध्दतीबरोबरच, एरियल सर्व्हे, ड्रोन्स, LDR (Light Detection and Ranging) सारखे आधुनिक तंत्रज्ञानही वापरले जाते. तर ऐतिहासिक काळातील स्थळांचा शोध घेताना, वाङ्मय, परकीय वृत्तांत, शिलालेख इ. चा आधार घेतला जातो.

**२. स्थळनिश्चिती** (Selection of Site) : वरील समन्वेषण झाल्यानंतर, आपल्याला पुरातत्वीय स्थळ सापडते. आता या स्थळांचा अधिक सखोल अभ्यास करणे शक्य आहे का? याचा अंदाज घ्यावा लागतो. साधारणतः, विविध कारणाने, या स्थळांमधील काही अवशेष, हे जमिनीवर आलेले असतात. असे जमिनीवरील अवशेष गोळा केले जातात. (Surface Collection) त्यांच्या गुणवत्तेवरुन, आपण ठरवतो की पुढील संशोधन हाती घ्यावे की नाही ते!

### ❁ उत्खनन (Excavation) :-

**३. स्थळाचे मापन आणि प्राथमिक नोंदी** : आतापर्यंत, एखाद्या स्थळाचे अधिक संशोधन करावे/उत्खनन करावे असे निश्चित झालेले असते. मग पहिलं काम म्हणजे या स्थळाचे मापन करणे. याठिकाणी, त्या स्थळाच्या परिघाची/'चढउतारांची' (Contour Mapping) नोंद घेतली जाते. तसेच, त्या स्थळाचा सर्वोच्च बिंदू (Datum Point) निश्चित केला जातो. हा बिंदू निश्चित करणे आवश्यक असते कारण या

बिंदूच्याच आधारे, पुढे, आपल्याला अवशेषांची खोली मोजायची असते. अशा प्रकारे चढउतार आणि सर्वोच्च बिंदू निश्चित होतो.

यानंतर, स्थळावर, समान चौकोनांची एक जाळी (Grid) काढावी लागते. हे चौकोन म्हणजे खड्डे (Trench) असणार आहेत. त्या जाळीतील प्रत्येक चौकोनाला/खड्ड्याला क्रमांक द्यावा लागतो. अशीच जाळी, आलेख कागदावर उतरवली जाते. संशोधन पुढे जसजसे विकसित होत जाईल तसतशी नोंद या आलेखात केली जाते.

४. **चाचणी उत्खनन** (Trial Trench) : यानंतर, या चौकोनाच्या जाळीमधून, साधारणतः मध्यभागातील एक चौकोन आपण निवडतो. याठिकाणी, एक खड्डा घेतला जातो. हा खड्डा, या स्थळाच्या शेवटी तळापर्यंत (Bed Rock), म्हणजे मूळ जमिन येऊपर्यंत खणला जातो. या उत्खननाच्या प्रत्येक टप्प्यावर अवशेषांची व्यवस्थित नोंद केली जाते. अशा प्रकारे, या टप्प्यावर, एकंदर स्थळामधील विविध स्तर, त्या स्तरामध्ये मिळणारे अवशेष, त्यांचे स्वरुप, महत्व म्हणजे एकूण त्या स्थळाची गुणवत्ता आपल्याला निश्चित कळून येते.

५. **सोपान पध्दती** (Step Trench) : येथे, स्थळाच्या मध्यापासून, कडेपर्यत एक सरळ रेषेतील चौकोन निवडले जातात. याठिकाणी, वरुन-खाली असे येत, चौकोनांची खोली वाढवत नेली जाते. त्यामुळे, एकंदर हे उत्खनन पायऱ्या-पायऱ्यासारखे दिसते. पूर्ण स्थळ न खोदता, तेथील अवशेषांचा आपल्याला अंदाज येतो.

६. **उदग्र उत्खनन** (Vertical Excavation) : येथे एका सरळ रेषेमधील चौकोन निवडले जातात. एक सांस्कृतिक कालक्रम समजण्यासाठी या प्रकारच्या उत्खननाची आवश्यकता असते. हा प्रकार कमी वेळेचा आणि कमी खर्चिक असल्याने बरीचशी उत्खननं अशा प्रकारचीच असतात. मात्र, या उत्खननातून, त्या स्थळाचा समग्र अभ्यास शक्य नसतो.

७. **आयत उत्खनन** (Horizontal Excavation) : एका स्थळाची गुणवत्ता-म्हणजे तेथील अवशेषांचे स्वरुप प्रचंड महत्वाचे असते. तसेच, संशोधकांना, त्या स्थळांचा अभ्यास अधिक करावा असे वाटत असते. अशावेळी आयत उत्खनन हाती घेतले जाते.

यामध्ये, त्या स्थळातील सर्व चौकोनांचे उत्खनन करुन, आतील अवशेष पूर्णपणे उजेडात आणले जातात. हे एक विस्तृत स्वरुपाचे उत्खनन असल्याने, घरे, घरांमधील संबंध, धान्यकोठारासारख्या सामुहिक वास्तू इ. महत्वाचे शोध यातून लागतात. या आयत उत्खननामुळे धोलावीराची नगररचना, पाणीपुरवठ्यांची अभिनव कल्पना, क्रिडांगण इ. बाबी उजेडात येऊ शकल्या. तसेच डेक्कन कॉलेजने ईनामगावचे आयत उत्खनन करुन, दख्खनच्या ताम्रपुषाणयुगाचे, तिच्या तपशीलासह दर्शन घडवले. हे उत्खनन जवळजवळ १२ वर्षे चाललेले होते. त्यामुळे, त्या स्थळाचा समग्र अभ्यास करणे हे अशाने शक्य होते.

हे दीर्घकाळ चालणारे आणि मोठ्या खर्चाचे असते. त्यामुळे साधारणत: शासनाच्या पुढाकाराने अशी उत्खनने होतात. जसे, भारतीय पुरातत्वीय खात्याची हडप्पा संस्कृतीची स्थळे, उदा. लोथल, धोलावीरा इ. अर्थात, डेक्कन कॉलेजसारख्या प्रतिष्ठित संस्थानीही अशा प्रकारचे उत्खनन हाती घेऊन महत्वाचे शोध लावलेले आहेत, उदा. ईनामगाव चे उत्खनन.

❋ **इतर काळातील स्थळांचे उत्खनन :–**

वर नमूद केलेली उत्खननं ही साधारणतः मानव स्थिर झाल्यानंतरच्या काळातील स्थळांची होती. त्याठिकाणी, एकमेकांवर वस्ती झालेली असल्याने, आपल्याला वरुन, खाली खोदत जावे लागते. मात्र ज्यावेळी एखादे भटक्या लोकांचे अश्मयुगीन स्थळ सापडते त्यावेळी तेथे स्तरच नसतात. फक्त एकदाच तेथे मानव राहून गेलेला असतो. त्याची तुटकी हत्यारे मागे पडलेली असतात. त्यावर माती साठलेली असते. मग अशावेळी, उत्खनन हे अधिक नाजूकपणे, सावकाशीने केले जाते. दगडी हत्यारांवरील माती ब्रशने साफ करुन, ती दगडी हत्यारे उघडी (Expose) करणे एवढाच या उत्खननाचा उद्देश असतो. तर, महाशिलायुगीन दफने वर्तुळाकार असतात. त्यावेळी, तेथे 'अधिक' चिन्ह काढले जाते. आणि फक्त एकमेकासमोरील चौकोनांचे उत्खनन केले जाते (Quadrant Excavation).

**८. अवशेषांच्या नोंदी** : उत्खनन हे एकदाच होत असल्याने आणि तो, एकप्रकारे त्या ऐतिहासिक स्थळाचा नाश असल्याने, ते व्यवस्थित करणे आणि प्रत्येक अवशेषांच्या नोंदी करणे ही एक आवश्यक बाब असते. त्यामुळे, प्रत्येक खड्ड्यानंतर, अवशेषांची व्यवस्थित नोंदी घेतल्या जातात. या नोंदीमध्ये पुढील गोष्टीची नोंद करणे अपेक्षित असते–अवशेषाचे स्वरुप, कच्चा माल, कोणत्या स्तरामध्ये मिळालेला आहे, खड्ड्याच्या बाजूपासून किती लांबी आणि रुंदीवर मिळालेला आहे, सर्वोच्च बिंदूपासून किती खोलीवर मिळालेला आहे इ. जर, जो अवशेष स्थिर स्वरुपाचा असेल, म्हणजे घराचा पाया वगैरे, तर, त्याचे रेखाटन केले जाते, छायाचित्रण केले जाते. तशाच प्रकारे खापरांच्या अभ्यासासाठी, स्थळाच्या शेजारीच एक 'पॉटरी यार्ड' (Pottery Yard) तयार केले जाते. इथे, खापरांचा अभ्यास रोजच्यारोज केला जातो. त्याचप्रमाणे ज्या पुरावस्तू (Antiqutes) मिळतात, त्यांची तपशीलवार नोंद, रोजच्या रोज एका स्वतंत्र वहीत (Antiquity Register) केली जाते. त्याचप्रमाणे, उत्खननामध्ये, आपण जसजसे खाली जात असतो, तसतशा, खड्ड्याच्या बाजूच्या भिंती उघड्या होत जातात. या भिंतीमध्ये, मातीचे स्तरही (Layers/Section) उघडे होत जातात. कालक्रमासाठी या स्तरांची नोंदही ठेवणे आवश्यक असते.

❁ **उत्खननानंतर :–**

**९. कालमापन** (Dating) : पुरातत्वीय संशोधनामध्ये वेगवेगळ्या स्वरुपाच्या शास्त्रीय कालमापन पध्दतींचा वापर केला जातो. यामध्ये, कार्बन–१४ (Radio-carbon) ही एक प्रसिध्द पध्दती आहे.

विलॉर्ड लिबी यांनी, १९४१ मध्ये या पध्दतीचा शोध लावला. प्राचीन अवशेषातील शिल्लक राहिलेल्या कार्बन-१४ चे मापन करुन, त्यांचे कालमापन केले जाते. तर, 'पोटॅशियम अर्गोन' (Potassium Argon) पध्दतीमध्ये प्राचीन खडकांचा काळ मोजला जातो. तसेच, प्राचीन खापरांचे कालमापन करण्यासाठी 'तप्तदिपन पध्दती' (Thermoluminescence) वापरली जाते. फॅरिंग्टन डॅनियल्स यांनी, १९५३ साली या पध्दतीचा शोध लावला. त्यानंतर, पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि अवशेषांमधील चुंबक यांचे प्रमाण लक्षात घेऊन, पुराचुंबकीय कालमापन पध्दतीचा वापर केला जातो. तर, अवशेषांतील युरोनियमच्या तेजोरेषा लक्षात घेऊन कालमापन करणारी 'विभंजन तेजोरेषा' (Fission Tracks) ही पध्दत ही वापरली जाते. तर प्राचीन हाडांचे कालमापन करण्यासाठी, हाडांतील फ्लुरिनचा शोध घेण्यासाठी 'फ्लुरिन कसोटी'चा वापर केला जातो.

**१०. अहवाल लेखन** (Report Writing) : एव्हाना आपल्याकडे सर्व अवशेषांच्या नोंदी आलेल्या असतात. पर्यवेक्षकांच्या दैनंदिनी आपल्याकडे असतात. दैनंदिन प्रगती दर्शवणारे आलेख, रेखाटने, छायाचित्रे, नकाशे सोबत असतात. अवशेषांचा अर्थ लागलेला असतो. दरम्यान, बीया, हाडे, परागकण (Pollens) असे अवशेष संबधीत प्रयोगशाळांकडे पाठवलेले असतात. त्यांचे अहवाल प्राप्त झालेले असतात.

या सर्वांच्या आधारे आता या उत्खननाचा व्यवस्थित अहवाल लिहिला जातो. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, तातडीने तो प्रकाशित केला जातो.

यामध्ये, त्या स्थळाची पार्श्वभूमी, त्यांचा भौगोलिक संदर्भ, त्यात सापडलेले अवशेष-म्हणजे खापरे, हाडे, पुरावस्तू, कालमापन आणि सर्वात शेवटी निष्कर्ष; अशा प्रकरणांचा समावेश असतो. प्रत्येक प्रकरणामध्ये आवश्यकतेनुसार नकाशे, रेखाटने, छायाचित्रे यांचा आवर्जून समावेश केला जातो.

## ❑ इतर सहाय्यभूत शास्त्रे :-

पुरातत्वशास्त्रीय संशोधनासाठी (म्हणजे स्थळ शोधापासून ते अहवाल लेखनापर्यंत चे सर्व टप्पे) इतर शास्त्रांचीही मदत होत असते. यामध्ये स्थळांचे भौगोलिक संदर्भ अभ्यासण्यासाठी Geomorphology, अश्मास्थींचा अभ्यास करण्यासाठी Paleontology, हाडांचा अभ्यास करण्यासाठी Physical Anthropology, प्राण्यांच्या हाडांचा अभ्यास करण्यासाठी Archaeozoology, स्थळांतील मातीचे रासायनिक परिक्षण करण्यासाठी Archaeo chemistry, परागकण/वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी, Paleobotany इ. अशा प्रकारे.

०......०......०

## ❑ इतिहास आणि पुरातत्व

सर्वसाधारणतः 'लिखित साधनांच्या आधारे गतकाळाचे मानवी जीवन उभे करणे म्हणजे इतिहास' असे एक ढोबळपणे समजले जाते. अर्थात, याला काही मर्यादा असतात. एकतर 'लिखित साधने' हा आग्रह

जर धरला तर, लाखो वर्षाचा इतिहास कसा लिहायचा? हा एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. दुसरं, जी काही लिखित साधने आहेत ती मर्यादित विषयांपुरती आहेत. त्यामुळे, संस्कृतीचा व्यापक अभ्यास निव्वळ लिखित साधनांतून होऊ शकत नाही. शिवाय, ती व्यक्तीविशिष्ठ असतात. त्यामुळे, जनसामान्यांचे जीवन अभ्यासायचे असेल तर ही लिखित साधने अपूरी पडतात.

अशावेळी, पुरातत्वशास्त्र आपल्या मदतीला येते. वरील सर्व मर्यादा काढून टाकून, गतकाळ अधिकाधिक वस्तुनिष्ठ समजून घेण्यासाठी पुरातत्वाचा उपयोग होतो.

जर, साकल्याने विचार केला तर, लिखित साधनांवर आधारलेला इतिहास काय आणि पुरातत्व काय, दोन्ही पध्दती अखेर मानवाचा इतिहास उलगडवून देण्यासाठी मदत करीत असतात. 'गतकाळातील मानवाचा अभ्यास' हाच जर मुख्य उद्देश असेल तर, या दोन्ही पध्दतींचा एकत्रित अभ्यास केल्यास गतकाळाचे 'संपूर्ण आकलन' आपल्याला होऊ शकते. विशेषतः ऐतिहासिक काळाचा विचार करताना, ही पध्दती योग्य ठरते. जसे, 'पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी' या ग्रंथाचा अभ्यास करुन आपण प्राचीन स्थळे शोधू शकतो. त्यांचा पुरातत्वशास्त्रीय अभ्यास करु शकतो. मार्शलने केलेला तक्षशीलेचा अभ्यास, अशाच प्रकारे दोन्ही पध्दती वापरुन केलेला आहे. तर मध्ययुगाचा विचार करता, मेहतांचा 'चंपानेर'चा अभ्यास आणि माटेंचा 'दौलताबाद'चा अभ्यास, या दोन्ही पध्दतींच्या मिलाफाची उत्तम उदाहरणे आहेत.

०......०......०

अमेरिकेमध्ये पुरातत्वाला, मानवशास्त्राची एक शाखा मानली जाते. मानवशास्त्र, जे वर्तमान जमातीबाबत करते; म्हणजे, त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास; तेच, पुरातत्व, प्राचीन मानवाबाबत करत असते. तसेच, पुरातत्व आणि इतिहासाच्या संबंधांचा विचार केला जातो. पुरातत्वशास्त्र मुख्यत्वे, लिखित साधनांपूर्वीच्या काळाचा-म्हणजे प्रागैतिहास आणि इतिहासपूर्व काळाचा इतिहास अभ्यासते. तरी, अलिकडे, इतिहास काळातील-म्हणजे, लिखित साधने उपलब्ध होतात त्या काळाचाही अभ्यास करते. अशावेळी, इतिहासकार, लिखित साधने आणि पुरातत्ववेत्त्यांनी शोधलेली अलिखित साधने या दोन्ही स्वरुपाच्या साधनांचा उपयोग करतात. थोडक्यात, पुरातत्वशास्त्राची मदत मानवशास्त्र आणि इतिहास दोहोंना होत असते. विशेषतः काळाच्या एका मोठ्या भागाचा अभ्यास पुरातत्वाने शक्य होत असल्याने, आता, हे शास्त्र, या दोन्हींचा अविभाज्य असा भाग बनलेले आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. ................ याने ट्रॉय चे उत्खनन केले.

*(अ) मार्शल* *(ब) श्लिमान* *(क) व्हिलर* *(ड) बर्जेस.*

२. प्रागइतिहास/प्रिहिस्ट्री ही संज्ञा ............ यांनी सर्वप्रथम वापरली.

*(अ) विल्सन* *(ब) थॉमसन* *(क) व्हिलर* *(ड) मार्शल.*

३. ............... हे भारतीय पुरातत्व खात्याचे प्रथम संचालक होत.

*(अ) कनिंगहॅम* *(ब) मार्शल* *(क) बर्जेस* *(ड) व्हिलर.*

४. ............... या गव्हर्नर जनलरने स्थळ वस्तुसंग्रहालयाची संकल्पना मांडली.

*(अ) क्लाईव्ह* *(ब) डलहौसी* *(क) कर्झन* *(ड) माऊंटबॅटन.*

५. डेक्कन कॉलेजने ............. या ठिकाणी १२ वर्षे उत्खनन केले.

*(अ) लोथल* *(ब) कोल्हापूर* *(क) ईनामगाव* *(ड) दायमाबाद.*

**प्रश्न २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पुरातत्वशास्त्र म्हणजे काय?

२. जगप्रसिध्द रोझेटा स्टोन कुणाला आणि कुठे मिळाला?

३. त्रियुग संकल्पना म्हणजे काय? ती कोणी मांडली?

४. खापरांवरुन कालक्रम शोधता येऊ शकतो हे सर्वप्रथम कुणी दाखवून दिले?

५. भारतविद्येचा जनक कोण?

## २.२.३ विभाग तिसरा : (अ) मूर्तीशास्त्र (Iconography), (ब) नाणकशास्त्र (Numismatics) आणि (क) पुराभिलेखशास्त्र (Epigraphy)

### (अ) मूर्तीशास्त्र (Iconography)

मूर्तींचा अभ्यास करणारे ते मूर्तीशास्त्र (Iconography) होय. वैदिक-हिंदू, बौध्द, जैन हे आपल्या भारतीय संस्कृतीतील मुख्य धर्म. सुरुवातीला हे सर्व धर्म मूर्तीपूजा करीत नसत. पुढे भक्तीमार्गाचा उदय झाला. सर्वसामान्यांना आपली श्रध्दा व्यक्त करण्यासाठी, आपल्यासमोर देवदेवतांच्या काही आकारांची गरज निर्माण झाली. अशावेळी देवदेवता प्रतिकात्मक पध्दतीने त्यांच्या समोर होत्या. मात्र यांचे समाधान होत नसे. त्यामुळे पुढे काळाच्या विविध टप्प्यामध्ये या सर्व धर्मांनी आपल्या देव-देवतांच्या मूर्ती निर्माण केलेल्या दिसून येतात. या मूर्ती अथवा प्रतिमा दगड, रस्ते, धातू, लाकूड, माती अशा माध्यमांतून बनवल्या जातात. याठिकाणी फक्त दगडांमधील मूर्ती आणि शिल्पांचा आपण विचार करणार आहोत. तसेच, प्रतिनिधिक स्वरुपात या शास्त्राचा विचार करावयाचा आहे.

अशा अनेक मूर्ती आज आपण पाहतो. यातील काही स्वतंत्र असतात तर काही गाभाऱ्यात. त्यांची पूजा केली जाते. या 'मूर्ती' होत. यामध्ये शिव, विष्णू, पार्वती, लक्ष्मी, गणेश, कार्तिकेय इ.प्रमुख देव त्यांच्या विविध अवतारासह/स्वरुपासह येतात. तर, काही मूर्ती मंदिरांमध्ये अथवा भींतीवर दिसून येतात. अशांची आपण पूजा करीत नाही. मग अशा मूर्तींना, सोयीसाठी आपण 'शिल्प' असे म्हणतो. यामध्ये सूर सुंदरी, गंधर्व, अप्सरा, यक्ष, प्राणी, पक्षी, वनस्पती, देवांचे गण, राक्षस, मंदिर बांधण्यासाठी अनुदान देणारे इ. चा समावेश होतो. अशा मूर्ती आणि शिल्पांचा अभ्यास मूर्तीशास्त्रामध्ये केला जातो. मूर्तीशास्त्राचा अभ्यास म्हणजे एक प्रकारे भारतीय संस्कृतीचाच-तिच्या इतिहासाचाच अभ्यास होय.

सर्वसाधारणत: अशा मूर्तींवर नावे नसतात. यांची ओळख पटवणे हाच सुरुवातीचा प्रश्न असतो. तर एकाच देवतेची मूर्ती वेगवेगळ्याच ठिकाणी आणि वेगवेगळ्याच काळांमध्ये वेगवेगळी दिसू लागते. हे असे का होते? सुरुवातीला शिवाची एकटी मूर्ती दिसते. ती पुढे पार्वती, गणपतीसह दिसू लागते. पुढेपुढे तर शिवाची मूर्ती दिसेनाशी होते, तिची जागा शिवलिंग घेते. हे असे का घडते? उत्तरेकडील सूर्य पायात बूट घालतो तर दक्षिणेकडे मात्र अनवाणी का असे? अशावेळी आपला गोंधळ उडतो. अशावेळी मूर्तीशास्त्र आपल्या मदतीस येते.

आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये देवदेवतांच्या मूर्ती/शिल्पं कशी घडवावीत, कोणत्या वस्तू त्यासाठी वापराव्यात, त्यांचे आकार कसे असावेत, त्यांची वेशभूषा/केशभूषा कशी असावी, त्यांना कोणते अलंकार घालावेत, त्यांच्या हाती कोणती साधने/आयुधे द्यावीत, त्यांचे वाहन कोणते असावे इ. बऱ्याच बाबींचे तपशीलवार आणि व्यवस्थित वर्णन केलेले आहे. यामध्ये समरांगण सूत्रधार, ररुपमंडन, मयमत, शिल्पमत, शिल्पप्रकाश, विष्णूधर्मोत्तर पुराण अशा ग्रंथांचा समावेश होतो. हे एकप्रकारे मूर्तीशास्त्रावरील प्राचीन ग्रंथच होत. त्याशिवाय, मूर्तीशास्त्राचे हे तंत्र निर्माण करताना प्राचीन विद्वानांनी महाकाव्ये, पुराण, जातक, पंचतंत्र अशा विविध ग्रंथातील कथांचाही आधार घेतलेला होता. किंबहुना अशा कथांमधूनच, मूर्ती/शिल्पं तयार करण्यांमध्ये वैविध्य आले. अशा ग्रंथांचाही अभ्यास मूर्तीशास्त्रात केला जातो. या अभ्यासातून आपल्याला पडलेले प्रश्न दूर होतात.

त्याचबरोबर हाताच्या मुद्रा कशा असाव्यात-त्यांची नावे; बसण्याच्या (आसन) उभे राहण्याच्या विविध पध्दती-त्यांची नावे; विविध आयुधांची नावे इ. बऱ्याच बाबी प्राचीन ग्रंथामध्ये हाताळल्या आहेत. जर मुद्रांचा विचार केला तर पुढील प्रकारांचा समावेश होतो. 'अभयमुद्रा'मध्ये आशिर्वाद देण्यासारखा पूर्ण पंजा खुला, वरच्या दिशेला आणि समोर असतो, 'वरमुद्रा'मध्ये हाच पंजा खालच्या दिशेला असतो, 'धर्मचक्रपरिवर्तनमुद्रा' मध्ये उजवा आणि डावा पंजा जवळ, अर्धवट झाकलेला, अंगठ्यावर टेकवलेले पहिले बोट, 'कर्तरीमुखमुद्रा'मध्ये पंजा खुला, वरच्या दिशेला आणि पहिले बोट अंगठ्याजवळ तर 'कटकहस्तमुद्रा' मध्ये पंजा खुला, वरच्या दिशेला मात्र अंगठ्याव्यतिरिक्त बाकीची बोटं अंगठ्याजवळ. आसनांचा विचार करता पुढील प्रकारांचा समावेश होतो. 'सुखासना'मध्ये, डावा पाय मांडी घातलेल्या स्थितीत तर उजवा पाय

बाजूला, खाली सोडलेला किंवा देह थोडासा डावीकडे कललेला, उजवा पाय आसनावर, डावा पाय बाजूला, खाली सोडलेला; 'ललितासना'मध्ये डावा पाय मांडी घातलेल्या स्थितीत तर उजवा पाय, आसनावरच, मुडपून ठेवलेला; 'भूमिस्पर्श'मध्ये मांडी घातलेली फक्त उजवा हात बैठकीला स्पर्श करणारा इ. तर उभे राहण्याच्या पध्दतीमध्ये 'समपद' दोही पायाच्या तळवे जमिनीला टेकलेले, 'अर्धसम' दोन पाय एकमेकांना छेदणारे, यामध्ये एक पाय सरळ असतो तर दुसरा तिरका, चललेला अशा प्रकारे; 'आलीढ'मध्ये उजवा पाय ताठ, तळवा तिरका टेकलेला तर डावा पाय वर आसनावर ठेवलेला असतो. याबरोबर मुर्तींच्या हातात विविध प्रकाराचे कमळ दिसते. या कमळाचे स्वरुप विविध काळानुरुप बदलत जाते.

मूर्तीशास्त्रज्ञाला याचा परिचय असणे आवश्यक असते. तसेच, स्थळकाळाचे भान हे मूर्तीशास्त्रज्ञाला असणे आवश्यक असते.

**लक्षणे :** मूर्तीशास्त्रासंबंधी जे प्राचीन ग्रंथ आहेत त्यांनी विशिष्ठ देवतांची काही विशिष्ठ वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत. मूर्ती/शिल्प तयार करताना ही वैशिष्ट्ये लक्षात घेणे हे अनपेक्षित असते. अशा वैशिष्ट्यांना/संकेताना 'लक्षण' असे म्हंटले जाते. जसे, शिवाचे लक्षण कोणते तर त्याच्या हाती त्रिशूळ, डमरु असला पाहिजे, गळ्यामध्ये नाग, डोक्यावर चंद्रकोर आणि जटा असली पाहिजे, जवळ नंदी असला पाहिजे. तर विष्णूच्या लक्षणामध्ये त्याच्या हाती शंख, चक्र, गदा असावे लागते. ती त्याची लक्षणे. जलदेवतांच्या हातात घट दाखवणे आवश्यक. मात्र गंगा ही देवता दाखवताना तिचे लक्षण मगर तर यमुनेचे कासव. पार्श्वनाथाच्या मागे नागाचा फणा, तर बाहुबलीच्या पायावर चढणारी वेल. अर्थात ही लक्षणे पहिल्यापासून नव्हती. तर काळाच्या ओघामध्ये ही लक्षणं बदलत गेलेली आहेत; त्यामध्ये भर पडत गेलेली आहे. तसेच अशा लक्षणांवरुन देवतेची नावेही वेगवेगळी होत जातात. हा या मूर्ती/शिल्पांचा मनोरंजक इतिहास मूर्तीशास्त्रांमध्ये अभ्यासला जातो.

वैदिक काळापासूनच देवताभक्ती आणि प्रतिमांचा पुसटसा उल्लेख आपल्याला आढळतो. मात्र या काळातील देवतांच्या प्रतिमा अद्याप सापडलेल्या नाहीत. पुढे मौर्य काळामध्ये आपल्याला प्रतिमा दिसू लागतात. मात्र त्या असतात प्राण्यांच्या, यक्ष, अप्सरा यांच्या. काही लेण्यांमध्ये दानकर्त्यांच्याही प्रतिमा आपल्याला दिसतात. अर्थात या प्रतिम अर्धठावामध्ये दिसून येतात. म्हणजे पुढील बाजूचे प्रतिमेची वैशिष्ठ्ये दिसतात. मागील बाजूस प्रतिमा सपाट असते. अर्थात याला काही अपवाद आहेत. पुढे ग्रीकांच्या प्रभावातून 'गांधार' शैलीमध्ये देवतांची शिल्पं दिसू लागतात. त्याचवेळी नाण्यांवरही देवतांच्या प्रतिमा दिसू लागतात. मात्र या प्रतिमांवर ग्रीक शैलीचा प्रचंड प्रभाव दिसून येतो. कुशाण काळापासून मात्र नाण्यांच्यावर आणि दगड/माती यामध्ये खास भारतीय शैलीमध्ये प्रतिमा दिसू लागतात. याला 'मथुरा शैली' असे म्हंटले जाते. या मथुरा शैलीचाच पुढे गुप्त काळामध्ये विकास होतो. या काळामध्ये मूर्ती आणि शिल्पं खास भारतीय अभिजात सौंदर्याने आपल्या पुढे येतात. त्याचबरोबर त्या आणि आयुधे/अलंकरण यामध्ये एक प्रकारची कलात्मक व्यवस्था स्थापन होते.

याठिकाणी आपण विष्णू आणि शिव मूर्तींचा थोडक्यात परिचय करुन घेणार आहोत. याठिकाणी सुरवातीपासून गुप्त-हर्षवर्धन काळापर्यंतच्या मूर्तींचा प्रातिनिधिक स्वरुपात विचार करावयाचा आहे.

### ❀ विष्णू मूर्ती :-

वैदिक साहित्य, महाकाव्ये, वैष्णव पुराणे यामधून आपल्याला विष्णमूर्ती, त्यांचे संकेत, त्यांचे प्रकार इ. बाबींची माहिती होते.

कुशाणकाळापासून विष्णूच्या मूर्ती आपल्याला दिसून येतात. या सर्व मूर्ती चार हातांच्या आहेत. गदा, चक्र, शंख, जलपात्र अशा वस्तू त्याच्या हातात दिसू लागतात. यातील गदा ही मुदगलासारखी दिसते. खालचा एक हात 'अभयमुद्रेमध्ये' तर दुसरा कमेवर असे. वरचे हात वर चलल्यासारखे दिसतात. त्यांना 'उद्‌बाहू' असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे या काळातच मूर्ती पूर्ण उठावामध्ये निर्माण होऊ लागल्या. यामध्ये मूर्तीची मागील बाजूही कलात्मकरित्या घडवली जाऊ लागली.

गुप्त काळामध्ये आता प्रत्येक बाबींमध्ये तंत्रशुध्दता आली, कलात्मकता आली. विष्णूमागे कलात्मक प्रभावळ दाखवली जाऊ लागली. ही मूर्ती चार हाताचीच असे आणि त्यातील चारही वस्तू मागील काळाप्रमाणेच आहे. गदा मात्र, आपल्या परिचयासारखी येऊ लागते. म्हणजे, उभा दांडा आणि त्याला जोडलेला एक मोठा बसका गोल. आता विष्णूचे वरील हात ही खाली आले. अशावेळी ही मूर्ती 'प्रलंबबाहू' आहे असे म्हंटले जाते. यातील एक हात 'आयुधपुरुषाच्या' डोक्यावर विसावलेला असतो. आयुधपुरुष म्हणजे देवतेच्या आयुधाचे मानवी रुप. मूर्तीवर विविध अलंकार आले. त्याची वेशभूषा सुंदर झाली. मूर्तीवर जानवेसुध्दा आले. हे जानवे पुन्हा मोत्यांच्या सरीचे केले गेले. या काळात मूर्तीच्या पुढील बाजूवरच कलात्मकता आली. मागील बाजू फक्त लक्षात येण्यासारखी ठेवली गेली.

अशी विष्णू मूर्ती पुढे विविध रुपामध्ये दिसू लागली. यावरुन तिचे बरेच प्रकार आपल्याला दिसून येतात. विष्णूच्या बहुतेक मूर्ती या 'स्थानक' म्हणजे उभ्या स्वरुपात आहेत. तसेच तिच्या आसनमूर्ती, शयनमूर्ती, अवतारमूर्ती आहेत. याचे पुन्हा प्रकार पडतात. जसे,

### ❀ स्थानक मूर्ती :-

चतुर्भुजः चार हातांची, उभी मूर्ती. हातामध्ये गदा, चक्र, शंख, अभयमुद्रा. सहाव्या शतकानंतर, कमळ हातामध्ये दिसू लागते; वैकुंठ : सिंह, मानव व वराह अशी तीन अथवा चार मुख असलेली विष्णूमूर्ती; अनंत : विष्णूच्या डोक्यावर सापाचा फणा असलेली मूर्ती; हरीहरः एकाच मूर्तीमध्ये शिव आणि विष्णू. त्यावरील अलंकार त्या, त्या देवतेच्या लक्षणानुसार असत. शैव आणि वैष्णव पंथांमध्ये सलोखा निर्माण करण्यासाठी विष्णूचे हे स्वरुप निर्माण झाले.

❀ **आसन मूर्ती :-**

गरुडारुढः पक्षीरुपातील गरुडावर बसलेला विष्णू; नरनारायणः चतुर्भुज नारायण आणि द्विभूज नर ही जोडी. तपश्चर्या करीत असलेली. पायाजवळ सिंह आणि हरीण एकत्र.

❀ **शयन मूर्ती :-**

शेषशायीः कोणतेही आयुध नसलेला विष्णू, डावा हात उशाशी घेऊन शेषावर निजलेला. वर कमळामध्ये ब्रह्मदेव. मात्र हे कमळ विष्णूच्या नाभीमधून निघालेले नाही. पुढील काळामध्ये विष्णूच्या हाती आयुधे आली, आणि हे कमळ नाभीशी जोडून, ब्रह्मदेवाला विष्णूशी जोडले गेले.

❀ **अवतार मूर्ती :-**

विष्णूच्या एकूण अवतार किती याबद्दल विविध ग्रंथांमध्ये एकमत नाही. ही संख्या ५ पासून १४ पर्यंत जाते. शिवाय हे अवतार ही विविध स्वरुपाचे आहेत, जसे, अंशावतार (वाहर, वामन, परशुराम), तात्कालिक अवतार (नृसिंह), पूर्णावतार (राम, कृष्ण).

**वराह :** यामध्ये पुन्हा दोन गट पडतात, जसे, (१) नृवराह- देह मानवाचा मुख वराहाचे (२) यज्ञवराह- पूर्ण देह वराहाचा.

**नृसिंह :** कोंडामोतू (आंध्र प्रदेश) येथील शिल्पपट्टावर सिंह व त्याच्या मानेजवळून उगवणारे गदा व चक्रधारी हात दिसतात. पुढे गुप्त काळामध्ये, (१) मानवी स्वरुपातील नृसिंह, (२) देह मानवाचा मुख सिंहाचे, (३) हिरण्यकश्यपूशी युध्द करताना.

**हयग्रीव :** घोड्याचे मुख आणि देह मानवाच अशी मूर्ती.

**धन्वंतरी :** उजव्या हातामध्ये घट असणारी मूर्ती.

**दक्षिणेतील विष्णूमूर्ती :** दक्षिणेतील विष्णूमूर्तीमध्ये काही लक्षणीय फरक आपल्याला दिसून येतात. गदा, आयुधपुरुष, अक्षमाला, फळ, घट इ. फार क्वचित दिसतात. तसेच परिवार देवता फारशा दिसत नाहीत. मात्र इकडील विष्णूमूर्तीमध्ये दागदागिन्यांचे अलंकरण मोठ्या प्रमाणावर दिसते. विष्णूचे 'अनंतशयनी' स्वरुप मोठ्या प्रमाणावर दिसते. विष्णूचे वराह, त्रिविक्रम, नृसिंह हे प्रकार याठिकाणी विशेष लोकप्रिय आहेत.

०......०......०

सहाव्या शतकांतर विष्णूमूर्तींचे विविध मुद्दयांवरुन असंख्य प्रकार पडतात, जसे आसन स्वरुप, अवतार, नव्या कथांचा समावेश इ. निव्वळ आयुधं, त्यांचा क्रम लक्षात घेतला तर एकूण २४ वेगवेगळे प्रकार आपल्याला दिसून येतात!

## ❁ शिव मूर्ती :-

हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच आपल्याला शिव प्रतिमा किंवा मूर्ती आढळू लागतात. याठिकाणी शिव, सभोवताली प्राणी घेऊन बसलेला दिसतो. विशेष म्हणजे कालिबंगनमधून शिवलिंगाचे अवशेषही मिळालेले आहेत. हाच प्रकार पुढे वैदिक आणि महाकाव्य काळातही दिसून येतो. पुढे कुशाणांच्या नाण्यांवर शिवाचे मूर्तस्वरुप ठळपणे दिसू लागते. या नाण्यांवरील शिव हा नंदीसह आहे. त्याच्या हातात कमंडलू आहे, त्रिशूळ आहे, दंड आहे, पाश आहे, कधीकधी तो त्रिमुखी आहे, मस्तकावर जटा आहेत-त्यातून अग्निज्वाळा निघत आहेत, त्याने प्राण्याचे कातडे पांघरलेले आहे इ. अशा प्राण्यांवरील शिवप्रतिमांबरोबर, मातीच्या ठशांवरही आपल्याला शिवप्रतिमा आढळतात.

गुप्तकाळापासून आपल्याला ठळकपणे दगडांमध्ये घडविलेल्या शिव मूर्ती दिसून येतात. या मूर्तींच्या स्वरुपावरु/लक्षणावरुन, शिवाची वेगवेगळी रुपे आपल्याला मिळतात.

**केवल शिव :** जटाधारी, कपाळावर तिसरा डोळा असलेला, वाघाचे कातडे पांघरलेला, एका हातात त्रिशूळ तर दुसरा हात अभयमुद्रेत असणारा एकटा शिव.

**पार्वतीसह शिव :** शिव आणि शक्ती अलिंगनमुद्रेत किंवा स्वतंत्र, दोघेही द्विभूज, कोणतेही आयुध नाही, मागे नंदी.

**अर्धनारीश्वर :** द्विभूज, आयुधाविना, उजवा भाग पुरुषाचा तर डावा भाग स्त्रिचा.

**लकुलिश :** हातात सोटा घेतलेला शिव.

**दक्षिणामूर्ती :** व्याख्यानमुद्रा, पायाजवळील दोन हरणे, सोबत चार शिष्य. तज्ञांच्या मते या मूर्तीवर बौध्दमूर्तींचा प्रभाव आहे.

**रावणानुग्रह :** कैलास पर्वत चलणारा अहंकारी रावण आणि केवळ अंगठ्याने पर्वत दाबून रावणाचे गर्वहरण करणारा शिव असे अंकन.

**गजासूरवध :** हत्तीवर बसून, अंकुश धारण करणारा शिव.

**नृत्य मूर्ती :** चतुर्भूज, नृत्य करणारा शिव.

**भिक्षाटन मूर्ती :** जटा, डाव्या हातात कपाळ/भीक्षापात्र.

याशिवाय हरीहर, चतुर्मुख, अष्टमुख, द्वादशमुख शिव असे अनेक प्रकार मिळत राहतात.

सहाव्या शतकानंतर शिवमूर्तीमध्ये आणखीन वैविध्य वाढते. त्याचा परिवारही वाढत जातो. समांतरपणे शिवलिंगाची पूजा ही प्रस्थापित होत राहते. पुढेपुढे शिवमूर्तीचे प्रमाण कमी होते, शिव फक्त शिल्परुपात राहू लागतो. गाभाऱ्यात 'शिवलिंगाचीच' पूजा प्रसिध्द होते.

❑ **मूर्तीशास्त्राचे इतिहास अभ्यासासाठी महत्व :-**

१) मूर्तीपूजा हे भारतीय संस्कृतीतील धर्मांचे एक अविभाज्य अंग आहे. त्यामूळे भारतीय संस्कृतीचा अभ्यास हा मूर्तीशास्त्राच्या अभ्यासाशिवाय अपूरा आहे;

२) काही मूर्ती प्रथम स्वतंत्र होत्या, जसे, शिव, नंदी, देवी, गणपती, कार्तिकेय इ. त्यांचे प्रत्येकाचे स्वतंत्र पंथ होते. पुढे हे सर्व पंथ एकत्र आले. आणि प्रत्येकाच्या देवता एकत्र करुन, शिवाचा एक परिवारच निर्माण झाला. हा म्हणजे इतिहासातील विविध समाज एकत्र येण्याचा स्पष्ट पुरावाच आहे;

३) हरीहर, अर्धनारी अशा मूर्तींवरुन तत्कालिन दोन्ही पंथाचे महत्व, त्यातील संघर्ष आणि त्यांच्यामध्ये समन्वय राखण्यासाठी झालेले प्रयत्न हे कळून येतात.

४) लोककथा, पुराणे यांचे मूर्त स्वरुप आपल्यासमोर असल्याने, त्या कथा समजायला मदत मिळते, जसे, रावणानुग्रह, गजासूरवध, अंधकासूरवध इ.;

५) मूर्तीशास्त्राच्या अभ्यासातून आपल्याला मूर्ती ओळखता येतात. या मूर्तींवरील (म्हणजे त्या त्या पंथावरील) विविध प्रभावही आपल्याला दिसून येतात. जसे, कुशाणांच्या प्रभावातून सूर्यमूर्ती ही कोट घातलेली, बूट घातलेली दाखविली जात असे;

६) मूर्ती आणि शिल्पांवरुन आपल्याला कलेचा विकासही समजू शकतो.

## (ब) नाणकशास्त्र (Numismatics) :-

नाण्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नाणकशास्त्र होय. अशा अभ्यासामध्ये नाणी ज्या धातूंनी बनलेले आहे, तो धातू ओळखणे यापासून त्यांचा अभ्यास करुन, त्यांचे वर्गीकरण करणे अशा बाबींचा समावेश होतो. हे वर्गीकरण करताना पुढील निकष महत्वाचे असतात, जसे, वजन, लेखन/नक्षीकाम, धातू, तंत्रज्ञान, पुढील आणि मागील बाजूला असलेला तपशील वगैरे. या शास्त्राचा सखोल अभ्यास 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ न्यूमिसमॅटिक रिसर्च सोसायटी' या अंजनेरी (नाशिक) स्थित संस्थेमध्ये केला जातो. या शास्त्राचा मोठ्या प्रमाणावर उपयोग इतिहासाच्या अभ्यासासाठी होत असतो. अर्थात, सुरुवातीला नाणी- त्यांचे स्वरुप, त्यांचा विकास पाहणे हे आवश्यक आहे.

फार पूर्वी, समाजातील **विनिमय** हे **'वस्तूंच्या'** स्वरुपात होत असे. गाई, कातडे, कापड इ. वस्तूंमध्ये हा विनिमय होत असे. मात्र, अशा प्रकारच्या व्यवहारांच्या काही मर्यादा असत. जसे,

१) अशा प्रकारचा 'वस्तूविनिमय' हा गरजांच्या योगायोगावर अवलंबून असे. म्हणजे एखाद्याला गव्हाची गरज आहे आणि त्याच्याकडे कातडं अतिरिक्त प्रमाणावर आहे. तर दुसऱ्याला

कातड्याची गरज आहे आणि त्याच्याकडे गहू मोठ्या प्रमाणावर आहे. अशी दोन माणसं ज्यावेळी समोर येतात त्याचवेळा त्यांच्यामध्ये असा विनिमयाचा व्यवहार शक्य असतो;

२) तसेच, वस्तूविनिमयामध्ये, मूल्यविभाजन अशक्य असते. म्हणजे, गव्हाच्या एका पोत्याला एक गाय असा विनिमय आहे. मात्र, जर एखाद्याला, फक्त अर्धं पोतं गहू हवे असेल तर काय करणार?

३) तसेच, वस्तूविनिमयामध्ये गुंतलेल्या वस्तू या नाशवंत असत. त्यामुळे ही संपत्ती साठवून ठेवणे अशक्य होते;

४) तसेच, एका ठिकाणाहून वस्तू, दुसऱ्या ठिकाणी नेणे प्रत्येकवेळी शक्य नसे. जसे, एखाद्याकडे गायी भरपूर आहेत पण त्याला दूरवर मिळणारी वस्तू हवी आहे. अशावेळी या सगळ्या गाई तिकडे घेऊन जाणं आलं.

थोडक्यात, 'वस्तूविनिमयातील' या मर्यादांमुळे, त्या मर्यादा दूर होतील अशा प्रकारच्या, सर्वांना मान्य होणाऱ्या वस्तूंची गरज होती. ती 'नाण्यांच्या' शोधामुळे पूर्ण झाली.

प्राचीन जगातही अशा प्रकारचे वस्तूविनिमय (आणि त्यातील समस्या) असे. पूर्वी इजिप्शीयन संस्कृतीमध्ये, ठरावीक वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या या विनिमयात वापरल्या जात असत. यांना 'टॅब्यून' असे म्हणत. अशा प्रकारे ठरावीक मूल्याच्या धातूचा वापर विनिमयात होणे सुरु झाले. पुढे, बॅबिलोनियन लोक, ठरावीक वजनाचे चांदीचे गोळे वापरु लागले. यांचे छोट्या मूल्यात विभाजनही होऊ लागले, जसे, शेकेल, मीन, टॅलेंट असे. थोडक्यात, आता, मूल्यविभाजनाची सुरुवात झाली असे म्हणता येईल. पुढे लिडियामध्ये धातूच्या तुकड्यावर चिन्हे मिटवली जाऊ लागली (इ.स.पू. ७००). ही चिन्हे या धातूच्या वजनाची आणि शुध्दतेची हमी देण्यासाठी असावीत. या चिन्हांबरोबरच, या तुकड्यांवर प्राण्याची चित्रे, लेखही दिसू लागतात. शिवाय ही नाणी विविध पटीतीलही आहेत. थोडक्यात, इ.स.पू. ७०० नंतर जगामध्ये खऱ्या अर्थाने नाण्यांचा उदय झाला असे म्हणता येईल. ही लिडियातील नाणी इलेक्ट्रमपासून बनवलेली असत. इलेक्ट्रम म्हणजे सोने आणि चांदीचे मिश्र प्रमाण असलेले नाणे.

भारताचा विचार करता, वैदिक काळातच (इ.स.पू.१५०० पासून पुढे) धातूंच्या तुकड्यांचा विनिमयासाठी वापर सुरु झालेला दिसतो. या तुकड्यांना कृष्णल, सुवर्ण, शतमान, निष्क इ. नावांनी ओळखले जात होते. ऋग्वेदामध्ये उल्लेख आहे की, कक्षिवक नावाच्या ऋषींनी, १० निष्क देऊन १० घोडे घेतले. अर्थात, ढवळीकरांच्या मते, या तुकड्यांवर चित्र, लेख नसत त्यामुळे यांना नाणी म्हणता येणार नाहीत. तरीही, वैदिक काळात, विनिमयासाठी धातूंच्या तुकड्यांचा, गाईसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून प्रयोग सुरु झालेला होता हे मात्र निश्चित.

सर्वसाधारणत: इ.स.पू. ६ व्या शतकांमध्ये, आपल्याला खऱ्या अर्थाने नाणी उदयास आली असे म्हणता येईल. इ.स.पू. सहावे शतक हे एक महत्वाचे शतक होय. या काळात भारताचे दुसरे नागरीकरण झाले. शेतीचे भरघोस उत्पादन, विकसित कारागीरी आणि समृध्द व्यापार आणि या सर्वांचे व्यवस्थापन करणारी शहरे ही या नागरीकरणाची ठळक लक्षणं होत. अर्थात, नाण्यांचा विकास या काळात होणे स्वाभाविकच होते. या काळातील १७५ ग्रॅम वजनाचे हे 'शतमान' नावाचे नाणे आहे. याचा उल्लेख वाङमयातही आहे आणि तक्षशीलेच्या उत्खननामध्ये तशी नाणीही मिळालेली आहेत. या शतमानाचे पुढे अर्ध शतमान, पाव शतमान, पादार्थ शतमान, शाण (आठवा भाग) असे विभाजनही दिसू लागते. या शतमानानंतर, कार्षापण हे नाणे अस्तित्वात आले. जातककथांमध्ये यांच्या वापराचे पुरावे ही आपल्याला मिळतात, जसे, १२ कार्षापणाला १ बैल. ही सगळी नाणी 'आहत' स्वरुपाची होती. या काळात वजनासाठी 'रत्ती' (रक्तिका/गुंजेचे बी) हे माप वापरलं जात असे.

नाण्यांच्या विकासामध्ये, ती **कशी बनवली जात असत** हे पाहणे हे गंमतशीर ठरेल. अगदी सुरुवातीला, म्हणजे इ.स.पू. सहाव्या शतकामध्ये आहत नाणी असत. यामध्ये प्रत्येक चिन्हासाठी एक स्वतंत्र 'पंच' असे. मग चांदीच्या पत्र्यावर, वेगवेगळे पंच वापरुन, वेगवेगळी चिन्हं उमटवली जात. याला 'आहत नाणी' Punch Marked Coins (PMC) असे म्हणतात.

त्यानंतर 'कास्ट' किंवा 'साच्यातील' नाणी येऊ लागली. यामध्ये, मातीच्या थाळ्यांची एक परत केली जात असे. यातील प्रत्येक थाळीमध्ये तीन-चार नाण्यांचे पोकळे साचे असत. या सर्व थाळ्या एका मातीच्या पाईपने जोडलेल्या असत. हे सर्व मातीने बंद केले जाई. मग, पाईपच्या तोंडामधून, धातूचा तप्त रस ओतला जाई. तो, त्या परतीतील प्रत्येक थाळ्या भरत, भरत खाली जात. अशा तऱ्हेने सर्व थाळ्या- म्हणजे साचे भरले की ती परत थंड केली जाई. मग शेवटी, ही परत फोडली जात असे. मग नाणी मिळत असत.

यानंतर, 'डाय स्ट्रक' हे तंत्रज्ञान आले. याचे मूळ तत्व हे पूर्वीच्या आहत नाण्यांसारखेच असे. फक्त याठिकाणी, विविध चिन्हांसाठी, एकच 'चिन्हांकित पंच' असे. मग, एका ऐरणीवर खालच्या बाजूने, वर तोंड करुन, एक पंच ठेवला जाई. त्यावर कोरे नाणे ठेवत. मग त्या कोऱ्या नाण्यावर/मागील बाजूला, दुसरा 'चिन्हांकित पंच' ठेवला जाई. मग हातोडी या दुसऱ्या पंचच्या मागे मारला जाई. त्यामुळे, नाण्यांच्या दोन्ही बाजूला, एकाच आघातामध्ये, त्या पंच वरील सर्व चिन्हं उमटत असत. आजही नाणी अशाच 'डाय स्ट्रक' पध्दतीने पाडली जातात.

### ❁ नाण्यांचा विकास :-

नाण्यांचा विकास पाहणे हे इतिहासाच्या अभ्यासासाठी अतिशय महत्वाचे असते. हेच आता आपल्याला पहावयाचे आहे. विषयाची व्याप्ती विचारात घेता, याठिकाणी फक्त प्राचीन भारतातील नाण्यांचा

प्रातिनिधीक स्वरुपात विचार केलेला आहे. तसेच, एक लक्षात घ्या की नाण्यांवरील लेखन, हे मुख्यत्वे चिन्हांकित असते. त्यामुळे याठिकाणी, सोयीसाठी 'रेखन' असा शब्द योजलेला आहे.

### ❀ आहत नाणी :–

तर, अशा प्रकारे, भारतातील सर्वात पहिली नाणी ही, इ.स.पू. सहाव्या शतकातील नाणी होत. यांना 'आहत नाणी' असे म्हणले जाते. ही साधारणतः चांदीची बनवली जात असत. वेगवेगळ्या चिन्हांसाठी, स्वतंत्र 'पंच' असत. या नाण्यांवर कोणतेही लेखन केलेले नसून, फक्त चिन्हं असत.

आहत नाण्यांच्यावरील चिन्हांमध्ये पुढील चिन्हांचा समावेश होतो, जसे, मानव, प्राणी (हत्ती, बैल, गेंडा), पक्षी (मोर), जलचर (मासे (जोडीने), बेडूक, कासव, फुले, टेकडी, नदी, सूर्य, चंद्र इ. तसेच, धुष्यबाण, तराजू, भौमितिक चिन्हेही दिसून येतात. यामध्ये सूर्यासारखे दिसणारे 'षडरचक्र' हे चिह हे एक विशेष चिन्ह होय. तसेच काही चिन्हे वारंवार येताना दिसतात, जसे, सूर्य, वर्तुळ, बैल, हत्ती, बाणांचे टोक, टेकड्या, झाडे इ. ही चिहे विशिष्ठ पध्दतीने, ठरावीक भागावर उमटवली जातात. असे म्हंटले जाते की, प्रत्येक प्रदेशाची वैशिष्ट्यपूर्ण अशी चिन्हे होती.

ही नाणी मुख्यत्वे चांदीची आहेत. ही ५६ ग्रेन वजनांची आहेत. आकाराने ही ओबडधोबड असली तरी गोल, चौकोनी असत. त्याचबरोबर काही लांबट–वक्राकारही असत. ही लांबट–वक्राकार नाणी सर्वात प्राचीन होत. यांचे १७५ ग्रेन वजन आहे. अशी नाणी वायव्य भारतामध्ये सापडलेली आहेत. ही नाणी साधारणतः ३२ रत्तींची असत. ३२ रत्ती म्हणजे ५६ ग्रेनची. १ ग्रेन म्हणजे ६४.७९ मिलिग्रॅम. आहत नाण्यांमध्ये साधारणतः एकाच प्रकारची नाणी असत. अर्थात, त्यामध्येही काही उपप्रकार होतेच, जसे, तक्षशीला–गांधार याठिकाणी सापडणारी नाणी एकाच प्रकारची आहेत; तसेच, कोसल प्रकार, अवंती प्रकार, मगध प्रकार वगैरे. अर्थात, याबरोबर, काही स्थानिक व्यापारी/कारागीर संघांनी/श्रेणींनीही 'आहत नाणी' काढलेली ही दिसून येतात.

### ❀ परकीयांची नाणी :–

पुढे, ज्यावेळी परकीयांचा भारतामध्ये प्रवेश झाला, त्यावेळी सुबक, सुंदर अशी नाणी आपल्याला दिसून येतात. ही, भारतातील पहिली लिखित नाणी आहेत. तशीच, ही नाणी साधारणतः 'डाय स्ट्रक' प्रकाराने पाडलेली आहेत. ही नाणी अतिशय सुबक असून, बहुतेक चांदीची आहेत. फक्त, कुशाणांनी सोन्याची नाणी पाडायला सुरुवात केली. या नाण्यांच्या, पुढील आणि मागील बाजूंचा वापर करुन, द्वि–लिपीत आणि द्वि–भाषेमध्ये मजकूर कोरला जात असे. त्यामुळे, या नाण्यांचे वाचन होऊ शकले. साधारणतः पुढील बाजूला राजाचा चेहरा/उभा राजा आणि मागे देवता, आणि कडांना मजकूर अशा स्वरुपाची रचना

दिसून येते. अशा परकीय राजांमध्ये ग्रीक (वायव्येकडील, बॅक्ट्रियन, इंडो-ग्रीक), सिथियन/शक (पूर्वीचे, पश्चिमी क्षत्रप), पार्थियन्स/पहलव आणि कुशाण यांचा समावेश होतो.

### ❁ ग्रीक नाणी :-

भारतातील पहिली-वाहिली परकिय नाणी ही ग्रीकांची आहेत. तशीच साच्यातून काढलेली पहिली नाणी ही या ग्रीकांचीच. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर, भारताचा आणि ग्रीकांचा सांस्कृतिक संबंध सुरु झाला. अलेक्झांडरने, भारतीय प्रदेशाचे विविध प्रांतामध्ये विभाजन करुन, त्यावर राज्यपाल (क्षत्रप) नेमलेले होते. पुढे, अलेक्झांडरच्या मृत्युनंतर ते स्वतंत्र झाले. यामध्ये बॅक्ट्रियन ग्रीक होते, पार्थियन ग्रीक होते आणि इंडो-ग्रीक होते. असे जवळपास ४२ ग्रीक राजे उत्तर आणि वायव्य भारतामध्ये, विशेषत: हिंदुकूशानजीकच्या प्रदेशामध्ये होऊन गेले. यांच्या इतिहासाची माहिती फक्त यांच्या नाण्यांच्या अभ्यासावरुनच आपल्याला होऊ शकते. यामधील 'इंडो ग्रीक' नाण्यांचा येथे थोडक्यात विचार करु.

इंडो ग्रीक नाणी ही सिरियातील ग्रीक नाण्यांच्या धर्तीवरच पाडलेली आहेत. ही नाणी सोने, चांदी आणि तांबे वापरुन तयार केलेली आहेत. यातील चांदीची नाणी भरपूर असून, सोन्याची कमी सापडलेली आहेत. अशी नाणी मोठ्या व्यवहारासाठी वापरली जात असत. तांब्याची नाणी ही मुख्यत्वे दैनंदिन व्यवहारासाठी आणि साध्या गरजांसाठी वापरली जात. त्यामुळे तांब्याची नाणीही मोठ्या प्रमाणावर सापडतात. यातील सोन्याच्या नाण्याचे (स्टेटर) वजन १३२ ग्रेन असते. तर चांदीचे (द्रम) ६६ ग्रेनचे असते. यावेळी सोने आणि चांदीचे किंमतीचे प्रमाण हे १:१० असे असे. तांब्याच्या नाण्यांचे वजन हे ७० ग्रेन असते. अशी इंडोग्रीकांची सोने आणि चांदीची नाणी ही आकाराने गोल आहेत तर तांब्याची नाणी चौकोनी आहेत.

ग्रीक नाण्यांच्या पुढील बाजूस राजाचा चेहरा आणि मागे ग्रीक देवता असते. या ग्रीक देवतांमध्ये झ्यूस (वज्र हे याचे प्रमुख अस्त्र), ॲथेन (अथेन्सची नगरदेवता, तिचा आवडता पक्षी घुबड), हिरॅक्लस (धनुष्यबाणासह), पिके (विजयदेवता, हातात पुष्पमाला आणि पाम वृक्षाची फांदी) इ. चा समावेश होतो. यातील राजाचा चेहरा हा साधारणत: उजवीकडे पाहताना दिसतो. पुढे डिमिट्रियसच्या काळापासून, चेहऱ्याऐवजी राजाचा अर्धपुतळा दाखवणे सुरु झाले. राजाचे केस कुरळे असतात आणि साधारण: ते एका फितीमध्ये बांधलेले असतात. हा पर्शियन प्रभाव होय. हा डिमिट्रियस पहिला ग्रीक राजा होय जो हिंदुकुश पार करुन, भारतामध्ये प्रवेश करु शकला. त्यामुळे याच्या नाण्यावर आपल्याला राजाच्या शिरस्त्राणावर हत्तीचे मुंडके दिसून येते. पुढे अगॅथोक्लोसच्या काळामध्ये ग्रीकांच्या नाण्यांवर कृष्ण आणि बलरामाच्या आकृती दिसू लागतात. अर्थात या आकृतींवर ग्रीक कलेचा प्रभाव आहे. अपोलोडोटसच्या काळामध्ये मात्र ग्रीकांचे जवळपास भारतीयीकरण पूर्ण होते. त्यामुळे त्याच्या नाण्यांवर आपल्याला भारतातील हत्ती आणि वशिंडयुक्त बैल अगदी भारतीय स्वरुपाचे दिसू लागतात.

बॅक्ट्रियन ग्रीकांची नाणी ही पूर्णपणे ग्रीक भाषेतील लेख असलेली आहेत. मात्र इंडोग्रीकांनी

भारतीयांसाठी जी नाणी काढली ती द्वैभाषिक असत. पहिला युक्रेटायडिस हा द्वैभाषिक नाणी काढणारा पहिला राजा होय. ही द्वैभाषिक नाणी म्हणजे पुढील बाजूस ग्रीक लेख आणि तीच माहिती, मागील बाजूस प्राकृत भाषेत आणि खरोष्ठी किंवा ब्राह्मी लिपीत असे. याचे कारण म्हणजे भारतामध्ये प्राकृत भाषा जरी बोलली जात असली तरी, वायव्य भागात खरोष्ट्री आणि उर्वरित भारतामध्ये ब्राह्मी लिपी वापरली जात असे. या द्वैभाषिक नाण्यांच्यामुळे, आपल्याला एका ज्ञात लिपी/भाषेच्या मदतीने अज्ञात लिपी आणि भाषा वाचता येते. अशा नाण्यांवर राजाच्या नावाबरोबर त्याची बिरुदंही असत. अशा नाण्यांवर चिन्हं ही असत. अशी ४०० हून अधिक चिन्हं सापडलेली आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. ही अर्थात, नाण्यांच्या मागील बाजूस असत.

ग्रीकांच्या व्यवहारातील नाण्यांबरोबर, काही प्रसंगोत्पात 'स्मारक नाणी'ही काढलेली दिसतात. ही नाणी मोठी असून, चांदी अथवा सोन्याची असत. जसे अलेक्झांडरने, त्याचा पौरसवरील विजय साजरा करण्यासाठी स्मारक नाणे काढलेले होते. यामध्ये पुढील बाजूस घोड्यावरुन भाला फेकणारा अलेक्झांडर दिसतो. तर मागील बाजूस हत्तीवर बसलेला पौरस राजा दिसतो.

ग्रीकांच्या नाण्यांचा भारतीय नाण्यांच्या विकासावर मोठा प्रभाव पडला. नाणी साच्यातून काढावीत म्हणजे ती एकसारखी निघतात, नाणी गोल असावीत, ती सुबक असावीत, राजाचा चेहरा, देवता दाखवाव्यात, राजाचे नाव द्यावे, त्याची बिरुदं दाखवावीत, ज्या-ज्या प्रदेशात ही नाणी वापरायची त्या त्या प्रदेशातील भाषा/लिपीमध्ये लेख असावेत इ. बरंचसं शिक्षण आपल्याला ग्रीक नाण्यांनी दिले. हा प्रभाव भारतीय नाण्यांच्यावर दिसतोच, शिवाय कुशाणांसारख्या परकीय नाण्यांवर सुध्दा दिसून येतो.

### ❁ शक नाणी :-

ग्रीकानंतर, पुढे, भारतामध्ये शक आले. या शकांची नाणी ही 'इंडो ग्रीक' नाण्यांसारखीच; त्याच धर्तीवर होती. मोठ्या व्यवहारासाठी चांदी आणि सामान्य व्यवहारासाठी तांब्याची नाणी त्यांनी पाडली. ही सुध्दा ग्रीक आणि खरोष्ट्री अशा दोन भाषांमध्ये असत. इथे, राजाच्या चेहऱ्याऐवजी, तो घोड्यावर बसलेला दाखवू लागले. तसेच, आता 'महाराजस राजति(धि)राजस (बसिलिओस बसिलिओन)' अशी भक्कम बिरुदं येऊ लागली. अगदी सुरुवातीला जे शक आलेले होते त्यांच्यामध्ये मौ (इ.स.पू. ९०-६०), अझ (इ.स.पू. ४८-२५), अझिलिस (इ.स.पू. ५७-३५) असे राजे होऊन गेले. यापैकी, मौ राजाच्या नाण्यांवर, पुढे, घंटी बांधलेला हत्ती आणि मागे 'कॉडेशिअस' हे चिन्ह दिसते. कॉडेशिअस या चिन्हामध्ये एका काठीला, दोन सापांनी वेढलेले असते. हे आज, डॉक्टर्सचे चिन्ह म्हणून आपण वापरतो. तर अझिलिसच्या नाण्यांवर; हातामध्ये 'पाम' वृक्षाची फांदी आणि दिवा घेतलेली देवता दिसू लागते. पुढे, असे हे सुरुवातीचे शक पराभूत होऊन भारताबाहेर हाकलले गेले.

त्यानंतर, शकांच्या दोन प्रमुख लाटा आल्या. यांना 'पश्चिमी क्षत्रप' असे म्हंटले जाते. यातील एक

शाखा 'क्षहरात' अशी समजली जाते. हे क्षहरात शक महाराष्ट्रात होते. तर दुसरी शाखा 'कार्दमक' अशी होती. हे मध्य प्रदेशामध्ये होते. दोन्ही सत्ता, सातवाहनांच्या समकालीन होत्या. 'राजाचा चेहरा असलेले' नाणे यांनी प्रचलित केले. हा प्रकार पुढे ५०० वर्षे भारतामध्ये कायम राहीला. ही चांदीची नाणी होती. या काळात शकांचे पूर्ण भारतीयीकरण घडून आलेले होते. 'सहिष्णूता' हे एक भारतीय संस्कृतीचे मोठे वैशिष्ट्य आहे. इथला राजा कोणत्याही धर्माचा असो, त्याच्या राज्यात सर्व धर्मांना आश्रय मिळत असे. शकांनी सुध्दा ही परंपरा कायम ठेवली.

महाराष्ट्रातील क्षहरात शकांमध्ये नाहपान हा एक थोर राजा होऊन गेला. समोरच्या बाजूला किरिट घातलेला त्याचा चेहरा दिसून येतो. तर मागील बाजूला 'वज्र' आणि 'बाण' ही चिन्हं दिसून येतात. मजकूर कडांना आहेच. या नाहपानाला, गौतमीपुत्र सातकर्णी या सातवाहन राजाने पराभूत केले. इतकेच नव्हे तर, नाहपानाच्या नाण्यांच्यावरच, ती खोडून, त्याने आपली नाणी पाडली! सातवाहनांची जी काही चांदीची नाणी आहेत ती एवढीच!

तिकडे, मध्य प्रदेशामध्ये, शकांची 'कार्दमक' शाखा होती. येथे रुद्रदामन, रुद्रसिंह असे थोर राजे होऊन गेले.यांच्या नाण्यांमध्ये विविध नव्या गोष्टींची भर पडली. एक तर नाण्यांच्या मागील बाजूला घोड्याच्या नालेच्या आकाराच्या, एकावर एक अशा तीन टेकड्यांचे रेखन येथे आले. तसेच, नदी, सूर्य, चंद्र अशी नक्षी आल्या. तर, ब्राहमी आणि खरोष्ट्रीमध्ये लेखन आले. दुसरं म्हणजे, ग्रीक भाषेतील मजकूर काढून टाकण्यात आला. आणि ग्रीक लिपी फक्त नक्षी म्हणून शिल्लक राहीली. तसेच, पुढे, खरोष्ट्री लिपीही काढून टाकण्यात आली. आणि सर्वत्र फक्त ब्राहमी लिपीमध्ये आणि प्राकृत भाषेत मजकूर कोरला जाऊ लागला. तिसरं म्हणजे, यांनी, तीन पिढ्यांची माहिती होऊ शकेल असा मजकूर कोरण्यास सुरुवात केली. याचा फायदा इतिहासाच्या विद्यार्थ्यांना खूप होतो. उदाहरणार्थ एका नाण्यांवर ***राज्ञो महाक्षत्रपस रुद्रदामनपुत्रस राज्ञो महाक्षत्रपस रुद्रसिंहस*** असे आहे. यावरुन, रुद्रदामनचा पुत्र रुद्रसिंह होता असे कळते. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, यांच्या नाण्यांवर आता ब्राहमीमध्ये कारकिर्दीचे वर्ष येऊ लागते. जसे इ.स.७८.

### कुशाण नाणी :-

कुशाण ही मध्य आशियातील एक टोळी. यांना हूणांनी पिटाळून लावले. ते प्रथम ग्रीकांच्या सेवत आले. आणि पुढे उत्तर भारताच्या मोठ्या भागात त्यांनी जवळजवळ ३०० वर्षे राज्य केले. कुजुल कॅडफिसेस हा भारतातील कुशाण सत्तेचा संस्थापक होय. याच्यानंतर विम कॅडफिसेस, कनिष्क, हुविष्क, वासुदेव असे मोठे राजे कुशाणांच्यात होऊन गेले. यातील कॅडफिसेस राजांची माहिती आपल्याला फक्त नाण्यांच्यामुळे मिळते. हे राजे परकिय जरी असले तरी परमतसहिष्णू होते. यातील कनिष्क हा बौध्दधर्मीय होता तर याच्यानंतरचे राजे शैव. यांच्याच काळात देवदेवतांच्या मुर्ती तयार करणे सुरु झाले.

कुजूलने जरी चांदी आणि तांब्यांची नाणी काढली तरी कुशाणांची बहुतेक नाणी सोन्याची आहेत.

विशेषत: कनिष्काची सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणावर सापडतात. यावरुन आपल्याला लक्षात येते की याच्या काळात समृध्दी होती. सर्व नाणी गोलाकार आहेत. पुढे वासुदेवाच्या काळात मात्र नाणी ओबडधोबड, प्रचंड भेसळ असणारी दिसू लागतात. यावरुन आपल्याला कळते की आता राज्याची अर्थव्यवस्था ढासळू लागलेली आहे. ग्रीक नाण्यांसारखाच; कुशाणांच्या नाण्यांवर पुढे राजा आणि मागे देवता हा प्रकार दिसून येतो. यांच्या नाण्यांवरील राजा हा सिंहासनावर बसलेला, रथात बसलेला, हत्तीवर अंबारीत बसलेला इ. असा दाखवलेला आहे. तसेच हे कुशाण राजे ढगांमध्ये बसलेले, ढगांमधून उगवणारे, प्रभावळ असलेले असेही दिसतात. यामुळे आपल्याला कळते की कुशाण राजे हे स्वत:ला देवतास्वरुप समजत आणि तसे ठसवण्याचा प्रयत्न करीत असत. याच्या नाण्यांवर उभा राजाही दिसून येतो. जसे वेदीमध्ये आहूती देणारा. हे राजे मध्य आशियातून आल्याने, मोठे बूट आणि कोट घातलेला राजा यांच्या नाण्यावंर दिसून येतो.

ग्रीकांप्रमाणेच यांच्या नाण्यांच्या मागील बाजूवर देवदेवता दिसून येतात. विमनंतर कुशाणांच्या नाण्यांवर 'फांदीसह शिव', त्रिशूळ-डमरुधारी शिव आपल्याला दिसतोच दिसतो. यावरुन आपल्याला कळते की शिवाची एकेकाळी मूर्तीस्वरुपात पूजा केली जात असे. त्याचे शिवलिंग स्वरुप फार पुढे प्रसिध्द झाले असावे. हुविष्कांच्या नाण्यांवर 'कार्तिकेय' दिसून येतो. शिव देवतेशिवाय, कुशाण नाण्यांवर, ग्रीक, पर्शियन, बौध्द देवताही दिसून येतात. आपल्याला हे माहिती आहे की कनिष्क हा बौध्द होता आणि इतर शैव होते. तरीही बाकीच्या देवता यांच्या नाण्यांवर दिसतात. याचे कारण म्हणजे त्यांचा राज्यविस्तार हा फार मोठ्या प्रदेशामध्ये झालेला होता. त्यामुळे, त्या त्या प्रदेशातील श्रध्देय देवता या नाण्यांवर दिसणे हे राज्याच्या समर्थनासाठी आवश्यक असते. या पर्शियन (ईराणी) देवतांमध्ये ओएशो (तीन तोंडे असलेला, त्रिशूळ आणि कंमडलूधारक), अर्दाक्षो (हातात कॉर्नुकोपिया) इ. चा समावेश होतो. शिवाय यांच्या नाण्यांच्या मागील बाजूवर काही चिन्हेही दिसतात. यातील नंदीपाद हे चिन्ह विशेषकरुन प्रत्येक नाण्यांवर आढळते.

यांच्या नाण्यांवर प्राणीही दिसून येतात. जसे, कुजूलच्या काळात कुशाण हे मुख्यत्वे वायव्य भारतामध्ये असल्याने, दोन वशिंड असलेला ऊंट दिसून येतो. तर, भारतामध्ये आल्यानंतर आपल्याला भारतीय बैल (वशिंडयुक्त) दिसू लागतो.

ग्रीकांप्रमाणेच, कुशाणांची नाणीही द्वैभाषिक आहेत. यांची सोयाची नाणी १२३ ग्रेन वजनाची असत.

### सातवाहन नाणी :-

उत्तरेकडील शक आणि कुशाण राजांच्या साधारण समकाळामध्ये दक्षिणेमध्ये 'सातवाहन' हे बलाढ्य राजे होऊन गेले. यांनी दीर्घकाळ आणि दक्षिण भारताच्या विस्तृत पट्ट्यामध्ये राज्य केले. मात्र, यांची नाणी अगदी साध्या धातूंपासून बनवलेली आहेत. सोने तर नाहीच तर जी काही चांदीची नाणी आहेत ती मूळ नाहपानाची पुढे खोडलेली नाणी आहेत. आणि थोडीफार वसिष्ठीपुत्र पुळुमावीची.

सातवाहनांची नाणी ही तांबे, शिसे आणि मिश्रधातूंची अशी बनवलेली असत. वसिष्ठीपुत्र पुळुमावींची काही चांदीची नाणी आपल्याला आढळतात. ही सुध्दा नाहपानांच्या नाण्यांवरच आधारलेली अशी आहेत. जसे पुढील बाजूला डावीकडे पाहणारा राजाचा चेहरा आणि भोवती ब्राह्मी मध्ये लेखन आढळते, जसे, 'वसिष्ठीपुतस सिरि पुळुमावीस' अशा प्रकारे. तर मागच्या बाजूला त्या तीन टेकड्या, सूर्य आणि उज्जैन चिन्ह दिसून येते. हे उज्जैन चिन्ह म्हणजे दोन डंबेल्स एकमेकांवर ठेवल्याप्रमाणे दिसते. ही खंर तर सूर्यांचीच प्रतिकृती आहे. अशा प्रकारची चिन्हांकित नाणी उज्जैनमध्ये अधिकप्रमाणावर/पहिल्यांदा सापडली म्हणून त्यांना 'उज्जैन चिन्ह' हे नाव पडले.

तीन टेकड्या-नदी, सूर्य, चंद्र, उजैन चिन्ह, सोंड उगारुन चित्कार करणारा हत्ती इ. चिन्हं साधारणतः सातवाहनांच्या नाण्यांवर दिसतात.

सातवाहनांप्रमाणेच, भारतातील इतर काही स्थानिक छोट्या राजांनी, शहरांनी, व्यापारी श्रेणींनीही नाणी पाडलेली होती. जसे, अर्जुनायन, मालव, यौधेय ही गणराज्ये; उज्जैन, कौशांबी, तक्षशिला अशी नगरे; आणि 'निगम' अशा व्यापारी श्रेणी. इसपू तिसऱ्या शतकापासून इसच्या चवथ्या शतकापर्यंत ही नाणी आपल्याला आढळतात. ही 'कास्ट' आणि 'डाय स्ट्रक' अशा दोन्ही तंत्रांनी पाडलेली असत. ही मुख्यतः तांबे आणि काशांमध्ये असत. क्वचित चांदीचीही आढळून येतात. जसे, महाभारतकालीन हिमाचल प्रदेशामध्ये औदुंबर, महादेव अशी छोटी राज्ये होती. यातील महादेवांच्या चांदीच्या नाण्यांवर पुढील बाजूला बैल आणि मागील बाजूला हत्ती दिसतो तर दोन्ही बाजूला *भागवत महादेवस राजराणा* असा ब्राह्मीतील लेख दिसून येतो.

### ❀ गुप्त नाणी :-

इ.स.च्या चवथ्या शतकातील गुप्त साम्राज्य हे प्राचीन भारतातील सुवर्णयुग असे समजले जाते. कर्तुत्ववान राजांची अखंडित मालिका, प्रचंड साम्राज्य विस्तार, उत्तम प्रशासन, संपन्न शेती, वैविध्यपूर्ण कारागीरी, समुध्द राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यापार, बृहद्‌भारताची निर्मिती, साहित्य-विज्ञान-कला-स्थापत्य यामधील अभिजात निर्मिती ही या काळाची प्रधान वैशिष्ट्ये होती. 'प्रत्येक गोष्टीचा सर्वोच्च मापदंड' या काळात निर्माण झाला. या काळामध्ये सोन्याची अप्रतिम नाणी गुप्तांनी पाडलेली दिसून येतात. आकार, रेखाटन, आकृती, चिन्हं, लेखन, भाषा अशा सर्वच निकषांवर ही नाणी अत्युत्तम अशी दिसून येतात. तशीच ही सोन्याची नाणी कमालीची शुध्द आहेत. यावरुन या काळाची आर्थिक संपन्नताही आपल्याला लक्षात येते.

सुरुवातीची गुप्त नाणी ही परंपरेचे पालन करणारी दिसून येतात. हे स्वाभाविक होते. कारण नविन राज्य निर्माण झाल्यावर, परंपरा पूर्णपणे खंडित टाकणे हे शक्यही नसते. म्हणजे नव्या नाण्यांचा वापर लगेचच विनिमयासाठी होणे हे शक्य नसते. त्यामुळे गुप्तांची सुरुवातीची नाणी ही पुढे राजाचा चेहरा मागे देवता ही

परंपरा राखणारीच दिसून येतात. तसेच नाण्यांवरील आकृत्यांचे कपडेही मध्य आशियासारखेच होते. मात्र पुढे बदल होत गेला. आता आकृतींला भारतीय कपडे दिसू लागतात. ग्रीक/कुशाण देवतेऐवजी सिंहवाहिनी दुर्गा, कमळावर बसलेली लक्ष्मी दिसू लागते. कॉर्निकोपियाऐवजी देवतेच्या हाती कमळ दिसू लागते. राजाच्या हातात आता धनुष्य दिसू लागते, कुऱ्हाड दिसू लागते.

गुप्तांची नाणी मोठ्या प्रमाणावर जी सापडतात ती सोन्याची आहेत. बहुतेक नाणी गोलाकारच आहेत. यावरील लेख 'कोरडे' न येता, वृत्तांमध्ये येऊ लागले. यांची भाषा संस्कृत असून, लिपी ब्राह्मी आहे. आपल्याला हे माहित आहे की कुशाणांची सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणावर पाडली. मात्र, नाणे तयार करण्यासाठी त्यामध्ये जो इतर धातू मिसळला जातो तो कुशाण नाण्यांमध्ये ५०% आहे. मात्र गुप्ताच्या काळात समृध्दीही अधिक होती, शिवाय तंत्रज्ञानही अधिक विकसित होते. त्यामुळे गुप्त नाण्यांमध्ये मिसळ १०% च दिसून येते.

चंद्रगुप्त पहिला हा गुप्त साम्राज्याचा वास्तविक संस्थापक. याने आपले राज्य स्थिर ठेवण्यासाठी शेजारील लिच्छवी राजघराण्याशी वैवाहिक संबंध निर्माण केलेले होते. त्यामुळे याची नाणी संयुक्त दिसतात, म्हणजे, राजा आणि राणी दोघेही दिसतात. तर मागे 'लिच्छवीयः' अशी अक्षरे दिसून येतात. पुढे समुद्रगुप्त हा एक थोर सम्राट होऊन गेला. याच्या काळात गुप्तांचे एक साम्राज्यच निर्माण झाले. या समुद्रगुप्ताची नाणी पाहिल्यास त्यांचे सहा प्रकारामध्ये वर्गीकरण करता येते.

**१. राजदंड छाप :** यामध्ये पुढील बाजूस राजा हातात राजदंड घेऊन असतो. याच्या समोर एक गरुडध्वज असतो. नाण्यांचा हा प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळतो. याचे वजन १०५-१२२ ग्रेन इतके आहे.

**२. धनुर्धर छाप :** राजाच्या हातात, राजदंडाऐवजी, धनुष्यबाण येते.

**३. परशू छाप :** याठिकाणी राजाच्या हातात कुऱ्हाड दिसते. मागील बाजूस कमळावर बसलेली किंवा हातात कमळ घेतलेली लक्ष्मी आहे. 'कृतांतपरशू' हा लेख दिसून येतो.

**४. अश्वमेध छाप :** याठिकाणी घोडा दिसून येतो. त्याच्यासमोर यज्ञावेदी असते. मागे 'अश्वमेध पराक्रमः' हा लेख दिसून येतो. समुद्रगुप्ताच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळी ही नाणी पाडलेली होती. यांचे वजन ११५-११८ ग्रेन आहे.

**५. व्याघ्र पराक्रम छाप :** बाणाने वाघ मारणारा राजा दिसतो. लेख 'व्याघ्रपराक्रमः' असा आहे. तर मागील बाजूस लेख 'राजा समुद्रगुप्तः' असा आहे. वजन ११५ ग्रेन.

**६. वीणावादक छाप :** हे दुर्मिळ नाणे आहे. यावर समुद्रगुप्त वीणा वाजवत बसलेला दिसून येतो.

समुद्रगुप्ताची ही नाणी म्हणजे गुप्त नाण्यांचा एक पॅटर्न दाखवतो. हे मूळ प्रकार कायम ठेवून, पुढील गुप्त राजांनी नवे प्रकारही सुरु केलेले दिसून येतात.

पुढे चंद्रगुप्त दुसरा याने गुजरातवर विजय मिळवला. यातून, त्याने चांदीची नाणीही पाडायला सुरुवात केली. या चांदीच्या नाण्यावंर शकांचा प्रभाव दिसून येतो. (याचे कारण गुजरातमध्ये शकांचे राज्य होते आणि तेथील प्रजेला या नाण्यांचाच परिचय होता. गुप्त साम्राज्यातील हा नवा भाग असल्याने, परंपरेचे पालन करणे हे चंद्रगुप्त दुसऱ्याला आवश्यक वाटत होते). त्याची नाणीही कलात्मक आहेत. त्याच्या सोन्याच्या नाण्यांमध्ये एकूण आठ प्रकार दिसून येतात. यामध्ये त्याने सुरु केलेले काही नवे प्रकारही दिसतात, जसे, घोडस्वार छाप (घोड्यावर बसलेला राजा), छत्र छाप (मागे प्रभावळ असलेला राजा), मंच छाप (मंचावर बसलेला राजा), इ. त्याने तांब्याची नाणीही काढलेली होती. या नाण्यांचा वापर दैनंदिन व्यवहारासाठी होत असावा. पुढे कुमारगुप्तानेही सोन्याची विविध नाणी सुरु केली. हा कार्तिकेयाचा भक्त असल्याने, याच्या नाण्यांवर कार्तिकेय मोठ्या प्रमाणावर दिसू लागतो. त्याने सोन्याच्या नाण्यांमध्ये काही नवे प्रकारही सुरु केले, जसे, सिंहमहेंद्र छाप (सिंहाला बाण मारणारा राजा), महेंद्रगज छाप (हत्तीवर बसलेला राजा), सिंहनिहंता महेंद्रगज छाप (हत्तीवर बसून सिंहाची शिकार करणारा राजा) इ. याच्या चांदीच्या नाण्यांमध्ये गरुड छाप, त्रिशूळ छाप, मोर छाप असे प्रकार पडतात. याठिकाणी पुढील बाजूस राजाचा चेहरा दाखविलेला आहे. तर स्कंदगुप्ताच्या चांदीच्या नाण्यांमध्ये नंदी छाप हे नवे नाणे दिसून येते.

## ❑ नाणकशास्त्राचे इतिहासासाठी असणारे महत्व

नाण्यांचा विकास आपण पाहिला. त्यांचे तंत्रही लक्षात घेतले. इतिहासाला, या नाणकशास्त्राची कशी मदत होऊ शकते हे आता पहावयाचे आहे.

(१) सर्वप्रथम म्हणजे, नाण्यांवरील मजकूरांवरुन, राजा, भाषा आणि लिपी आपल्याला समजून येते. असे जवळपास ४० परकीय राजे निव्वळ नाण्यांवरुन आपल्याला कळले आहेत. या राजांचा निव्वळ उल्लेख करणारेही अन्य कोणतेही लिखित साधन उपलब्ध नाही!; (२) नाण्यांवर शक राजांनी तिथी लिहिण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपल्याला कालक्रम समाजाला मदत होते.(३) द्वैभाषिक तसेच द्वैलिपी नाण्यांमध्ये, समान मजकूर दोन भाषा/लिपींमध्ये लिहिलेला असतो. त्यामुळे, लिपी/भाषा कळणे, नाणी वाचता येणे शक्य होते; (४) नाण्यांच्या उपलब्धीवरुन, तत्कालिन राजवटींमधील व्यापारी सबंध तसेच व्यापारी जाळे इ. बाबी कळून येतात. (राज्यविस्तार मात्र कळत नाही. कारण, नाणी एका ठिकाणाहून दुसरीकडे आरामात नेता येतात. असा राज्यविस्तार अन्य साधनांतून कळतो); (५) काही विशिष्ठ चिन्हांवरुन, आपल्याला अन्य महत्वाच्या गोष्टी समजतात. जसे, वसिष्ठीपुत्र पुळुमावीच्या नाण्यांवर 'जहाजाचे' चिन्ह आहे. यावरुन, सातवाहनांच्या सागरी व्यापाराकडे निर्देश होतो; (६) तसेच, 'वीणाधर' अशा प्रतिमांवरुन, राजाचा कल दिसून येतो; (७) नाण्यांतील धातूच्या प्रमाणावरुन आर्थिक परिस्थिती कळून येते. जसे, कुशाण आणि गुप्तांच्या नाणेसंचामध्ये सोन्याचे मोठे प्रमाण त्यांच्या काळातील समृध्दी दाखवते. (८) नाण्यांवरुन, राजाचा धार्मिक कल दिसून येतो. जसे गुप्तांच्या नाण्यांच्या पुढील बाजूस गरुडध्वज आहे तर मागील बाजूस लक्ष्मी.

म्हणजेच ते वैष्णव असावेत असे कळते. नाण्यांवरील देवतांवरुन राजाचे धार्मिक धोरणही समजते. जसे कुशाणांच्या नाण्यावर ग्रीक, भारतीय, पर्शियन देवतांचा आढळ होतो. असे लक्षात येते की हे राजे परमतसहिष्णू होते. अर्थात, त्याचबरोबर हेही कळते की वैविध्यपूर्ण प्रदेशावर राज्य करताना राजाने वास्तववादी दृष्टिकोन स्विकारला असावा. (९) श्रेणींच्या नाण्यांवरुन, त्यांचे तत्कालिन अर्थव्यवस्थेतील महत्व दिसून येते; (१०) गणराज्यांच्या नाण्यांवरुन, त्यांचे अस्तित्व आणि महत्व कळून येते; (११) तसेच शहरांच्या नाण्यांवरुन, त्यांची तत्कालिन स्वायत्ततेकडे निर्देश होतो; (१२) जर नाणी, पुरातत्वीय उत्खननातील स्तरांमध्ये सापडली तर त्यावरुन त्या स्तरांचा कालनिर्णय होतो. यातून, त्या स्तरांतील अन्य अवशेषांचे कालमापन शक्य होते.

याशिवाय, धातूतंत्रज्ञान आणि कला अशा अन्य बाबींचा विकासही आपल्याला समजून येतो.

## (क) पुराभिलेखशास्त्र (Epigraphy)

जूने लेख म्हणजे पुराभिलेख आणि त्यामधील प्राचीन कोरिव लेखांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे 'पुराभिलेखविद्या' (Epigraphy) होय. असे प्राचीन कोरिव लेख विविध वस्तूंवर कोरलेले असत, जसे, मोठे प्रस्तर (शिलालेख), दगडी खांब (स्तंभालेख), तांब्याचे पत्रे (ताम्रपट), भांडी, मुद्रा इ. डॉ. शोभना गोखले या विदुषिंनी पुराभिलेखाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

### पुराभिलेखांचे प्रकार :-

पुराभिलेखांचे, आपल्याला दोन पध्दतीने प्रकार पाडता येतात.

### (अ) पुराभिलेखांचे, ते ज्या वस्तूवर कोरलेले आहेत, त्यावरुन खालील प्रमुख प्रकार पडतात.

**शिलालेख :** यामध्ये मोठे प्रस्तर, छोटे प्रस्तर यावर यावेळी लेख कोरलेला असतो त्यावेळी त्याला शिलालेख असे म्हणतात. हे शिलालेख एका ठिकाणी स्थिर असतात. स्तंभालेख: एकाच दगडाने बनवलेल्या खांबावर ज्यावेळी आलेख कोरलेला असतो त्यावेळी त्याला 'स्तंभालेख' असे म्हणतात. या स्तंभालेखामध्ये पुन्हा ध्वजस्तंभ, जयस्तंभ, छायास्तंभ, वीरगळ असे प्रकार पडतात. यातील ध्वजस्तंभामध्ये एक स्तंभ उभा करीत. त्या स्तंभावर जे शिल्प असे त्या शिल्पाला 'ध्वज' असे म्हंटले जाते. जसे, सारनाथ येथून जे चार सिंहाचे शिल्प सापडलेले आहे (ही आपली राजमुद्राही आहे) तो एकेकाळाच्या 'सिंहध्वजा'च भाग होता. म्हणजे, एका स्तंभावर हे शिल्प होते. विदिशा (मध्य प्रदेश) याठिकाणी एक विष्णूचे मंदिर आहे. त्यासमोर एक गरुड-स्तंभ आहे. यावर ग्रीक राजदूत हेलिओडोरस याने लेख कोरलेला आहे (इ.स.पू. २ रे शतक). तर जयस्तंभ हा दिग्वीजयानंतर उभा केला जात असे. जसे, यशोधर्मन या राजाचा मंदसौर येथील जयस्तंभ. तर एखादा मृताच्या स्मरणासाठी 'छायास्तंभ' भारत असत. तर धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या स्मरणार्थ 'वीरगळ' उभे केले जात असत. दक्षिणेकडील वीरगळांमध्ये त्या-त्या लढाईची माहितीही कोरलेली असते.

**ताम्रपट :** यावेळी तांब्याच्या पत्रावर आलेख कोरलेले असतात त्यावेळी त्यांना 'ताम्रपट' असे म्हणतात. असे ताम्रपट हलवता येण्यासारखे असतात. हे आयताकृती असतात. साधारणत: तीन तांब्याच्या पत्र्यावर हे कोरलेले असतात. अक्षरे झिजू नयेत म्हणून वरच्या आणि खालच्या पत्र्यावर कोरले जात नाही. तर एकमेकांवर घासून अक्षरे झिजू नयेत म्हणून या पत्र्याच्या कडा थोड्याशा वर उचलल्या जात. असे ताम्रपट, एका कडीने एकत्रित ठेवलेले असत. असे ताम्रपट काही ग्रॅमपासून तीन चार किलोपर्यंत मिळालेले आहेत.

वरील प्रमुख प्रकाराशिवाय, पुराभिलेख आपल्याला नाण्यांवर, मातीच्या भांड्यावर, विटांवर, मुद्रांवरही सापडतात. तसेच, कागदाच्या शोधापूर्वी, भूर्जपत्र, ताडपत्र आणि कापडांवरही लेखन सापडते. यांचा विशेष अभ्यास हा 'हस्तलिखितशास्त्र' (Manuscriptology) या विद्याशाखेमध्ये केला जातो.

**(ब) पुराभिलेख विविध उद्देशाने लिहिलेले असतात. यांचा उद्देश लक्षात घेऊन आपण या पुराभिलेखांचे पुढीलप्रमाणे प्रकार पाडू शकतो, जसे,**

**अ) शासकीय आलेख :** हे राजाकडून किंवा प्रशासनाकडून प्रसिध्द केले जातात. यामध्ये पुन्हा, राजशासने:यावर मुख्यत: राजाज्ञा असतात, उदा. अशोकाचे शिलालेख; प्रशस्ती: राजाचे कर्तृत्व सांगणारे प्रंशसापर आलेख, उदा. समुद्रगुप्ताचा अलाहाबाद स्तंभालेख, पुलकेशी दुसरा याचा ऐहोळ स्तंभालेख; भूदाने; ग्रामदाने; मोबदला म्हणून, कौतुक म्हणून, महसूल/पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी म्हणून कोरलेले आलेख. हे शिलालेख ही असू शकतात आणि मोठ्या प्रमाणावर ताम्रपट असतात.

**ब) खाजगी व्यक्तींचे/संस्थांचे आलेख :** यामध्ये, मंदिर/मठांना दिलेल्या देणग्या, मूर्तीची प्रतिष्ठापना, तलाव/कुंड बांधल्याप्रित्यर्थ अशा आलेखांचा समावेश होतो. तसेच, कोरीव लेणे, स्तूपांची तोरणे यांच्यावरही लेख आढळतात. जसे, भारहूतच्या स्तूपावरील तोरणांवर कराडच्या कारागीरांनी लेख कोरलेला होता. तसेच मूर्तीच्या आसनपट्टीवरही लेख आढळतात. कुंडाच्या भींतीवर लेख आढळतात.

## पुराभिलेखांची लिपी आणि भाषा :-

आपल्या इतिहासातील वाचता आलेल्या लेखनाचा पहिला स्पष्ट पुरावा म्हणजे अशोकाचे शिलालेख होय. यापूर्वी लेखनाचे आपल्याला ज्ञान होते, मात्र त्यांचे स्पष्ट पुरावे आपल्याला मिळत नाही. जसे, हडप्पा संस्कृतीमध्ये (इ.स.पू. २६००-१७००) मुद्रांवर, धोलावीरा येथील फलकावर अक्षरे दिसून येतात. ती अद्याप वाचता आलेली नाहीत. वैदिक काळामध्ये (इ.स.पू. १५००-१०००) संख्येचे ज्ञान होते, छंदशास्त्राचे ज्ञान होते. म्हणजेच यांना लेखनाचे ज्ञान होते. तसेच इ.स.पू. सहाव्या-चवथ्या शतकातील बौध्द त्रिपिटकांमध्ये 'लेखनविद्या', लेखा, लेखक असे शब्द आलेले आहेत. पुढे इ.स.पू. चवथ्या शतकामध्ये आलेल्या निआर्कस या ग्रीक सेनापतीने, भारतीय लोक 'कापूस कुटुन तयार केलेल्या कापडावर लिहित' असे नमूद केलेले आहे. तर कर्टियस 'भूर्जपत्रावर' भारतीय लोक लिहित असत असे म्हंटले आहे. थोडक्यात,

अशोकाच्या पूर्वीच किती तरी वर्षे आपल्याला लेखनकलेचे ज्ञान होते हे निश्चित. दुर्देवाने, हे सर्व लेख सेंद्रिय वस्तूवर लिहिल्याने, काळाच्या ओघात त्या वस्तू नष्ट झाल्या. आणि शिलालेख, दगडावर कोरलेले असल्याने ते चिरस्थायी ठरले.

अशोकानंतर आपल्याला वाचता येणारे पुराभिलेख मिळू लागतात. मौर्य, सातवाहन अशा घराण्यांचे हे पुराभिलेख आहेत. हे पुराभिलेख मुख्यत्वे प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपीमध्ये आहेत. तर वायव्य भागातील आलेख आपल्याला प्राकृत भाषेमध्ये मात्र खरोष्ठी लिपीत दिसून येतात. कारण त्याठिकाणी ब्राह्मी समजत नव्हती. पुढे कुशाण आणि गुप्त काळापासून, संस्कृत भाषेला उर्जितावस्था प्राप्त झाली. त्यामुळे संस्कृत भाषेमध्ये आणि ब्राह्मी लिपीमध्ये पुराभिलेख दिसू लागतात. गुप्त काळ हा तर सर्वाथाने सुवर्णकाळ. त्यामुळे त्यांचे संस्कृत लेख हे लालित्यपूर्ण असे आहेत. पुढे हर्षवर्धनाच्या काळापासून केंद्रिय सत्ता कमकुवत झाली. प्रादेशिकतेचा उदय झाला. यातूनच प्रादेशिक भाषा आणि लिपीचे प्रादेशिक स्वरुप निर्माण झाले. यातून तामीळ, मराठी वगैरे भाषा निर्माण होतात. तसेच देवनागरी लिपी विकसित होत जाते.

लेखाप्रमाणे 'अंकही' आपल्याला पुराभिलेखामध्ये दिसून येतात. अर्थात हे अंक साधारणत: अक्षरांमध्येच लिहिले जातात. जसे, ४ या अंकासाठी क, १० साठी ठ अशाप्रकारे. पुढेपुढे हे अंक प्रतिकात्मक स्वरुपात शब्द लिहून कोरले जात, जसे, ० या अंकासाठी आकाश हा शब्द, २ साठी नेत्र/कर्ण (कारण ते दोन असतात), ४ साठी वेद, ५ साठी पांडव, ६ साठी ऋतू, ३२ साठी दंत इ.

पुराभिलेखामध्ये कालगणनासुध्दा कोरलेली असते. ही राज्याभिषेकाांतर अमुक अमुक वर्षे, बुध्दनिर्वाणानंतर अमुक अमुक वर्षे, शक, संवत अशा प्रकारे दिलेली असते. तसेच तीथी, वार, मास, ऋतू यांचाही उल्लेख असतो. ही संक्षिप्त स्वरुपात दिलेली असतात, जसे, सं=संवत, ग्री=ग्रीष्म.

### ❀ पुराभिलेख कसे कोरले जात असत?

साधारण शिलालेख तयार करत असताना, प्रथम दगड गुळगुळीत केला जात असे. त्यानंतर शाई अथवा खडूने लेख लिहिला जात असे. नंतर हा लेख छिन्नीने कोरला जात असे. यातील शाई ही, पिंपळाचा डिंक, टाकणखार इ.च्या उकळलेल्या मिश्रणातून तयार करीत. तसेच दिव्याची काजळी गोळा करुनही काळी शाई तयार केली जात असे. प्राचीन काळी शाईला 'मसी' असे म्हणत असून, 'मसीकुपिका' म्हणजे दौत होय. हे कोरण्याचे काम एका शासकीय अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली होत असे. त्याला 'अक्षपटलिक' असे म्हंटले जात असे.

### ❀ पुराभिलेखांचा अभ्यास :-

अशा पुराभिलेखांचा अभ्यास खऱ्या अर्थाने सुरु झाला तो सर विल्यम जोन्स यांच्या उत्साहातून. सर विल्यम जोन्स यांनी 'एशियाटिक सोसायटी' ही संस्था स्थापन केली (१७८६). या संस्थेद्वारे मोठ्या प्रमाणावर

पुराभिलेख शोधण्याचे काम सुरु झाले. या शोधातून मिळालेल्या वस्तू, त्यांच्या अर्थासह प्रकाशित करण्यासाठी, 'एशियाटक रिसर्चेस' हे नियतकालिक सुरु केले (१७८८). तर त्या वस्तू ठेवण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी 'इंडिया म्युझियम'ची स्थापना करण्यात आली. या संशोधकामध्ये जसे युरोपियन होते तसेच, त्यांनी प्रशिक्षित केलेले भारतीय होते. युरोपियनांमध्ये चार्लस विल्किस (पाल, मौखरी घराण्याचे आलेखवाचन), बॅबींग्टन (महाबळीपूरम येथील तामीळ आलेखवाचन), राधाकांत शर्मा (चौहान घराण्याचे आलेखवाचन), यती ज्ञानचंद्र (राजस्थानमधील आलेखवाचन) इ. अर्थात भारतातील प्राचीन लेख हे, भाषा कोणतीही असली तरी ब्राह्मी लिपीमध्ये आहेत. आणि ही ब्राह्मी लिपी, विशेषत: अशोकालीन ब्राह्मी लिपी अद्याप वाचली गेली नव्हती. ती वाचली जेम्स प्रिसेप यांनी (१८३४-३८).

हे शिलालेख आणि त्यांचे वाचन प्रकाशित करणे आणि संशोधनासाठी खुले करणे हेही महत्वाचे असते. यापूर्वी विल्यम जोन्सने एक नियतकालिक सुरु करुन या कार्याचा श्रीगणेशा केलेलाच होता. मात्र यामध्ये सर्व प्रकारची संशोधन असत. खास पुराभिलेख प्रकाशित करणे आवश्यक होते. त्यामुळे अलेक्झांडर कनिंगहॅमने 'कार्पस इस्क्रिप्शन इंडिकॅरम' हे नियतकालिक सुरु केले (१८७७). पुढे जेम्स बर्जेस यांनी 'एपिग्राफिका इंडिका' ही मालिका सुरु केली (१८८८). पुढे १९१० मध्ये ल्यूडर्स यांनी भारतातील सर्व ब्राह्मी पुराभिलेखांची यादी प्रकाशित केली. यामध्ये या पुराभिलेखांचा सारांशही दिलेला होता. तसेच व्यक्तीनाम, ग्रामनाम सूचीही दिलेली होती. ही यादी 'ल्यूडर्स लिस्ट' या नावाने प्रसिध्द आहे.

### पुराभिलेखांचे विषय :-

पुराभिलेखांमध्ये प्रचंड स्वरुपाची माहिती दिलेली असते. राजा एखादे भूदान देतो. त्याचा तपशील स्थायी स्वरुपात शिलालेखांच्या माध्यमात दिसतो. असे शिलालेख दान दिलेल्या जमिनीत पुरलेले असतात. तर, एक पुरावा म्हणून, असे आलेख ताम्रपटावर कोरलेले असतात. अशी भूदानं ही क्षत्रियांना त्यांच्या कर्तृत्वासाठी, कार्यासाठी दिले जात असे. तसेच विद्यादान आणि धर्मपालासाठी ब्राह्मणाच्या एका कुटुंबाला किंवा ब्राह्मणांच्या समुहाला दिले जात असे. असे भूदान यावेळी, एका जमिनीचे असे त्याला 'ब्रह्मदेय' तर गावांचे असे तर 'अग्रहार' असे म्हंटले जात असे. एका मंदिराच्या व्यवस्थेसाठी ते जर असेल तर त्याला 'देवदान' असे म्हंटले जात असे. तर बौध्द भिक्षूंना दिलेल्या दानास 'भिक्षुदल' असे म्हंटलेले आहे. हे दान जर बौध्द भिक्षूंना कायमस्वरुपी दिलेले असेल तर त्यास 'अक्षयनीवी' असे म्हणले जात असे.

अशा पुराभिलेखामध्ये पुढील प्रकारची माहिती असते: सर्वप्रथम पवित्र शब्द असत जसे 'स्वस्ति', 'सिध्दम' असे; त्यानंतर शुभचिह असे; दानकर्त्याचा तपशील आणि वंशावळ, त्याचे आणि त्याच्या मागील तीन पीढ्यांचे कर्तृत्व; दान घेणाऱ्याचा तपशील; दानाचा उद्देश म्हणजे कशासाठी दान दिलेले आहे; दानाचा तपशील म्हणजे जमिनीची चतु:सीमा, एकूण महसूल किती-तो कशाप्रकारे मोजला गेला-त्यातील कितवा भाग राजाला पाठवायचा किती स्वत:कडे ठेवायचा, दानामध्ये त्या जमिनीतील/गावातील कोणकोणत्या

बाबींचा समावेश होतो जसे तलाव, विहिर इ., कशाचा समावेश होत नाही; दान घेणाऱ्याचे विशेषाधिकार म्हणजे त्या प्रदेशातून अगदी सैन्यानेही प्रवेश करायचा नाही इ.; दान समारंभाच्या वेळी उपस्थित असलेले अधिकारी-त्यांनी नावे आणि पदे इ.; कोणत्या पर्वकाळी/ग्रहणाच्यावेळी/मुहुर्ताला दिले गेले, कोणत्या तीथीला, वारी दिले गेले; तसेच, लोककल्याणाप्रित्यर्थ उभारलेल्या योजनांबद्दलही माहिती दिलेली असते. जसे गिरणार येथील सुदर्शन हा तलाव. हा चंद्रगुप्त मौर्याच्या काळामध्ये बांधला गेला. पुढे तो शक राजा रुद्रदामन, गुप्त राजा स्कंदगुप्ताने दुरुस्त केला.

असा तपशील असलेले ताम्रपट राजधानीत जपून ठेवलेले असत. अशा प्रकारचा महाराष्ट्रातील पहिला शिलालेख हा अशोकाचा असून, सोपारे याठिकाणचा आहे. तर पहिला ताम्रपट हा वाशिम येथील वाकाटक राजा विंध्यशक्ती दुसरा याचा आहे. तर मराठीतील पहिला शिलालेख हा गोमटेश्वराच्या मूर्तीखाली आहे (इ.स. १०६१). आणि मराठीतील पहिला ताम्रपट हा दिवेआगार याठिकाणी सापडलेला आहे (इ.स.१०६०).

## ❑ काही महत्वाचे शिलालेख : (अ) अशोकाचे आलेख

अशोक हा मौर्य सम्राट होय. त्याच्या काळामध्ये मौर्य साम्राज्य जवळपास संपूर्ण भारतभर पसरलेले होते. अशोकाने आपले धोरण स्पष्ट करण्यासाठी शिलालेख आणि स्तंभालेखांचा आधार घेतला. यांना 'अशोकाच्या राजाज्ञा' असेही आपण म्हणू शकतो. अशोकाच्या या आलेखांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

**१. शिलालेख :** कालसी (उत्तर प्रदेश); धौली, चौगढ (ओरिसा); एरागुड्डी (आंध्र प्रदेश); सोपारे (महाराष्ट्र); गिरनार (गुजरात); शहाबाजगढी, मन्सेरा (पाकिस्तान).

**२. लघुशिलालेख :** अहरौरा (उत्तर प्रदेश); सहस्राम (बिहार); कलकत्ता-बैराट (प.बंगाल); एरागुड्डी (आंध्र प्रदेश); मस्की सिद्दापूर, ब्रह्मगिरी, जटिंगरामेश्वर (कर्नाटक); रुपनाथ (मध्य प्रदेश); बैराट (राजस्थान).

**३. स्तंभालेख :** दिल्ली-टोपडा, दिल्ली-मीरत (दिल्ली); अलाहाबाद-कोसम (उत्तर प्रदेश); लौरिया अरराज, लौरिया चंदागढ, रामपूर्वा (बिहार).

**४. लघुस्तंभालेख :** सारनाथ (उत्तर प्रदेश), सांची (मध्य प्रदेश), रुम्मिनिदेई, निगलीसागर (नेपाळ), शेरेकुन्हा (अफगाणीस्थान).

## ❑ शिलालेख :-

सर्वसाधारण: अशोकाच्या १४ राजाज्ञा या शिलालेखांमध्ये कोरलेल्या आढळतात. प्रातिनिधिक

स्वरुपात गिरनारचा याठिकाणी आपण थोडक्यात विचार करु. थोड्याफार फरकाने तीच माहिती इतर शिलालेखामध्ये आहे. काही नविन आज्ञा ही इतरत्र आढळतात.

**गिरनार (गुजरात) :** याठिकाणी अशोकाच्या १४ राजाज्ञा अथवा त्याचे धोरण कोरलेले आहे.

**आज्ञा–१ :** प्राण्यांचा वध करु नये, बळी देऊ नयेत. राजवाड्यातही मांसाहार टाळावा.

**आज्ञा–२ :** अशोकाने आपल्या राज्यात तसेच मित्रांच्या राज्यामध्ये मनुष्यचिकित्सा आणि पशुचिकित्सेच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या. तशी औषधी वनस्पतींची लागवड केली. जनावरे आणि माणसे दोघांसाठी रस्त्याची, पाण्याची, सावलीसाठी झाडांची सोय केली.

**आज्ञा–३ :** सर्व अधिकाऱ्यांनी धम्माची शिकवण देण्यासाठी आणि इतर कार्यासाठी दर पाच वर्षांनी दौरे काढावेत. सर्वांनी मातापित्यांची सेवा करावी.

**आज्ञा–४ :** राजाने युध्दं सोडून आता धम्माचा प्रचार सुरु केलेला आहे.

**आज्ञा–५:** राजाने धर्ममहामात्रांची नेमणूक केलेली आहे. धम्मप्रसारासाठी तसेच धम्मपालनावर लक्ष ठेवण्यासाठी ही नेमणूक आहे.

**आज्ञा–६ :** राजाने हेरांची नेमणूक केली. हे हेर, राजाला, कुठेही, कधीही, केव्हांही भेटू शकतात. राजाचे लोककल्याण हे प्रमुख कर्तव्य आहे. तो, लोकांची गाऱ्हाणी कुठेही ऐकेल.

**आज्ञा–७ :** राजाची इच्छा आहे की सर्वपंथीय लोक सगळीकडे रहावेत.

**आज्ञा–८ :** राजाने, विहारयात्रा (शिकार, मारझोड) सोडून आता धर्मयात्रेला सुरुवात केलेली आहे.

**आज्ञा–९, ११ :** समारंभ निष्फळ असतात. त्यामुळे धर्माचरण केले पाहिजे. धर्माचरण म्हणजे वडिलधाऱ्यांचा आदर, नोकरांना योग्य वागणूक, प्राणीमात्रांवर दया, अंहिसा, श्रमण आणि ब्राह्मण यांना दान.

**आज्ञा–१० :** राजा यशप्राप्ती आणि किर्तीला महत्व देत नाही. तर धम्माचरणाला प्राधान्य देतो.

**आज्ञा–१२ :** प्रत्येकाने दुसऱ्या संप्रदायाचा आदर केला पाहिजे. जो दुसऱ्या धर्माची निंदा करतो तो स्वधर्माचीच हानी करत असतो. सर्व संप्रदायांनी कल्याणकारी सिध्दांतांचा पाठपुरावा करावा.

**आज्ञा–१३ :** कलिंग युध्दामध्ये लाख लोक मारले गेले. राजाला पश्चाताप झाला. त्याल कळून चुकले ज्याच्या विजयामुळे प्रेमभावाना वाढते तोच खरा विजय होय.

**आज्ञा–१४ :** हे आलेख का कोरले त्याची कारणे.

०......०......०

**कालसी, शहाबाजगढी, मन्सेरा :** याठिकाणी अशोकाच्या १४ राजाज्ञा कोरलेल्या आहेत. तर धौली, चौगढ याठिकाणी ३ आज्ञा माहित मात्र नव्या दोन आज्ञा आहेत.

**लघुशिलालेख :** या शिलालेखांमध्ये पाच-सहा ओळी आहेत. गुर्जरा (उत्तर प्रदेश) येथील लेखांमध्ये 'देवानाम पिय पियदसिनो असोकराज' (देवानाम प्रिय प्रियदर्शिनी अशोकराजा) असा स्पष्ट उल्लेख आहे. तर मस्की (कर्नाटक) लेखांमध्ये 'असोक' आणि 'देवाांप्रिय' असा उल्लेख आहे.

**स्तंभालेख दिल्ली-टोपडा आणि दिल्ली-मीरत :** हे दोही स्तंभालेख मूळत: टोपडा आणि मीरत येथे होते. फिरुजशहा तुघलक या सुलतानाने हे दिल्लीला आणले. म्हणून त्याना जोडनावाने ओळखले जाते. लौरिया अरराज, लौरिया नंदनगढ: अलेक्झांडर कनिंगहॅमला लोरिया या गावाच्या जवळपास हे दोही स्तंभालेख सापडले. यातील लौरिया अरराज या स्तंभावर गरुडध्वज असून, नंदनगढच्या स्तंभावर सिंहध्वज आहे. याच स्तंभावर अशोकाच्या आलेखाच्या खाली, औरंगजेबाचेही लेख आहेत.

**रामपूर्वा :** येथील स्तंभावरही सिंहध्वज आहे. तसेच अशोकाचे सहा लेख यावर कोरलेले आहे. अलाहाबाद-कोसम: या स्तंभावर अशोकाचे सहा लेख आहेत. त्याखाली समुद्रगुप्ताची प्रशस्ती याठिकाणी कोरलेली आहे. यावर जहांगीरचेही लेख आहेत. मूळात हा स्तंभ कौशांबी याठिकाणावरुन, अकबराने अलाहाबादला आला. म्हणून हे जोडनाव.

**लघुस्तंभालेख : सारनाथ :** येथील स्तंभावर सिंहध्वज होता. हा सिंहध्वज आपल्या देशाची राजमुद्रा बालेला आहे. शेरेकुन्हा : शांतीचा संदेश देणारा हा स्तंभालेख आहे. हा अरेमाईक लिपीत लिहिलेला आहे.

## अशोकाच्या आलेखाची वैशिष्ट्ये :-

(१) या आलेखावरुनच अशोकाची माहिती मिळते. त्याचे 'देवानाम प्रियदर्शी राजा' हे बिरुद मिळते. (२) अशोक धम्माचा प्रचार करतो. हा धम्म पूर्णपणे बौध्द धर्म नाही. तर अशोकाची स्वत:ची अशी 'धम्म कल्पना' आहे. अशोकाच्या या धम्मामध्ये 'नैतिक तत्वां'चा समावेश होतो. (३) 'युध्दाऐवजी प्रेम, वडिलधाऱ्यांची सेवा, नोकरांप्रती चांगली वागणूक, त्यागी माणसांचा आदर, विरोधी विचारांबद्दल सहिष्णू धोरण, प्राणीमात्रांबद्दल दया' ही वैश्विक नितीमूल्ये अशोक जोपासताना दिसतो. (४) अशोकाने आपली संपूर्ण प्रशासनव्यवस्था, साम्राज्यामध्ये नैतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी गुंतवलेली होती हे लक्षात येते. (५) अशोकाचा धार्मिक सहिष्णुतेचा आग्रह कळतो. त्यावरुन त्याकाळी धर्माधर्मांमध्ये वाद होत असत याकडेही लक्ष जाते. (६) अशोकाचे ग्रीस, सिरिया, श्रीलंका या देशांशी असणारे मित्रत्वाचे संबंध कळून येतात. (७) यज्ञीय हिंसा, मांसाहार, खर्चिक समारंभ याचा अशोक विरोध करतो. तो स्वत: त्याचा अवलंब करतो. (८) अशोकाचे हे लेख अशा ठिकाणी कोरले याठिकाणी माणसांची वर्दळ असते, जसे, बाजार, चौक इ. म्हणजे आपले धोरण आणि विचार सर्वसामान्यांपर्यंत जावे असे त्याला वाटत होते. (९) त्याचप्रमाणे ते

अशा भाषेत (प्राकृत) आणि लिपीत (ब्राह्मी, वायव्य भागात खरोष्टी) लिहिलेले होते की जी सर्वसामान्यांना समजेल. (१०) ही राजाज्ञा देण्याची जी पध्दती आहे त्यावर पर्शियन शैलीचा मोठा प्रभाव आहे. तसेच, मूळातच 'शिलालेख उभारणे' या संकल्पनेवर पर्शियाचा प्रभाव आहे. कारण अशोका अगोदर आपल्याला भारतात ना शिलालेख मिळतात ना त्यांचा विकास आढळतो. तत्कालिन पर्शियामध्ये मात्र ही पध्दती होती. सांस्कृतिक संबंधांद्वारे ही परंपरा आपल्याकडे आली.

### (ब) दुसरा पुलकेशी याचा ऐहोळ - आलेख

दुसरा पुलकेशी हा चालुक्य घराण्यातील एक मोठा राजा होय. यांची राजधानी 'वातापी' (बदामी, जि. विाापूर, कर्नाटक). याच्या काळामध्येच युवानश्वांग हा चीनी प्रवासी याच्या राज्यात येऊन गेला. रविकिर्ती हा याच्या दरबारातील एक प्रतिष्ठित पदाधिकारी. तो साहित्य आणि कलेमध्ये पारंगत होता. या रविकिर्तीने ऐहोळ या ठिकाणी एक जैनमंदिर बांधले. तसेच या जैनमंदिराच्या एका भींतीवर आपल्या राजाची प्रशस्ती कोरली. यालाच 'ऐहोळ प्रशस्ती' असे म्हणतात (इ.स.६३४).

हा लेख १८ ओळी आणि ३७ पंक्तींचा असून, संस्कृतमध्ये आहे. यातील तपशील पुढीलप्रमाणे :

१ ते ३ पंक्तींमध्ये, रविकिर्ती, जिनेंद्र, चालुक्य घराणे आणि दुसरा पुलकेशी (सत्याश्रय असे म्हंटलेले आहे) यांचा जयजयकार करतो.

५ व्या पंक्तीमध्ये तो, जयसिंह वल्लभ राजाच्या पराक्रमाचे वर्णन करतो. ६ व्या मध्ये, रणराग राजाच्या, ७-८ पंक्तीमध्ये प्रथम पुलकेशीच्या, ९-१० पंक्तीमध्ये किर्तीवर्माच्या, ११-१३ पंक्तीमध्ये मंगलेश राजाच्या पराक्रमाचे वर्णन करतो.

१४ -१५ व्या पंक्तीमध्ये, मंगलेश आणि त्याचा पणतू पुलकेशी दुसरा यांच्या मतभेदाचे वर्णन करतो.

१६ व्या पंक्तीपासून दुसरा पुलकेशी याच्या कर्तृत्वाची प्रंशसा सुरु होते. त्याने पराभूत केलेल्या राज्यांची, राजघराण्यांची माहिती मिळते. जसे त्याने पुढील राज्ये काबीज केली, वनवासी नगर आणि किल्ला (१८ वी पंक्ती), पिष्ठपूर (२७), केरळ, पांड्य (३१) कोकण (२०), ओरिसा (२१,२६), दक्षिण गुजरात आणि दक्षिण मध्यप्रदेश-माळवा (२२, २४), त्याो समकालीन असणाऱ्या हर्षवर्धनाचाही पराभव केलेला होता (२३). तसेच पल्लव (२९) आणि चोलांसारख्या (३०) पराक्रमी राजघराण्यांनाही धूळ चारलेली होती. त्याचा साम्राज्यविस्तार ही दिलेला आहे (२५, ३५).

३२ व्या पंक्तीमध्ये दुसऱ्या पुलकेशीच्या वातापी राजधानीचे वर्णन येते. तर ३३ आणि ३४ व्या पंक्तीमध्ये लेखाचा काळ येतो. ३५ आणि ३६ व्या पंक्तीमध्ये रविकिर्तीचे हे जैनमंदिर बांधल्याचा उल्लेख येतो.

शेवटच्या ३७ व्या पंक्तीमध्ये रविकिर्ती आत्मस्तुती करतो आणि स्वत: 'कालिदास आणि भारावी' या महाकवींच्या पंक्तीत आहे असे सांगतो.

### ❀ महत्व :–

चालुक्य घराणे, त्या घराण्यातील दुसरा पुलकेशी या राजापर्यंतची वंशावळ याबाबत माहिती मिळते.

दुसरा पुलकेशीच्या समकालीन मध्य आणि दक्षिण भारतातील विविध राज्ये आणि तेथील राजघराणी यांची माहिती मिळते.

दुसरा पुलकेशीचे पराक्रम कळून येतात. यातून चालुक्यांचा राज्यविस्तार कळून येतो. 'तिन महाराष्ट्र' (२५), ''तिही समुद्राने वेढलेला'' (३५) या शब्दांवरुन, तो संपूर्ण दक्षिण भारताचा सम्राट होता हे कळते. तसेच, त्याने दक्षिण गुजरात, दक्षिण मध्यप्रदेश, ओरिसाही ताब्यात घेतलेला होता हे कळते.

काळ सांगताना रविकिर्ती, भारतीय युध्दानंतर ३७३५ वर्षे लोटल्यानंतर आणि कलियुगातील शक राज्यांची ५५६ वर्षे लोटल्यानंतर असे लिहितो. या दोन्ही बाबी प्रस्तुत लेखाचा काळ इ.स. ६३४ निश्चित करतात.

रविकिर्ती हा एक मोठा साहित्यिक होता. त्याने हा लेख सर्व वृत्त, मात्रांचा विचार करुन लिहिलेला आहे. संस्कृत भाषेचे सौंदर्य त्याच्या आलेखामधून कळून चुकते. त्याचे शब्दभंडार, त्याची मांडणी ही अतिशय सुंदर आहे. प्रचंड अलंकारांनी, दृष्टांतांनी, उपमांनी नटलेला हा लेख आहे. जसे, 'रणांगणरुपी मंदिरामध्ये कटचुरींच्या वैभवरुपी वधूस प्राप्त करुन घेतले' (ओळ १२), 'त्याच्या प्रतापापुढे जमलेले लाट, मालव, गुर्जर हे बळाने जिंकलेल्या मांडलिक राजाने कसे वागावे याचे शिक्षण देणारे जणू आचार्य झाले' (पंक्ती २२), 'कोकणामध्ये त्याच्या आज्ञेने प्रचंड सैन्यांच्या लाटांमुळे मौर्यरुपी छोटी डबकी उद्ध्वस्त झाली' (पंक्ती २०), 'त्याने जेव्हा चोलांवर विजय मिळवण्याचा उद्योग आरंभला तेव्हा चपळ मासे हेच जिचे चंचल क्षेत्र आहेत अशी कावेरी नदी त्याच्या मस्त हत्तीच्या 'तांड्यांचा बांध घातल्याने समुद्राचा स्पर्श टाळू शकली.' इ.

### ❀ प्राचीन भारतीय इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून पुराभिलेखाचे महत्व :–

(१) तत्कालिन राजा, त्याचे घराणे आणि वंशावळ आपल्याला माहिती होते; (२) राजाचे कर्तृत्व, त्याचे धोरण समजते, जसे, अशोकाच्या शिलालेखातून त्याचे धोरण समजते, अलाहाबाद स्तंभालेखातून समुद्रगुप्ताचा पराक्रम समजतो, नाशिक शिलालेखातून गौतमीपुत्र सातकर्णीचा पराक्रम समजतो, हाथीगुंफा लेखातून खारवेलाचे लोककल्याणाची कामे समजतात; (३) राजाचा राज्यविस्तार समजतो, जसे, अशोकाचे शिलालेख या या ठिकाणी सापडलेले आहेत यावरुन त्याचा राज्यविस्तार कळतो. तसेच, 'त्रिसमुद्रतोयपितवाहन'

या गौतमीपुत्र सातकर्णीच्या बिरुदावरुन, त्याचे दक्षिण भारतावर राज्य आहे हे कळते; (४) कालगणनेच्या नोंदीवरुन राजांचा कालक्रम निश्चित करता येतो; (५) राज्यकर्त्यांच्या वंशावळीवरुन आपल्याला एखाद्या राजघराण्यातील संगतवार राजे कळून येतात; त्यांचे पराक्रम कळून येतात; (६) अक्षराच्या वळणावर स्थळ, काळाचा नेहमी प्रभाव पडत असतो. त्यामुळे या अक्षरवाटिकेवरुन आपल्याला स्थळ, काळ समजायला मदत होते; (७) भूदान परंपरेची, व्यवस्थेची माहिती मिळते. यातून प्रशासकीय धोरण कळून येते; (८) तत्कालिन जमिन महसूल व्यवस्थेची, धार्मिक धोरणाची माहिती मिळते; (९) तत्कालीन अधिकारी व त्यांच्या पदांची नावे मिळतात; (१०) पिके, जमिनीचा प्रकार, पाणीपुरवठ्यांचे प्रकार इ. माहिती मिळते; (११) राजाचा धार्मिक कल समजतो.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-३

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा.**

१. विष्णूच्या उजव्या हातामध्ये घट असणाऱ्या मूर्तीला ............... मूर्ती असे म्हणतात.

*(अ) वराह (ब) नृसिंह (क) हयग्रीव (ड) धन्वंतरी.*

२. ................ यांच्या नाण्यांवर शिवाचे मूर्तस्वरुप ठळपणे दिसू लागते.

*(अ) ग्रीक (ब) शक (क) कुशाण (ड) गुप्त.*

३. आहत नाणी ही इ.स.पू. .............. शतकामध्ये प्रचलित झाली.

*(अ) तिसऱ्या (ब) चवथ्या (क) पाचव्या (ड) सहाव्या.*

४. ................ यांनी भारतामध्ये सोन्याची नाणी प्रथम प्रचलित केली.

*(अ) ग्रीक (ब) शक (क) कुशाण (ड) गुप्त.*

५. ऐहोळ शिलालेखामध्ये .............. या राजाची प्रशस्ती कोरलेली आहे.

*(अ) अशोक (ब) दुसरा पुलकेशी (क) हर्षवर्धन (ड) चंद्रगुप्त.*

**प्रश्न २ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विष्णूच्या हयग्रीव मूर्तीचे लक्षणे कोणती?

२. शिवाच्या दक्षिणामूर्तीची लक्षणे कोणती?

३. आहत नाणी म्हणजे काय?

४. कोणत्या राजाने, नाहपानाची नाणी खोडून, त्यावर स्वतःचे नाणे कोरले?

५. सम्राट अशोकाचा कलिंग युध्दानंतरचा पश्चाताप कोणत्या क्रमांकाच्या शिलालेखातून व्यक्त झालेला आहे?

## २.३ सारांश

मानवी संस्कृतीचा साकल्याने अभ्यास करण्याचे काम मानवशास्त्र करीत असते. यामधील विविध शाखांमधून, आपल्याला मानवी संस्कृतीच्या विविध अंगाचा अभ्यास करता येऊ शकतो. यासाठी, ज्या समाजांचा/संस्कृतींचा अभ्यास करायचा असतो; त्या-त्या समाजामध्ये जाऊन हा अभ्यास केला जातो. यासाठी एथ्नोग्राफर्स, त्यांचे निरिक्षण करतात आणि व्यवस्थित नोंदी करीत असतात. अशा नोंदींचा उपयोग विविध शास्त्रांना होत असतो. अर्थात, मानवशास्त्र असो अथवा एथ्नोग्राफर्स हे प्रामुख्याने वर्तमान संस्कृतींचा अभ्यास करीत असतात. तर, गतकाळातील संस्कृतींचा अभ्यास पुरातत्वशास्त्र करीत असते. पुरातत्वशास्त्रांच्या मदतीमुळे, आपणाला लिखित साधनपूर्व भारताचा इतिहास कळतोच. तसेच लिखित साधनांच्या काळाला समग्रपणे समजून घेण्यासाठीही पुरातत्वशास्त्राची मदत मिळत असते. अशाच प्रकारे प्राचीन काळातील मूर्तींचा अभ्यास, मूर्तीशास्त्राद्वारे आपण करतो. तसेच, नाण्यांचा विकास समजून घेण्यासाठी नाणकशास्त्रांची मदत इतिहासाला मिळत असते. आणि, पुराभिलेखशास्त्रामुळे प्राचीन आलेख समजून येतात. त्याद्वारे, संस्कृतीची विविध अंगे लक्षात येतात.

## २.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **अश्मास्थी** : बरीच वर्षे धूळ, माती, वारा, पाऊस याचा परिणाम होऊन सेंद्रिय पदार्थांचे एका दगडांमध्ये रुपांतर होते. त्याला अश्मास्थी असे म्हणतात.
- **चिन्हव्यवस्था** : मूल्यव्यवस्था/धारणा/वैचारिक बैठक/समजूत. शब्दशः अर्थ घेतल्यास, 'भाषा' ही सुध्दा चिन्हव्यवस्था होऊ शकेल. ती चिन्ह ज्या संस्कृतीतील आहेत, अशा प्रत्येक चिन्हांना त्या संस्कृतीमध्ये काही एक अर्थ असतो.
- **पुनरुज्जीवन काळ** : १५ व्या शतकामध्ये, मध्ययुगाचा अंत झाल्यावर, लगेचच नवे काही निर्माण करणे अशक्य झाले होते. याचे कारण कित्येक शतके मध्ययुगीन संस्था-विचारांचा पगडा होता. त्याऐवजी, पुन्हा एकवार अभिजात ग्रीक-रोमन संस्था व विचारांना नवी झळाळी देण्यात आली.
- **भावकी** : एकाच मूळ पुरुषापासून, पसरलेल्या पिढीचा वंश.
- **मर्कट कुटुंब** : जीवशास्त्रज्ञांनी, विविध प्राण्यांचा अभ्यास करुन त्यांचे विविध कुटुंबात वर्गीकरण केलेले आहे. जसे, मर्कट कुटुंब मध्ये, माणूस, माकड, वानर, गोरिला, चिंपाझी,

ओरांगउटांन इ. येतात. तर 'मार्जार कुटुंब'मध्ये, मांजर, रानमांजर, वाघ, बिबट्या, चित्ता इ. प्राणी येतात.

- **सिथियन** : शक लोक.
- **स्तरशास्त्र** : एकावर, एक थर साठून एक ढिगारा तयार होतो. अशावेळी, सर्वात वरील थर हा तुलनेने सगळ्यात अलिकडचा असतो तर सर्वात खालील थर हा सगळ्यात पूर्वीचा असतो. मुख्यत्वे, नदीच्या काठांचा अभ्यास करताना, भूरुपशास्त्रज्ञांनी या संकल्पनेचा शोध लावला. याचा उपयोग पुरातत्वशास्त्रालाही झाला.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**१)** १. *(अ) डार्विन.*

२. *(ब) गिझ.*

३. *(ब) स्टिवर्ड.*

४. *(अ) एल्विन.*

५. *(अ) लेव्हि-स्ट्रॉस.*

**२)** १. *मानवाच्या भूतकाळाचा आणि वर्तमान काळाचा अभ्यास करुन, त्याचे विश्लेषण करणारे आणि वर्णन करणारे शास्त्र म्हणजे 'मानवशास्त्र' होय.*

२. *सर जॉन लुबॉक.*

३. *एखाद्या विशिष्ठ मानवसमूहाचे, त्यांच्यामध्ये राहून, शास्त्रीय पध्दतीने निरिक्षण करणे आणि त्यांचे वर्णन करणे म्हणजे एथ्नोग्राफी होय.*

४. *मॅलिनोवस्की.*

५. *गुंथर सोंथायमर.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**१)** १. *(ब) श्लिमान.*

२. *(अ) विल्सन.*

३. *(अ) कनिंगहॅम.*

४. *(क) कर्झन.*

५. *(क) ईनामगाव.*

२) १. *गतकाळातील मानवाच्या भौतिक अवशेषांचा अभ्यास करुन, त्याचा इतिहास अभ्यासणारे शास्त्र.*

२. *बुशार्द ला इजिप्तमधील अलेक्झांड्रिया येथे.*

३. *डॅनिश संशोधक थॉमसन यांनी, 'त्रियुग संकल्पना' मांडली. यानुसार, मानवी संस्कृतीचा विकास, क्रमशः अश्म, कास्यआणि लोह युगांमध्ये झाला असे त्याने दाखवून दिले.*

४. *सर फ्लिंडर्स पेट्री.*

५. *सर विल्यम जोन्स.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१) १. *(ड) धन्वंतरी.*

२. *(क) कुशाण.*

३. *(ड) सहाव्या.*

४. *(क) कुशाण.*

५. *(ब) दुसरा पुलकेशी.*

२) १. *घोड्याचे मुख आणि मानवाचा देह अशी मूर्ती.*

२. *व्याख्यानमुद्रेतील शिव, त्याच्या पायाजवळ दोन हरणे, सोबत चार शिष्य.*

३. *चांदीच्या पत्र्यावर, चिन्हांकित ठसे मारुन पाडलेली नाणी.*

४. *गौतमीपुत्र सातकर्णी.*

५. *१३ वा शिलालेख.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न १ : टिपा द्या.**

अ) शारिरिक मानवशास्त्र.

ब) भाषाशास्त्रीय मानवशास्त्र.

क) पुरातत्वशास्त्राचा विकास.

ड) विष्णू मूर्ती

इ) गुप्त नाणी.

ई) ऐहोळ शिलालेख.

**प्रश्न २ : दीर्घोत्तरी प्रश्न.**

अ) मानवशास्त्र म्हणजे काय ते सांगून सांस्कृतिक मानवशास्त्राचा विकास स्पष्ट करा.

ब) एथ्नोग्राफी म्हणजे काय ते सांगून तिच्या विकासाची माहिती द्या.

ब) पुरातत्वशास्त्र म्हणजे काय ते सांगून पुरातत्वीय संशोधनाचे प्रमुख टप्पे विशद करा.

क) मूर्तीशास्त्र म्हणजे काय ते सांगून शिवमूर्तीची ठळक लक्षणे स्पष्ट करा.

ड) भारतीय नाण्यांचा विकास स्पष्ट करा.

इ) पुराभिलेखशास्त्र म्हणजे काय ते सांगून अशोकाच्या शिलालेखांची माहिती द्या.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- **देगलूरकर, गो. बं.** : *''विष्णूमूर्ती नमस्तुभ्यं''.*
- **देगलूरकर, गो. बं.** : *''शिवमूर्ती''.*
- **देव, शां. भा.** : *''पुरातत्वविद्या''.*
- **ढवळीकर, म. के.** : *''पुरातत्वविद्या''*, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.
- **ढवळीकर, म.के.** : *''भारतीय नाणकशास्त्र''*, कॉंटीनेंटल प्रकाशन, पुणे.
- **फेल्डहाऊस, ॲन** : *''नदी आणि स्त्रीत्व''*, (अनु.) (मूळ : Water and Womanhood), पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
- **गोखले, शोभना** : *''पुरातत्वविद्या''*, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.
- **Guha, Rmachandra** : *"Savaging the Civilized : Verrier Elwin".*
- **जोशी, नि.पु.** : *''भारतीय मूर्तीशास्त्र.''*

- **Sontheimer, Gunthar** : *"Pastoral Deities in Western India."*
- **Shrinivas, M. N.** : *"The Remembered Village"*, Oxford University Press, Oxford, 1978.
- www.encylopedia of Ideas.
- www.wikipedia.org.


❑ ❑ ❑

घटक-३

# इतिहासातील नवीन दृष्टीकोन
# (New Approaches in History)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ सूक्ष्म इतिहास (Micro History)

३.२.२ समकालीन इतिहास (Contemporary History)

३.२.३ स्थानिक इतिहास (Local History)

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणांस -

१. सूक्ष्म इतिहासाचा दृष्टीकोन स्पष्ट करता येईल.

२. सूक्ष्म इतिहास लेखनाचा उदय, विकास, फायदे व तोटे सांगता येतील.

३. समकालीन इतिहासाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

४. समकालीन इतिहासाचा उदय, विकास, फायदे व तोटे स्पष्ट करता येतील.

५. स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

६. स्थानिक इतिहासाचा उदय, विकास, फायदे व तोटे स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, वर्गसंघर्ष, लढाया, थोरामोठ्यांची चरित्रे आणि स्वातंत्र्य आंदोलने इथपर्यंत मर्यादीत राहिलेला नाही. अर्थात इतिहास लेखनाचा हा पारंपारिक दृष्टीकोन आता मागे पडला आहे. इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने माणूस हा इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधीत सर्वच अंगोपांगाचा ऊहापोह आता इतिहास होणे अपेक्षित धरले आहे. इतिहासविषयक नव्या प्रवाहानी अथवा नव–नवीन दृष्टीकोनांच्यामुळे इतिहास आता समृध्द बनत आहे. इतिहासात विविध दृष्टीकोनाच्याबरोबर आंतरविद्याशाखीय मांडणी होऊ लागली आहे. याचे बरेचसे श्रेय 'ॲनाल्स परंपरेला' जाते. इतिहासात केवळ समग्रलक्षी इतिहास महत्त्वाचा नसून, सूक्ष्म इतिहासही तितकाच महत्त्वाचा बनला आहे. स्थानिक इतिहास हेही ॲनाल्स परंपरेचे फलित मानले जाते. सद्यस्थितीत जगभरात स्थानिक इतिहास लेखनाला चालना मिळालेली दिसते. स्थानिक इतिहास लेखनाबरोबरच समकालीन इतिहासाचा एक नवीन दृष्टीकोन अर्थात 'अलिकडचा इतिहास' हाही तितकाच महत्त्वाचा आहे. समकालीन इतिहासाच्या माध्यमातून ज्या घटना काही काळ इतिहासाच्या कक्षेत नाहीत असे मानले जात होते, त्या घटनेच्या संदर्भात समकालीन इतिहासलेखन महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास अभ्यासासाठी असलेली सूक्ष्म इतिहास, समकालीन इतिहास व स्थानिक इतिहास हे इतिहासाचे नवीन दृष्टीकोन तुम्हास इतिहासाकडे पाहण्याची नवीन दृष्टी देतील. तुमच्या इतिहासविषयक पारंपारिक संकल्पना बदलण्यास मदत करतील.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ सूक्ष्म इतिहास (Micro History)

इतिहास म्हणजे भूतकाळात काय घडले, कसे घडले हे शोधून काढणे. घटना मानवी कर्तृत्वाने घडतात की, ज्यांचे प्रतिबिंब कागदपत्रांमध्ये उमटत असते. म्हणून पुराभिलेखागारातील अस्सल कागदपत्रांचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करून मानवी इतिहासांची मांडणी करण्याची संकल्पना विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इतिहासकारांच्यामध्ये स्पष्ट होती. त्यांनी ह्या कागदपत्रांच्यामध्ये प्रतिबिंबीत झालेला राजे्–रजवाड्यांच्या युध्दांचा, घटनांचा व अभिजनवादी घटकांचा इतिहास लिहिण्याचा कार्यक्रम जोमाने राबविला. पुराभिलेखागारात जतन करून ठेवलेली कागदपत्रे व त्या कागदपत्रात प्रतिबिंबीत झालेला इतिहास नेमका कोणाचा इतिहास सांगतात हा प्रश्न या काळातील इतिहासकारांना पडला नाही. मात्र इ.स. १९७० च्या दशकातील जगभरातील इतिहासकारांना हा प्रश्न भेडसावू लागला, यातून पुढे सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाहाचा उदय झाला.

## अ) सूक्ष्म इतिहासाचा अर्थ :-

इतिहासलेखनातील हा नवीन प्रवाह इ.स. १९७० च्या दशकात उदयास आला. 'मायक्रोहिस्ट्री' (Microhitory) या इंग्रजीमधील शब्दाला मराठीमध्ये 'सूक्ष्म इतिहास' अथवा 'सूक्ष्म इतिहास' हा शब्दप्रयोग केला जातो. या इतिहास लेखन प्रवाहाची अनेकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र जोओवानी लेवी (Giovanni Levi) या इटालियन इतिहासकाराने सूक्ष्म इतिहासाचा अर्थ लावताना इतिहास लेखनामधील निरीक्षणाचे प्रमाण कमी करून इतिहास लेखनात सूक्ष्म विश्लेषण व कागदपत्राचा सखोल अभ्यास करण्यावर भर दिलेला आहे.

## ब) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाचा उदय :-

ब्रिटिश इतिहासकार इ.पी. थॉम्पसन यांनी शोषित वर्गाचा अथवा शुद्र लोकांचा (Little People); इतिहासाला त्यांचा विसर पडण्यापूर्वी, त्यांचा इतिहास लिहिण्यासाठी, तळातून इतिहास (History from below) लिहिण्याची संकल्पना मांडली. थॉम्पसन यांच्या अपारंपारिक मार्क्सवादी विचारप्रवाहाने पुढे दोन वेगवेगळ्या इतिहास संकल्पनांना तत्त्वाधार पुरवला. पहिली संकल्पना म्हणजे 'सबाल्टर्न स्टडीज' अर्थात 'वंचितांचा इतिहास'. या विचाराच्या इतिहासकारांच्या गटाने, भारताच्या संदर्भात, १९८० च्या दशकात रणजित गुहा आणि त्यांच्या साथीदारांनी, वंचितांच्या परिप्रेक्षातून इतिहासलेखन सुरू केले. सबाल्टर्न गटातील इतिहासकारांनी आपल्या लेखनातून 'इतिहासात कुठल्याही प्रकारचा आवाज नसलेल्या वंचित जनसमूहांना आवाज देण्याच्या' हेतूने इतिहास लेखन प्रकल्प हाती घेतला. थॉम्पसन यांच्या या विचारांचा प्रभाव इटलीमधील काही इतिहासकारांच्यावर देखील पडला. ह्याच इतिहासकारांनी पुढे 'मायक्रोहिस्ट्री' अर्थात सूक्ष्म इतिहासलेखनाचा परीप्रेक्ष्य व तात्त्विक भूमिका विकसित केली. इटलीमधील या गटामधील इतिहासकारांच्या मध्ये 'क्वॉडेर्नी स्टोरीसी' (Quaderni Storici) या पत्रिकेशी संबंधित कार्लो गिन्झबर्ग, इडोआर्डो ग्रेन्डी, जिओवानी लेवी व कार्लो पोनी इत्यादीचा समावेश होता. या समूहाने सूक्ष्म इतिहासाची सैध्दांतिक मांडणी करण्यास सुरूवात केली. क्वॉडेर्नी स्टोरीसी या इटालियन गटाची सूक्ष्म इतिहास लेखन पध्दतीची सैध्दांतिक पध्दती, विचार, मांडणी व दृष्टीकोन प्रसिध्दीस आला.

सूक्ष्म इतिहास ही एक ऐतिहासिक लेखन पध्दती आहे की, जी व्यक्ती आणि लहान गटांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास करते. ज्यामध्ये विविध कल्पना, प्रथा, परंपरा, विश्वास व विविध कृतीचा अभ्यास असतो की, ज्या पारंपारिक इतिहास लेखनापासून दूर राहिलेल्या आहेत. इ.स. १९६० ते १९७० च्या दशकात हा गट सांस्कृतिक मानववंशशास्त्रातील विकासामुळे ऐतिहासिक भिन्नतेकडे व जागतिक अनुभवाकडे आकर्षित झाला, त्यामध्ये त्यांची रूची वाढली. विशेषत: क्लिफोर्ड गीर्टझचे कार्य सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहाच्या विकासात महत्त्वाचे ठरले. गीर्टझने या काळात केलेली संस्कृतीची संकल्पना व केलेली सैध्दांतिक मांडणी लोकप्रिय झाली की, जी व्यक्तीच्या बाह्य व व्यक्तीगत जगाचा संबंध समजावून घेण्याची व

अभ्यासाची परवानगी देतो. इटालियन गटाच्या इतिहासकारांनी केलेली ही सैध्दांतिक मांडणी पुढे फ्रान्स व उत्तर अमेरिकेतील संशोधकांनी उचलून धरली, त्याचे अनुकरण करण्यास सुरूवात केली, मात्र त्यांचे प्रयत्न इटालियन इतिहासकारांच्या एवढे नव्हते. इ.स. १९८० च्या दशकाच्या सुरूवातीस मोठ्या सामाजिक गटाच्या विरोधात हा प्रवाह उदयास आला की, ज्याचा उद्देश छोट्या-छोट्या घटना व प्रसंगाचा अभ्यास करणे हा होता.

## क) सूक्ष्म इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये :-

सूक्ष्म इतिहास लेखनाची काही ठळक वैशिष्ट्ये जोवोवानी लेवी या इटालियन इतिहासकाराच्या इ.स. १९९१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'ऑन मायक्रोहिस्ट्री' या लेखामध्ये पहावयास मिळतात. सूक्ष्म इतिहास लेखन प्रवाहाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

### १. क्षुल्लक व चित्र-विचित्र प्रसंगाचा अभ्यास :-

पारंपारिक इतिहासलेखन हे मानवी इतिहासात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा अभ्यास करते. मात्र सूक्ष्म प्रवाह अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगाचा अभ्यास करतो. क्षुल्लक प्रसंगाचा गांभीर्याने अभ्यास करणे ही याची विशेषता आहे. यामागे एक निश्चित भूमिका आहे. क्षुल्लक व चित्र-विचित्र प्रसंग अथवा घटना अभ्यासून त्यांना इतिहास लेखनात स्थान प्राप्त करून देणे ही भूमिका नसून, क्षुल्लक प्रसंगांचे विश्लेषण करून एखाद्या मोठ्या ऐतिहासिक प्रश्नामध्ये प्रवेश करणे ही आहे.

### २. अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा अभ्यास :-

पारंपारिक इतिहास लेखनात महत्त्वाच्या घटना व प्रसंगाचा अभ्यास केला जातो. अर्थशून्य भासणाऱ्या घटनांना जाणीवपूर्वक बगल दिली जाते. मात्र सूक्ष्म इतिहासकार अगदी क्षुल्लक, चित्र-विचित्र व अर्थशून्य वाटणाऱ्या एखाद्या प्रसंगावर अथवा घटनेचे अतिसूक्ष्म विश्लेषण करून समाजातील परंपरांचे आकलन करून घेतात. एका अर्थाने विषम बाजूचा अभ्यास करून समबाजू मांडण्याचा ते प्रयत्न करतात. अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा अभ्यास करून अर्थ निर्माण करता येतो, विपरीतता अभ्यासून एकरूपता मांडता येते अशी भूमिका मांडतात. एका अर्थाने ते अर्थशून्य भासणाऱ्या घटनांचा, विरोधाभासातून अभ्यास करतात.

### ३. अभ्यासाचे क्षेत्र व आकार सूक्ष्म करण्यावर भर :-

पारंपारिक इतिहासलेखन एखाद्या व्यापक प्रदेशाचा अथवा कालखंडाचा अभ्यास करण्यास प्राधान्य देते. मात्र सूक्ष्म इतिहास लेखन एखाद्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या मानवी समूह, कुटुंबाचा अथवा

व्यक्तीच्या संदर्भातील एखादा सूक्ष्म विषय निवडून अभ्यास करते. ज्याप्रमाणे सूक्ष्मदर्शक यंत्राचा वापर करून एखादा शास्त्रज्ञ जिवाणूंच्या एखाद्या वेगळ्या जगाची ओळख करून देतो तीच भूमिका येथे सूक्ष्म अभ्यासकाची असते. सूक्ष्म इतिहासातील 'सूक्ष्मीकरण' केवळ अभ्यासाचे क्षेत्र अथवा आकार कमी करण्यापर्यंत मर्यादित नाही तर ते अभ्यासल्या जाणाऱ्या कालखंडाला देखील सूक्ष्म करते. सूक्ष्म एखाद्या कुटुंबाचा अथवा व्यक्तीचा काळाच्या एका विशिष्ट अल्पावधीचा अभ्यास करते. त्याच्या अभ्यासाचा विषय अल्पावधीक, प्रसंगनिष्ठ असतो.

## ४. सामान्य इतिहासावर प्रकाश :-

सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाहातील इतिहासकार असे मानतात की, एखाद्या व्यक्तीला, काळाच्या एका विशिष्ठ क्षणाला आलेला अनुभव समजून घेणे हे इतिहास संशोधकापुढील आव्हान आहे. मात्र एखाद्या छोट्या समूहाचा, कुटुंबाचा किंवा व्यक्तीचा सूक्ष्म अभ्यास हे विषय खास आहेत म्हणून करत नसून त्यांचा प्रमुख हेतू हा सामान्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणे हा असतो. खास अथवा विशेष विषयाचा सूक्ष्म अभ्यास हा ऐतिहासिक विश्लेषणाच्या व्यापक प्रश्नांची चर्चा करण्याचा मार्ग मोकळा करेल अशी या गटातील इतिहासकारांची धारणा आहे.

## ५. कथा व वृत्तांताना इतिहासलेखनात स्थान :-

सूक्ष्म इतिहास लेखन प्रणालीमध्ये कथांना खूप महत्त्व दिले जाते. सूक्ष्म इतिहास लिहिण्याचे प्रमुख ऐतिहासिक साधन म्हणजे सर्वसाधारण अथवा दुय्यम/कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तीने स्वत:बद्दल अथवा एखाद्या घटनेबद्दल दिलेला वृत्तांत किंवा सांगितलेली कथा. एखाद्या सर्वसाधारण व्यक्तीने सांगितलेली कथा इतिहासात ठराविक परिस्थितीमध्ये नोंदवली जाते. यामध्ये कोर्टामधील त्याची साक्ष अथवा एखाद्या घटनेचा तपास करताना घेतलेली त्याची जबानी याचा समावेश होतो. त्यामुळे सूक्ष्म इतिहास लेखनात अशा साधनांना महत्त्वाचे स्थान आहे. युरोपीय इतिहासकारांनी १३ व्या ते १७ व्या शतकात ख्रिस्ती धर्मातील पाखंडमत शोधून काढण्यासाठी निर्माण केलेल्या इन्क्विझिशन न्यायालयाने निर्माण केलेल्या दस्तऐवजांचा उपयोग सूक्ष्म इतिहास लिहिण्यासाठी मोठ्या खुबीने केलेला आढळतो.

यामध्ये सूक्ष्म इतिहासलेखन करणारे इतिहासकार सर्वसाधारण व्यक्तीने साक्ष देताना सांगितलेल्या कथा बारकाईने अभ्यासतात. त्यांचे लक्ष ह्या कथा कशा तयार केल्या गेल्या याकडे असते. सांगितलेल्या कथांचा अर्थ अधिकारी मंडळीनी कसा काढला हे समजण्याचा ते प्रयत्न करतात. कारण सूक्ष्म इतिहासकार सर्वसाधारण लोक स्वत:बद्दल काय कथा सांगतात. या बाबतीत संवेदनशील असतात. एका अर्थाने ते कथा कशा सांगितल्या जातात याची कथा सांगतात.

## ६. साध्या घटनेतील क्लिष्टता स्पष्ट करतात :-

सूक्ष्म इतिहासलेखनात संशोधक एखादी वरपांगी अथवा साधी वाटणारी घटना निवडतात व नंतर त्यामधील गुंतागुंतता अथवा क्लिष्टता स्पष्ट करतात. यासंबंधी जोओवानी लेवी म्हणतात की, इतिहासकाराने नेहमी एखाद्या व्यक्तीने सांगितलेल्या कथेतील विरुध्द कथनाकडे (counter-narrative) लक्ष दिले पाहिजे. एखादा व्यक्ती स्वत:ची कथा सांगताना त्यामधील वरपांगी महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टीच्या बुडाशी जाऊन दडलेले अर्थ शोधणे या संदर्भात महत्त्वाचे ठरते. व्यक्ती आपल्या कथेत काय सांगतो यापेक्षा तो काय सांगत नाही हेही तितकेच महत्त्वाचे ठरते. कथेमधील 'मौन' हा कथेचा महत्त्वाचा घटक ठरतो.

या संशोधनावर अथवा काही सूक्ष्म इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारावर क्लिफोर्ड गर्टज या मानववंशशास्त्राच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. गर्टज याने आपल्या 'Thick Description : Toward an Interpretive theory of Culture" या लेखात इंडोनेशिया मधील बाली बेटावरील आदिवाशी लोकांच्या अभ्यासात वापरलेली 'दाट वर्णनाची' पध्दत. सूक्ष्म इतिहासकारांनी स्विकारलेली आहे. गर्टज यांनी ती पध्दती वापरून ह्या आदिवासी लोकांच्या कोंबड्यांची झुंज ह्या खेळाचे बारीक निरीक्षण करून दाट वर्णन केले. कोंबड्याच्या झुंजीच्या खेळात वापरल्या जाणाऱ्या विधीतील चिन्हसंहितेची उकल केली. पुढे गर्टज यांचा प्रिन्स्टन विद्यापीठातील विद्यार्थी रोबर्ट डार्नटन यांने आपल्या 'द ग्रेट कॅट मॅसॅकर' या सूक्ष्म इतिहासात याचा प्रभावी वापर केला. इ.स. १७३० च्या दशकात पॅरिसमधील एका छापखान्यातील कामगारांनी आपल्या मालकांच्या मांजरांची कत्तल का केली हा प्रश्न हाताळला. डार्नटन यांने पुराव्यांचा खल करून कामगारांनी मांजराची कत्तल करताना केलेल्या विधीचे दाट वर्णन केले व त्याच्या मानसिकतेचा शोध घेतला, अर्थात एखाद्या वरपांगी व साध्या घटनेमागील क्लिष्टता स्पष्ट करण्याचा हा प्रयत्न होता.

## ७. चीज ॲण्ड वर्म्स : कार्लो गिंझबर्ग (एका सामान्य घटनेचे आकलन)

सूक्ष्म इतिहासलेखन पध्दतीचा पहिल्यांदा उपयोग केला तो इटालियन इतिहासकार कार्लो गिंझबर्ग याने १९७६ मध्ये गिझबर्ग यांनी 'चीज ॲण्ड वर्म्स' या शीर्षकाखाली १६ व्या शतकात इटलीमधील एक विचित्र प्रसंग अभ्यासला व ते प्रसिध्द केले. यामध्ये त्यांनी मेनोकियो नावाच्या एका पिठाच्या गिरणी मालकावर ख्रिस्ती धर्माच्या विरुध्द पाखंडीपणा करण्याचा आरोप केला होता. त्याचे पाखंडमत शोधून काढण्यासाठी नेमलेल्या इन्क्विझिशन न्यायालयासमोर त्याला उभे करून त्याची दोनदा साक्ष घेण्यात आली. त्याचबरोबर त्याच्या इतर सहकाऱ्याच्याही साक्ष घेण्यात आल्या. मेनोकियोने आपल्या साक्षीमध्ये जग हे परमेश्वराने तयार केले नसून ते दुधापासून बनलेले चीझ कुजल्यामुळे निर्माण झाले आहे, अशी साक्ष दिली. त्यामुळे न्यायालयाने त्याला पाखंडी मत बाळगण्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा दिली. गिझबर्ग याने ह्या घटनेचा तपशीलवार व सूक्ष्म पध्दतीने अभ्यास करून तत्कालीन सामान्य समाजाच्या तळाशी असलेल्या व सामाजिक चालीरिती व भूमिका उघड केल्या.

गिझबर्ग यांनी या ग्रंथातून अंतोनियो ग्रामचीच्या 'सांस्कृतिक धुरीणत्वाच्या' संकल्पनेचा ऊहापोह केलेला आहे. त्यांच्यामते, अभिजनवादी वर्गाच्या ह्या सांस्कृतिक धुरणीत्वाला तळातील लोक आव्हान देखील देतात. अभिजन वर्गाचे शोषित-अंकित लोकांच्या वर्गावर सांस्कृतिक धुरीणत्व प्रबळपणे प्रस्थापित असले तरी अनेक वेळेला ह्या धुरीणत्वाला ततळातून विरोध होत असतो. गिझबर्गच्या मतानुसार, अभिजन वर्गाच्या सांस्कृतिक धुरीणत्वाला आव्हान किंवा प्रतिकार एखादी सामान्य व्यक्ती देखील करू शकते. त्याचा हा विरोध आपल्या वेगळ्या चालीरीती, कृत्य अथवा विचारांच्या माध्यमातून असतो. आणि अशा प्रकारच्या सामान्य घटकामधून सूक्ष्म इतिहासकार आपल्या लिखाणातून अशा प्रकारचे प्रसंग शोधून त्यांच्या आधारे सामान्य लोकांचा इतिहास लिहू शकतो.

गिझबर्ग यांनी या अभ्यासातून 'दडपशाहीची दफ्तरे' (Archives of repression) ही संकल्पना मांडलेली आहे. त्यांच्या मते, जुन्या कागदपत्राची दफ्तरे ही दडपशाहीचे प्रतिनिधीत्व करतात. कारण मुळीच ही कागदपत्रे सामाजिक नियंत्रण करणाऱ्या संस्थानी निर्माण केलेली असतात. हे जरी खरे असले तरी ह्या दफ्तरांच्यामध्ये ज्यांना दडपण्यात आले अशा लोकांचे विचार, शब्द व कृत्य नियंत्रण करणाऱ्या संस्थाची इच्छा नसतानाही जतन केली जातात. हा एक विरोधाभासच आहे की, दडपशाहीच्या दफ्तरामध्ये आपल्याला अशा प्रकारच्या वंचित, शोषित, दुय्यम लोकाचा ज्यांना दडपले गेले त्यांचा आवाज सापडतो.

गिंझबर्ग हे संरचनावादाचा तिरस्कार करताना दिसतात, त्यांच्या मते, संरचनावादी दृष्टीकोन असं मानतो की, मानवाला माहित नसलेल्या व त्याच्या नियंत्रणबाह्य असलेल्या शक्ती अथवा घटक मानवी इतिहासाची दिशा ठरवतात. मार्क्सवाद संरचनावादाचा उत्तम नमुना आहे. मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार एखाद्या व्यक्तीच्या अथवा वर्गाचा उत्पादनाच्या साधनांशी असलेला त्याचा संबंध इतिहास घडवतो. त्यामुळे इतिहास घडविण्यात लोकांना कोणत्याही प्रकारचे कारकत्व असत नाही. त्यामुळे गिझबर्ग अशा संरचनावादी विचारांना मानत नाहीत. उलट इतिहास घडविण्यात मानवाला कारकत्व असते व ते ओळखून त्याची पुर्नबांधणी करणे ही इतिहासकारांची जबाबदारी आहे, असे गिझबर्ग म्हणतात.

## ❑ सूक्ष्म इतिहासलेखनाच्या मर्यादा :-

सूक्ष्म इतिहास लेखन काही निश्चित मर्यादा आहेत त्या खालीलप्रमाणे :-

१) सूक्ष्म इतिहास लेखनाचा मुख्य हेतू क्षुल्लक घटनांचा अभ्यास करून मोठ्या ऐतिहासिक प्रश्नामध्ये प्रवेश करणे हा जरी असला तरी अनेक इतिहासकारांना मोठे ऐतिहासिक प्रश्न हाताळणे सोयीस्कर वाटत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे बहुतेक वेळेला त्यांचे विषय व्यक्ती किंवा प्रसंग केंद्रित असतात. अशा व्यक्ती ज्यांनी बंडखोरी किंवा कुठलातरी गुन्हा केलेला असतो. ज्यांचे हे कृत्य दडपण्यासाठी सत्ताधीशांनी त्यांची साक्ष नोंदवून ठेवलेली असते.

वास्तविक पाहता हे काही सर्वसाधारण लोक ज्यांना इतिहासात कोणत्याही प्रकारचा आवाज नाही अशी नसतात. त्यांच्याकडे प्रस्थापित अभिजन वर्गाच्या सांस्कृतिक धुरीणत्वाविरुध्द आवाज उठविण्याचे धाडस असते. त्यांनी हे धाडस केले, म्हणूनच त्यांची साक्ष अभिजन वर्गाने निर्माण केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये नोंदवली गेलेली असते. अशावेळी इतिहासकाराला खऱ्याखुऱ्या सामान्य वंचित-शोषित लोकाबद्दल तर्क-वितर्क मांडता येतील काय?

२) सूक्ष्म इतिहास लेखनात इतिहासकार अल्पकालीन घटनांचा अथवा प्रसंगाचा अभ्यास करतो अशावेळी काळाच्या ओघात झालेले बदल अभ्यासणे व ते का? व कसे? घडून आले या प्रक्रियेचे विश्लेषण करू शकत नाही. अभ्यासाचा कालखंड अल्प असल्यामुळे समाजात दीर्घकालीन झालेले बदल दर्शवू शकत नाही.

३) सूक्ष्म इतिहास लेखनात वापरलेली एखादी साक्ष अथवा जबानी ही त्यांच्या स्वत:च्याच शब्दात आहे की नाही हे ठरवणे अवघड आहे. कारण न्यायालयातील कारकून, साक्षीदाराने दिलेल्या साक्षीला शुध्द करून प्रस्तापितांच्या शब्दात लिहून ठेवत असे. ह्या प्रक्रियेमुळे साक्षीदाराने वापरलेली लोकसंस्कृतीमधील शब्द गाळले जात किंवा त्याच्याऐवजी वेगळे अभिजनवादी शब्द वापरले जात. याचाच अर्थ असा की, कोणत्याही न्यायालयीन हा अथवा पोलिस तपासणीत दिलेली साक्ष ही साक्षीदाराने वास्तवात वापरलेल्या शब्दांचे पूर्णपणे प्रतिरूप नसते.

४) एखाद्या घटनेतील साक्षीदार हा त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत असतो. त्यामुळे एका अर्थाने साक्ष देणारा व्यक्ती हा त्याने अनुभवलेल्या प्रसंगाचे पूर्ण वर्णन नसून त्याला ह्या प्रसंगाबद्दल विचारलेल्या काही प्रश्नांची उत्तरे असतात. त्यामुळे त्याने दिलेली साक्ष ही घडलेल्या प्रसंगाचे पूर्णपणे प्रतीरूपण करते का हा प्रश्न निर्माण होतो.

## ❑ सूक्ष्म इतिहासलेखनाचे फायदे :-

सूक्ष्म इतिहास लेखनामध्ये काही अडचणी अथवा त्रुटी असल्या तरी त्यांचे अनेक फायदे अथवा जमेच्या बाजूदेखील आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

१) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाह वाचकासमोर मानवी चेहरा असलेला इतिहास आणतो.

२) इतिहासातील खऱ्या-खुऱ्या सामान्य लोकांच्या जीवनातील प्रसंगाबद्दल वाचकाला माहिती मिळते.

३) सूक्ष्म इतिहासामध्ये पुराव्याची शहानिशा (सूक्ष्म विश्लेषण) केलेली असते, त्यामुळे वंचित घटकांचा इतिहास समजण्यास मदत होते.

४) वंचित, शोषित व सर्वसाधारण लोकांचा व अगदी क्षुल्लक घटना अथवा प्रसंगाचा अभ्यास हे याचे प्रमुख आकर्षण आहे.

५) त्यांना कोणत्याही प्रकारे आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता, मात्र एखाद्या खटल्याच्या, तपासणीच्या किंवा तंट्याच्या परिस्थितीमुळे सत्ताधारी अथवा अभिजनवादी वर्ग त्यांच्या साक्ष अथवा जबानीची नोंद ठेवली.

**स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-१**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जोओवानी लेवी हा इतिहासकार कोणत्या देशातील आहे?

२) सबाल्र्टन हिस्ट्रीसाठी मराठीत कोणता प्रतिशब्द वापरला जातो?

३) सूक्ष्म इतिहासात कोणत्या घटनांचा अभ्यास केला जातो?

४) सूक्ष्म इतिहासलेखन परंपरेवर कोणत्या मानववंशशास्त्रज्ञाचाच प्रभाव जाणवतो?

५) 'चीज ॲण्ड वर्म्स' हा ग्रंथ कोणी लिहिला?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) भारतामध्ये सबाल्र्टन दृष्टीकोनातून ................. यांनी लिखाण केले.

२) इटलीमधील सूक्ष्म इतिहास लेखन करणारा गट .............. पत्रिकेशी संबंधीत होता.

३) ख्रिस्ती धर्मातील पाखंडमत शोधून काढण्यासाठी निर्माण केलेल्या न्यायालयाना .............. म्हणतात.

४) 'दडपशाहीची दफ्तरे' ही संकल्पना ................ यांनी मांडली.

५) सूक्ष्म इतिहासलेखन प्रवाह ............... देशात उदयास आला.

## ३.२.२ समकालीन इतिहास लेखन (Contemporary History)

'समकालीन' ही संकल्पना अथवा संज्ञा इंग्रजीमधील 'Contemporary' या शब्दाला मराठीत पर्यायवाची शब्द आहे. 'समकालीन' हा शब्द साहित्य क्षेत्रात मोठ्या खुबीने वापरला जातो. साहित्यिक, नाटककार, कवि, समीक्षक व टीकाकार या शब्दाचा वारंवार वापर करतात. आपण या ठिकाणी 'समकालीन'चा संबंध इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून पाहणार आहोत. 'अलीकडील भूतकाळाचा'

(Recent Past) यासाठी 'समकालीन इतिहास' ही संकल्पना अथवा संज्ञा वापरली जाते. एका अर्थाने ही संज्ञा विसाव्या शतकाच्या इतिहासाबद्दल असलेल्या ग्रंथांचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते. एखाद्या इतिहास संशोधकाने स्वत:च्या जीवनाशी संबंधी अथवा समकालीन काळाशी संबंधीत इतिहास लेखन केलेले असेल तर अशा इतिहासाला समकालीन इतिहास म्हणून संबोधतो. 'समकालीन' या संज्ञेची जाणीव (साहित्य/इतिहास) मूळात भारतीय नाही. सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात युरोपीय देशात २०व्या शतकात या संज्ञेचा उदय झाला.

'Contemporary' हा शब्द लॅटिनमधील 'Contem Porarious' पासून तयार झालेला आहे. 'Con' म्हणजे एकत्र व 'Tempus', 'TemPur' म्हणजे काळ. यामधील 'TemPus' हा लॅटिन 'TemPur' हा इंग्रजी शब्द मात्र दोन्हीचा अर्थ वेळ, काळ या अर्थाने आहे. म्हणून 'Contemporary' म्हणजे एका काळात राहणारे अथवा 'ज्या काळात आहात त्या काळाशी सुसंगत असणे' म्हणजे आपण ज्या काळात राहतो, वावरतो, त्या काळातील घडलेल्या घटनांचा इतिहास. काही इतिहासकार व संशोधक, समकालीन इतिहासाला ऐतिहासिक अभ्यास करण्यासाठीचा विषय निवडण्याची पध्दती मानतात, वर्तमानकाळातील समस्या अथवा प्रश्नावर आधारलेल्या विषयांच्या अभ्यासाला समकालीन इतिहास म्हटले जाते.

## ❑ समकालीन इतिहासाची व्याख्या :-

समकालीन इतिहासाची निश्चित अशी व्याख्या आज तरी उपलब्ध नाही. इतिहासकार व संशोधक यांच्यामध्ये समकालीन इतिहासाच्या संकल्पनेवरूनच मतमतांतरे आहेत. काही इतिहास संशोधक आधुनिक इतिहासाचा एक उपघटक म्हणून या ज्ञानशाखेकडे आपण संकल्पनेकडे पाहतात, तरीही काही इतिहास संशोधकांनी 'समकालीन इतिहासाला परिभाषीत करण्याच्या प्रयत्न केलेला दिसतो. जर्मन इतिहासकार हरमन हीमपेल ह्यांनी इ.स. १९५७ मध्ये समकालीन इतिहासाची व्याख्या ''सर्वात शेवटच्या किंवा सर्वात अलीकडील उलथापालथीच्या घटनेपासून सुरू होणारा काळ'' अशी केली होती. (Any present time begins with the last catastrophe, the most recent one) समकालीन इतिहासाची हरमन हीमपेल यांची व्याख्या आपण मानली तर समकालीन इतिहासाचा कालखंड हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाच्या कालखंडाप्रमाणे न बदलणारा नसून तो सातत्याने बदलणारा बनतो.

गिओफ्री बाराक्लोव यांनी इ.स. १९६४ मध्ये 'ॲन इंट्रॉडक्शन टू कंटेम्परी हिस्ट्री' हा ग्रंथ प्रसिध्द केला. यामध्ये 'समकालीन इतिहास' यासंबंधी बाराक्लोव यांनी अशी भूमिका मांडलेली आहे की, 'समकालीन इतिहास' हा आधुनिक इतिहासापेक्षा 'गुणवत्ता व आशयामध्ये' (Quality and Content) वेगळा असतो. या दृष्टीकोनातून समकालीन इतिहासाची व्याख्या करताना बाराक्लोव म्हणतात की, ''आजच्या जगात आस्तित्वात असलेले प्रश्न जेव्हा सदृश्य आकार घ्यायला लागतात, तेव्हापासून समकालीन

इतिहास सुरू होतो.'' (Contemporary History begins when the problems which are actual in the world today first take visible shape.)

## ❑ समकालीन इतिहासलेखनाचा विकास :-

समकालीन इतिहासलेखनाचा मुख्य उद्देश अलीकडील भूतकाळातील काही पैलू अथवा वर्तमान काळातील काही घटना, विकासाच्या संकल्पना, संदर्भ आणि त्याची ऐतिहासिकता समजून घेणे असा असला तरी 'हिस्ट्री' हा शब्द ज्या 'हिस्टॉरिया' या ग्रीक भाषेतील शब्दावरून आला आहे. त्याचा मूळचा अर्थ 'समकालीन घडामोडीचे ज्ञान' असा होतो. थ्युसीडीडीजने (इ.स.पू. ४००-४५५) पेलोपॉनेशियन आणि अथेनियन लोकांच्यामधील युध्दाचे कथन व लेखन केलेले आहे. थ्युसीडीडीज स्वत: या युध्दात सहभागी होता. युध्द सुरू होताच त्याने आपल्या लिखाणाला सुरुवात केली होती. या ग्रंथात थ्युसीडीडीजने एक खंत व्यक्त केलेली आहे की, त्याला दूरवरच्या भूतकाळाबद्दल किंवा स्वत:च्या काळाच्या पूर्वीच्या कालखंडाबाबत अचूक ज्ञान मिळणे अशक्य होते. म्हणजे दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास लिहिण्यावर साधनांच्या मर्यादा असल्यामुळे इतिहासाच्या ज्ञानशाखेवर अनेक प्रश्न व संशय निर्माण होतात.

थ्युसीडीडीज यासारख्या इतिहासकारांनी लिहिलेला 'अलीकडच्या भूतकाळाचा इतिहास' हा दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास बनला, हळूहळू जास्त दूरवरच्या भूतकाळाच्या अभ्यासाला मान्यता प्राप्त होत गेली.

### अ) १९ व्या शतकातील दृष्टीकोन :-

१९ व्या शतकापर्यंत लिहिले गेलेले सर्व इतिहास 'अलीकडील भूतकाळाचा इतिहास' अर्थात 'समकालीन इतिहास' सांगणारे होते. याचे प्रमुख कारण म्हणजे या काळात दूरवरच्या भूतकाळाचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करण्यासाठी लागणारे संशोधन तंत्र व साधने तपासण्याची पध्दती विकसित झालेली नव्हती. छापखाने अस्तित्वात येण्याच्या अगोदर कागदपत्रे सहजासहजी मिळवणे शक्य नव्हते. दूरवरच्या भूतकाळाबद्दल लिखित कागद अथवा पुरावे हे जवळजवळ अस्तित्वातच नव्हते आणि जे उपलब्ध होते ते त्रोटक व विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध होते. त्यामुळे १९व्या शतकाच्या पूर्वीच्या व पूर्वाधातील इतिहासकारांना आपले लिखाण स्वत:च्या निरीक्षणावर व समकालीन व्यक्तीच्या मुलाखतीच्या आधारे लिहावे लागत होते.

१९ व्या शतकात इतिहास लेखनाचे व्यावसायीकरण (Professionalisation) होण्यास सुरूवात झाली. तेव्हा जास्त दूरवरच्या (प्राचीन/मध्ययुगीन) भूतकाळाच्या अभ्यासाला व संशोधनाला ऐतिहासिक मान्यता मिळू लागली. व्यावसायिक इतिहासलेखन वृत्तीचे पूर्णपणे संस्थापीत झाले. रान्के, बारथोल्ड, नेबूर, जोहान ड्रोयक्षेत्र यासारख्या जर्मन इतिहासकारांनी नविन व्यावसायिक इतिहासाला प्रोत्साहन दिल्याने खऱ्या अर्थाने समकालीन इतिहासाला इतिहासाच्या कक्षेतून बाहेर फेकले गेले. १९व्या शतकात इतिहास संशोधक

'अलिकडच्या भूतकाळाचा' इतिहास लिहिण्याच्या प्रयत्नामुळे तिरस्काराने पाहू लागले. १९ व्या शतकाच्या अखेरीस युरोपमधील व्यावसायिक इतिहासकारांनी 'दूरवरच्या भूतकाचा अभ्यास व संशोधन करणे' हे आपले प्रमुख कार्य आहे असा विचारप्रवाह प्रसूत केला. एवढेच नव्हे तर अलीकडच्या भूतकाळाचा अभ्यास म्हणजे पत्रकार व इतर अभ्यासकाचे काम आहे असे मत मांडले.'

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन इतिहासकारांमध्ये असा विचार प्रबळ झाला की, एखादी घटना घडून गेल्यानंतर, एखादी पिढी संपल्यानंतरच त्या घटनेचा वस्तुनिष्ठपणे इतिहास लिहिला जाऊ शकतो. वस्तुनिष्ठ इतिहास म्हणजे, वर्तमान काळातील वाद अथवा प्रश्नांचा कोणताही संदर्भ न घेता, 'जे काही घडले ते लिहिणे' (to write history "as it actually happened") इतिहासकाराचे काम भूतकाळाचे मापन करणे नाही अथवा वर्तमान काळातील लोकांना भविष्यकाळाच्या फायद्यासाठी कोणतीही शिकवण द्यायची नाही तर फक्त 'जे घडले ते सांगणे' हे आहे असा युक्तीवाद या काळात रान्केने केला. रान्केच्या या विचारांचा प्रभाव २० व्या शतकाच्या शेवटपर्यंत जगाच्या कानाकोपऱ्यातील इतिहास अभ्यासक, संशोधकांच्यावर होता. भारतामध्ये रान्के प्रभावाचे प्रत्ययंतर आजही वारंवार दिसून येते.

## ब) २० व्या शतकातील बदल :-

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक तत्त्वज्ञ विचारवंतांनी इतिहास संशोधनाच्या पध्दती व वैज्ञानिक संशोधनाच्या पध्दतींची तुलना सुरू केली. इतिहासलेखन पूर्णपणे वस्तुनिष्ठ होऊ शकते का? हा ह्या विचारवंतांच्यामधील वादाचा अथवा तुलनेचा विषय होता. इतिहासलेखनाच्या पूर्ण वस्तुनिष्ठतेवर प्रश्नचिन्ह उभे केले गेले. पहिले व दुसरे महायुद्ध यासारख्या मोठ्या घटना युरोपच्या धर्तीवर घडल्या, या घटनाचे विश्लेषण करण्यासाठी, त्याची कारणमिमांसा, चिकित्सा करण्यासाठी 'अलीकडच्या भूतकाळाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले. विशेषत: दुसऱ्या महायुध्दामुळे जागतिक इतिहासाचे एक नवीन पर्व सुरू झाले असा समज अनेक संशोधक, अभ्यासकांचा झाला होता.

इ.स. १९९० च्या दशकात नेदरलँडमध्ये समकालीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एका संस्थेची स्थापना झाली. त्यानंतर इ.स. १९३९ मध्ये ही संस्था लंडन मध्ये आणली गेली. या संस्थेतील संस्थापक अथवा अभ्यासकांना जर्मनीमध्ये नेमके काय घडत होते किंवा का घडले हे जगाला दाखवून द्यायचे होते, जाणून घ्यायचे होते. या काळात अलिकडच्या भूतकाळाचा अभ्यास करण्याची सर्वात जास्त गरज पश्चिम जर्मनीतील अभ्यासकांना वाटू लागली. पारंपारिक समाजापासून अलिप्त असलेल्या अभ्यासपूर्ण 'वस्तुनिष्ठ' इतिहासाने जर्मनीतील लोकांना 'जीवन जगण्यासाठी योग्य दिशा दाखवण्यात अपयश आले होते' आणि म्हणूनच जर्मनीमधील लोकांनी हिटलरच्या हुकूमशाहीला पाठिंबा दिला होता अशी भावना जर्मन इतिहासकारांमध्ये उदयास आली होती. ह्या भावनेच्या प्रभावाखाली जर्मनीतील इतिहासकारांनी 'समकालीन इतिहास' लिहिण्याच्या प्रकाराला मान्यता दिली.

१९८० च्या दशकात एक विशिष्ठ ज्ञानशाखा म्हणून समकालीन इतिहासाचा विकास झालेला होता. याकाळात सामाजिक परिवर्तनाचा वेग आणि स्थित्यंतरांचा अभ्यास करणे इतिहासकारांना गरजेचे वाटत होते. अलिकडील भूतकाळ राजकीय आणि सार्वजनिक जीवनामध्ये वाद निर्माण करत होता. विशेषत: दुसऱ्या महायुध्दानंतर कल्याणकारी राज्य स्थापन करण्याच्या संबंधात राजकीय पक्षाची भूमिका व अभिजनवादी वर्गाची भूमिका यासारखे वादाचे मुद्दे होते. यासाठी ऐतिहासिक व आंतरशाखीय पध्दतीशास्त्राचा वापर करून या विवादाचा अलीकडील भूतकाळाचा विश्लेषणात्मक पातळीवर अभ्यास करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. यातून इ. स. १८८६ मध्ये समकालीन ब्रिटीश इतिहास संस्थेची स्थापना (Centere for Contemporary British History) त्यानंतर हे केंद्र समकालीन इतिहासकारांचे आकर्षण ठरले. युरोपीय इतिहासकारांनी २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात समकालीन इतिहास लिहिण्यास सुरुवात केली.

## क) विश्वसनीय साधनांची संकल्पना व समकालीन इतिहास :–

इतिहास लेखन पध्दतीमध्ये शासकीय कागदपत्रे व पुराभिलेखागारातील लिखित साधनांना लिओपोल्ड रान्के व इतर आधुनिक विज्ञानवादी विचारवंतांनी खूप महत्त्व दिले होते. 'विश्वसनीय साधनांची' (Reliable Sources) त्यांची एक संकल्पना होती, ज्यामध्ये त्यांच्या वैज्ञानिक इतिहासलेखनाच्या दृष्टीकोनातून 'पुराभिलेखा गटातील लिखित साधनांना' अनन्यसाधारण महत्त्व होते. लिखित साधनाशिवाय इतिहास लिहिता येत नाही (No documents, No History) ह्या रान्केवादावर इतिहासकारांचा विश्वास होता. स्वत: रान्के जुना बाजारात जाऊन कागदपत्र विकत घेत असे. महाराष्ट्रामध्ये वि. का. राजवाडे व डी. बी. पारसनीस यासारखे इतिहासकार की जे रान्केंच्या संकल्पनेवर विश्वास ठेवणारे होते ते; पायपीट करून अनेक खटाटोप करून अस्सल लिखित कागदपत्रे मिळवित असत. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात पुणे शहरामध्ये मराठा इतिहासाच्या कागदपत्रावरून इतिहासकारांच्या दोन गटात राजकारण झाले होते.

१९ व्या शतकातील रान्के आणि इतर इतिहासकारांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनातून इतिहास लेखन.करण्याच्या पध्दतीचा प्रभाव आजदेखील आपल्यावर जाणवतो. ह्या प्रभावामुळेच अलीकडच्या अर्थात समकालीन.इतिहास लिहिणे हे इतिहासकाराचे काम नाही अशा प्रकारचा समज आपल्यामध्ये दृढ झाला आहे. वर्तमानकाळाच्या जास्त जवळ असलेल्या भूतकाळाचा इतिहास लिहिला तर इतिहासकारांचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्य चुकतो आणि त्यांना वस्तुनिष्ठ व नि:पक्षपाती लिखाण करता येत नाही असे आजदेखील संशोधकाला वाटते.

युरोपमधील इतिहास अभ्यासक व संशोधकांचा इतिहास लेखनातील शासकीय कागदपत्रांच्या अर्थात पुराभिलेखागारातील कागदपत्रांच्या महत्त्वावरील विश्वासाला २० व्या शतकाच्या मध्यास तडा गेला. उदा. दुसऱ्या महायुध्दकाळातील एका ज्यू धर्माच्या मुलीने लिहिलेल्या 'डायरी ऑफ ॲन फ्रांक'मधील रोजनिशीतील मजकुरावरून येते. ॲन फ्रांकने एका ठिकाणी डच शिक्षक गेरीत बोल्केन्स्टीन यांनी रेडिओवर केलेल्या विनंतीचा उल्लेख केला आहे. बोल्केनस्टीन यांनी लोकांना त्यांनी लिहिलेल्या डायऱ्या, पत्र,

आठवणी व रोजनिशी गोळा करण्यासाठी विनंती केली होती. बोल्केनस्टीन यांच्यामते, इतिहास हा नुसत्या शासकीय निर्णय अथवा कागदपत्रांच्या आधारे लिहिला जाऊ शकत नाही, जर नाझी लोकांनी ज्यू लोकांवर काय-काय आणि कसे अत्याचार केले हे जर भविष्यकाळात लोकांना समजायचे असेल तर साधारण कागदपत्रे गोळा करून इतिहास लिहिणे गरजेचे होते. कारण दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी ठेवण्याची आवश्यकता समाजाला वाटत नाही, तर या गोष्टी पुराभिलेखागारामध्ये सापडत नाहीत. जनसामान्याच्या दैनंदिन व्यवहाराबाबतीत पुराभिलेखागार मौन बाळगतो, त्यामुळे घडून आलेला बदल, सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतर त्याला दिलेला प्रतिसाद किंवा केलेला प्रतिकार जाणून घेण्यासाठी इतर साधनांच्याकडे पहावे लागते.

## ड) अंतरिमकाळाची संकल्पना व समकालीन इतिहास :-

वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करण्यासाठी, घडणाऱ्या घटना आणि इतिहासलेखनाचा काळ यांच्यामध्ये विशिष्ठ अंतर असणे गरजेचे असते अशी कल्पना आपल्यामध्ये रूढ झालेली आहे. ह्याच अंतराच्या कल्पनेमुळे इतिहास आणि वर्तमान काळामध्ये एक 'अंतरिम काळ' म्हणजे साधारण ३० वर्षाचा असला पाहिजे असा समज आहे. अनेक देशांच्यामध्ये सरकारी कागदपत्रे ३० वर्षांनी खुली करण्याची पध्दती आहे, त्यामुळे हा काळ गृहित धरला जातो, त्यामुळेच सरकारी कागदपत्रे, गोपनीय अभिलेख, अहवाल इत्यादी दस्तावेज अभ्यासल्याशिवाय एका परिपूर्ण इतिहासाची मांडणी करता येणार नाही असा अनेक इतिहासकारांचा समज आहे. सरकारी कागद प्राप्त झाल्यानंतरच एखाद्या काळाचा अथवा घटनेचा इतिहास लिहिला जाऊ शकतो आणि म्हणूनच समकालीन इतिहास कधीच परिपूर्ण होऊ शकत नाही असे अनेक इतिहासकारांना वाटते. मात्र आपल्याला हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, जुन्या पिढीतील इतिहास लेखकांनी 'अभिलेखागारातील सरकारी कागदपत्राच्या उपलब्धतेच्या आधारे लिहिलेला इतिहास' आणि वर्तमानकाळाच्यामधील ३० वर्षाच्या अंतराळाच्या नियमाला आज फार अर्थ उरलेला नाही.

## इ) पारंपारिक साधनांच्या पलीकडे एक नवीन दृष्टीकोन :-

इ.स. १९८०-९० च्या दशकापासून इतिहास लेखनाचे नवीन दृष्टीकोन अथवा प्रवाह आणि पध्दती निर्माण झालेल्या दिसतात. यालाच 'नूतन इतिहास' (New History) असे संबोधले जाते. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक इतिहास, नागरी इतिहास, स्त्रीवादी इतिहास, लिंगभेद, पुरुषत्वाचा इतिहास, वंचित इतिहास, स्थानिक इतिहास, लिंगभेद आणि पुरुषत्वाचा इतिहास, सूक्ष्म इतिहास, समकालीन इतिहास इत्यादीचा समावेश होतो. नूतन इतिहासाचे लिखाण करताना शासकीय कागदपत्रे कितपत उपयोगी पडतील अथवा वापरात येतील हा एक प्रश्नच आहे. कारण वर उल्लेख केलेल्या पारंपारिक इतिहास लेखनाच्या कल्पना, संकल्पना व समज हे अत्यंत संकुचित स्वरूपाचे आहेत हे आता बहुतेक इतिहासकारांना जाणवू लागलेले

आहे. इतिहास लेखन पध्दतीमध्ये आधीच्या काळात सरकारी कागदपत्रांना जेवढे महत्त्व दिले जात होते, तेवढे या नवीन दृष्टीकोनवादी इतिहास लेखनात होत नाही.

'No documents, No History' हा आग्रह सद्यस्थितीत विशेषत: भारतासारख्या देशात एका मर्यादेपलीकडे ताणता येणार नाही. इतिहासाच्या कक्षा जसजशा रुंदावल्या, तसतशा अपारंपारिक साधनाकडे अधिक औदार्याने पाहण्याचा दृष्टीकोनही आढळून येत आहे. कारण कोणत्याही काळाचे इतिहास कथन करण्यासाठी पुराभिलेखागारातील सरकारी लिखित साधनांची उपलब्धता अनिवार्य असते असे आता आपल्याला म्हणता येणार नाही. अशासकीय अथवा गैरसरकारी कागदपत्रे, दस्तावेज, आठवणी, अहवाल, वृत्तपत्रे, रोजनिशी, मालमत्तेची कागदपत्रे इत्यादीसारखी सामान्य अथवा तळागाळातील लोकांना इतिहास लिहिण्यासाठी किती महत्त्वाची आहेत हे वंचित इतिहास लेखन प्रवाह अभ्यासकानंतर लक्षात येते. सरकारी कागदपत्रे इतिहास लेखनासाठी महत्त्वाची नाहीत असे नाही, मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, ही कागदपत्रे सरकारी दृष्टीकोनाचे प्रतिनिधीत्व करतात.

## ई) समकालीन इतिहास लेखनाची गरज :-

समकालीन इतिहास लेखनाचे जागतिक स्तरावरील महत्त्व पाहता भारताच्या अथवा महाराष्ट्राच्या समकालीन इतिहास लेखनासाठी पुढे येण्याची गरज आहे. २१ वे शतक सुरू होऊन त्याची दोन दशके आता संपलेली आहेत. २१ व्या शतकात, २० व्या शतकातील १९५० ते पुढे या समकालीन इतिहासलेखनास काहीच हरकत नाही. स्वातंत्र्योत्तर भारतात एकाच कळात नागरी क्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, धवलक्रांती, लोकशाही सशक्तीकरण, राजकीय स्थरीकरण आणि अभिसरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. मात्र ह्या मूलभूत स्थित्यंतरांचा राष्ट्र, प्रदेश, जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक दृष्टीकोनातून इतिहास व विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून लिखाण करणे हे महत्त्वाचे आहे. स्वतंत्र भारतातील जातिव्यवस्थेवर साहित्यिक अथवा राजकीय उद्देशाने लिहिलेले शेकडो ग्रंथ पहावयास मिळतात, मात्र एकाही इतिहासकाराने स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील जातीव्यवस्थेचे विश्लेषण करणारा अथवा उत्क्रांती अभ्यासणारा इतिहास लिहिलेला नाही. कोणत्याही इतिहासकाराने समकालीन भारतातील निवडणूका अथवा बदलत्या निवडणूक प्रक्रियेचा अथवा लोकशाही स्थित्यंतरांचा इतिहास लिहिलेला आढळत नाही, त्यासाठी समकालीन इतिहासलेखन गरजेचे आहे.

## ❑ समकालीन इतिहास लेखनातील समस्या :-

समकालीन इतिहासातील विषय अथवा प्रश्न निवडून संशोधन करणाऱ्या इतिहासकारांना इतर कालखंडातील विषयाचे संशोधन करणाऱ्यांपेक्षा वेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

## १. संदर्भसाधने जमा करणे :-

समकालीन इतिहास लेखन करणाऱ्यासाठी पहिली अडचण अथवा समस्या संदर्भसाधने जमा करण्याची आहे. समकालीन इतिहास लिहिताना एका ठिकाणी एखाद्या पुराभिलेखागारात एकत्रित जमवलेली अथवा विषयनिहाय वर्गीकरण केलेली लिखित साधने सहसा मिळत नाहीत. सरकारी कागदपत्रे संशोधकास देण्यास नोकरशहा टाळाटाळ करतात, त्यामुळे विविध ठिकाणी जाऊन मूळ अप्रकाशित साधनांचा शोध घ्यावा लागतो. समकालीन विषयाच्या संदर्भात कागदपत्राची कमतरता नाही, मात्र ती एका छताखाली अथवा पुस्तक, ग्रंथस्वरूपात उपलब्ध होत नाहीत. विशालकाय माहिती जमा करणे हे खरे आव्हान आहे.

## २. संदर्भसाधनांची विपुलता :-

एका बाजूस समकालीन इतिहासाची साधने जमा करणे हे इतिहास संशोधकाला जसे आव्हान आहे तसेच आव्हान समकालीन घटनांच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या संदर्भसाधनांच्या विपुलतेचे एकीकडे आव्हान आहे. समकालीन इतिहासकाराचा प्रश्न हा साधनांच्या कमतरतेचा नसून साधनांच्या विपूल उपलब्धतेचा आहे. इतर कालखंडाचे इतिहासकार आपल्या संशोधनाच्या विषयाची सर्व उपलब्ध साधने वाचण्याचा प्रयत्न करतो, मात्र समकालीन इतिहासकाराला हे करणे शक्य नाही, विशेषत: आजच्या माहिती जालाच्या विस्फोटाने हे अशक्यप्राय झालेले आहे. त्यामुळे त्याला सर्व साधने वाचून संपवणे अशक्य आहे.

## ३. अपारंपारिक साधनाचा वापर :-

समकालीन इतिहास संशोधकाला पारंपारिक साधनांच्याबरोबर अपारंपारिक संदर्भ साधनाचा मोठ्या प्रमाणावर आपल्या लेखनासाठी वापर करावा लागतो. विशेषत: मौखिक इतिहास, कारण समकालीन इतिहास लेखकाला फक्त लिखित पुराव्यावर भिस्त ठेवून चालत नाही, त्यासाठी मौखिक हा पर्याय राहतो. ज्या घटनांच्या, व्यक्तीच्या, समूहाचा इतिहास लिखित स्वरूपात मागे राहिलेला नाही किंवा जे घटक समूह शांतच राहिले. त्यांच्या इतिहासाची पुर्नप्राप्ती करण्याचे मौखिक साधन हे उत्तम आहे. मात्र मौखिक इतिहासाच्या मर्यादा व धोके लक्षात घेऊन त्याचा सावध उपयोग करणे गरजेचे ठरते. मौखिक इतिहासाचा वापर समकालीन इतिहासकाराने खुबीने आणि आंतरविद्याशाखीय दुवा वापरून करणे गरजेचे आहे.

## ४. माहिती तंत्रज्ञानाचा वापर :-

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. जशी विज्ञानक्षेत्रात याने क्रांती केलेली आहे. तशीच पारंपारिक क्षेत्रातही, माहिती तंत्रज्ञान युगाचा उदय समकालीन इतिहास लेखकांना एक प्रकारे वरदान आणि आव्हानदेखील आहे. इ. स. १९९० च्या दशकापासून कागदपत्रे पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने संग्रहित

करण्यास सुरूवात झाली. त्यापूर्वी तयार केलेले दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतरित करण्यास सुरूवात झाली. ती सहजपणे उपलब्ध होऊ शकतात, त्याची सहज चौकशी केली जाऊ शकते, अथवा संकेतस्थळावर सहजतेने उपलब्ध होतात. त्यामुळे समकालीन इतिहास लेखकाला माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रचंड प्रमाणात उपलब्ध साधने हाताळणे समस्या प्रधान आहे.

## ५. मुलाखतीच्या माध्यमातून साधने तयार करणे :-

समकालीन इतिहास लेखकांने साधने अभ्यासण्याबरोबरच मुलाखती घेऊन साधने तयारदेखील केली पाहिजेत. नूतन इतिहासाचे विषय उदाहरणार्थ, सबाल्टर्न (वंचित) अथवा स्त्रीवादी इतिहासलेखनासाठी ऐतिहासिक साधने मिळवणे अथवा प्राप्त होणे अवघड, आणि म्हणूनच इतिहासकार कोणतीही ‘आवाज नसलेल्या’ (Voiceless) तळागाळातील लोकांच्या किंवा सामान्य स्त्रियांचा इतिहास लिहू शकत नाही. अशा परिस्थितीत समकालीन इतिहासकारांनी ह्या लोकांच्या मौखिक इतिहासाच्या शास्त्रानुसार मुलाखती घेऊन त्या टंकलिखित करून त्यांचे एक साधन म्हणून वापर करणे व साधन तयार करणे क्रमप्राप्त होते, असे केल्यास भविष्यकाळातील इतिहासकारांना एक मौलिक ऐतिहासिक साधन मिळण्याची शक्यता निर्माण होते.

## ६. टीकात्मक भूमिकेतला वाचक :-

समकालीन इतिहासलेखनामधील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे त्यांनी लिहिलेल्या इतिहासाचा वाचक हा टीकात्मक भूमिकेतून वाचन करणारा असतो. इतिहासाचा विषय समकालीन असल्यामुळे वाचकाला त्याबद्दल काही ना काही माहिती असते. प्राचीन अथवा मध्ययुगीन कालखंडाबाबत असे घडत नाही कारण वाचक बहुधा त्याबाबत अनभिज्ञ असतो, त्यामुळे या कालखंडातील केलेले लेखन तो मान्य करतो. समकालीन इतिहासाच्या वाचकाला विषयाबद्दल काही राजकीय अथवा तात्त्विक पूर्वग्रह असण्याची दाट शक्यता असते. समकालीन इतिहास वाचक स्वत:ची एक भूमिका घेऊन वाचत असतो. अशा परिस्थितीत वाचकाने इतिहासकाराच्या विश्लेषणाला अथवा मांडणीला नाकारण्याची किंवा आव्हान देण्याची शक्यता जास्त असते.

## ७. पूर्वग्रह :-

समकालीन इतिहासलेखकाला स्वत:च्या पूर्वग्रहाला सामोरे जावे लागण्याची शक्यता जास्त असते. अलीकडील भूतकाळाच्या इतिहासकाराची आपल्या विषयाबद्दल प्रबळ व पूर्वकल्पित मते असण्याची दाट शक्यता असते. कागदपत्रे व पुरावे तापसण्याआधीच त्याला आपले अभ्यासाचे निष्कर्ष माहीत असतात, असे

असल्यामुळे ऐतिहासिक साधनांमध्ये तो आपल्या निष्कर्षाला दुजोरा देणारेच पुरावे शोधण्याची शक्यता जास्त असते. जे पुरावे त्याच्या निष्कर्षाविरोधात जातात त्यांच्याकडे तो जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो. इतर कालखंडातील इतिहास लेखनाच्या तुलनेत समकालीन इतिहास लेखनात याची शक्यता जास्त असते. त्यामुळे समकालीन इतिहास लेखकाने कोणत्याही व्यक्तीचे, घटनेचे अथवा व्यक्ती समूहाचे वकीलपत्र घेऊन चालणार नाही. आपली भूमिका नि:पक्षपातीपणाची घ्यावी लागेल.

## ८. वस्तूनिष्ठता (सत्य लिहिण्याची क्षमता) :-

समकालीन इतिहासलेखनामध्ये हयात असलेल्या व्यक्तीबद्दल किंवा कार्याबद्दल वस्तूनिष्ठपणे मांडणी करणे आणि सर्वकाही खरेखुरे सांगणे हे मोठे आव्हान आहे. एकतर संबंधीत व्यक्ती जीवंत असतात. त्या, यातील काही गोष्टींना आक्षेप घेवू शकतात अथवा एखाद्या व्यक्तीचा जनमानसात मोठा प्रभाव असतो, त्यामुळे त्या व्यक्तीचे वस्तूनिष्ठपणे चित्रण केले तर जनसमूहाच्या रोषाला सामोरे जावे लागते. या संदर्भात य. दि. फडके म्हणतात की, ''इतिहासकाराच्या दृष्टीने सर्व माणसे कालवश झालेली असतात! समकालीन इतिहास लिहिणाऱ्याने हयात असलेल्या व्यक्तींना तसेच दिवंगत व्यक्तींना सारखीच वागणूक देण्याची तयारी ठेवली पाहिजे. हयात असलेल्या तसेच दिवंगत झालेल्या व्यक्तीविषयी हातचे राखून न ठेवता समकालीन इतिहासकाराने मोकळेपणाने खरे बोलले पाहिजे. तशी त्याच्या मनाची तयारी नसेल तर समकालीन इतिहास लिहिण्याच्या फंदात न पडता त्याने इतिहासपूर्व काळातील विषय संशोधनासाठी व लेखनासाठी निवडावा.''

## ९. समकालीन इतिहासाच्या संकल्पनेतील घोळ :-

आधुनिक इतिहास व समकालीन इतिहासाच्या संकल्पनेत स्पष्ट अशी संकल्पना नाही. काही इतिहासकार आधुनिक इतिहासात समकालीन इतिहास समाविष्ठ आहे असे म्हणतात. मात्र काही इतिहासकार समकालीन इतिहास, आधुनिक इतिहासासारखा नाही असे म्हणतात. त्यामुळे समकालीन इतिहासाची व्याख्या अथवा संकल्पना हीच मूळात समस्या आहे. कारण पारंपारिक पुरणामतवादी (लेपीर्शीरींळींश) इतिहासकारांनी इतिहास लेखनावर मर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्यांनी जीवंत स्मृतीला बाहेरचा रस्ता दाखवलेला आहे. अर्थात जिवंत स्मृतींना त्यांच्या इतिहासाच्या परिभाषेत स्थान नाही. यांच्यावर रान्केच्या विचारांचा प्रपात्र आहे. तो म्हणतो की, सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही ऐतिहासिक पध्दतीच्या सहाय्याने समकालीन इतिहासाशी संपर्क साधू शकत नाही. या संदर्भात बाराक्लोव म्हणतात की, समकालीन हा एक अतिशय लवचिक शब्द आहे, ज्याचा भिन्न लोकांसाठी भिन्न अर्थ आहे. समकालीन इतिहास हा शब्द ते पिढीच्या इतिहासाचा आहे असे म्हणतात, ते म्हणतात. "The phrase contemporary history is the history of generation for simple reason that generations overlap."

## ❑ समकालीन इतिहासाचे फायदे :-

समकालीन इतिहास लेखनात अनेक अडचणी, आव्हाने व समस्या असल्या तरी एक मोठा फायदा असतो, जो इतर कालखंडाच्या इतिहासकारांना मिळत नाही. कारण ते त्या समकालीन घटनाचे प्रत्यक्ष साक्षीदार अथवा त्या कालखंडाच्या समकालीन असतात. त्यामुळे या कालखंडावर लिखाण केल्याचे अनेक फायदे आहेत, ते खालीलप्रमाणे :-

## १. वर्तमान मानसिकतेचे विश्लेषण :-

समकालीन इतिहास लेखकाला अलीकडील भूतकाळातील व वर्तमान लोकांच्या भावना समजून घेण्याची संधी असते. दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास लिहिणाऱ्या अभ्यासकाला ही संधी प्राप्त होत नाही. आपण ज्या काळावर, त्या काळातील घटना, विकास, स्थित्यंतरे, चळवळी व विविध सामाजिक-सांस्कृतिक घटकांच्यावर अभ्यास करत असतो, त्यामागील लोकांच्या भावनिकतेचा वेध घेण्याची क्षमता आणि संधी समकालीन इतिहासलेखकाला मिळते. एखाद्या घटनेमागील मानसिक समजून घेण्याची क्षमता वर्तमानकाळातील लोकांना येते. आतिदूरच्या भूतकाळाच्या इतिहासासंबंधी ही संधी नसते. कारण इतिहास लेखक म्हणून पुराव्यांच्या आधारे जरी त्या काळाचा इतिहास लिहिला असला तरी तो त्या काळातील लोकांच्या भावना व मनोभूमिका समजाऊन घेऊ शकत नाही. समकालीन इतिहासलेखक आपण जगलेल्या काळाचा इतिहास लिहित असल्यामुळे त्याला मात्र हे शक्य होते.

## २. विशिष्ठ विषयाच्या इतिहासलेखनाचे आद्यप्रवर्तक :-

समकालीन इतिहास लेखनकाराला विशिष्ठ विषयाच्या इतिहास लेखनाचे आद्यप्रवर्तक होण्याची संधी मिळते. संशोधकाला दिशा देण्यासाठी दुय्यम साधने उपलब्ध नसतात अथवा इतर संशोधकांनी तयार केलेल्या घटनांचा कालानुरूप नसतो. अथवा सर्वमान्य असलेले घटनांचे विश्लेषण देखील उपलब्ध नसतात. हे सर्व पहिल्यांदाच समकालीन इतिहास लेखकाला तयार करावे लागते व त्यासाठी त्याला प्रचंड मेहनत करावी लागते, मात्र या मेहनतीचा मोबदला त्याला एखाद्या विषयाचा पहिल्यांदा इतिहास लिहिण्याची संधी प्राप्त होते. यासंबंधी प्रसिध्द समकालीन इतिहासकार रामचंद्र गुहा म्हणतात, ''जेव्हा तुम्हाला स्वातंत्र्योत्तर बंगालच्या सामाजिक इतिहासाच्या कोणत्यातरी पैलूवर पहिला ग्रंथ लिहिता येत असेल तेव्हा वसाहतवादी बंगालच्या सामाजिक इतिहासाच्या कोणत्यातरी पैलूवर चारशेवा ग्रंथ का लिहावा जेव्हा तुम्हाला प्रसिध्द लेखिका महाश्वेतादेवी यांच्या जीवन व कार्यावर पहिला ग्रंथ लिहिता येत असेल तेव्हा बंकिमचंद्र चटर्जींच्या जीवनावर विसावे किंवा तिसावे पुस्तक का लिहावे?''

## ३. आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन :-

समकालीन इतिहास लेखकाला आंतर विद्याशाखीय दृष्टीकोनातून लिखाण करण्याची खूप संधी आहे. हे जरी खरे असले तरी ज्या विषयावर आपणास संशोधन करावयाचे आहे त्या विषयाशी संबंधित आंतर विद्याशाखीय अंतरसंबंध निर्माण करणे अथवा तशा प्रकारचे प्रारूप तयार करण्यासाठी संशोधकाला आंतरविद्याशाखीय अनुबंध निर्माण करता येतात. उदा. एखाद्या व्यक्तीला राज्यशास्त्रामध्ये आवड असेल तर त्यांने राज्यशास्त्रातील आपल्या संशोधनाबद्दल जागरूक असले पाहिजे. समकालीन इतिहास लेखकांसाठी आंतरविद्याशाखीय संकल्पना, सिध्दांत अथवा प्रारूप वापरण्यासाठी संधी व मोठा वाव आहे, कारण या विद्याशाखांमधील अलीकडील भूतकाळातील घटनावर, विकासावर जे संशोधन झालेले असते, त्याच्या संशोधनातून समकालीन इतिहास अथवा अलिकडील भूतकाळ त्या-त्या परीप्रेक्षातून व दृष्टीकोनातून समजावून घेवू शकतो व एक नवीन आंतरविद्याशाखीय प्रारूप तयार करू शकतो.

### स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-२

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) समकालीन इतिहास ही संकल्पना इतिहासात कोणत्या इतिहासासाठी वापरली जाते?

२) समकालीन इतिहासाची संकल्पना कोणत्या इतिहासकारांनी मांडली?

३) इ.स. १९३० मध्ये समकालीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी कोणत्या देशात संस्था उभारण्यात आली?

४) समकालीन इतिहासलेखन कोणत्या देशात विकसित झाले?

५) 'डायरी ऑफ ॲन फ्रांक' ही रोजनिशी कोणी लिहिली?

### (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) समकालीन या संज्ञेचा उदय ............ व्या शतकात झाला.

२) ॲन इंट्रॉडक्शन टू कंटेम्परारी हिस्ट्री हा ग्रंथ .......... यांनी लिहिला.

३) समकालीन ब्रिटिश इतिहास संस्थेची स्थापना ............. मध्ये झाली.

४) समकालीन इतिहासलेखनात ............. साधनांचा वापर केला जातो.

५) वस्तूनिष्ठपणे चित्रण केले तर जनसमूहाच्या रोषाला सामोरे जावे लागेल असे ........... यांनी म्हटले आहे.

## ३.२.३ स्थानिक इतिहास लेखन (Local History)

इतिहासलेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले आहेत. यामध्ये अलिकडील काळात विशेष प्रसिध्दीत आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे 'स्थानिक इतिहास लेखन' अथवा 'स्थानीय इतिहास' हा होय. स्थान म्हणजे ठिकाण किंवा स्थानिक म्हणजे मूळचा म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास. अरुण टिकेकर यांनी 'स्थानिक इतिहास' ऐवजी 'स्थानीय इतिहास' असा शब्दप्रयोग केलेला आहे. वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. भारतामध्ये ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहिलेला आहे. प्राचीन काळी आपल्याकडे जी स्थलमहात्म्ये होती त्याचाच हा आधुनिक व शास्त्रीय अवतार आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणाऱ्या व्यक्तीला स्थानिक अथवा गावकरी म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ठ नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. यासंबंधी अरूण टिकेकर म्हणतात की, ''हा एका अर्थानं भूतकाळात रमू पाहणाऱ्यांचा छंद. आपल्या गावाचा वा शहराच्या तसंच त्या शहरातील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणं ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक, तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतीबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पडकण्यावर स्थानीय इतिहासकाराचे यश अवलंबून असते'' एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रित राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

### १. स्थानिक इतिहास लेखनाची सुरूवात :-

१६ व्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला. लंडन शहराचा सूक्ष्म पध्दतीने सर्वेक्षण करून त्यावर आधारित इ.स. १८९४ मध्ये ४४ खंड प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणार हे पहिले शहर. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातून पुढे लंडन विद्यापीठात 'Institute of Historical Research' स्थापन झाली. त्यामुळेच लंडन शहराला स्थानिक इतिहासाची जननी असे म्हणतात. याच काळात फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादींचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी १८४० च्या

दशकात आपपाल्या क्षेत्रातील उदयोग व्यवसायाचा इतिहास लिहिण्यास सुरूवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयांच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषत: महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास १८३६ मध्ये प्रसिध्द झालेले गोविद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन', १९६८ मध्ये प्रसिध्द झालेले ना. वि. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन', आर. व्ही. सबनीस यांचे 'नोट्स ऑन कोल्हापूर'. अशा ग्रंथाद्वारे १९व्या शतकामध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला. विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृध्दींगत झाली. ना. गो. चापेकरांचे 'बदलापूर' दे. गो. लांडगे यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', अरूण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादीत केलेले 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा' यासारख्या अनेक ग्रंथाचा उल्लेख होतो. महाराष्ट्रामध्ये स्थानिक इतिहासलेखनाची अनेक उदाहरणे देता येतील. मात्र अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी रोमिला थापर यांनी इ.स. १९७६ मधील पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्ष पदावरून केलेल्या प्रादेशिक व स्थानिक इतिहास या विषयावर केलेल्या मांडणीपासून झाली असे मानले जाते. तेव्हापासून भारतात या नवीन विचार प्रवाहाचा खऱ्या अर्थाने अभ्यास सुरू झाला.

## २. प्रादेशिक इतिहासातून स्थानिक इतिहासाकडे :-

इतिहासाची व्याप्ती, स्थल व कालसापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी याची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते किंवा स्थलाच्या निकषावर केली जाणारी विभागणी; जशी की जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास. विशेषत: प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून ज्याची ओळख आहे तो स्थानिक इतिहास. यासंदर्भात राजा दीक्षित यांनी प्रादेशिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे हे म्हणतात की, ''इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय.''

२० व्या शतकात प्रादेशिक इतिहास ही संकल्पना उदयास येवून इतिहास संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग बनली. प्रादेशिक इतिहासाचे सूक्ष्म अध्ययन करण्यासाठी त्याची लहान-लहान भागात विभागणी केली गेली. यातून स्थानिक इतिहास या संकल्पनेचा उदय झाला. आज संशोधकाचे आवडीचे क्षेत्र म्हणून स्थानिक इतिहासाकडे पाहिले जाते. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजातील प्रत्येक

घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर, स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

## ३. स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश :-

इतिहास संधोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. आपण त्या गावात लहानाचे मोठे झालो त्या गावाबद्दलची देखील माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्ती समूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तानी राज्य केलेले आहे, त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खाणाखुणा अनेक गावागावात विखुरलेल्या आहेत. बऱ्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक वैशिष्ट्यामुळे प्रसिध्दीस आलेले असते. त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहासलेखनाचा उद्देश आहे.

## ४. स्थानिक इतिहासलेखनाचे महत्त्व :-

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता त्याचे विविध दृष्टीकोनातून महत्त्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्य विषय आहेत. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोनातून लिहिलेला असतो. यामध्ये मुख्य वर्ग विषय समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप, उदरनिर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ट असतो.

स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषत: स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. 'स्थल' इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे, कारण स्थानिक संदर्भ, व्यक्तीजीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे,

व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. थोडक्यात, आपण स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून,

१) एखाद्या गावाची, घटनेची, स्थानाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो.

२) स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न करू शकतो.

३) समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो.

४) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो.

५) दुर्लक्षित घटक, प्रथा, परंपरा, आचार-विचार, कथा, पुराणकथा, दंतकथा याचा नव्याने विचार करू शकतो.

## ५. स्थानिक इतिहास लेखन पध्दती :-

स्थानिक इतिहास लेखन ही नवीन संकल्पना आज झपाट्याने विकसित होत आहे. 'No documents, No History' हा प्रवाह महत्त्वाचा असला तरी याच्या व्यतिरिक्तही इतिहास लेखन केले जावू शकते हे आज सहप्रमाण सिध्द होत आहे. यासाठी अनेक नवनवीन आधुनिक पध्दती वापरल्या जात आहेत जसे की,

१) ऐतिहासिक संशोधन पध्दती (पारंपारिक)

२) क्षेत्र भेट

३) सर्वेक्षण

४) मुलाखत

५) प्रश्नावली

६) मौखिक परंपरा

७) प्रथा, परंपरा व पध्दती

८) संकेत

९) दंतकथा/अख्यायिका

१०) पुरातत्वीय साधने.

या पध्दती अथवा माध्यमांचा आधार घेवून स्थानिक इतिहास लेखन केले जाऊ शकते.

## ६. स्थानिक इतिहासाचे प्रारूप/पैलू

- **भौगोलिक पार्श्वभूमी**
  - जमीनीचे प्रकार इ.सीमा
  - नद्या, ओढे, नाले, तलाव (पाण्याचे स्त्रोत)
  - पर्जन्य
  - हवामान
  - जंगल संपदा
  - पशुपक्षी
- **ऐतिहासिक पार्श्वभूमी**
  - प्राचीन
  - मध्ययुगीन
  - आधुनिक
  - ऐतिहासिक स्थळे
  - स्मारके
  - घटना विशेष
  - व्यक्ती विशेष
- **सामाजिक जीवन**
  - लोकसंख्या
  - धर्म/पंथ
  - जाती/पोटजाती
  - प्रथा/ रूढी/परंपरा
  - आचार/विचार
  - निष्ठा
  - आहार
  - पोषाख
  - कुटुंब संस्था
  - सामाजिक स्थित्यंतरे
  - आभूषणे
  - स्त्री/पुरुष प्रमाण
  - सामाजिक संस्था
- **सांस्कृतिक जीवन**
  - सांस्कृतिक
  - मनोरंजन
  - जत्रा/यात्रा
  - उत्सव
  - उरुस
  - शिक्षण
  - सांस्कृतिक संस्था
  - संगीत
  - वादन
  - खेळ
  - क्रीडा प्रकार
- **आर्थिक जीवन**
  - शेती
  - शेतीचे प्रकार
  - उदरनिर्वाहाची साधने
  - उद्योगधंदे
  - जोडधंदे
  - व्यापार
  - व्यापारी जमाती
  - बँका
  - दळणवळण

वरील प्रारूपाच्या अनुषंगाने स्थानिक इतिहासाचे लेखन केले जात आहे व केले जाऊ शकते. याशिवाय यामध्ये इतर अनेक अतिविशिष्ट घटक समाविष्ठ होऊ शकतात.

## ७. स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

स्थानिक इतिहासलेखन करताना खालील पैलूचा अथवा घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो ते प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे :-

## १. ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची व्युत्पत्ती गांवाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोकसमजूती इत्यादी महत्त्वाच्या असतात. बऱ्याचवेळी गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. कोल्हापूर या नावाचा व्युत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर आपणास त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, या इतिहास काळात त्या-त्या गावांचा विकास व जडण-घडण झालेली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्या कारणाने शेकडो, हजारो गावांचा इतिहास शब्दबध्द झालेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे आहे, यामध्ये नव संशोधकांना अधिक वाव आहे.

## २. भौगोलिक पार्श्वभूमी/घटक :-

जगातील प्रत्येक देशाला, त्या देशातील राज्यांना, प्रांताना, जिल्ह्यांना, तालुक्यांना काही विशेष प्रसंगी गावांनाही विविध भौगोलिक परिस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदलही होत जातो, त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगलसंपदा, पशु-पक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्रोत इत्यादीचा अभ्यास केला जाऊ शकतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करत असतो, त्यामुळे या भौगोलिक घटकाचा त्या-त्या गावावर काय परिणाम होतो किंवा झालेला आहे याचाही आपण अभ्यास करू शकतो. उदा. नदी, तलाव, ओढे, असलेली गावे, तेथील शेती व शेतीवर आधारीत व्यवसाय आणि ज्या गावात नदी, तला, ओढे नाहीत तेथील शेती, शेतीवर आधारीत व्यवसाय असा तुलनात्मक अभ्यास. कोणाचाही ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे आवश्यक असते. अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित

अर्थबोध होत नाही. उदा. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरून कसे निसटले हे त्यांचे रणचातुर्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच तेथील भौगोलिक परिस्थितीही महत्त्वाची आहे. विशिष्ठ भौगोलिक परिस्थितीचा तेथील पशुपक्षी, शेती, व्यक्ती व व्यक्तीसमूहावर परिणाम होत असतो. त्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## ३. सामाजिक जीवन :-

प्रत्येक गावाची एक विशिष्ठ सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समाविष्ठ करू शकतो. गावातील लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंब संस्था, कुटुंब संख्येत झालेला बदल, विविध जाती, पोट जाती, पंथ, रूढी-परंपरा, आचार-विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा. काही गावात व जातीत लग्न, प्रथा, विशिष्ट केल्या जातात. गावामध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकांवरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहिताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री-पुरुष समानता, प्रमाण, मुलींचे शिक्षण, हुंडा, प्रथा, विवाह पध्दती इत्यादी संबंधी माहिती नव्याने मांडू शकतो.

## ४. सांस्कृतिक जीवन :-

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा, महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, संकेत पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी-देवतांची मंदिरे, दर्गे मशिदी आहेत आणि त्या-त्या गावात विशिष्ठ पध्दतीने त्यांच्या जत्रा-यात्रा साजऱ्या केल्या जातात, त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ट खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनांची माध्यमे व कला प्रकार आहेत, त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जावू शकतो. उदा. शिराळा येथील नागपंचमी, कवठेएकंद येथील शोभेची दारू उडवण्याची प्रथा, काही गावास दिपावली, बैल पोळा, पाडवा विविध पध्दतीने साजरा केला जातो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या गावातील सामाजिक-धार्मिक-आर्थिक अनुबंध समजाऊन घेऊ शकतो. साहित्यिक-सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो. काही गावातील यात्रा-जत्रा विशिष्ट संकेताच्या आधारावर संपन्न होतात. याचाही या माध्यमातून अभ्यास होऊ शकतो. सांस्कृतिक जीवन हे बऱ्याच कृषी घटकावर आधारीत आहे. अनेक सण-समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो.

## ५. आर्थिक जीवन :-

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती अर्थात कृषी जीवनावर आधारीत आहे. त्या-त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेती आधारीत जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण,जाती आधारीत व्यवसाय, व्यापारी जाती-जमाती इत्यादीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनांच्या माध्यमातून गावपातळीवर केला जाऊ शकतो. उदा. एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्रफळ, लागवडी खालील शेती, हंगाम, पिक पध्दती, शेतीची पध्दती, शेती उत्पादन बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरी, कोळपणी अशा कितीतरी अंगाने अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजाऊन घेऊ शकतो. सांगोला, आटपाडी, मोडनिंब, पंढरपूर, अकलूज येथे पशु-पक्षांचा बाजार भरतो, कोटीच्या धर्तीवर आर्थिक उलाढाल होते. याचाही अभ्यास होवू शकतो. कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथे बिरदेव यात्रेत घोंगड्याचा बाजार भरतो असे आणि कितीतरी उदाहरणे आपणास सहज पहावयास मिळतात.

## ६. राजकीय व प्रशासकीय जीवन :-

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये एखाद्या गावाचे देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातील योगदान, प्रशासनातील योगदान, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था यांचाही अभ्यास केला जाऊ शकतो.

### स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-३

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणत्या देशात स्थानिक इतिहास लेखन परंपरेचा उदय झाला?

२) मुंबईचे वर्णन हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

३) 'जागृत सातारा' हा ग्रंथ कोणी लिहिला?

४) स्थानिक इतिहासांची मांडणी करणाऱ्या भारतीय इतिहासकार कोण?

५) इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च सेंटर कोणत्या विद्यापीठात आहे?

### (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) स्थानिक इतिहासऐवजी स्थानीय इतिहास हा शब्द ............ यांनी वापरला आहे.

२) स्थानिक इतिहासकार रॉबर्ट डॉच ........... देशातील होता.

३) स्थानिक इतिहासाला ........... इतिहासाचा पोटविभाग म्हणतात.

४) स्थानिक इतिहास लेखनात ................ ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे.

५) लंडन शहराचा ४४ खंडातील इतिहास ............ मध्ये प्रसिध्द झाला.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **सूक्ष्म** : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.
- **अभिजन** : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)
- **सबाल्टर्न** : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.
- **इन्क्विझिशन** : ख्रिश्चन धर्मातील पाखंडी मत तपासण्यासाठीचे न्यायालय.
- **मौखिक** : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** *१) इटली.*

*२) वंचिताचा इतिहास.*

*३) क्षुल्लक.*

*४) क्लिफोर्ड गर्टज.*

*५) कार्लो गिंझबर्ग.*

**ब)** *१) रणजीत गुहा.*

*२) क्वॉडेर्नी स्टोरीसी.*

*३) इन्क्विझिशन.*

*४) कार्लो गिंझबर्ग.*

*५) इटली.*

## ❑ स्वयं–अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे

**अ)** *१) अलिकडील भूतकाळ.*

*२) हरमन हीमपेल.*

*३) नेदरलँड.*

*४) जर्मनी.*

*५) एका ज्यू धर्माच्या मुलीने.*

**ब)** *१) २०.*

*२) गिओफ्री बाराक्लोव.*

*३) १९८६.*

*४) अपारंपारिक.*

*५) य. दि. फडके.*

## ❑ स्वयं–अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे

**अ)** *१) इंग्लंड.*

*२) गोविंद माडगांवकर.*

*३) पु. पा. गोखले.*

*४) रोमिला थापर.*

*५) लंडन.*

**ब)** *१) डॉ. अरूण टिकेकर.*

*२) इंग्लंड.*

*३) प्रादेशिक.*

*४) गाव.*

*५) १८९४.*

## ३.५ सारांश

इतिहास लेखन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. स्थलकाल परत्वे यामध्ये बदल होत गेले, नवीन-नवीन विचार व पध्दती अस्तित्वात आल्या व रूढ झाल्या, इतिहासाचे परिप्रेक्ष बदलले. पारंपारिक इतिहास लेखन परंपरेबरोबरच इतर प्रवाह व दृष्टीकोन प्रसूत झाले. या नवीन प्रवाह अथवा दृष्टीकोनाच्या माध्यमातून इतिहासातील घटनांचे पुनर्लेखन व नव्याने विश्लेषण करण्याची आवश्यकता निर्माण झाली किंवा केले गेले. मानवाच्या गतकाळातील घटनांची नोंद घेतली गेली, त्याचे विश्लेषण केले गेले मात्र या अभिजनवादी इतिहासामध्ये वंचित, शोषित, पिडीत, तळागाळातील, दुसऱ्या भाषेत बोलायचे झाले तर अगदी क्षुल्लक व वरपांगी किरकोळ घटना आहेत, व्यक्ती आहेत, समूह आहेत म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्यांच्या इतिहासाची नोंदच घेतली नाही. परंतु अलीकडे 'No Document, No History' हा युक्तीवाद मागे पडून नवीन दृष्टीकोन इतिहास लेखनात आलेले आहेत. यामध्ये साधनाबरोबरच व्यक्ती व घटनेलाही तितकेच महत्त्व आहे. मग ती व्यक्ती अथवा घटना कीतीही क्षुल्लक अथवा छोटी असो त्यांचा अभ्यास करण्याचा प्रवाह समोर येत आहे. छोट्यातील छोटी घटना निवडून त्याचे सूक्ष्म विश्लेषण करून त्यामधून मोठ्या घटनेत प्रवेश करणे हे सूक्ष्म इतिहास लेखनांचे ध्येय आहे. इतिहास लेखनात अलीकडील इतिहास लिहिण्याचे इतिहासकार जाणीवपूर्वक टाळतात, कारण अलीकडच्या इतिहास लिहिण्यासाठी कागदपत्राची समस्या असते, मात्र समकालीन इतिहासाच्या माध्यमातून अलीकडच्या इतिहासातील घटनांची जंगी तयार करून स्वत:च पुरावा निर्माण करण्याचे तंत्र विकसित होत आहे. इतिहासकाराने पुराव्यांच्या मागे न लागता स्वत:च पुरावा निर्माण करणे हे अलिकडील इतिहासाचे अर्थात समकालीन इतिहासाचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. समकालीन इतिहासात खूप साऱ्या छोट्या-मोठ्या घटना घडत असतात. मात्र इतिहासकार त्या छोट्या अथवा स्थानिक आहेत. म्हणून दुर्लक्ष करतो व राष्ट्रीय स्तरावरील घटनावर लक्ष केंद्रीत करतो यामध्ये स्थानिक घटना, प्रसंग, व्यक्ती व त्यांचे कर्तृत्व राष्ट्रीय स्तरावर धुसरच राहते यांची दखल घेवून अलिकडील इतिहासाबरोबरच स्थानिक इतिहास लेखनासाठी मान्यता मिळत आहे. प्रांतिक इतिहासाचा अविभाज्य घटक असलेला स्थानिक इतिहास लेखनाचा प्रकार नवतरुणांच्यामध्ये प्रसिध्दीस येत आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. सूक्ष्म इतिहास लेखनाची सविस्तर चर्चा करा.

२. समकालीन इतिहास लेखन म्हणजे काय ते स्पष्ट करा.

३. स्थानिक इतिहास लेखनाचे महत्व विशद करा.

४. कार्लो गिझबर्ग यांनी यांची अंशलक्ष्यी इतिहासातील कामगिरी स्पष्ट करा.

५. समकालीन इतिहास लेखनातील समस्या स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


- **वांबूरकर, जास्वंदी (संपा.) :** *''इतिहासातील नवे प्रवाह''*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१४.
- **इतिहास लेखन मीमांसा**, लोक वाङ्मय गृह, मुंबई, २०१०.
- **पाटील, अवनीश :** *''समकालीन इतिहास लेखन''*, विभागीय अध्यक्षीय भाषण, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, २०१६.
- **पाटील, अवनीश :** *''मायक्रोहिस्ट्री : परिचयात्मक टीपण''*, निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ, इतिहास परिषद, कोल्हापूर, २०१३.
- **Giovanni Levi :** *"On Microhistory in Peter Burke (ed)"*, New prerespectives on Historical writings, Pennsylvania State University, 1992.


❑ ❑ ❑

घटक-४

# नवी साधने

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ डिजिटल अर्काइव्ह (Digital Archives) प्रकार आणि स्वरूप

४.२.२ मौखिक साधने (Oral Sources) आणि मुलाखत पद्धत

४.२.३ टिपण बनवणे आणि संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Bibliographic Software)

४.२.४ वस्तुसंग्रहालयामार्फत इतिहासाचे प्रस्तुतीकरण/प्रतिनिधित्व

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- ✯ इतिहास संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या नव्या साधनांची माहिती होईल.
- ✯ डिजिटल अर्काइव्हचे (Digital Archives) प्रकार आणि स्वरुप ज्ञात होतील.
- ✯ मौखिक साधन आणि त्या साठी वापरल्या जाणाऱ्या मुलाखत पद्धतीची माहिती होईल.
- ✯ टिपण बनवण्याची पद्धत तसेच संदर्भग्रंथसूची करिता वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरचा परिचय होईल.
- ✯ वस्तुसंग्रहालयाद्वारे इतिहासाचे प्रस्तुतीकरण करण्याच्या तंत्राची माहिती होईल.

## ४.१ प्रास्ताविक

मागील घटकांमध्ये आपण इतिहास या अभ्यासशाखेशी संबंधित नवे आकलन, इतिहास संशोधनात इतर अभ्यासशाखांचा उपयोग आणि इतिहास अभ्यासशाखेतील नवे दृष्टीकोन यांचा अभ्यास केला. इतिहास संशोधनासाठी जसे इतिहासकाराकडे काही कौशल्ये आवश्यक असतात उदा. वस्तुनिष्ठता, तर्कबुद्धी इत्यादी. त्याचप्रमाणे इतिहास संशोधकाला इतिहास संशोधनाची काही तंत्रे किंवा पद्धती देखील वापरावी लागतात. उदा. अंतरंग व बहिरंग परीक्षण इत्यादी. इतिहास संशोधनासाठी कौशल्ये आणि तंत्रासोबतच इतिहास संशोधनाची संदर्भसाधने (Sources) देखील आवश्यक असतात. या सर्वांचा अभ्यास आपण पूर्वी केला आहेच. पण या घटकामध्ये आपण इतिहास संशोधनाच्या नव्या साधनांची (Tools) माहिती घेणार आहोत.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे विकसित झालेले डिजिटल अर्काइव्ह हे संशोधकांना संशोधनासाठी उपयुक्त साधन म्हणून उपयोगी ठरत आहे. मौखिक साधने ही इतिहासाच्या संदर्भसाधनांना समृद्ध करत आहेत. मौखिक साधन निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या मुलाखत पद्धतीने मौखिक साधनांचा वापर अधिक सटीक झाला आहे. टिपण बनवण्याच्या पद्धतीने आणि संदर्भसूची बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरच्या वापरामुळे संशोधकांना बरीच मदत होत आहे. वस्तुसंग्रहालयामार्फत इतिहासाचे ज्ञान प्रभावीपणे प्रस्तुत करता येणे शक्य झाले आहे. आपण या घटकात इतिहासाच्या या नव्या अवजारांची माहिती घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ डिजिटल अर्काइव्ह (Digital Archives) प्रकार आणि स्वरूप

#### १) डिजिटल अर्काइव्ह म्हणजे काय?

इतिहास संशोधनासाठी लागणारी दुर्मिळ प्राथमिक संदर्भसाधने उदा. जुनी हस्तलिखिते, पत्रव्यवहार, ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी दफ्तर, पोथ्या, चोपड्या, वृतपत्रे, मासिके, दुर्मिळ ध्वनी मुद्रिते आणि फिल्म्स इत्यादींचे संग्रह आणि मुख्यत: त्यांचे संरक्षण करण्याचे काम पुराभिलेखागार करत असतात. ही पुराभिलेखागारे शासकीय अथवा खाजगी मालकीची असतात. पुराभिलेखागरांच्यामध्ये देखील ग्रंथालयांच्या प्रमाणे दुर्मिळ ग्रंथ असतात. मात्र, ग्रंथालयाचे प्राथमिक कार्य हे उपयोगासाठी ग्रंथ उपलब्ध करून देणे हे असते. मात्र, पुराभिलेखागाराचे प्राथमिक कार्य त्या दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण करणे हे असते.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे. माहितीचा साठा करण्याच्या सर्व्हरच्या क्षमतेत प्रचंड वाढ झाली आहे. इंटरनेटमुळे जगभरातील सर्व्हर आणि संगणक हे एकमेकांशी जोडले गेले आहेत. त्याचप्रमाणे इंटरनेटद्वारे माहिती अपलोड आणि डाऊनलोड करण्याच्या वेग देखील वाढला आहे. त्यामुळे डिजिटल माहितीचे प्रमाण देखील वेगाने वाढत आहे.

ज्याप्रमाणे पुराभिलेखागार आणि ग्रंथालय यांच्या ग्रंथांचे संरक्षणाला दिलेल्या प्राथमिकतेमुळे मोठा फरक असतो, तितका मोठा फरक डिजिटल अर्काइव्ह आणि डिजिटल लायब्ररी यांच्यात असत नाही. डिजिटल माहिती ही ग्रंथ अथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही, त्यामुळे त्यांच्या भौतिक संरक्षणाची गरज नसते.

डिजिटल लायब्ररी ही डिजिटल माहिती एकत्र करते आणि ती माहिती लोकांना उपलब्ध करून देते. डिजिटल लायब्ररीद्वारे ही गोळा केलेल्या माहितीचा साठा आणि त्या माहितीची उपलब्धता दीर्घकाळासाठी अस्तित्वात राहील की नाही याची खात्री देता येत नाही. माहिती साठवण्याच्या व्यवस्था बंद पडूच नये अशी व्यवस्था डिजिटल लायब्ररीद्वारे केली असते किंवा नसते.

याउलट, डिजिटल अर्काइव्ह स्थापन करण्यामागे आणि त्यांची जपवणूक करण्यामागे दोन उद्देश असतात. पहिला उद्देश हा, मौल्यवान डिजिटल माहितीचा कोणत्या ही प्रकारे ऱ्हास न होऊ देता भावी पिढ्यांसाठी संरक्षित करणे. तर दुसरा उद्देश हा सुव्यवस्थितरित्या निर्माण केलेल्या डिजिटल अर्काइव्हमध्ये कोणत्याही पद्धतीचा तांत्रिक दोष निर्माण होऊ नये याची उपाययोजना केलेली असते.

डिजिटल माहितीचा साठा करणे आणि त्यांचे संरक्षण या कामासोबतच कच्च्या स्वरूपातील अथवा प्राथमिक स्वरूपातील डिजिटल माहितीचा अन्वयार्थ लावण्याची सोय देखील डिजिटल अर्काइव्हमध्ये केली जाते. डिजिटल लायब्ररी या डिजिटल अर्काइव्हमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. कोणती माहिती गोळा करायची, कोणती माहिती साठवायची, कोणती माहिती दीर्घकाळासाठी संरक्षित करायची आणि कोणती माहिती सोडून द्यायची या गोष्टी ठरवताना डिजिटल लायब्ररी या डिजिटल अर्काइव्ह बनवताना मदत करू शकतात. कोणती माहिती निवडायची आणि कोणती सोडून द्यायची याचा निर्णय अतिशय कौशल्याने घ्यावा लागतो. डिजिटल अर्काइव्ह नेमके कोणत्या उद्देशासाठी बनवले आहे, त्यावरून कोणती माहिती तेथे साठवायची याचा निर्णय घेतला जातो.

डिजिटल अर्काइव्हमध्ये पुराभिलेखागाराप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रुपांतर केले जाते. याद्वारे त्या ऐतिहासिक कागदपत्रांचे आणि ऐतिहासिक वस्तूंचे डिजिटल माहितीच्या रुपात जतन करता येते. डिजिटल अर्काइव्हमध्ये जतन केलेली माहिती इतिहास संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध करून दिली जाते.

## २) डिजिटल अर्काइव्हचे प्रकार आणि स्वरूप

डिजिटल अर्काइव्ह हे मुख्यत: तीन प्रकारच्या गटांमध्ये विभागले जातात. पहिल्या गटातील डिजिटल अर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागारे, ग्रंथालये, विद्यापीठे, संग्रहालये, शासकीय संस्था (स्थानिक, प्रादेशिक अथवा राष्ट्रीय), इतिहासविषयक अथवा सांस्कृतिक मंडळ इत्यादींच्याद्वारे चालवले जाते. या गटातील

डिजिटल अर्काइव्ह बहुतांश मोफत वापरासाठी उपलब्ध असतात किंवा नाममात्र शुल्क आकारले जाते. नवी दिल्ली येथील भारताच्या नॅशनल अर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी केलेला प्रकल्प या गटात मोडतो. ''अभिलेख पटल'' या नावाने सुरु केलेल्या वेबसाईटवर नॅशनल अर्काइव्हद्वारा डिजिटलाईझ केलेले ऐतिहासिक दस्तावेज काही शुल्क भरून संशोधकांसाठी उपलब्ध केले जाते. अशाच प्रकारचे डिजिटल अर्काइव्ह पुणे येथील भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट द्वारे देखील सुरु करण्यात आले आहे.

दुसऱ्या गटातील डिजिटल अर्काइव्ह हे कोणत्यातरी एका व्यक्तीद्वारे, लोकांच्या छोट्या समूहाद्वारे, स्वयंसेवी संस्थाद्वारे निर्माण केले जातात. या गटातील डिजिटल अर्काइव्ह हे विशिष्ट आणि सामुहिक गरजेनुसार बनवले जातात. उदा. एखाद्या ऐतिहासिक घराण्याच्या किंवा एखाद्या संशोधकाच्या किंवा संशोधन संस्थेच्या संग्रहातील दस्तावेज हे डिजिटल अर्काइव्हच्या रुपात जतन केले जातात. महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातील ऐतिहासिक दस्तावेज, डिजिटलाईझ करून मंडळाच्या वेबसाईटवर संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तिसऱ्या गटातील डिजिटल अर्काइव्ह हे प्रकाशक अथवा व्यवसायिक संस्थांच्याद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना आणि ग्रंथालयांना सशुल्क उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रकारचे छोट्या स्वरूपातील डिजिटल अर्काइव्ह हे व्यक्तिगत संशोधकांना उपलब्ध करून दिले जात असले तरी मोठ्या प्रमाणातील अर्काइव्ह हे फक्त विद्यापीठे, ग्रंथालये तत्सम संस्था यांनाच उपलब्ध करून दिले जातात. या परिस्थितीत संशोधक व्यक्ती विद्यापीठ, ग्रंथालय तत्सम संस्थांच्या माध्यमातून अर्काइव्ह वापरू शकते.

डिजिटल अर्काइव्हमुळे दुर्मिळ ग्रंथ आणि दस्तावेजांचे खात्रीलायकरित्या जतन करता येते. सुव्यवस्थित पद्धतीने आयोजित डिजिटल अर्काइव्ह संशोधकाला अत्यंत उपयोगी ठरते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संशोधकाला होणाऱ्या फायद्याचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे डिजिटल अर्काइव्ह होय.

## स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-१

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) डिजिटल अर्काइव्हमध्ये ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे कोणत्या पद्धतीने डिजिटल माहितीत रुपांतर केले जाते?

२) डिजिटल माहिती कोणत्या ही प्रकारे ऱ्हास न होऊ देता कोणासाठी संरक्षित केली जाते?

३) डिजिटल अर्काइव्हचे किती प्रकार आहेत?

४) भारताच्या नॅशनल अर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी सुरु केलेल्या प्रकल्पाचे नाव काय?

(५) धुळे येथील कोणत्या संस्थेत डिजिटल अर्काइव्ह सुरु करण्यात आले आहे?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ...............च्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे.

२) ................ही ग्रंथ अथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही.

३) ................मध्ये जतन केलेली माहिती इतिहास संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध करून दिली जाते.

४) पुणे येथील ................................या संस्थेने डिजिटल अर्काइव्ह सुरु केले आहे.

५) ................ या डिजिटल अर्काइव्ह बनवताना निवड करण्यासाठी मदत करू शकतात.

## ४.२.२ मौखिक साधने (Oral Sources) आणि मुलाखत पद्धत

### अ) मौखिक साधने

मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटुंबिक, समूहासंबंधी, दैनंदिन जीवनासंबधी, महत्त्वपूर्ण घटनांसंबधी मौखिक स्वरूपातील माहितीचा ध्वनिमुद्रण म्हणजे साऊंड रेकॉर्डिंग, व्हिडीओ रेकॉर्डिंग किंवा मुलाखतीची ट्रान्सस्क्रीप्ट इत्यादींच्या माध्यमातून संग्रह आणि अभ्यास होय. लिखित साधनांपेक्षा मौखिक साधनांची विश्वासार्हता कमी मानली जात असली, तरी देखील, जेथे लिखित साधनाचा अभाव असतो तेथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. मौखिक साधनाचे ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीने, ढोबळ मानाने, मौखिक परंपरा आणि मुलाखत असे मौखिक साधनांचे दोन प्रकार करता येतात.

मौखिक परंपरा म्हणजे, परंपरेने, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी विभिन्न स्वरूपातील मौखिक माहिती होय. मानवी समाजात काही समूहांकडे-जमातींकडे लिखित साधनांचा अभाव होता अथवा त्यांना लेखन कलेची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे लेखन कलेची माहिती असून देखील काही समूहांनी आपली माहिती मौखिक परंपरेनेच पिढ्यानपिढ्या संक्रमित केली आणि पाठांतराद्वारे पिढ्यानपिढ्या त्यांचे जतन देखील केले. अशा पद्धतीने ज्ञान, स्मृति, भूतकालीन घटना, पारंपारिक कथा-गाणी, पारंपारिक कायदे यांचे ग्रहण, संवर्धन आणि संक्रमण होत राहिले. पारंपारिक कथा, दंतकथा, मिथके, म्हणी, पोवाडे, ओव्या, गाणी इत्यादींचा अंतर्भाव मौखिक परंपरेत केला जातो.

मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची लिखित अथवा पुरातत्त्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात. अशा पडताळणीमुळे माहितीच्या सत्यासत्यतेची तपासणी करता

येते. त्यामुळे आदिवासी, भटके-विमुक्त, पशुपालक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जाती अशा विभिन्न जाती-जमाती-समूहांच्या ऐतिहासिक संशोधनातही मौखिक साधने बऱ्याच अंशी उपयुक्त ठरतात.

## ब) मुलाखत पद्धत

समकालीन इतिहास लेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून मुलाखत पद्धत वापरली जाते. मुलाखत पद्धतीत इतिहासकार एक किंवा अनेक संबंधित व्यक्तींची मुलाखत घेऊन त्या मुलाखतींच्या उपयोग ऐतिहासिक साधन म्हणून करतो. मुलाखत घेण्यापूर्वी संशोधक, आपल्या संशोधनाच्या विषयाच्या अनुषंगाने ज्यांची मुलाखत घ्यायची आहे त्या व्यक्तींची विविध निकषांवर मुलाखतीसाठी निवड करतो. मुलाखतीच्या उद्दिष्टांच्या स्वरूप आणि व्याप्तीची कल्पना संशोधकास असणे आवश्यक असते.

### १) मुलाखतींचे प्रकार

मुलाखतींचे 'मुक्त मुलाखत' आणि 'संरचित मुलाखत' असे दोन प्रकार आहेत. 'मुक्त मुलाखत' किंवा 'खुली मुलाखत' प्रकारात, संशोधक, मुलाखत देणाऱ्या व्यक्तीला आपला संशोधन विषय सांगून त्या विषयावर कोणतेही ठराविक प्रश्न न विचारता खुलेपणाने बोलू देतो. मुक्त मुलाखतीत मुलाखत देणारा अधिक मोकळेपणाने बोलू शकतो. कोणताही अडथळा न आल्याने त्याला जसे आठवेल तसे मोकळेपणाने आणि ओघवते मांडू शकतो.

मुलाखतीच्या दुसऱ्या प्रकारात म्हणजे 'संरचित' किंवा 'नियोजित' मुलाखतीत संशोधक मुलाखत देणाऱ्याला माहिती देताना अथवा देऊन झाल्यावर काही ठराविक प्रश्न विचारतो. संशोधकाला त्या विचारलेल्या प्रश्नांचीच उत्तरे अपेक्षित असतात. अशा प्रकारे घेतलेली मुलाखत ही अल्पावधीत आटोपता येते आणि अपेक्षित माहिती देखील प्राप्त होते. विशिष्ट मुद्द्यांवर मुलाखत केंद्रित राहिल्याने अवांतर बोलण्याचा प्रसंग सहसा येत नाही. त्यामुळे वेळेचा अपव्यय टाळता येतो.

संशोधकाला आवश्यकता वाटल्यास तो कधीकधी मुलाखतीच्या दोन्ही प्रकारांची सरमिसळ करू शकतो. त्यामुळे मुलाखत देणाऱ्याला मोकळेपणाने बोलू देत असतानाच काही मुद्द्यांवरती विशिष्ट प्रश्न विचारून त्यांची उत्तरे मिळवू शकतो. संशोधकाला हवी ती माहिती एका मुलाखतीत मिळते किंवा काही वेळा एकापेक्षा जास्त मुलाखती घ्याव्या लागतात.

### २) मुलाखत देणारी व्यक्ती

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, त्याच्याजवळची माणसे, त्याच्या परिवारातील लोक, व्यवसायिक सहकारी, तसेच विरोधक इत्यादींच्या मुलाखती घ्यायला हव्यात. तसेच त्या

व्यक्तीशी थेट संबंध नसलेले पण त्यांच्या बाबतची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे आवश्यक आहे. चरित्रनायकाच्या सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

## ३) मुलाखतीची तयारी

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. त्याचप्रमाणे जर त्यात गल्लत झाली तर मुलाखतीचा अपेक्षित परिणाम देखील साधला जात नाही. त्यामुळे मुलाखतीची तयारी अत्यंत आवश्यक ठरते.

ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी, मुलाखत देणाऱ्याला, विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याच्या मनात, स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखतीदरम्यान अथवा नंतर, मुलाखतीची टिपणे काढून, ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून, त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो.

## ४) मुलाखतीमधील प्रश्न

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. अशा प्रश्न असल्यास मुलाखत देणाऱ्याचा गोंधळ उडणार नाही. मुलाखत देणाऱ्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह-दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

## ५) मुलाखत पद्धतीचे मूल्यमापन

नजीकच्या भूतकाळाचे किंवा समकालीन इतिहासाचे संशोधनासाठी मुलाखत पद्धत हे उत्तम आणि उपयुक्त साधन आहे. बौद्धिक कसब आणि कौशल्य असलेला संशोधक मुलाखत देणाऱ्याकडून जास्तीत जास्त माहिती मिळवू शकतो. अशाप्रकारची माहिती कोणत्याही लिखित साधनातून मिळणे दुरापास्त असते.

मुलाखतीच्या ओघात नवी माहिती, नवे मुद्दे, नवे पैलू, नवा दृष्टीकोन संशोधकाला मिळतो, कधी त्यामुळे संशोधनाची पूर्ण दिशाच बदलून जाते. मुलाखतीच्या वेळी मिळालेली माहिती टिपणाच्या रुपात अथवा ध्वनीचित्र मुद्रणाद्वारे स्वरूपात जतन करता येते. त्यामुळे तिचा योग्य ठिकाणी एक पेक्षा अधिक वेळा पुरावा म्हणून वापर करता येतो. मुलाखतीची टिपणे अचूक असल्याची मुलाखत देणाऱ्याने खातरजमा केली असल्यामुळे मुलाखत विश्वसनीय साधन ठरते.

मुलाखत पद्धतीमुळे बरीच माहिती मिळत असली तरी ही पद्धत केवळ नजीकच्या भूतकाळाच्या किंवा समकालीन इतिहासाच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरते. त्यापेक्षा मागील भूतकाळाच्या संशोधनासाठी या पद्धतीचा वापर करता येत नाही. मुलाखत देणारा त्याच्या स्मृतीतील माहिती देत असतो, त्यामुळे ती सर्वथा अचूक आणि विश्वसनीय मानता येत नाही. मुलाखत देणाऱ्याचे पूर्वग्रह हे त्याने दिलेल्या माहितीतून व्यक्त होत असतात. त्यामुळे त्याने दिलेल्या माहितीची पडताळणी आवश्यक ठरते. मुलाखत देणाऱ्याच्या पूर्वग्रहांची, निष्ठांची, वैरभावाची, वैचारिक-राजकीय भूमिकांची माहिती घेऊन त्याच्या पृष्ठभूमीवर संशोधक मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचा चिकित्सात्मक पद्धतीने अन्वयार्थ लावू शकतो.

थोडक्यात नजीकच्या भूतकाळाच्या किंवा समकालीन इतिहासाच्या संशोधनासाठीच्या माहिती संकलनासाठी मुलाखत पद्धत ही अत्यंत उपयुक्त असली तरी त्याच्या काही मर्यादा आहेत. कुशल इतिहास संशोधक आपल्या चिकित्सात्मक विश्लेषणाने मुलाखतीद्वारे मिळवलेल्या माहितीचा योग्य प्रकारे उपयोग करू शकतो.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) मुलाखतींचे प्रकार कोणते?

२) मुलाखत देणाऱ्यास संशोधन विषयाची माहिती देणे का आवश्यक असते?

३) मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी कसा उपयोगात आणला जाऊ शकतो ?

४) मुलाखत देणाऱ्याला कशाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही?

५) कोणत्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते.

### (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) ............... म्हणजे परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी विभिन्न स्वरूपातील मौखिक माहिती होय.

२) मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची ...................... अथवा पुरातत्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात.

३) समकालिन इतिहासलेखनासाठी अत्यंत उपयुक्त तंत्र म्हणून .................. वापरली जाते.

४) मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि ................... असावेत.

५) कुशल इतिहाससंशोधक आपल्या .................... विश्लेषणाने मुलाखतीद्वारे मिळवलेल्या माहितीचायोग्य प्रकारे उपयोग करू शकतो.

## ४.२.३ टिपण बनवणे आणि संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Bibliographic Software)

### अ) टिपण बनवणे

प्रत्येक संशोधन प्रक्रियेच्या काही तांत्रिक बाबी असतात. या तांत्रिक बाबींचा नीट उपयोग केल्यास संशोधन सुकर होते. संशोधन करताना संशोधक मोठ्या संख्येने विभिन्न प्राथमिक संदर्भ साधने, दुय्यम संदर्भ साधने आणि विविध संदर्भ ग्रंथ अभ्यासत असतो. या सर्व संदर्भ साधनांतून मिळालेला तपशील, मजकूर, मुद्दे इत्यादी सगळीच्या सगळी लक्षात ठेवणे अशक्य बाब आहे. साधने अभ्यासत असताना काही मुद्दे त्यावेळी महत्त्वाचे वाटत नाहीत, तरी देखील पुढे ते उपयोगी ठरण्याची शक्यता असते. त्याचबरोबर संकलित केलेली माहिती संदर्भ म्हणून देताना पुरावा म्हणून जवळ असणे आवश्यक असते. संशोधकाजवळ सुव्यवस्थित रुपात बनवलेली टिपणे असल्यास अवतरणे देताना, तळटीप देताना आणि संदर्भसूची तयार करताना ती अत्यंत उपयोगी ठरतात. टिपण बनवण्याच्या तंत्राचा सुयोग्य आणि सुव्यस्थित पद्धतीने वापर केल्यास संशोधकाच्या स्मरणशक्तीवर ताण येत नाही.

### १) टिपण बनवताना पाळावयाची पथ्ये

एकाचा विषयाशी संबंधित विभिन्न पैलूंवर दीर्घकालीन संशोधनासाठी उपयोगी ठरणारी टिपणे बनवताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. प्राथमिक संदर्भ साधन असल्यास त्याची पुराभिलेखागारातील नोंदीचे तपशील व्यवस्थित टिपणावर नोंदवाव्यात. संदर्भ ग्रंथांचे शीर्षक, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, अनेक खंडीय ग्रंथ असल्यास खंडाचा क्रमांक, अनेक आवृत्या असतील तर उपयोगात आणलेल्या आवृत्तीची नोंद इत्यादींचा तपशील ठेवणे आवश्यक आहे. मजकूर ज्या पृष्ठावरून घेतला आहे त्याचा पृष्ठक्रमांक देखील नोंदवणे गरजेचे असते. टिपण हे मुद्देसूद आणि विषयानुसार केले असावे. एखाद्या संदर्भ ग्रंथातील विधान योग्य वाटल्यास, अवतरण देण्यासाठी, कोणताही बदल न करता जसाच्या तसा उतरवून घ्यावा. योग्य पद्धतीने काळजीपूर्वक बनवलेली टिपणे ही संशोधकाला अत्यंत उपयुक्त ठरतात.

## २) टिपण बनवण्याच्या पद्धती

वहीवर अथवा रजिस्टरवर टिपण, विषयानुसार अथवा प्रकरणानुसार टिपण, सुट्या कागदावर टिपण आणि कार्डवर टिपण अशी टिपण बनवण्याच्या चार पद्धती आहेत. या प्रत्येक पद्धतीच्या काही सोयी आहेत तशाच त्यांच्या काही गैरसोयी देखील आहेत. पद्धत कोणतीही असो ती संशोधकाला सोयीस्कर वाटणारी असायला हवी. त्यामुळे संशोधकाने त्याला उपयुक्त आणि सोयीची वाटेल तीच टिपण बनवण्याची पद्धत उपयोगात आणावी.

**अ) वह्यांतून संदर्भ ग्रंथांचे टिपण :** या पद्धतीत प्रत्येक संदर्भ ग्रंथासाठी प्रत्येकी एक वही अथवा रजिस्टर वापरून त्यात टिपण बनवले जाते. काही संशोधकांना, विशेषत: नवख्या संशोधकांना ज्यांना संक्षिप्त स्वरुपात माहिती नोंदवण्याचे तंत्र माहित नसते त्यांना ही पद्धत उपयुक्त असते. काही संशोधकांना संदर्भ ग्रंथ वाचताना मोठ्या प्रमाणात माहिती नोंदवावी असे वाटते. काही वेळा माहिती इतकी प्रभावी आणि समर्पक असते की त्याची विस्तृत नोंद घ्यावी असे वाटते, त्यावेळी देखील ही पद्धत उपयुक्त ठरते.

प्रत्येक संदर्भ ग्रंथासाठी एक वहीवर अथवा रजिस्टरवर टिपण घेतल्यास अनेक टिपणाच्या अनेक वह्या तयार होतात. इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या वह्यांतून नेमका संदर्भ शोधून काढणे हे जिकीरीचे काम बनते. नेमके संदर्भ कोणत्या वहीत आणि त्या वहीत नेमके कोठे आहेत ही बाब संशोधकाला स्मरणात ठेवावी लागते, त्यामुळे त्याच्या स्मरणशक्तीवर ताण पडतो. या पद्धतीच्या वापरात वेळेचा अपव्यय होण्याची शक्यता असते.

**ब) उपविषयानुसार अथवा प्रकरणानुसार टिपण :** या पद्धतीत संशोधक एका संदर्भ ग्रंथाची एका वहीत टिपणे न काढता त्याच्या मुख्य संशोधन विषयाच्या उपविषयानुसार अथवा प्रकरणानुसार एका वहीत टिपणे काढतो. एका उपविषयावर, एका प्रकरणावर अथवा एका घटकावर टिपण लिहिल्यामुळे संशोधनाचे संबंधित प्रकरण लिहिताना आवश्यक ती माहिती एकत्र प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाच्या स्मरणशक्तीवर ताण येत नाही.

प्रकरणानुरूप टिपण घेतल्यामुळे ही पद्धत सोयीची वाटली तरी या पद्धतीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात माहिती संकलित होते. त्यामुळे आवश्यक माहिती अथवा संदर्भ शोधून काढणे अवघड बनते. एकच माहिती दोन किंवा जास्त प्रकरणात अथवा उपविषयात वापरायची असल्यास ही पद्धत गैरसोईची ठरते.

**क) सुट्या कागदावर टिपण :** टिपण बनवायची तिसरी पद्धत म्हणजे सुट्या कागदावर टिपण काढणे. या पद्धतीत संशोधक वहीवर टिपण काढण्या ऐवजी सुट्या कागदांवर टिपणे घेतो आणि आपल्या सोईनुसार त्यांची विभागणी करतो आणि गरजेनुसार क्रम लावून त्यांच्या फाइल्स बनवतो. या पद्धतीमुळे वर उल्लेखलेल्या दोन्ही पद्धतीचे लाभ मिळतात, म्हणजे जास्त तपशील असलेले टिपण तयार करता येते आणि गरज पडल्यास त्याची प्रकरणानुसार अथवा सोयीनुसार जुळवाजुळव करता येते.

मात्र, सुट्या कागदावर टिपण घेण्याच्या पद्धतीत देखील संपूर्ण कागद वाचावा लागतो. त्यातील नेमके संदर्भ सहज सापडत नाहीत. संशोधनाच्या दिशेमध्ये, संशोधनाच्या क्रमामध्ये किंवा संशोधनाच्या टप्प्यांमध्ये बदल होऊ शकतो. त्यामुळे या कागदांची पुन्हा पुन्हा जुळवाजुळव करणे अवघड होते.

**ड) कार्डवरील टिपण :** वरील सर्व पद्धतींपेक्षा कार्डवर टिपण काढण्याची सर्वात सोयीची ठरते. ही पद्धत कमी त्रासाची, कमी खर्चिक, कमी वेळ घेणारी आहे. कार्ड पद्धतीचे दोन फायदे आहेत. कार्ड पद्धतीचा पहिला फायदा म्हणजे एकाच छोट्या कार्डवर वापरायची सर्व महिती एकत्र आणि संक्षिप्त स्वरूपात मिळते. कार्ड पद्धतीचा दुसरा फायदा म्हणजे कार्डची पुन्हा पुन्हा जुळवाजुळव तुलनेने सोपी आणि सोयीची ठरते. एकदा कार्ड तयार झाले आणि गरजेनुसार यांचा जुळणी झाली आणि संशोधन कच्चा आराखडा तयार असल्यास संशोधनाचे काम वेगाने करता येते. संक्षिप्त टिपणांमुळे तळटीपा आणि संदर्भ ग्रंथसूची बनवण्याचे काम सोपे होते.

कार्ड पद्धतीसाठी वापरायचे संशोधनाचे काम हे बरीच वर्षे चालत असल्यामुळे साधारणपणे पोस्टकार्डच्या आकाराचे थोडे जाड कार्ड वापरणे सोयीस्कर असते. साधारण कागदपेक्षा जाड असलेले कार्ड जास्त काळ टिकते. कार्डवर कोणताही क्रमांक न घालता शक्यतो एकाच बाजूवर टिपण लिहावे. एका कार्डवर एकच मुद्दा घेतल्यास कार्डची जुळवाजुळव करणे सोपे जाते. संदर्भ देण्यासाठीच्या आवश्यक नोंदी उदा. संदर्भ ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, पृष्ठ क्रमांक इत्यादी हे कार्डवर ठराविक जागेवर नोंदवावेत. कार्डच्या वरच्या भागात मध्यावर त्याविषयाची अथवा मुद्द्याची माहिती लिहावी की ज्यामुळे कार्डची जुळवाजुळव करणे सोपे होईल. ग्रंथातील आवश्यक वाटणारी वाक्ये ही कार्डच्या मागील बाजूला टिपून घेता येतात. दीर्घकाळ टिकणारी आणि सोयीस्कर असलेली कार्ड पद्धत संशोधकांत जास्त प्रमाणात प्रचलित आहे.

### ३) टिपणांचे वर्गीकरण

टिपणे काढून झाल्यानंतरचा टप्पा हा टिपणांच्या वर्गीकरणाचा असतो. टिपणांचे वर्गीकरण हे कालक्रमानुसार, विषयानुसार, स्थळानुसार आणि संदर्भ ग्रंथ लेखकाच्या आद्याक्षरानुसार अशा चार पद्धतींनुसार केले जाते.

टिपण बनवण्याचे तंत्र संशोधकाने व्यवस्थितपणे आत्मसात केल्यास संशोधकाचे काम सोपे होते.

## ब) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Bibliographic Software)

इतिहास संशोधनात संदर्भाचे जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व संदर्भसूचीला आहे. संशोधकाने कोणते संदर्भ ग्रंथ अभ्यासले किंवा वापरले आहेत? कोणत्या लेखकाचे कोणते ग्रंथ अभ्यासले आहेत? कोणता ग्रंथ केंव्हा आणि कोणी प्रकाशित केला? ग्रंथाची कितवी आवृत्ती वापरली आहे? कोणत्या

मासिकातील किंवा संशोधन पत्रिकेतील लेख आहे? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नाची उत्तरे संदर्भ सूची पहिल्यानंतर मिळतात. संदर्भ ग्रंथसूची ही संशोधकीय लेखाच्या अथवा ग्रंथाच्या शेवटी दिली जाते. लेखकाच्या आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानुसार ग्रंथांची सूची दिली जाते.

संदर्भग्रंथसूची देण्याच्या विविध पद्धती आहेत. वेगवेगळ्या प्रकाशकांना, संशोधन पत्रिकांना वेगवेगळ्या प्रकारे संदर्भ ग्रंथसूची हवी असते. संशोधकाला पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या प्रकारची संदर्भ ग्रंथसूची बनवणे अवघड आणि वेळखाऊ काम वाटते. मूळात एखाद्या संशोधनाची सुव्यवस्थित संदर्भ ग्रंथसूची बनवणे हे अत्यंत कष्टाचे, काळजीपूर्वक करण्याचे आणि वेळखाऊ काम असते. ग्रंथ प्रकाशन विश्वात वाढ झाली आहे, त्याच प्रमाणे इंटरनेटमुळे देखील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे सर्व संदर्भ सुव्यवस्थितपणे जुळवणे आणि त्यांची संदर्भ ग्रंथसूची बनवणे हे कठीण होत आहे.

सध्याच्या या बदलणाऱ्या परिस्थितीत तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संशोधकाच्या मदतीला संदर्भ सूचीसाठीचे सॉफ्टवेअर आले आहे. बिब्ल्योग्राफिकल सॉफ्टवेअर म्हणून ओळखली जाणारी ही सॉफ्टवेअर संदर्भ ग्रंथसूची बनवण्यासोबतच संशोधकाला आणखी बरीच मदत करतात. संदर्भ सूची सॉफ्टवेअरचे तीन मुख्य उपयोग पुढील प्रमाणे आहेत.

१) हे सॉफ्टवेअर संशोधकाला त्याच्या संदर्भांची व्यवस्थितपणे जुळवणी करण्यास मदत करते. विषयवार, विभागवार संदर्भांची जुळवणी करणे आणि संदर्भांना शोधणे सोपे होते.

२) हे सॉफ्टवेअर संशोधकांसाठी संदर्भ ग्रंथसूची आणि तळटीपा बनवते. त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीने संदर्भ ग्रंथसूची अथवा तळटीपा द्यायच्या असल्या तरी या सॉफ्टवेअरच्या मदतीने त्या तत्काळ देता येतात.

३) हे सॉफ्टवेअर संशोधकाला त्यांच्या जवळ माहितीच्या साठवण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. संशोधकाला त्या माहितीच्या साठ्यात स्वत:ची माहिती साठवता येते. त्यामुळे संशोधकाला इंटरनेटद्वारे जगात कोठेही असताना त्याचे संदर्भ वापरता येतात.

Endnote and End Note Web, Mendeley, Ref Works, Zotero ही काही प्रचलित संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Bibliographic Software) आहेत.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ज्या संशोधकांना संक्षिप्त स्वरुपात माहिती नोंदवण्याचे तंत्र माहित नसते त्यांना कोणती पद्धत उपयुक्त असते?

२) टिपणे काढण्याची कोणती पद्धत संशोधकांत जास्त प्रमाणात प्रचलित आहे?

३) कार्ड पद्धतीत जाड कागद का वापरतात?

४) कशामुळे माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे ?

५) Mendeley आणि Ref Works ही काय आहेत ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) योग्य पद्धतीने काळजीपूर्वक बनवलेली ............ ही संशोधकाला अत्यंत उपयुक्त ठरतात.

२) संक्षिप्त टिपणांमुळे तळटीपा आणि ................ बनवण्याचे काम सोपे होते.

३) ................ तंत्र संशोधकाने व्यवस्थितपणे आत्मसात केल्यास संशोधकाचे काम सोपे होते.

४) ........... च्या प्रगतीमुळे संशोधकाच्या मदतीला संदर्भग्रंथसूचीसाठीचे सॉफ्टवेअर आले आहे

५) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर संशोधकांसाठी संदर्भ ग्रंथसूची आणि ................ बनवते.

## ४.२.४ वस्तुसंग्रहालयामार्फत इतिहासाचे प्रस्तुतीकरण/प्रतिनिधीत्व (Representing History Through Museum)

ज्ञानाचा परीघ वाढविण्यासाठी अथवा इतिहासाचे वेगळ्या दृष्टीकोनातून आकलन करून घेण्यासाठी वस्तुसंग्रहालये मदत करतात, सहाय्य करतात. इतिहासातील कच्चे दुवे भरून काढण्यासाठी महत्वाचे कार्य करतात. आदिम काळापासून समाजात घडत गेलेले नव-नवीन बदल हे संग्रहालयातील प्रदर्शित वस्तूंच्या माध्यमातून प्रतित होतात. संग्रहालयातील प्रत्येक वस्तू, त्या-त्या काळाचा इतिहास प्रतिपादित करते, त्या इतिहासाचे प्रतिनिधीत्व करते. वस्तूच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व कलाविषयक प्रगतीचे, बदलाचे, संक्रमणाचे टप्पे समजून घेण्यास मदत होते. आधुनिक व भौतिकवादी जीवनशैलीचे जीवन व्यतीत करताना इतिहासाशी आपली नाळ कायम करण्याचा अथवा जोडण्याच्या दृष्टिकोणातून ही संग्रहालये आपणास मदत करतात. प्रस्तुत उपघटकात आपण संग्रहालयामध्ये ज्या विविध प्रकारच्या वस्तू प्रदर्शित केलेल्या असतात, त्या आपला इतिहास कशा प्रकारे सांगतात किंवा त्या-त्या काळातील इतिहासाचे कशा प्रकारे प्रतिनिधीत्व करतात; त्यामधून आपणास इतिहास कसा समजून घेऊ शकतो याचा आढावा घेणार आहोत.

### १) संग्रहालयांचे कार्य व भूमिका :-

संग्रहालयाचे पारंपारिकपणे मुख्य कार्य म्हणजे वस्तू गोळा करणे, त्यांचे जतन व संवर्धन करणे, त्यांचे संशोधन करणे, प्रदर्शित करणे या तत्वावर आधारीत आहे. एका विशिष्ठ काळातील किंवा देशातील किंवा

समाजाच्या एखादा ठराविक घटक डोळ्यासमोर ठेवून त्याच्याशी निगडीत वस्तूंचे संकलन, जतन व संवर्धन करून त्याचे प्रदर्शन करणे ते जनसामान्यापर्यंत पोहोचवणे हे प्रमुख लक्ष्य मानले जाते. प्रदर्शनाच्या माध्यमातून अध्यापन, अध्ययन व पर्यटनांच्या माध्यमातून लोकशिक्षण व मनोरंजन केले जाते. अलिकडच्या काळात संग्रहालयांची संख्या झपाट्याने वाढते आहे. विशेषत: संकल्पना (थिम) अथवा विशेष विषय अध्यापन किंवा पुस्तकामधल्या इतिहासापेक्षा संग्रहालयामधून प्रदर्शित होणारा इतिहास 'सार्वजनिक इतिहास' म्हणून ओळखला जातो.

## २) वस्तूसंग्रहालयाची बदलती संकल्पना आणि इतिहासाचे प्रतिनिधीत्व :-

नानाविध वस्तूंचा संग्रह ज्या ठिकाणी केलेला असतो, त्या ठिकाणाला सामान्यत: संग्रहालय म्हणून संबोधले जाते. मानव समाजप्रिय आणि संग्रहप्रिय प्राणी आहे. मानवाच्या या संग्रह करण्याच्या प्रवृत्तीचा प्रारंभ आदिमानव काळापासून चालू झालेला दिसतो. प्रथम तो अन्नाचा संग्रह करू लागला, त्यानंतर हत्यारे, प्राणी, वनस्पती, बी-बियाणे, वृक्ष, निसर्गातील चमत्कारिक वस्तूंचा संग्रह करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. काळानुरूप त्यात बदल होवून यातूनच पुढे 'वस्तू संग्रहालय' या संकल्पनेचा उदय व विकास झाला. संग्रहालयाची ही बदलती भूमिका अथवा संकल्पना ते समकालीन इतिहासाचे प्रतिनिधीत्व अशी आहे. 'अद्भूत वस्तूंचा संग्रह' या खाजगी स्तरावरील नामाभिधानापासून सुरुवात होऊन १६८३ मध्ये 'ऑक्सफोर्ड' येथे सुरू झालेल्या 'अॅश्मोलियन म्युझियम' पर्यंत संग्रहालयाची सार्वजनिक वाटचाल झाली आहे.

१९४६ मध्ये 'आयकॉम'ची (International Council of Museum) स्थापना झाली आणि संग्रहालयाचे वर्णन अथवा स्वरूप 'लोकाच्या आस्वादासाठी व प्रबोधनासाठी प्रदर्शन करणारे' असे करण्यात आले. यामध्ये ऐतिहासिक वस्तू, पारंपारिक कला व पुरातत्व शास्त्रीय संग्रहालयाव्यतिरिक्त हस्तकला, औद्योगिक कला, विज्ञान व तंत्रज्ञान, नैसर्गिक विज्ञाने, वैद्यकीय इतिहासाबरोबरच विशिष्ठ व्यक्ती व घटनाविषयीच्या संग्रहांनादेखील संग्रहालयाचा दर्जा देण्यात आला. १९७० च्या दशकात 'इकोम्यूझियम', १९८० च्या दशकात 'न्यू म्युझियम' या संग्रहालयातील नवीन संकल्पना पुढे झाल्या की, ज्या पारंपारिक संग्रहालयापेक्षा वेगळ्या होत्या. त्यामुळे संग्रहालये वस्तूकेंद्रीऐवजी, 'अभ्यासकेंद्री' झाली. गेल्या दशकभरात 'म्यूझियम ऑफ आयडियाज' ही संग्रहालयशास्त्रात नवीन संकल्पना उदयास आलेली आहे. या संकल्पनेत सादरीकरणासाठी वस्तूंचा वापर केला जात नाही.

लॉस ऐंजिल्समधील 'म्युझियम ऑफ टॉलरन्स' हे वस्तूंचे नव्हे तर एका कल्पनेभोवती उभारलेले संग्रहालय आहे. 'हॉलोकास्ट' (ज्यूंची दुसऱ्या महायुद्धातील आम कत्तल) या कल्पनेभोवती साकारलेले हे संग्रहालय समकालीन समाजातील असहिष्णूतेवर प्रकाशझोत टाकते व त्याच्या प्रसाराचा प्रतिकार करण्याची गरज प्रतिपादीत करते. लॉस ऐंजिल्समधील हे संग्रहालय तेथील वांशिक अल्पसंख्यांक, स्त्रिया, एड्सग्रस्त

व नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना सहन कराव्या लागणाऱ्या सामाजिक विषमतांना वाचा फोडते. ऐतिहासिकता व समकालीन समस्यांच्या प्रतिनिधीत्वांचा मिलाफ साधण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. ऐतिहासिक घटनांच्यावर आधारीत मात्र कोणत्याही प्रकारच्या वस्तू अथवा साधनांचा वापर न करता शीख धर्माचा उदय व मुघलांच्याकडून शीखांची झालेली कत्तल या संकल्पनेवर आधारित नांदेड येथील गुरुद्वारामध्ये उभारलेले दृश्यसंग्रहालय उत्तम उदाहरण आहे. मुंबईमधील 'कृष्ठरोग' या विषयावर आधारित 'अॅक्कर्म लेप्रसी म्युझियम' की ज्यामधून आपल्याला मानवी स्वभावाचे दोन पैलू पहावयास मिळतात. एकीकडे कुष्ठरोग्यावर लादला जाणारा बहिष्कार व दुसरीकडे या रोगावर केला जाणारा उपाय शोधण्यासाठी चाललेले प्रदीर्घ प्रयत्न पहावयास मिळतो. या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून आधुनिक मानवी समस्या व समकालीन इतिहासाची अभासादृश्य वास्तव प्रतिमा दृष्टीपथास पडते. संग्रहालयांच्या माध्यमातून पारंपारिक सादरीकरणाच्या तंत्राबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कोणत्याही वस्तूंच्याशिवाय अशा प्रकारचे संकल्पना संग्रहालय ज्यामध्ये विविध ऐतिहासिक व समकालीन समस्या हाताळून ऐतिहासिक विषयांचे प्रतिनिधीत्व केले जाते आहे. लंडन येथील संग्रहालयात २००६-०७ मध्ये 'लंडनचे शरणार्थी' या संकल्पनेवर आधारित प्रदर्शनाने 'शरणार्थी' या संकल्पनेला आव्हान दिले आणि त्यांनी त्यांच्या स्वत:च्या आवाजाद्वारे गमावलेल्या आणि उपलब्धतेच्या वैयक्तिक कथा शोधल्या. हा त्यांचा मौखिक इतिहास आविष्कार एका प्रदर्शनातून प्राप्त केलेला होता.

शहर संग्रहालय व ग्राम संग्रहालये विकसित होत आहेत. २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून अनेक लोकांनी स्थलांतर सुरू केले आहे. शहरी संग्रहालयातून शहरी आयुष्यातील लोकप्रिय मात्र हरवलेल्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचे संक्रमण ही याची मुख्य संकल्पना (थिम) होती. शहरी जीवनातील सामान्य लोकांच्या जीवनाचे प्रदर्शन करण्यासाठी 'खालून इतिहास' (History from below) हा दृष्टिकोण होता. तर ग्रामीण भागातून शहरी भागात झालेले स्थलांतर व त्यातून ग्रामीण जीवनाचा ऱ्हास अथवा औद्योगिकीकरणाचा फटका म्हणून ग्राम उद्योगांचा (बलुतेदार-आलुतेदारीवर आधारित) ऱ्हास अथवा एकूणच ग्रामीणऱ्हाट दाखविण्यासाठी उभारलेली ग्रामसंग्रहालये जसे की सिद्धगिरी ग्रामजीवन संग्रहालय, प्राचीन कोकण ग्राम संग्रहालय, रत्नागिरी हे या ग्राम जीवनाचे प्रतिनिधीत्व करते.

## ३) स्मारक संग्रहालये : इतिहास पुरुषांचे दृश्य चित्रण

इतिहास पुरुषांचे कार्य मानवाला प्रेरणा व राष्ट्रभक्तीची ओळख करून देणारे असते. जागतिक स्तरावर असो अथवा भारतात विविध क्षेत्रातील कर्तृत्वान इतिहास पुरुषांच्या अथवा स्त्रियांच्या जीवन कार्याचा वेध घेणारी संग्रहालये उभारलेली आहेत. त्या संग्रहालयामधून त्या व्यक्तीचा संपूर्ण जीवनपटच उलगडून दाखविलेला असतो. त्या व्यक्तीच्या जीवनकार्याशी संबंधित अनेक वस्तू संग्रहालयात प्रदर्शित असतात आणि त्या वस्तू त्या व्यक्तीच्या कार्याची साक्ष तर देतातच त्याचबरोबर त्यांच्या कार्याची ओळख करून देतात. त्या वस्तूच्या माध्यमातून त्या व्यक्तीचे जीवन कार्य समजून घेण्यास व त्यांच्या जीवन कार्याचा वेध

घेण्यासाठी ही स्मारक संग्रहालये महत्त्वाचे कार्य करतात. त्या-त्या व्यक्तीच्या कार्यासोबतच तत्कालीन समाजकारण, राजकारण, धर्मकारण, सांस्कृतिक जीवनाचे ते प्रतिनिधीत्व करतात.

महात्मा गांधीच्या जीवनावर आधारीत अनेक संग्रहालये भारतात आहेत, यामध्ये मणिभवन मुंबई, वर्धा, दिल्ली, पुणे, साबरमती गुजरात, कलकत्ता इ.चा समावेश होतो. या संग्रहालयातील प्रत्येक वस्तू ही महात्मा गांधींच्या कार्याची साक्ष तर देतेच त्याचबरोबर तत्कालीन इतिहासाचे प्रतिनिधीत्वही करते. शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय, खांडेकरांचे साहित्यिक जीवन चरित्रच आपल्यासमोर या संग्रहालयाच्या माध्यमातून सचित्र उभे करते. त्या-त्या व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत वस्तू त्या काळाचे व तत्कालीन इतिहासाचे प्रतिनिधीत्व करतात व त्यामधून तत्कालीन इतिहासाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालय सातारा येथील संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या मोडी कागदपत्रावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या हाताचा ठसा व वाघनखे पाहिली की, आपल्या डोळ्यासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र व अफजलखान वधाचा प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. तर न्यू पॅलेस (शहाजी छत्रपती वस्तू संग्रहालय) मधील राजर्षी शाहू महाराजांचाचे विविध पोषाख पाहिल्यानंतर त्यांच्या शरीरयष्टीची आपणास प्रचिती येते. पर्यटक त्याची प्रत्यक्ष अनुभूती घेतो, अशी खूप उदाहरणे सांगता येतील. राणा प्रताप म्युझियम (उदयपूर), सरदार वल्लभभाई पटेल म्युझियम (सुरत), टिपू सुलतान म्युझियम (श्रीरंगपट्टण), नेहरू मेमोरियल म्युझियम (नवी दिल्ली), महात्मा फुले स्मारक संग्रहालय (पुणे), भाऊदाजी लाड संग्रहालय (मुंबई), रविंद्रनाथ टागोर म्युझियम (कलकत्ता) इत्यादींचा उल्लेख करता येईल.

### ४) मानवशास्त्र संग्रहालये : मानवी उत्क्रांतीचा आलेख :-

आपण कुठून आलो, कसे आलो, आपले पूर्वज कोण होते, ते कसे जगले या सगळ्या विषयीचे प्रतिबिंब मानवशास्त्र संग्रहालयामधून दृष्टीपथास पडते. मानवाची उत्क्रांती व विकास कशा पध्दतीने झाला, तो अन्नासाठी शिकार कशी करू लागला, अन्नसंग्रह करण्याची पध्दती, लाकडून आणि हाडे यापासून शस्त्र बनविण्याची कला, सामाजिक, धार्मिक प्रथा, परंपरा, रूढीचे प्रतिबिंब पहावयास मिळते. मानव शास्त्रज्ञ व पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी 'होमोसेपियन' ही पहिली मानव प्रजात शोधून काढली, तेव्हापासून ते पुढे जगातील मानवाची वर्गवारी विविध वंश व गटामध्ये केली गेली. जीवाच्या उत्पत्तीपासून ते आधुनिक कालखंडापर्यंत मानवी विकासाचे टप्पे व स्थित्यंतरांचा सचित्र कालपट आपणास विविध प्रकारचे मानवी सांगाडे, हाडे, कवठ्या, हत्यारे, अवजारे, वस्तू, अलंकार, भांडी, गृहाचित्रे व इतर अनेक वस्तूंच्या माध्यमातून दृष्टीपथास येतो. नागपूर येथील क्षेत्रीय मानव विज्ञान संग्रहालय, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील मानवंशशास्त्र संग्रहालय, डेक्कन विद्यापीठ येथील मानववंशास्त्र विषयक दालन याचे उत्तम उदाहरण आहे. भारतातील अनेक पुरातत्व संग्रहालयामध्ये मानवी विकासाचे अनेक टप्पे व तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाशी संबंधीत वस्तू तत्कालीन मानवी विकासाचे टप्पे प्रदर्शित करतात.

## ५) युध्देतिहासाचे चित्रण : शस्त्रास्त्र/संरक्षण संग्रहालये :-

मानवी विकासाच्या विविध टप्प्यामध्ये अग्नीचा शोध, धातूचा शोध, चाकाचा शोध व विविध शस्त्रास्त्रांचा शोध हा मानवाने स्वत:च्या विकासासाठी व संरक्षणासाठी केलेला दिसतो. प्रागैतिहासिक काळापासून ते पहिल्या-दुसऱ्या महायुद्धापर्यंत अनेकविध प्रकारची हत्यारे व शस्त्रास्त्रे मानवाने विकसित केली. अगदी दगडी हत्यारे ते विमानभेदी क्षेपणास्त्रापर्यंत शस्त्रास्त्राचा विकास म्हणजे मानवाचे स्वत:चे ते राष्ट्र संरक्षणापर्यंतच्या संकल्पनेचा कष्टसाध्य प्रयत्न आहे. रणक्षेत्र, युध्दकला, डावपेच, रणनिती व त्यातून निर्माण झालेली विविध प्रकारची वैशिष्ठ्यपूर्ण शस्त्रास्त्रे, सर्वसामान्य प्रेक्षक ते इतिहास अभ्यासकापर्यंत प्राचीन काळापासूनच्या युद्धशास्त्रावर आधारित विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी त्याला संग्रहालयातील विकास शोधावयाचा असेल तर भारतीय, पोलीस दलाचे प्रतिनिधीत्व करणारे 'सेंट्रल पोलीस म्युझियम' नवी दिल्ली याचे उदाहरण देता येईल.

## ६) कला संग्रहालये : कलेचा दृश्य इतिहास :-

मानवाने प्राचीन काळापासून कलेमध्ये अभिरूची दाखविलेली दिसते. किंबहुना कला हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग होता. दृश्यात्मक इतिहास (गुहाचित्रे) हा मौखिक इतिहासापेक्षा अधिक प्राचीन आहे. मानवी इतिहासाच्या उगमापासून सामाजिक स्मृतींच्या जडणघडणीवर व उत्क्रांतीवर दृश्यकलेचा मोठा प्रभाव राहिलेला आहे. पुराश्मयुगात शिकार व कंदमूळावर जगणाऱ्या समूहांनी त्यांच्या भावना, दिनचर्या, इच्छा किंबहुना आपले जीवनच गुहामधील चित्रकलाकृतीतून प्रकट केलेले दिसते. शिकार, बळी चढविणे, अंत:संस्कार इत्यादी सामूहिक कृत्यांचे रेखाटन करणारे त्यांचे भावविष्कार हे पुरातत्वीय वस्तूंच्याबरोबरच त्या समाजांचे आपले आकलन अधिक वृध्दिंगत करतात.

ताम्रपाषाण युग ते पुढे पूर्वमध्ययुग काळापर्यंतचे विविध कलाविष्कार जसे की चित्रकला, मूर्ती कला, नक्षी कला, हस्तकला आदिवासी कला, रेखाटन, रंगरंगोटी ते तत्कालीन बहुतांश निरक्षर समाजाचे ऐतिहासिक दस्तऐवजच म्हणावे लागतील. इजिप्त, मेसोपोटेमियम, हडप्पा संस्कृतीमधील दृश्यकला तत्कालीन समाजाचे प्रतिनिधीत्व करतात आणि हे सर्व आपणांस संग्रहालयाच्या माध्यमातून पहावयास मिळते. प्राचीन काळापासून मौखिक व इतर परंपरासोबत सार्वजनिक इतिहासाचे एक महत्त्वाचा घटक म्हणून दृश्यकलेकडे पाहिले जाते. आदिम समाजाच्या इतिहासाचे प्रतिनिधीत्व या दृश्यकलामधून होते.

भारतातील नव्हे तर जगभरातील विविध संग्रहालयांच्यामधून प्राचीन ते आधुनिक कालखंडातील पाषाण, पंचधातू, काष्ठ, हस्तीदंती शिल्पाकृती प्रदर्शित झालेल्या दिसतात. यातील बहुतांश शिल्पाकृती अथवा मूर्ती या विविध देव-देवतांचे प्रतिनिधीत्व करतात तर काही शिल्पाकृती विविध कलाविष्कार प्रदर्शित करतात. उदा. सूर-सुंदरी, पशु-पक्षी, कामशिल्पे इत्यादी या शिल्पाकृती केवळ देव-देवता अथवा सुंदर कलाकृती इथपर्यंतच याचे महत्व नसून या कलेच्या माध्यमातून तत्कालीन धार्मिक प्रथा, परंपरा, रूढी,

संकेत, प्रतिके, अलंकार, वस्त्र प्रावरणे, पशुपक्षी, वाहने, आयुधे याचे प्रतिनिधीत्व करतात. त्याचप्रमाणे कलेचे जे विविध प्रकार अथवा संप्रदाय उदयास आले त्याचेही हे प्रतिनिधीत्व करतात जसे की, गांधारशैली, मथुराशैली, नागर, वेसर इत्यादी.

## ७) सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे प्रतिबिंब :-

समाज, संस्कृती व धार्मिक जीवनाच्या पाऊलखुणांचा शोध घेताना इतर अनेक साधनांच्या इतकीच महत्त्वाची ठरतात ती वस्तूसंग्रहालये. संग्रहालयांच्यामध्ये प्रागैतिहासिक काळापासूनच्या मानवी समूहाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हजारो वस्तू वस्तूसंग्रहालयात प्रदर्शित असतात. तत्कालीन मानवी समूहाच्या विकासाशी संबंधित मातीची भांडी, हत्यारे, शस्त्रे, हाडाचे सापळे, मृदभांडी, शिक्के, मूर्त्या, अग्निकुंडे, मृण्मय मूर्त्या, प्रतिमा, अलंकार, सौंदयप्रसाधनांची साधने, करमणुकीच्या वस्तू/साधणे, कोरलेले शिक्के, शिकारीची गुहा चित्रे, वजनमापे, मणी, काचेच्या वस्तू, नाणी अशा कितीतरी वस्तू सांगता येतील. मानवाला अक्षरज्ञान होण्याच्या अगोदरपासून ते आजतागायत अनेक लिखित अलिखित पुरावे तत्कालीन मानवी समाज, संस्कृती व धार्मिक जीवनाचे पुरावे संग्रहालयात प्रदर्शित असतात हे पुरावे या वस्तूंच्या माध्यमातून तत्कालीन स्थितीचे प्रतिनिधीत्व करतात.

आदिवासी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शेकडो वस्तू, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, गुजरात, आंध्र प्रदेश या राज्यातील आदिवासी संग्रहालयामधून पहावयास मिळतात. मध्य भारतातील आदिवासांच्या सांस्कृतिक भिन्नतेचे प्रतिनिधीत्व करणारे भोपाळ येथील आदिवासी संग्रहालय, महाराष्ट्रातील 'वारली', 'भिल्ल', साताऱ्याची 'कथोडी', यवतमाळचे 'कोलाम' या आदिवासाची सामाजिक जीवनाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हजारो वास्तू पुणे, नागपूर येथील संग्रहालयात आहेत. छत्तीसगडमधील 'अणु झमडिया' (बस्तर) मध्य भारतातील 'कमार' व 'पहाडी', 'कोरवा' इत्यादी जमातीचे लोकजीवन नागपूर येथील संग्रहालयात सूक्ष्मपणे पहावयास मिळते. वस्तूशिवाय पर्याय नाही. कारण त्या-त्या काळातील हत्यारे व शस्त्रास्त्रे तत्कालीन कालखंडाने प्रतिनिधीत्व करतात. संग्रहालयात प्रदर्शित केलेली विविध कालखंडातील शस्त्रास्त्रे तत्कालीन मानवाचे विज्ञान व तंत्रज्ञानातील ज्ञान व अभ्यास, युध्दशास्त्रविषयक ज्ञान व आकलन समजून घेण्यास मदत करते. किंबहुना तत्कालीन युध्दपरिस्थितीचे व मानवाच्या संरक्षण सिध्दतेचे एक आभासी चित्र उभे करते.

प्राचीन भारतातील विविध हत्यारे, पशू-पक्षी, वाहने व युध्द परिस्थितीचे चित्र पहावयाचे झाल्यास संग्रहालयातील 'वीरगळ' हे उत्तम उदाहरण आहे. कोकणातील वीरगळाच्या मधून प्राचीन भारतीय नावीक परंपरेचा इतिहास समजण्यास मदत होते. त्याप्रमाणे भारताच्या विविध भागात सापडलेल्या वीरगळाच्यामधून तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या धार्मिक प्रथा, रूढी, परंपराचे प्रतिनिधीत्व यामधून पहावयास मिळते.

भारतातील सर्वच संग्रहालयात कमी-अधिक प्रमाणात प्राचीन ते आधुनिक कालखंडातील शस्त्रास्त्राचे दालन पहावयास मिळते. मुघल कालीन तलवारीचे शेकडो प्रकार बडोद्याच्या प्रताप शस्त्रागारात पहावयास मिळतात. या तलवारीचे विविध प्रकार मुघल काळात प्रचलित युध्दशास्त्राचे चित्र निर्माण करतात. आपणास जर भारतीय रणगाड्यांच्या विकासाचे चित्र पहावयचे असेल तर अहमदनगर येथील रणगाड्याचे संग्रहालय उत्तम उदाहरण आहे. हे संग्रहालय भारतीय रणगाड्याच्या विकासाचे प्रतिनिधीत्व करतात. त्याचप्रमाणे भारतीय हवाई दलाचा इतिहास प्रत्यक्ष अनुभवायाचा असेल तर 'एअर फोर्स म्युझियम', पालम हे त्यांचे उत्तम उदाहरण ठरू शकेल. भारतीय पोलीस दलाचा उदय व केवळ या वस्तू संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या आहेत, इथपर्यंत त्याचे महत्त्व राहत नाही, तर त्या वस्तूंना समकालीन इतिहासाचे संदर्भ असतात, समकालीन जीवन त्यामधून प्रतिबिंबीत होते. या वस्तूंच्या माध्यमातून आदिवासी जीवनाशी निगडीत विविध प्रथा, परंपरा, रूढी, आचार-विचार, कला, धार्मिक जीवन समजून घेण्यास मदत होते. वारली चित्रकलेची परंपरा व महत्त्व या संग्रहालयांच्या माध्यमातून जगाच्यासमोर आलेले दिसते.

वैदिक काळातील धार्मिक जीवनाचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा वैदिक संस्कृतीमध्ये असलेले अग्नी व यज्ञाचे महत्त्व विविध ग्रंथातून वाचावयास मिळते, मात्र ही वैदिक काळातील ही यज्ञपध्दती नेमकी कशी होते, यज्ञ कसे करायचे. त्यासाठी कोणकोणते साहित्य वापरले जायचे, त्याचे प्रकार व नावे आपणास पुणे येथील यज्ञीय वस्तू संग्रहालयातून दृष्टीपथास येते. त्या संग्रहालयातील एक-एक वस्तू वैदिक यज्ञीय पध्दतीचे प्रतिनिधीत्व करते.

प्राचीन काळापासून भारतात प्रचलित असलेली सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेली 'तांबूल' परंपरा राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या मधून प्रतित होते. केवळ पान खाणे किंवा चैनीचा भाग म्हणून याला महत्त्व नाही तर या दालनात प्रदर्शित केलेल्या विविध वस्तूंच्यामधून 'तांबूल' परंपरेशी निगडीत तत्कालीन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व पौराणिक आशय व संदर्भ या वस्तूंच्यामधून ध्वनित होतात या घटकांचे या वस्तू प्रतिनिधीत्व करतात. भारतात प्राचीन काळापासून संगीत, वादनांची व नृत्यांची दीर्घ परंपरा आहे. या परंपरेतून वाद्याचे अनेक प्रकार प्राचीन ते आधुनिक कालखंडापर्यंत निर्माण झाले. विविध प्रकारचे सूर वाद्य, तालवाद्य, ज्यामध्ये चर्मवाद्य, धातू वाद्य, काष्ठ वाद्य यांचा समावेश होतो. या सर्व वस्तू राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या दालनात या परंपरेचे प्रतिनिधीत्व करतात. परंपरा व लिखित पुरावे जितके महत्त्वाचे असतात तेवढेच हे दृशय पुरावे त्यांची साक्षात अनुभूती देवून जातात. भारतीय संगीत परंपरेचे ते प्रतिनिधीत्व करतात.

प्राचीन ते आधुनिक कालखंडात भारतातील स्त्री जीवनाशी संबंधित व रूढी-परंपरांचा व धार्मिक जीवनाशी संबंधित असलेली 'सती प्रथा'. सती प्रथा ही एक वाईट प्रथा होती त्या विरोधात इंग्रजांनी कायदा केला याचा अभ्यास आपण पुस्तकातून करतो त्याच बरोबर भारतातील अनेक संग्रहालयातून या सती प्रथेचे प्रतिनिधीत्व करणारे सतीचे दगड अथवा सती शिळा हे एक उत्तम उदाहरण आहे. केवळ सतीशिळा इतकेच

या वस्तूला महत्त्व नाही तर या दगडाच्या माध्यमातून तत्कालीन स्त्री जीवनाशी निगडीत सामाजिक मानसिकतेवर प्रकाश पडतो. सती गेलेल्या स्त्रीयांचे प्रतिनिधीत्व त्याचा इतिहास यामधून प्रतित होतो. या सती शिळेप्रमाणेच धर्माच्या, गावच्या, जनावरांच्या अथवा एखाद्या युध्दात शौर्य गाजवून धारातीर्थी पडलेल्या योध्याचे चिरस्मरण राहण्यासाठी कोरलेला 'वीरगळे' ही तितकाच महत्त्वाचा आहे. संग्रहालयापासून ते कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक गावात हा पहावयास मिळतो. हा प्रत्येक वीरगळ त्या-त्या शूरवीराचे प्रतिनिधीत्व करतो, त्याचा इतिहास त्यातून प्रतीत होतो.

कोल्हापूर वस्तूसंग्रहालयात असलेली 'पोसायडन' ही शिल्पाकृती केवळ एक कलाकृती म्हणून प्रतीत होत नाही तर यामधून ग्रीक धार्मिक संदर्भ, ग्रीक-रोमणांचे भारतीयांशी असलेले व्यापारी संदर्भ व समुद्राशी संबंधीत पौराणिक संदर्भ घेवून आपल्यासमोर येते. या शिल्पाकृतीचे एक शिल्प म्हणून जेवढे महत्त्व आहे तेवढेच राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक या दृष्टीकोणातूनही आहे. या सर्व घटकांचे हे शिल्प प्रतिनिधीत्व करते.

स्कॉटलंडचे राष्ट्रीय संग्रहालय, स्कॉटलंडची कथा, त्याची जमीन, तिथले लोक आणि संस्कृतीचीच कथा सांगते. स्कॉटलंडच्या इतिहासाचे प्रतिनिधीत्व करते. मेकिंग द मॉडर्न वर्ल्ड गॅलरी मधील विज्ञान संग्रहालय १७५० पासून ते आजच्या काळापर्यंत औद्योगिकीकरणाचा इतिहास व संस्कृती कथन करते. तसे पुणे येथील महात्मा फुले औद्योगिक संग्रहालय, भारतातील विज्ञान-तंत्रज्ञानातील बदलाचा व समाज परिवर्तनाचा इतिहास कथन करते.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४

### अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) संग्रहालयाचे मुख्य कार्य ........... व .......... करणे हे आहे.

२) ऑक्सफोर्ड येथे ............ वर्षी ॲश्मोलियन म्युझियम सुरू झाले.

३) इ.स. १९८० च्या शतकात ............... ही संग्रहालयातील नवीन संकल्पना पुढे आली.

४) मणिभवन मुंबई येथील संग्रहालय .......... व्यक्तीच्या जीवनावर आधारीत आहे.

५) प्रताप शस्त्रागर ............ येथील संग्रहालयात आहे.

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) संग्रहालयामधून प्रदर्शित होणाऱ्या इतिहासाला कोणता इतिहास म्हणतात?

२) 'आयकॉम'ची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

३) इको म्युझियमची संकल्पना कोणत्या दशकात झाली?

४) सेंट्रल पोलिस म्युझियम कोणत्या शहरात आहे?

५) अहमदनगर येथे कोणते संग्रहालय आहे?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **डिजिटल माहिती :** संगणक अथवा तत्सम माध्यमात साठवता येणारी माहिती.
- **डिजिटल लायब्ररी :** स्कॅन केलेल्या ग्रंथांची सुविधा देणारे युक्त ग्रंथालय.
- **संदर्भ ग्रंथसूची :** संशोधनात वापरलेल्या ग्रंथांची सूची.
- **तळटीप :** संशोधनातील एखाद्या संदर्भाची, त्याच पृष्ठावर, खालच्या बाजूस, दिलेली माहिती.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** १) छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून.

२) भावी पिढ्यांसाठी.

३) तीन.

४) अभिलेख पटल.

५) राजवाडे संशोधन मंडळ.

**ब)** १) माहिती तंत्रज्ञाना.

२) डिजिटल माहिती.

३) डिजिटल अर्काइव्ह.

४) भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट.

५) डिजिटल लायब्ररी.

### ❑ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** १) मुक्त मुलाखत आणि संरचित मुलाखत असे दोन प्रकार.

२) तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते.

३) मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास.

४) संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रहदूषितपणाची.

५) त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या.

**ब)** १) मौखिक परंपरा.

२) लिखित.

३) मुलाखतपद्धत.

४) वस्तुनिष्ठ.

५) चिकित्सात्मक.

❑ **स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे**

**अ)** १) वह्यांतून संदर्भ ग्रंथांचे टिपण पद्धत.

२) कार्ड पद्धत.

३) जास्त काळ टिकतो म्हणून.

४) इंटरनेटमुळे.

५) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर.

**ब)** १) टिपणे.

२) संदर्भ ग्रंथसूची.

३) टिपण बनवण्याचे.

४) तंत्रज्ञाना.

५) तळटीपा.

❑ **स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-४ ची उत्तरे**

**अ)** १) जतन व संवर्धन.

२) १६८३.

३) न्यू म्युझियम.

४) महात्मा गांधी.

५) बडोदा.

**ब)** १) सार्वजनिक इतिहास.

२) १९६६.

३) १९७०.

४) नवी दिल्ली.

५) रणगाड्याचे संग्रहालय.

## ४.५ सारांश

इतिहास संशोधन ही अत्यंत जटील प्रक्रिया आहे. अशा प्रकारच्या जटील प्रक्रियेत काही तांत्रिक बाबी या संशोधनाची अवजारे म्हणून संशोधकाला उपयुक्त ठरतात. माहिती तंत्रज्ञानातील विकासामुळे काही नवी अवजारे संशोधकाला सहाय्यकारी ठरत आहेत. डिजिटल अर्काइव्हच्या माध्यमातून ऐतिहासिक दस्तावेजांचे आणि वस्तूंचे भावी पिढ्यांसाठी जतन करता येणे शक्य झाले आहे. भारतात आणि महाराष्ट्रात देखील अशी डिजिटल अर्काइव्ह उभे राहत आहेत. या डिजिटल अर्काइव्हचा इतिहास संशोधकांना मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.

ज्या समूहांची लिखित साधने उपलब्ध नाहीत त्या समूहांबाबतच्या संशोधनासाठी त्यांची मौखिक साधने उपयोगी ठरतात. ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफितीद्वारे पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होणाऱ्या माहितीला जतन करता येते. नजीकच्या भूतकाळातील किंवा समकालिन विषयाच्या संशोधनाकरिता मुलाखत पद्धत उपयुक्त ठरते. मुलाखत घेताना खूप काळजी घ्यावी लागत असली तरी मुलाखत हे ऐतिहासिकदृष्टया महत्वाची माहिती मिळवण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

टिपण काढण्याची पद्धत ही संशोधकाला त्याचे संदर्भ साहित्याची जुळवाजुळव करताना उपयोगी पडणारी पद्धत आहे. योग्य पद्धतीने टिपण घेतल्यास संशोधकाचे वायफळ खर्च होणारा वेळ मोठ्या प्रमाणात वाचतो. संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर देखील संशोधकास त्याची संदर्भ ग्रंथ सूची आणि तळटीपा बनवण्यात अत्यंत उपयोगी ठरते. आदिम काळापासून समाजात घडत गेलेले नव-नवीन बदल संग्रहालयातील प्रदर्शित वस्तूंच्या माध्यमातून प्रतित होतात. संग्रहालयातील प्रत्येक वस्तू त्या-त्या काळाचा इतिहास प्रतिपादित करते, त्या इतिहासाचे प्रतिनिधीत्व करते. वस्तूंच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व कलाविषयक प्रगतीचे, बदलाचे, संक्रमणाचे टप्पे समजून घेण्यास मदत होते.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

१) डिजिटल अर्काइव्हचे प्रकार आणि स्वरूप सांगा.

२) मुलाखत पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करून त्यांचे मूल्यमापन करा.

३) टिपण बनवायच्या विविध पद्धतींच्या गुण-दोषांची चर्चा करा.

४) संग्रहालयामधून प्रतीत होणारा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक इतिहास उदाहरणासह स्पष्ट करा.

५) संग्रहालयातून इतिहास कसा प्रतिबिंबीत होतो ते स्पष्ट करा.

**(ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)**

१) मौखिक साधने.

२) मुलाखत पद्धतीचे प्रकार.

३) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर.

४) संग्रहालयांची बदलती भूमिका.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


* **Shaikh Ali, B. :** *"History : Its Theory and Method"*, Manohar Publication, Delhi, 1979.
* **कोठेकर शांता :** *''इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान''*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११.
* **सरदेसाई, बी. एन. :** *''इतिहास लेखन पद्धती''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००४.
* **गायकवाड, आर. डी., सरदेसाई, बी. एन., हनमाने, व्ही. एन. :** *''इतिहास लेखनशास्त्र''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.


❑ ❑ ❑